16-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SKK/ 12:00

16-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SKK/ MAP/ SBT/ 12:00

सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी. व मु.शी : तोंडी उत्तरे

उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी संख्येअभावी बंद पडलेली तुकडी त्याच तत्वावर मंजूर करणे

(1) * 24386 श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे दिनांक 21 जुलै, 2006 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या अकरावी यादीतील प्रश्न क्रमांक (11) ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील बंद पडलेल्या वर्ग तुकड्या पुर्ववत पुन्हा त्याच शाळेत / संस्थेत मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक 14 जून, 2006 अन्वये निर्गमित झाला आहे काय, हे खरे आहे काय,

(2) माध्यमिक शाळेच्या बंद पडलेल्या तुकड्या पुन्हा मंजूर करण्याबाबतच्या दिनांक 19 जुन, 2003 च्या शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही झालेल्या वर्ग / तुकड्यांनी मंजूरी देण्याच्या संदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(3) असल्यास, सन 2005 ते 2007 या वर्षात किती वर्ग / तुकड्यांना शासन मंजुरी दिलेली आहे,

(4) दिलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता: (1) होय.

(2) माध्यमिक शाळेत बंद पडलेल्या तुकड्या पुनर्जिवित करणेविषयीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(3) उच्च माध्यमिकच्या दोन तुकड्यांना मंजूरी दिली आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जी.एल.अैनापूरे : सभापती महोदय, विना अनुदानित शाळा नको तेथे देण्याबाबतच्या शासनाच्या धोरणामुळे आणि दुसऱ्या काही कारणांमुळे बऱ्याचशा शाळांच्या तुकड्या कमी व्हायला लागलेल्या आहेत. अनुदानित तुकड्या कमी झालेल्या आहेत. काही शाळांच्या तुकड्या कमी झाल्या काही तुकड्या वाढल्या. त्या कमी झालेल्या तुकडया त्याच शाळेत देण्यासंबंधी शासन निर्णय दिनांक 14 जून 2006 रोजी निर्गमित केला. या निर्णयाची अंमलबजावणी मात्र खालच्या स्तरावर फारशी झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे. याची अंमलबजावणी का झाली नाही ? याला कोण जबाबदार आहे ? याची चौकशी शासन करणार आहे काय ? यासबंधीचा वेळीच निर्णय न घेतल्यामुळे शिक्षक अतिरिक्त झालेले आहेत. शिक्षकांच्या सेवेची खात्री देण्यासाठी शासन धोरणात्मक निर्णय जाहीर करेल काय ? आतापर्यन्त ज्या तुकड्या चालू होत्या, त्यापैकी किती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23386.....

श्री.जी.एल. अैनापुरे.....

तुकड्या बंद पडलेल्या आहेत ? बंद पडलेल्या तुकड्या त्याच संस्थेला देण्यात आलेल्या आहेत काय ? असल्यास, हेच धोरण सर्वसाधारण सर्व स्तरावर शासन राबवेल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : ज्या संस्थांच्या तुकड्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या अभावी बंद पडलेल्या आहेत त्यांच्याबाबतीमध्ये शासनाने तीन वेगवेगळी परिपत्रके काढलेली आहेत. दिनांक 13 ऑगस्ट 2004, त्यानंतर 5 ऑगस्ट 2005, त्यानंतर 14 डिसेंबर 2006 अशी परिपत्रके काढलेली होती. यामध्ये संदिग्धता होती, म्हणून त्याच शाळेमध्ये दोन वर्षाच्या आत विद्यार्थी संख्या होणार असेल तर बंद पडलेल्या तुकड्या पुनर्जिवित करण्याचा निर्णय विचाराधीन आहे. अशाप्रकारे एकूण 50 संस्थांच्या तुकड्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्या तुकड्या लवकरात लवकर पुनर्जिवित करण्यात येतील. याबाबतची सगळ्या ठिकाणी कार्यवाही का झाली नाही, याची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माध्यमिक, उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयातील बंद पडलेल्या वर्ग तुकड्या पूर्ववत पुन्हा त्याच संस्थेत मंजूर करण्याबाबततचा शासन निर्णय दिनांक 14 जून,2006 रोजी निर्गमित झालेला आहे हे खरे आहे का ? असा प्रश्न विचारलेला होता. या अनुषंगाने उत्तर दिलेले आहे की, "माध्यमिक शाळेत बंद पडलेल्या तुकड्या पुनर्जिवित करणेविषयीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. " त्या अगोदच शासन निर्णय दिनांक 12 डिसेंबर 2002 आणि 11 ऑगस्ट 2004 रोजी सुधारित शासन निर्णय काढला. विद्यार्थ्यांच्या संख्येअभावी बंद पडलेल्या तुकड्या पुन्हा त्याच संस्थांच्या शाळांना देण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे पाठविलेले आहेत, त्यावर शासनाने काय विचार केलेला आहे ? आतापर्यन्त किती प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : 50 संस्थांच्या तुकड्यांना मान्यता देण्याबाबत ताबडतोब निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, शिक्षण विभागाचे जी. आर. काढण्याचे सत्र अव्याहत चालू आहे. प्रत्येक विषयामध्ये "जी. आर. काढला आहे", "विचाराधीन आहे", "लवकरात लवकर करु" याच्या पलीकडे माननीय मंत्रिमहोदय काहीही उत्तर देत नाहीत. आपण नेहमी ऐकता. या गोष्टीचा कोठे तरी गांभीर्याने विचार झाला पाहिजे. शासन जी.आर. काढते पण त्यांची अंमलबजावणी शासन करीत नाही. शिक्षकांना वेठीस धरतात, विद्यार्थ्यांना वेठीस धरतात आणि प्रत्येक वेळी "विचाराधीन आहे" हेच उत्तर असते. जे जी. आर. काढलेले आहेत त्याप्रमाणे अंमलबजावणी का झाली नाही ? त्या तुकड्या परत देण्याचा जी. आर. काढलेला आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, उच्च माध्यमिकच्या दोन तुकड्यांना मंजुरी दिली आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जेवढ्या तुकड्या बंद पडल्या त्यापैकी 2 तुकड्या परत दिलेल्या आहेत आणि ही बाब विचाराधीन आहे, लवकरात लवकर करु असे उत्तर दिलेले आहे. लवकरात लवकर म्हणजे कधी मिळणार ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे एकूण तीन शासन निर्णय घेतले त्यामध्ये संदिग्धता होती. याबाबत कायम चांगला निर्णय व्हावा म्हणून पुढच्या अधिवेशनात हा प्रश्न निर्माण होणार नाही अशा प्रकारची कार्यवाही शासन निश्चितपणे करील.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, तीन निर्णय घेतले असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. माझ्या माहितीप्रमाणे एकूण 8 निर्णय आहेत. परंतु एका निर्णयाची तंगडी दुसऱ्या निर्णयामध्ये घातलेली आहे. निर्णय घेत असताना अधिकाऱ्यांना स्पष्टपणे सांगावे. शासनाने या ठिकाणी उत्तर दिलेले आहे की, 14 जून, 2006 चा जो निर्णय आहे तो आजही कायम आहे. या कायम करण्याच्या संदर्भात जे प्रस्ताव पाठविले त्यामध्ये 50 प्रस्ताव आले आणि दोनच्या बाबतीत मंजुरी दिली. 5 ऑगस्ट, 2005 आणि 11 ऑगस्ट, 2004 चे जे निर्णय आहेत ते पुनरुज्जीवित केल्याशिवाय त्यांना न्याय मिळणार नाही. आज महाराष्ट्रामध्ये जवळजवळ शेकडो शिक्षक सरप्लस आहेत. त्यांना काम न करता पगार मिळतो. तुकड्या काढताना जे बजेटेड आहे ते तसेच्या तसे पुढे देण्याबाबत आपण जे म्हणत होतो तसा निर्णय शासन तातडीने घेणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : जी तीनही परिपत्रके आहेत ती खरोखर संदिग्ध आहेत. त्यामुळे एक चांगले परिपत्रक लवकरात लवकर काढू. हे अधिवेशन संपण्यापूर्वी किंवा एक महिन्यामध्ये शासन हा निर्णय घेईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

ता.प्र.क्र. 24386 .....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये यासंदर्भात चर्चा झालेली होती. ज्या अनुदानित तुकड्या बंद पडत आहेत आणि त्या अनुदानित तुकड्या दुसऱ्या शाळेमध्ये सुरु होत असतील किंवा त्याच संस्थेच्या शाळेमध्ये सुरु होत असतील तर ते देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तुकड्या बंद करण्याच्या वेळी शिक्षण उपसंचालक आणि शिक्षण अधिकारी यांच्याकडून निर्णय होतो. मागच्या अधिवेशनमध्ये शासनाने मान्य केले होते. तुकड्यांना पुन्हा परवानगी देण्याचे अधिकार शासनाकडे घेतलेले आहेत. त्याच्या ऐवजी तुकड्या बंद करण्याचा निर्णय शिक्षण अधिकारी किंवा शिक्षण उपसंचालक घेत असतील तर त्यांनी तुमच्याकडे प्रस्ताव पाठविण्याऐवजी संबंधित शिक्षण अधिकारी आणि संबंधित शिक्षण उपसंचालक यांना हे अधिकार डेलिगेट करणार काय ? त्यामुळे दोन दोन वर्षे हे प्रस्ताव प्रलंबित राहणार नाही. हा निर्णय शासन तातडीने घेणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे अधिकार शिक्षण संचालकांकडे देण्याचा निर्णय घेण्याच्या मन:स्थितीमध्ये शासन आहे. परंतु एकदा मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हा निर्णय झाल्यामुळे पुन्हा मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर हा विषय घेऊन शिक्षण उपसंचालकांकडे हे अधिकार द्यावयाचे आणि शासनाने मॉनिटरींग करावयाचे असे शासनाचे धोरण आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माझे असे स्पष्ट म्हणणे आहे की, हे सर्व शासन निर्णय पाहिले तर शासनाची नियत स्पष्ट आहे. यामध्ये अनेक कारणे आहे. एका गावात दोन-चार शाळा काही कारणाने देऊन टाकल्या असतील. बंद झालेल्या ज्या तुकड्या आहेत त्या तुकड्या त्या ठिकाणी संख्या होत असेल तर त्या ठिकाणी द्यावयाच्या, नाही तर बाजूच्या शाळेला द्यावयाच्या असे स्पष्ट धोरण आहे. एका मागोमाग एक असे 8 जी.आर. काढले. शासनाने सचिव सेवक असे पद निर्माण केले आहे काय ? त्यांना जी. आर. सुध्दा बरोबर काढता येत नाही. दर दोन महिन्यांनी जी. आर. दुरुस्त होतो. 14 जून, 2006 चा जो शासन निर्णय आहे त्यामध्ये हे धोरण मान्य केले आहे की, ज्या शाळेची तुकडी बंद झाली असेल त्या ठिकाणी अनुदान तत्वावर वर्ष सहा महिन्यात पुन्हा संख्या झाली असेल तर त्यांना तुकडी द्यावयाची.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेथे दिली नसेल तर बाजूला जी शाळा असेल तेथे ती तुकडी द्यावयाची आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की या बाबतीत 1 महिन्याच्या आत निर्णय घेतला जाईल काय ?

प्रा. वसंत पुरके : हा तुकड्यांचा प्रश्न निश्चितच गंभीर आहे. या प्रश्नाच्या बाबतीत दोन-तीन क्लिष्ट बाबी निर्माण झालेल्या आहेत. यासंदर्भात काढलेले जी.आर. संदिग्ध आणि एकमेकांत गुंतागुंत निर्माण करणारे आहेत. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीत सुस्पष्ट जी.आर. आम्ही काढणार आहोत. दोन वर्षामध्ये त्या शाळेतील तुकडी बंद झाली असेल तर त्या शाळेला किंवा लगतच्या शाळेला ती तुकडी दिली पाहिजे. शिक्षकालाही संरक्षण मिळाले पाहिजे. हे अधिकार मंत्रालय पातळीवर असल्यामुळे दोन वर्षाच्या कालावधीत जे प्रस्ताव सादर केलेले असतील त्याबाबतीत कालापव्यय होऊ नये म्हणून शिक्षण संचालक किंचा उप संचालकांकडे हे अधिकार दिले गेले पाहिजेत हे मान्य आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील विशेषत: सांगलीतील नद्यांचे पाणी प्रदुषणमुक्त करण्याबाबत

(२) * २६५८७ श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड तारांकित प्रश्न क्रमांक २२१४७ ला दिनांक ७ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय पर्यावरण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रदुषित झालेल्या नद्या प्रदुषणमुक्त करण्यांसदर्भात सांगली शहराचे सुरु असलेले काम पूर्ण झाले आहे काय,

(२) उक्त प्रश्नी करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) उक्त प्रश्नी करण्यात येत असलेली कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री. गणेश नाईक : (१) नाही.

(२) सदर योजनेतंर्गत सांडपाणी अडविणे व वळविणे या उपकामाची मुदत दिनांक ३१.३.२००७ पर्यंत आहे. परंतु सद्य:स्थिती काम पुर्ण होण्यास आणखी काही महिने लागतील याची प्रामुख्याने कारणे खालील प्रमाणे :

मंजूर योजनेत केंद्र शासनाने सुचविलेले बदल, प्रत्यक्ष काम करताना झालेले तांत्रिक बदल, जागांची उपलब्धता, सुधारीत अंदाजपत्रकांना मंजूरी अप्राप्त व त्यानुसार असणारी निधीची अनुपलब्धता यामुळे योजनेची कामे पुर्ण करण्यास अधिक कालावधी लागण्याची शक्यता आहे.

(३) योजनेतील कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व स्तरावरुन कार्यवाही करणेत येत आहे.

अ) सुधारीत अंदाजपत्रके केंद्र शासनास मंजूरीसाठी पाठविण्यात आली आहे.

ब) कवलापूर पंपिंग स्टेशनसाठी जागा अद्याप अप्राप्त आहे. सदर जागा ताब्यात मिळण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत प्रयत्न सुरु आहेत.

क) सांगली-मिरज आणि कुपवाडा शहर महानगरपालिकेने त्यांच्याकडील देय रकमेचा हिस्सा अद्याप भरलेला नाही. वरील प्रमुख बाबीबाबत पाठपुरावा सातत्याने सुरु आहे. या सर्व बाबीच्या पुर्ततेवरच योजनेची पुढील अंतिम कार्यवाही शक्य आहे.

प्रा. शरद पाटील : प्रश्नाच्या उत्तरामध्ये विसंगती आणि संदिग्धता आहे. सांडपाणी अडविणे व वळविणे या उपकामाची मुदत 31.3.2007 पर्यन्त असून काम पूर्ण होण्यास काही महिने लागतील, त्यासंबंधीची कारणे उत्तरामध्ये नमूद केलेली आहेत. उत्तरामध्ये मुख्य काम आणि उपकाम याबाबता खुलासा दिलेला नाही. या कामास प्रत्यक्षात सुरुवात झालेली आहे काय ? "अंदाजपत्रकांना मंजुरी अप्राप्त" असेही उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. तेव्हा अंदाजपत्रकाच्या मंजुरी अभावी कामास सुरुवात करण्यात आलेली आहे काय ? हे काम पूर्ण

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होण्यास निश्चित किती कालावधी लागेल ? सुधारित अंदाजपत्रके केन्द्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्याची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक : या योजनेवर फेब्रुवारी 2007 पर्यन्त 1463 लाख रु. खर्च झालेला असून 60 टक्के काम पूर्ण झालेले आहे. केन्द्र शासनाच्या सूचनेनुसार या शुध्दीकरण केन्द्राची क्षमता वाढविलेली आहे. त्यामुळे कामाची किंमत देखील वाढलेली आहे. सिमेंट व स्टीलच्या किंमती वाढल्यामुळे अधिक निधीची मागणी केलेली आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतर काम गतीने करण्याच्या अनुषंगाने पावले टाकली जातील.

प्रा. शरद पाटील : या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. गणेश नाईक : हा सांगली शहराचा भाग आहे. तेथील नाल्यावर पक्का बंधारा बांधणे हे पहिले काम आहे. हे काम झाल्यानंतर 17 कि.मी. लांब असलेल्या झुलगाव या ठिकाणी सांडपाणी शुध्दीकरण केन्द्र उभारुन शुध्द केलेले पाणी 530 हेक्टर जमिनीला सिंचनासाठी द्यावयाचे आहे. कामाची मूळ किंमत 2555.29 लाख रु. आहे. त्यामध्ये पाणी अडविणे, सांडपाणी पक्रिया केन्द्र उभारणे, भूसंपादन अशा तीन कामांचा समावेश आहे. भूसंपादनाचा खर्च 55.95 लाख रु. आहे. हा खर्च महापालिकेने करावयाचा आहे. ज्या ठिकाणी शुध्दीकरण संयंत्र उभारावयाचे आहे तेथील लोकांनी त्यास विरोध केलेला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे सीईओ हे ती जागा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. कामाची मूळ रक्कम 2107 लाख रु. असून सुधारित रक्कम 2678.83 लाख रु. इतकी आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आतापर्यंत 85 टक्के काम पूर्ण झाले असून रु.1117.42 लक्ष एवढा खर्च झालेला आहे. ही सर्व कामे 31.3.2007 पर्यंत पूर्ण करावयाची होती. परंतु अधिक क्षमता वाढविल्यामुळे आणि बांधकामाच्या मालाचे दर वाढल्यामुळे पुन्हा सुधारित अंदाजपत्रक पाठविण्यात आले असून त्या अंदाजपत्रकास मान्यता घेण्याच्या अनुषंगाने प्रयत्न सुरु आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा अतिशय मुलभूत स्वरुपाचा प्रश्न आहे. या प्रश्नाची मर्यादा किंवा कक्षा संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू होते. यादृष्टीने सन्माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे की, अनेक शहरांमध्ये, अनेक गावांमध्ये नदीचा प्रवाह गावाजवळून जातो त्या ठिकाणी सांडपाणी नद्यांच्या प्रवाहामध्ये सोडून दिले जाते. परिणामी नद्यांचे पाणी प्रदुषित होते. पर्यायाने गावाला शुध्द पाणी मिळत नाही. ही व्यथा आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आहे. अशाच प्रकारची चर्चा चिपळूण येथील लोटे परशुराम आद्योगिक वसाहतीच्या बाबतीत सभागृहामध्ये झाली. तेथील प्रदुषित पाण्यामुळे लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहामध्ये मान्य केले होते आणि आमदारांचा संयुक्त पाहणी दौरा आयोजित करुन प्रत्यक्षात कोणत्या उपाययोजना करता येतील या विषयी अभ्यास करु आणि त्यानंतर शिफारशी करुन त्यांची अंमलबजावणी करु असे आश्वासन दिले होते. या योजनेविषयी माहिती देताना मंत्रीमहोदयांनी अनेक कारणे दिली. ती मला न पटणारी आहेत. त्यांचा पाठपुरावा व्हावयास पाहिजे. केवळ जीवनमरणाचा प्रश्न असे म्हणून भागणार नाही. शासकीय दिरंगाई हेच मुख्य कारण आहे. प्रदुषण प्रत्यक्षात माणसांच्या जीवनाशी निगडित आहे. म्हणून कोणत्याही बाबतीत हलगर्जीपणा किंवा दिरंगाई न करता प्रदुषणाच्या प्रश्नाचा प्राथम्याने विचार करुन त्यावर उपाययोजना करणार आहात का? शेवटी पर्यावरण विभाग हा महत्वाचा विभाग आहे. प्रदुषण मुक्त हा मुख्य उद्देश आहे, प्रदुषण वाढविणे हा उद्देश नाही. या विभागाचा कारभार मंत्रीमहोदयांनी हाती घेतल्यापासून किती ठिकाणचे प्रदुषण थांबले आणि किती ठिकाणी निर्माण झाले? शेवटचा प्रश्न असा आहे, चिपळूण येथील लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीच्या प्रश्नासंबंधी संयुक्त पाहणी दौरा केव्हा आयोजित करणार आहात?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26587.....

श्री.गणेश नाईक : माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. अनेक शहरातील सांडपाणी नद्यांमध्ये सोडल्यामुळे प्रदुषण होते ही बाब अतिशय सत्य आहे. महानगरपालिका, नगरपालिका आणि छोट्या गावांमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते सोडण्याची परिपूर्ण यंत्रणा नाही. बऱ्याच नगरपालिका व महानगरपालिकांनी असे प्रक्रिया केंद्र उभारण्याची आर्थिक क्षमता नसल्याचे स्पष्ट केले आहे. या प्रश्नासंबंधी Special purpose vehicle अशा प्रकारची कंपनी स्थापन करुन त्या त्या शहरातील सांडपाणी आणि त्या सांडपाण्याची एकूण क्षमता गृहित धरुन काही खाजगी कंपन्यांना आमंत्रित करण्याचा विचार आहे. जेणेकरुन त्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ज्याप्रमाणे पिण्याच्या पाण्याकरीता दर आकारला जातो त्याच धर्तीवर सांडपाणी प्रक्रिया दर आकारण्याचा उद्देश आहे. जेणेकरुन वरच्या शहरातील सांडपाणी नद्यांमध्ये सोडल्यामुळे खालच्या भागातील शहराला प्रदुषित पाण्याचा पुरवठा होतो त्यामध्ये सुधारणा होऊ शकेल. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे पर्यावरण खात्याची ही जबाबदारी आहे हे मान्य आहे व हे खाते फार महत्वाचे आहे. म्हणूनच प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली महसूल सचिव, विविध विभागांचे सचिव, आयुक्त, जिल्हाधिकारी यांची बैठक होऊन या उपाययोजनेला निश्चित स्वरुप देण्याच्या अनुषंगाने तज्ञ कंपन्यांकडून माहिती मागविली आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्या अहवालाचा अभ्यास केल्यानंतर मंत्रिमंडळासमोर ठराव सादर केला जाईल. मंत्रिमंडळाने संमती दिल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. चिपळूण येथील लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीमध्ये निर्माण झालेल्या प्रदुषणाच्या प्रश्नासंबंधी मी स्वत: सभागृहात संयुक्त पाहणी करण्याचे आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे संबंधित सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात आले होते. परंतु त्याच काळात अनेक सन्माननीय सदस्य परदेश दौ-यावर गेले होते, काही काळानंतर महानगरपालिका व नगरपालिका, जिल्हा परिषदा यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला. आता विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाले आहे. परंतु अधिवेशन समाप्तीनंतर निश्चितपणे संयुक्त पाहणी दौरा आयोजित करण्यात येईल.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

राज्यातील रात्रशाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांच्या मागण्याबाबत

(३) * २४३९९ श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. श्रीकांत जोशी , श्री. प्रतापराव सोनवणे अतारांकित यादी क्रमांक १५ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक १३५७७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्रशाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांच्या मागण्या तपासण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप मागण्या तपासण्याचे काम पूर्ण झाले नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता : (१), (२) व (३) राज्यातील रात्रशाळांतील शिक्षकांच्या मागण्यासंदर्भात दिनांक २३.११.२००६ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे रात्रशाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांच्या मागण्यांच्या अनुषंगाने शिक्षण सहसंचालक (माध्यमिक) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात येत आहे. रात्रशाळा शिक्षक संघटनेने त्यांच्या ज्या काही सूचना असतील त्या सदर संस्थेकडे पाठवाव्यात आणि त्यावर समितीने आपला अहवाल शासनास सादर करावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील रात्रशाळांमध्ये काम करणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचा-यांना सुविधा देण्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. दिनांक 16 डिसेंबर, 2005 रोजी नागपूर मध्ये या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा झाली होती. 11 महिने उलटून गेल्यानंतर सुध्दा याबैठकीच्या संदर्भात काहीही निर्णय झालेला नाही. तसेच दिनांक 23 डिसेंबर 2006 रोजी झालेल्या बैठकीमध्ये रात्रशाळेमध्ये काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनवाढीच्या, घरभाडेभत्त्याच्या तसेच त्यांना अन्य सुविधा देण्याच्या संदर्भात चर्चा झाली होती. त्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला होता की, या प्रश्नाच्या संदर्भात सहसंचालकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात येईल. उत्तरामध्ये सांगण्यात आलेले आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात विचार करण्यात येत आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, शिक्षण सह संचांलकांच्या अध्यक्षतेखाली रात्रशाळा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात समिती गठीत झालेली आहे काय? समिती गठीत झाली नसेल तर ही समिती किती दिवसात गठीत होणार आहे? तसेच ही समिती रात्रशाळांतील शिक्षकांच्या संदर्भातील सर्व अभ्यास करुन आपला अहवाल शासनाला किती दिवसात सादर करणार आहे?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 24399 .....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दिनांक 23.11.2006 रोजी जी चर्चा झाली होती त्या चर्चेप्रमाणे कालच यासंदर्भातील बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली रात्रशाळेचे संघटनेचे प्रतिनिधी तसेच 3-4 सन्माननीय सदस्यांना या समितीमध्ये घेतले जाईल. दोन महिन्याच्या कालावधीत या समितीला शासनास अहवाल सादर करावयाचा आहे. अहवाल आल्यानंतर सर्व मागण्यांच्या संदर्भात कार्यकक्षा ठरवून देण्यात येतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, संपूर्ण राज्यातील रात्रशाळेपैकी मुंबई रात्रशाळांची संख्या अधिक आहे. ज्या ठिकाणी रात्रशाळा आहेत त्या ठिकाणी नेहमीच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे रिक्त ठेवली जातात तसेच या ठिकाणी अननुभवी शिक्षकांची नेमणूक केली जाते. रात्रशाळांमध्ये अनुभवी, तज्ञ शिक्षक नेमणे आवश्यक आहेत तसेच शिक्षकांचे एकही पद रिक्त ठेवता कामा नये कारण या रात्रशाळांमध्ये गरीब तसेच दिवसा काम करुन रात्री शिक्षण घेण्यासाठी मुले येत असतात त्यामुळे रात्रशाळांमध्ये अनुभवी शिक्षक नेमण्याची आवश्यकता आहे. तसेच रात्रशाळांमध्ये शिक्षकांऐवजी शिक्षण सेवकांची पदे भरली जातात ही जी पध्दत सुरु केली आहे ती बंद केली जाणार आहे काय? तसेच मुंबईमध्ये जागेचे दर मोठया प्रमाणात वाढत असल्यामुळे ज्या ठिकाणी रात्रशाळा आहेत त्या ठिकाणी पटसंख्या, निकाल याचे कारण दाखवून या रात्रशाळा बंद करुन जागा हडपण्याचा प्रयत्न केला जात आहे त्यावर निर्बंध आणले जाणार आहेत काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, संपूर्ण राज्यात रात्रशाळांची संख्या 184 असनू त्यापैकी 136 रात्रशाळा केवळ मुंबईतच आहेत. या रात्रशांळामध्ये कामगारांची मुले तसेच दिवसा काम करुन रात्री स्वत: शिकणारी मुले येत असतात. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे मुंबईत जागेचे वाढते दर पाहून रात्रशाळा बंद करण्याचा कोणी प्रयत्न केला तर तो हाणून पाडला जाईल. तसेच रात्रशाळा बंद करुन त्या जागेचा इतर कामासाठी उपयोग करु दिला जाणार नाही. जे विद्याथी रात्रशाळेमध्ये प्रवेश घेतात त्या शिक्षण देण्याची, अनुभवी शिक्षक देण्याची जबाबदारी आपली आहे. तसेच रात्रशाळेच्या शिक्षकांच्या संदर्भात समिती गठीत झाली असून त्या समितीचा अहवाल शासनास दोन महिन्यात सादर होणार आहे. हा अहवाल आल्यानंतर शासन यासंदर्भात योग्य तो निर्णय घेईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 24399 .....

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले होते की, यासंर्भात उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली जाईल परंतु, आता ही समिती उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली न नेमता संचालकांच्या अध्यक्षतेखाली नेमली जाईल तसेच या समितीमध्ये सन्माननीय सदस्यांचाही समावेश करण्यात आलेला आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. रात्रशाळेमध्ये जे शिक्षक शिकवतात त्यांच्यावर वर्कलोड कमी असतो, त्यांचा दर्जा कमी असतो म्हणून शासन या शिक्षकांना भविष्य निर्वाह निधी तसेच घरभाडे भत्ता देत नाही का ? रात्रशाळा आणि शाळेतील शिक्षकांमध्ये आपण अशा प्रकारचा फरक का केलेला आहे? रात्रशाळेमध्ये शिकविणारे शिक्षक अधिक मेहनत करुन अधिक कष्ट करुन विद्यार्थ्यांना शिक्षण देत असतात त्यामुळे शासन रात्रशाळेतील शिक्षकांवर जो अन्याय करीत आहे तो अन्याय त्वरित दूर करणार आहे काय? तसेच या शिक्षकांना पूर्व लक्ष प्रभावाने फायदा देण्याच्या संदर्भात शासन काही प्रयत्न करणार आहे काय? तसेच रात्रशाळेतील शिक्षकांच्या संदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय आहे?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24399.....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे राज्यातील रात्रशाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी एक समिती घटित केलेली आहे. ती समिती दोन महिन्यात अहवाल देणार आहे. रात्रशाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांना चांगल्या सुविधा कशा देता येईल यासाठी ही समिती नेमलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, रात्रशाळांच्या संदर्भात शालेय शिक्षण सुधार समितीची रचना करण्यात आली होती. या समितीने राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सर्व बाबींचा विचार करुन तत्संबंधीचा अहवाल तत्कालीन शिक्षणमंत्री कै.सुधाकरराव नाईक यांच्याकडे दिनांक 26 जुलै 1984 रोजी दिला होता. या समितीमध्ये शिक्षण राज्यमंत्री श्रीमती पार्वती मलगोंडा, शिक्षण उपसचिव नागपुरे, इत्यादी सदस्य होते. त्या समितीने रात्रशाळांच्या संदर्भात कोणत्या शिफारशी केल्या होत्या त्याची माहिती मंत्रिमहोदय सदनाला देतील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्या संदर्भातील माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, रात्रशाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांना पूर्ण वेतन, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन इत्यादीचा अहवाल देण्यासाठी समिती गठित करण्यात आलेली आहे. समिती दोन महिन्यांत अहवाल सादर करणार आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, रात्रशाळा आणि सकाळच्या शाळा या कष्टकरी आणि श्रमिकांच्या मुलांना शिक्षण उपलब्ध करुन देणा-या माध्यम आहेत. स्वातंत्र्यपूर्व पासून मुंबईत रात्रशाळा सुरु आहेत. रात्रशाळेत शिकविणारे एक शिक्षक श्री.आठरे गुरुजी हे विधानसभेवर निवडून आले होते. आज त्यांचे वय जवळपास 90-92 असेल. जे कष्टकरी मुले आहेत ती फक्त रात्रशाळांमध्ये शिक्षण घेऊ शकतात. तेव्हा अशा विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी चांगल्या शिक्षकांची नियुक्ती होणे गरजेचे आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी आता सांगितले की, रात्रशाळांतील शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी समिती नेमलेली आहे. त्यांना माहीत होते की, आता अधिवेशन सुरु होणार आहे आणि हा प्रश्न नक्कीच उपस्थित होणार, तेव्हा समिती नेमलेली आहे असे उत्तर दिल्याने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24399.....

श्री.मधुकर सरपोतदार.....

आपला प्रश्न सुटणार आहे. रात्रशाळांबाबत सरकारला आपुलकी, जिव्हाळा, आस्था वाटत नाही. दुसरे असे की, रात्रशाळांच्या जागांसंदर्भात कोणते प्रश्न आहेत याची माहिती मंत्रिमहोदयांकडे उपलब्ध नाही. मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, रात्रशाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांच्या संदर्भात समितीसमोर कोणते विषय आहेत त्याची माहिती मंत्रिमहोदयांनी पटलावर ठेवावी जेणेकरुन सदस्यांना देखील काही सूचना करता येतील. तेव्हा ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अधिवेशन संपण्यापूर्वी ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, रात्रशाळांमध्ये शिकविणारे शिक्षक हे सामाजिक जीवनातील महत्वाचे घटक आहेत. दलित कामगारांची मुले किंवा रोजदारीवर काम करणारी कुटुंबे यांची मुले या शाळेत शिक्षण घेतात. या मुलांना चांगले शिक्षण द्यावयाचे असेल तर त्यासाठी चांगल्या शिक्षकाची नेमणूक करणे आवश्यक आहे. दुसरे म्हणजे सुप्रीम कोर्टाचा असा निर्णय आहे की, एक माणूस एक काम करीत आहे आणि दुसरा माणूस सुध्दा तेच काम करीत असेल तर त्या दोघांना मिळणाऱ्या सुविधांमध्ये विषमता असू नये. असे असताना सकाळच्या शाळेमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांना एक न्याय आणि रात्रशाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांना दुसरा न्याय असा भेदभाव शासन का करीत आहे ? रात्रशाळा सुरु न ठेवण्याचा शासनाचा उद्देश आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, रात्रशाळा सुरु ठेवण्याचा शासनाचा उद्देश आहे. म्हणून रात्रशाळांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांच्या मागण्यांसंदर्भात विचार करण्यासाठी समिती नेमली आहे. त्या समितीपुढे रात्रशाळांतील शिक्षकांना पूर्णवेतन , महागाई वेतन, भविष्य निर्वाह निधी देण्याबाबत तसेच त्यांना वरिष्ठ श्रेणी व निवड पूर्वलक्षी प्रभावाने मिळणे इत्यादी बाबीं आहेत. रात्रशाळा सुरु ठेवण्याची शासनाची मानसिकता असल्यामुळे समितीपुढे हे विषय दिलेले आहेत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : मग, समिती कशाला पाहिजे ? हे आम्ही करणार आहोत, असे आपण जाहीर करुन टाकावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यामुळे किती बोजा पडणार आहे ? विद्यार्थी किती आहेत ? हे सर्व पहावे लागेल.

सभापती : आपण ज्यावेळी या प्रश्नाच्या निर्णयाप्रत पोहचाल त्यावेळी रात्रशाळांमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी किंवा शिक्षकांच्या बाबतीत याठिकाणी सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, त्या लक्षात घेऊन निर्णय व्हावा यादृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी प्रयत्न करावेत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ठीक आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, लोडशेडींग असल्यामुळे रात्रशाळा कशा चालणार ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, लोडशेडींग असल्यामुळे रात्रीच्या शाळा कशा चालणार ? असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. याबाबत मी सांगू इच्छितो की, ज्या ठिकाणी मोठया शाळा असतील त्याठिकाणी जनरेटरची व्यवस्था करण्यात येईल व बाकीच्या ठिकाणी कंदिलाची व्यवस्था करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुणे जिल्ह्यातील बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा नगरातील स्वयंसिध्द शिबिरात झालेली विषबाधा

(४) * २७२४३ श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. श्रीकांत जोशी , श्री.सय्यद पटेल , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा नगरीत आयोजित करण्यात आलेल्या स्वयंसिध्द शिबिरात सहभागी झालेल्या जवळ जवळ ६०० जणांना ८ डिसेंबर, २००६ रोजी अन्नातून विषबाधा होण्याची घटना उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता : (१), (२), (३) व (४) पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा नगरी येथे दिनांक १ ते १० डिसेंबर, २००६ या कालावधीत स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण १७६ प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेतला होता. यापैकी दिनांक ५ डिसेंबर, २००६ रोजी ६४ प्रशिक्षणार्थीनी दुपारचे जेवण केल्यानंतर रात्री पोटदुखीचा त्रास सुरु झाल्याची तक्रार केल्यामुळे त्यांना उपचाराकरीता खाजगी रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले. यापैकी दोन प्रशिक्षणार्थी वगळता ६२ प्रशिक्षणार्थींना औषधोपचार केल्यानंतर त्याच दिवशी वसतिगृहात पाठविण्यात आले व उर्वरित दोघांना दुसऱ्या दिवशी बरे वाटल्यानंतर सोडण्यात आले. सदर प्रकरणाची सखोल चौकशी केल्यानंतर प्रशिक्षणार्थीचे विषबाधेमुळे नाही तर, पाणी, हवामान व भोजन पद्धतीतील झालेला बदल तसेच अवाजवी प्रमाणात व्यायाम यामुळे काही प्रशिक्षणार्थीना पोटदुखीचा त्रास झाला होता असे खाजगी वैद्यकीय अधिकारी व विभागाच्या उपसंचालकांनी चौकशीअंती निष्कर्ष काढला आहे.

श्री.प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक १ मध्ये ६०० जणांचा जो उल्लेख आहे तो मुद्रणदोषामुळे झालेला दिसून येतो. तेथे ६४ हीच संख्या बरोबर आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये मान्य केले आहे की, एकाचवेळी ६४ प्रशिक्षणार्थींनी या शिबिरात जेवण केल्यानंतर त्यांना पोटदुखीचा त्रास सुरु झाला आणि त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. या प्रशिक्षणार्थींना जो त्रास झाला तो नेमक्या कोणत्या कारणामुळे झाला, याचे माननीय मंत्रिमहोदयानी जे उत्तर दिलेले आहे, ते न पटणारे व दिशाभूल करणारे वाटते. तेव्हा, माननीय मंत्रिमहोदय पुन्हा एकदा या प्रकरणाची चौकशी करुन खरे कारण शोधण्याचा प्रयत्न करणार काय ? तसेच असे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कोणत्या उपाययोजना करणार ? असा माझा पहिला प्रश्न आहे. सभापती महोदय, स्वयंसिध्दा प्रशिक्षण शिबीर ही शासनमान्य योजना असून त्यात महिलांना तसेच विद्यार्थीनींना सुदृढतेचे तसेच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाते. निश्चितपणे हा चांगला उपक्रम

...३....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२७२४३....

श्री.प्रतापराव सोनवणे.....

आहे. शासनाने या उपक्रमासाठी अनुदान व निधी उपलब्ध करुन दिलेला असतानाही या शिबिरामध्ये प्रवेश देताना महिलांकडून व विद्यार्थीनींकडून शुक्ल आकारले जाते, असे निदर्शनास येते.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी फक्त प्रश्न विचारावा. या प्रश्नातील मुख्य भाग हा विषबाधेचा आहे, त्यामुळे आपण फक्त त्याच प्रश्नाशी निगडीत प्रश्न विचारावा.

श्री.प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, त्याच प्रश्नाची निगडीत हा प्रश्न आहे. महिलांचा आणि विद्यार्थीनींचा हा विषय असल्यामुळे अशा शासकीय योजनांमध्ये त्यांना नि:शुल्क प्रवेश दिला गेला पाहिजे, अशी माझी मागणी आहे. तेव्हा यापुढे अशा शिबिरांना विद्यार्थीनी व महिलांना नि:शुल्क प्रवेश दिला जाईल, असे माननीय मंत्रिमहोदय जाहीर करतील काय ? असा माझा दुसरा प्रश्न आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा नगरी येथे दिनांक १ ते १० डिसेंबर, २००६ दरम्यान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यात एकूण १७६ प्रशिक्षणार्थींनी भाग घेतला होता, त्यापैकी दिनांक ५ डिसेंबर,२००६ रोजी ६४ प्रशिक्षणार्थींनी दुपारचे जेवण केल्यानंतर त्यांना रात्री पोटदुखीचा त्रास झाला. यामध्ये पोटदुखणे, मळमळ, उलटी अशी कारणे आहेत. त्याठिकाणी मानधनावर डॉक्टर काम करतात. डॉ.श्री व सौ. गरुडकर यांच्याकडे त्यांना ॲडमिट केल्यानंतर व त्यांच्यावर उपचार केल्यानंतर डॉक्टरांनी दोन जणांना सोडून बाकीच्यांना सुट्टी दिली होती. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी विचारले की, हे कारण पटत नाही. परंतु डॉक्टरांचा अशाप्रकारचा अहवाल उप संचालकांमार्फत शासनास प्राप्त झालेला आहे, त्यानुसार खेळाडूंच्या स्नायुंवर अतिरिक्त ताण पडल्यामुळे, तिखट खाल्ल्यामुळे आणि जास्तीचे जेवण केल्यामुळे त्यांना त्रास झालेला आहे, असे डॉक्टरांनीच रिपोर्टममध्ये नमूद केलेले आहे. या कारणांमुळेच त्यांना त्रास झालेला आहे. तसेच, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रवेश देण्यात यावा, अशी सूचना केली. ही सूचना निश्चितपणे तपासून पाहण्यात येईल व यावर निश्चिपणे पॉझिटीव्हली विचार केला जाईल.

...४.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२७२४३....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, तिखट खाल्ल्यामुळे त्यांना त्रास झाला. परंतु हे कारण पटण्यासारखे नाही. त्यामुळे माझी आपल्यामार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, माननीय मंत्रिमहोदय याबाबतीत पुन्हा एकदा चौकशी करणार का ? तसेच, त्याठिकाणच्या भोजनाचे व पाण्याचे नमुने आपण तपासणीसाठी पाठविले होते का ? व डॉक्टर या निर्णयाप्रत कसे काय आले ?

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.27243.....

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी बाब निदर्शनास आणली ती थोडया प्रमाणात खरी आहे. सगळयांनाच तिखटामुळे त्रास झालेला नाही. जे प्रशिक्षणार्थी त्या शिबिरामध्ये आले होते त्यापैकी काही प्रशिक्षणार्थींना कठीण व्यायाम प्रकारांमुळे देखील त्रास झालेला आहे, असे डॉक्टरांच्या अहवालात नमूद केले आहे. त्याचप्रमाणे या दुर्घटनेची बातमी वृत्तपत्रात आल्यानंतर अन्न व औषधिद्रव्ये प्रशासनाच्या अधिका-यांनी घटनास्थळी भेट देऊन आवश्यक ते नमुने गोळा केले असून यामध्येही काही आक्षेपार्ह आढळून आलेले नाही. यावरुन डॉक्टरांनी त्यांच्या अहवालात जी कारणे दिलेली आहेत त्यामुळेच प्रशिक्षणार्थींना त्रास झालेला आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, खेळाडूंना अशाप्रकारचे प्रशिक्षण मिळते म्हणूनच हे खेळाडू राज्य पातळीवर व राष्ट्रीय पातळीवर राज्याचे नांव उंचावतात. अशाच एका प्रशिक्षणामधील प्रशिक्षणार्थींना विषबाधा झालेली आहे. राज्यात होणा-या क्रीडास्पर्धांना किंवा प्रशिक्षण शिबिरांना उपस्थित राहणा-या खेळाडूंना प्रवास, निवास, भोजन व्यवस्था योग्य प्रकारे उपलब्ध होत नाही, असा अनुभव आहे. पाणी, हवामान व भोजन पद्धतीतील झालेला बदल तसेच अवाजवी प्रमाणात व्यायाम यामुळे काही प्रशिक्षणार्थींना त्रास झाल्याचे, लेखी उत्तरात नमूद केले असून हे उत्तर अतिशय व्हेग आहे.. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या संपूर्ण प्रकरणाची शासन पुन्हा एकदा चौकशी करणार काय आणि नेमके काय घडले, हे सत्य उघड करणार काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या संपूर्ण प्रकरणाची क्रीडा संचालकांच्या माध्यमातून नव्याने चौकशी करण्यात येईल.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी असे सांगितले की, जेवण तिखट असल्यामुळे प्रशिक्षणार्थींना त्रास झाला. पदार्थ जर तिखट झाला असेल तर पहिल्या घासातच खाणा-याला समजते व तो पदार्थ नंतर खाल्ला जात नाही. मग प्रशिक्षणार्थींना बळजबरीने तिखट जेवण खाऊ घातले का, तसेच, तिखटाचे प्रमाण जेवण झाल्यानंतर ठरविले की अगोदर ठरविले ? मला असे म्हणावयाचे आहे की, ही जी कारणमिमांसा या उत्तरात दिलेली आहे ती योग्य वाटत नाही. तसेच, रात्रीच्या तिखट जेवणाचा परिणाम केवळ पोटदुखीपर्यन्त मर्यादित राहत नाही तर दुस-या दिवशी सकाळी जास्त त्रास होतो. म्हणून या प्रकरणी नेमके काय घडले आहे, याची माहिती सन्माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी. ..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, एकूण 176 प्रशिक्षणार्थींपैकी फक्त 64 प्रशिक्षणार्थींना त्रास झालेला आहे. वरण, भात, वांग्याची भाजी, पोळी असा जेवणाचा साधा बेत होता. 176 प्रशिक्षणार्थींपैकी 64 प्रशिक्षणार्थींना तिखट फार झोंबले असावे व बाकीच्यांना कमी वाटले असावे, असे वाटते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तिखटाचा प्रश्न सन्माननीय सदस्य, डॉ.वसंतराव पवार यांनी सोडविला आहे. दुपारचे जेवण घेतल्यानंतर रात्री पोटदुखी सुरु झाली. रात्री म्हणजे नेमकी कधी, रात्रीचे जेवण काय होते, अतिरिक्त व्यायाम म्हणजे नेमका कोणता व्यायाम प्रकार केल्यामुळे प्रशिक्षणार्थींना पोटदुखी सुरु झाली ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, लेखी उत्तरामुळे सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. उत्तर सुस्पष्ट व समर्थनीय असावयास हवे, परंतु याबाबतीत दुर्लक्ष झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच संबंधित संचालकांची तात्काळ बदली करण्यात आलेली असून त्यांची राज्याबाहेर बदली करावी, असा प्रयत्न आहे. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे यासंदर्भात निश्चित कार्यवाही करण्यात येईल. प्रशिक्षणार्थींना फिजिकल स्ट्रेस, ॲरोबिक्स वगैरे नेमक्या कोणत्या कारणामुळे त्रास झाला आहे याचा शोध घेतला जाईल व या प्रश्नाला न्याय दिला जाईल.

यानंतर श्री.बोरले.....

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.27243.....

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपण सांगलीला जात असतांना बालेवाडी परिसरातून जात असाल.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. असा कोणता व्यायाम आहे की, ज्यामुळे पोट दुखते.

सभापती : मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांच्या प्रश्नाला उत्तर दिल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांच्या प्रश्नाला उत्तर द्यावे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपण सांगलीला जात असतांना बालेवाडी परिसरातून जात असाल. सन 1992 मध्ये झालेल्या नॅशनल गेम्स कॉम्पीटीशनसाठी ही खास वास्तू उभारली गेली. रस्त्यावरुन जातांना तेथील स्विमींग पूल दिसतो. परंतु आता तेथे 6 फुटाच्यावर उंच गवत वाढलेले आहे. बालेवाडी हे वेस्ट ऑफ पब्लिक मनीचे उत्तम उदाहरण आहे. परंतु आता पुणे जिल्हयातील बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा नगरीतील जॉगिंग ट्रॅक, हॉकीचे मैदान, स्विमींग पूल खराब झालेला आहे. संपूर्ण बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा नगरीची दुरावस्था झालेली आहे. 176 प्रशिक्षणार्थींना अन्नातून विषबाधा झाल्याने ते आजारी पडले आहेत. पुढच्या काळात स्विमींग पुलामध्ये पडून कोणाचा मृत्यू झाला तर त्याचे कोणाला आश्चर्य वाटू नये. पुण्यासारख्या ठिकाणी चांगल्या प्रकारची स्पोर्टस् ॲकॅडमी असतांना शासन त्यासंदर्भात अनास्था का दाखवित आहे ? शासन हे युनिट पुनरुज्जीवीत करणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा नगरीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन 2008 मध्ये कॉमन वेल्थ स्पर्धा पुण्यामध्ये होणार आहेत. त्यासाठी 7 ते 8 कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यासाठी राज्य शासन 2.90 कोटी रुपये खर्च करणार आहे. बालेवाडीमध्ये असणारे जॉगिंग ट्रॅक व इतर सोईसुविधा अद्ययावत करण्याचा प्रयत्न क्रीडा विभागाच्या माध्यमातून होणार आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या माध्यमातून हा खर्च केला जाणार आहे. तसेच, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना मी सांगू इच्छितो की, रोलिंगचे व्यायाम, पाठीवरील व पोटावरील व्यायामामुळे पोटाच्या स्नायूंवर व आतडयांवर ताण पडल्यामुळे मुले आजारी पडली होती.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गडचिरोली जिल्ह्यातील खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षक कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती व वाढीव घरभाडे भत्ता लागू करण्याबाबतचा प्रस्ताव

(5) * 24401 श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड तारांकित प्रश्न क्रमांक 21060 ला दिनांक 7 डिसेंबर, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गडचिरोली व इतर नक्षलबाधित, दुर्गम, आदिवासी विभागात खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षक कर्मचाऱ्यांना शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे "एकस्तर पदोन्नती" व "वाढीव घरभाडे भत्ता" योजना लागू करण्याबाबत वस्तूनिष्ठ माहिती संकलीत करुन शिक्षण संचालकाकडून मागविण्यात आलेला प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,

(2) असल्यास, केव्हा व प्रस्तावाचे स्वरुप काय आहे,

(3) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता : (1), (2) व (3) याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालकांकडून प्राप्त करुन घेण्यात आला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हा प्रश्न सभागृहामध्ये किती वेळा उपस्थित करावयाचा हाच प्रश्न आहे. हा प्रश्न 9 वेळा सभागृहामध्ये चर्चेला आलेला आहे. सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण देणे आवश्यक आहे. मागच्या प्रश्नावरा हा फॉलोअपचा प्रश्न आहे. मागच्या हिवाळी अधिवेशनामध्ये देखील हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. याबाबतची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करुन आवश्यक तो प्रस्ताव शिक्षण संचालकांकडून मागविण्यात येईल असे उत्तर देण्यात आले होते, त्यावर हा फॉलोअपचा प्रश्न आहे. प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, "याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालकांकडून प्राप्त करुन घेण्यात आला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे." मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, शासनाने जी.आर. काढलेला आहे त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, आदिवासी क्षेत्रातील बिकट परिस्थिती, शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी, शासकीय अधिकारी, कर्मचा-यांना त्या भागात काम करतांना येणा-या विविध अडचणींचा विचार करुन तसेच नक्षलग्रस्त/संवेदनशील भागात जीविताची सुरक्षितता लक्षात घेऊन तेथे प्रोत्साहनपर योजना लागू केली. वन विभागातील शासकीय कर्मचा-यांना ही योजना लागू केली. केवळ खाजगी शाळेतील शिक्षकांना योजना लागू झालेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, शासनाने यासंदर्भात पुन्हा समिती नेमू नये.

यानंतर कु.खर्चे .....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे.....

सभापती महोदय, या सभागृहामध्ये हा प्रश्न यापूर्वी एकूण नऊ वेळा उपस्थित झालेला आहे. आता आपण एक महिन्याच्या आत या प्रश्नावर निर्णय घेणे आवश्यक आहे. आदिवासी विभागात खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षक कर्मचा-यांना वाढीव घरभाडे भत्ता तसेच एकस्तरीय पदोन्नती या योजना लागू करणार आहात का ?

श्री.हसन मुश्रीफ :नक्षलग्रस्त आणि आदिवासी विभागामध्ये प्रोत्साहनपर योजना जी आहे ती जे लोक इतर भागातून नक्षलग्रस्त भागात सेवेसाठी जातात त्यांच्याकरिता आहे. जे लोक खाजगी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक या शाळेतील शिक्षक आहेत ते त्याच भागातील राहणारे असतात आणि ते खाजगी शाळांमधून नेमेले गेलेले असतात. ज्या जिल्हापरिषदेतील शिक्षकांची दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागांतील शाळांमध्ये बदली होते त्यांच्याकरिता उपरोक्त योजना लागू आहेत. यापूर्वी जेव्हा हा प्रश्न या सभागृहात उपस्थित झाला होता तेव्हाही हे सांगितले होते की, खाजगी शाळेतील शिक्षकांची जर नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील शाळांमध्ये नेमणूक करण्यात येत असेल तर त्यांनाही आम्ही अशा प्रकारची योजना लागू करु. ताबडतोबीने आम्ही यासंदर्भात शासन निर्णय घेणार आहोत.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी नंतर प्रश्न विचारण्याची संधी देईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदनामध्ये जे उत्तर आलेले आहे त्याबाबत माझा मंत्रीमहोदयांना एक प्रश्न आहे तसेच एका विसंगतीचे उत्तरही मला या सदनाच्या माध्यमातून मिळणे आवश्यक आहे. शिक्षकांना दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागांमध्ये जाण्याकरिता प्रोत्साहनपर भत्ता आणि जीवित हानी भत्ता देण्यात येतो. त्यांना जीवित हानीला भत्ता मिळत असेल तर ते माठे काम आहे, जीवित हानीकरिता इन्शोरन्स काढणे वगैरे मी समजू शकतो उदा. पाच लाखाच्या ऐवजी 10 लाखाच्या विम्याचा प्रिमियम भरणे वगैरे. परंतु जसा दुर्गम भागातील शिक्षकांना जीवित हानी भत्ता मिळतो त्याचप्रमाणे इतर खात्याच्या कर्मचा-यांना देखील जीवित हानी भत्ता आपण देणार का ? असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. दुर्गम भागामध्ये काम करावयाला अथवा तेथे जाण्यास शिक्षक तयार नसतो, अशा प्रकारचे उत्तर आलेले आहे. जिल्हापरिषदेच्या शिक्षण समितीच्या माध्यमातून एखाद्या शिक्षकाची बदली जबरदस्तीने दुर्गम भागातच करतो अशी

J-2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

धाकदपटशाही दाखवून भ्रष्टाचार निर्माण होतो, या संदर्भात संबंधित मंत्री महोदयांना कल्पना आहे का ? असल्यास, या संदर्भात त्यांनी सभागृहाला माहिती द्यावी.

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांनी सदर प्रश्न या सभागृहात नऊ वेळा विचारला गेला,असे सांगितले त्यावरुन त्याची तीव्रता शासनाच्या लक्षात आली आहे. सभापती महोदय, हा प्रश्न गडचिरोली जिल्हयापुरता मर्यादित राहणार नाही. जो नक्षलग्रस्त आणि दुर्गम भाग आहे अशा भागांमध्ये जे कर्मचारी बदलीस पात्र असतील आणि जोखीम पत्करुन त्या ठिकाणी सेवा द्यावयास तयार असतील अशा कर्मचा-यांना दुर्गम भागात पाठविण्याकरिता सन्माननीय सदस्यांनी एक समिती गठित करुन आपण आम्हाला सुचवावे अथवा या तीव्र आणि गंभीर स्वरुपाच्या प्रश्नावर सोल्यूशन काढावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा पॉईंटेड अशा स्वरुपाचा प्रश्न आहे की, यासंदर्भातील मूळ जी.आर.मध्ये बदलीचा उल्लेख नाही, ही गोष्ट खरी आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : बदलीस जे कर्मचारी पात्र आहेत.....

प्रा.बी.टी.देशमुख : जनरल नॉलेज आम्हाला नको आहे, मूळ जी.आर. जो यासंदर्भातील काढलेला आहे त्यामध्ये बदलीसंबंधी काही उल्लेख आहे का ? याचे उत्तर केवळ होय किंवा नाही अशाच स्वरुपाचे असू शकते.

सभापती : पुरके साहेब, मूळ प्रश्न असा दिसतो की, गडचिरोली किंवा अन्य दुर्गम भागामध्ये जे कर्मचारी शासनामार्फत तेथे जाऊन सेवा देतात त्या कर्मचा-यांना देखील शिक्षक कर्मचा-यांप्रमाणे जीवित हानी भत्ता व इतर प्रोत्साहनपर भत्ते देण्यात यावेत आणि असे ते दिले जातात का ? असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. त्याचे उतर द्यावे

प्रा.वसंत पुरके : शासनाच्या ज्या विभागामार्फत जे अधिकारी दुर्गम भागामध्ये सेवेकरिता जातात त्यांना देखील हे नियम लागू आहेत.

यानंतर श्री.सुंबरे....

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलेखीपाठ नाही

ता.प्र.क्र. 24401 ...

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, या ठिकाणी जे कर्मचारी सध्या आहेत ते सारे बाहेरच्या जिल्ह्यातूनच तेथे गेलेले आहेत. तेव्हा तेथे आहेत ते कर्मचारी त्याच जिल्ह्यातील आहेत असे आपल्याला म्हणता येणार नाही. ....

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या विषयी येथे चर्चा करण्यापेक्षा माझ्या दालनामध्ये दोन्ही बाजूच्या सदस्यांची आपण एक बैठक घेऊ आणि ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण यावर निर्णय देण्यापूर्वी माझी आपणास एक सूचना राहील. आतापर्यंत 9 वेळा हा प्रश्न या सभागृहामध्ये आलेला आहे परंतु तरीही यावर निश्चित असे उत्तर सरकारकडून मिळत नाही. तेव्हा केवळ आपल्या दालनामध्ये बैठक आपण घेऊ नये तर यासाठी एक समिती नेमून त्या समितीच्या जास्तीत जास्त तीन बैठकांमध्ये याबाबत निश्चित असा निर्णय व्हावा असे काही तरी आपण करावे.

सभापती : ठीक आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, तोपर्यंत हा प्रश्न आपण राखून ठेवावा अशी माझी आपणास आग्रहाची विनंती आहे.

सभापती : हा प्रश्न मी राखून ठेवणार नाही. मात्र माझ्या दालनामध्ये बैठक होऊन त्यामध्ये जो काही निर्णय होईल तो सभागृहामध्ये जाहीर करण्यास मी मंत्री महोदयांना सांगेन.

***

..... के 2 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे मोगरे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील अतिरिक्त जमिनीतील बेदखल कुळांना सुधारित कूळ कायद्यानुसार कूळहक्क ठरवून मिळण्याबाबत.

(6) * 25666 मेजर सुधीर सावंत, श्री. संजय दत्त, श्री. धनाजी साठे : सन्माननीय महसूल मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे मोगरे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील अतिरिक्त जमिनींचा प्रत्यक्ष कब्जा असलेल्या बेदखल कुळांनी मुंबई कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, 1948 च्या कलम-4 मधील नवीन सुधारणेनुसार कूळहक्क ठरवून मिळावा म्हणून मा.तहसिलदार, ता.राजापूर, जि.रत्नागिरी यांच्याकडे दिनांक 7 सप्टेंबर, 2006 अथवा दिनांक 25 सप्टेंबर, 2006 या दरम्यान 70-ब खालील कूळवहिवाट दावे दाखल केले आहेत हे खरे आहे काय,
(2) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी अतिरिक्त जमिनीचा प्रत्यक्ष कब्जा असलेल्या अर्जदार कुळांना कूळ कायद्यातील नवीन सुधारणेनुसार कूळहक्क ठरवून मिळण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्याचे प्रस्तावित केली आहे,
(3) अद्याप, कार्यवाही करण्यात आली वा प्रस्तावित केली गेली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री. नारायण राणे यांच्याकरिता : (1) होय.
(2) न्यायिकवत स्वरूपाचे अधिकारात प्रकरण निहाय सुनावणी घेऊन निर्णय देण्यात येत आहे,
(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या संबंधात जे दावे दाखल केलेले आहेत त्यांची सुनावणी किती दिवसात करण्यात येणार आहे तसेच या संदर्भात नेमलेल्या पालव समिती आणि म्हसकर समितीने आपला अहवाल शासनाला सादर केलेला आहे व त्या समित्यांच्या शिफारशी देखील मान्य करण्यात आलेल्या आहेत तर मग त्यांची अमलबजावणी करण्यात टाळाटाळ का केली जाते ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, राजापूर तालुक्यातील (जिल्हा रत्नागिरी) मौजे मोगरे येथील कुळांच्या बाबतीतील हा प्रश्न आहे. तेथील लोटरीकर यांची 80 हेक्टर जमीन 1976 सालामध्ये अतिरिक्त म्हणून घोषित केली होती ाणि त्यानंतर 13 लाभार्थींना तिचे वाटप केलेले होते. परंतु ते करीत असताना या मालका व्यतिरिक्त 15 लोक कूळ म्हणून तेथे वहिती करीत होते. त्यामुळे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे की, किती दिवसात त्यांना कूळ म्हणून आपण जाहीर करणार किंवा या जमिनी

..... के 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्या ताब्यात देणार ? त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे प्रकरण अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे चालू आहे आणि शासनाच्या माध्यमातून त्यांना जरूर सूचना दिल्या जातील की, लवकरात लवकर, जास्तीत जास्त एक महिन्यामध्ये या प्रकरणाचा निपटारा करून निकाल द्यावा.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हा प्रश्न प्रामुख्याने कोकणातील महत्त्वाचा प्रश्न आहे. कसेल त्याची जमीन हा कायदा 1944 साली संमत करण्यात आला ज्याचा आपण आता कूळ कायदा म्हणून उल्लेख करतो. त्या कायद्याच्या अंतर्गत ज्यांचेकडे आवश्यकतेपेक्षा जास्त जमीन होती ती जादा जमीन कुळांच्या नावे करण्यात आलेली होती आणि बाकी जमीन मालकाकडे आली होती. पण मालकाकडे राहिलेल्या जमिनीपैकी कित्येक जमिनी त्यानंतरही सातत्याने कूळ कसत आहेत त्यामुळे ज्या कुळांना या कायद्याचा फायदा मिळलेला आहे आणि ज्या जमिनी मूळ मालकाकडे राहिल्या पण त्या जमिनीवर देखील कुळांचीच वहिवाट होती अशा बेदखल कुळांची नवीन संकल्पना पुढे आली. म्हणून शासनाने या संदर्भात विचार केला आणि या बेदखल कुळांना 'कूळ' म्हणून दर्जा देण्याचा निर्णय केलेला आहे. आता हा विशिष्ट राजापूर तालुक्यातील हा प्रश्न महत्त्वाचा आहेच पण केवळ या एका प्रकरणापुरताच हा प्रश्न मर्यादित नाही तर कोकणामध्ये अशी अनेक प्रकरणे आहेत आणि त्या प्रकरणांना वाचा फोडली जात नव्हती. सरकारने कायदा करूनही बेदखल कुळांना न्याय त्यामुळे मिळत नाही. तेव्हा या आणि अन्य प्रकरणे जी आहेत, त्या बेदखल कुळांचा प्रश्न शासन युद्ध पातळीवर सोडविणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, 6 मार्च 2006 रोजी मुंबई कूळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम 1948 च्या कलम 4 मध्ये आपण सुधारणा केली आहे आणि या बेदखल कुळांना न्याय मिळावा यासाठीच प्रामुख्याने ही सुधारणा या अधिनियमामध्ये करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, प्रामुख्याने रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील 12 वर्षांपेक्षा जास्त काळ जमीन कसणाऱ्या बेदखल कुळांना न्याय मिळावा, वैधानिक निकषामध्ये ते यावेत यासाठी कलम 4 मध्ये सुधारणा करून करण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे.

(यानंतर श्री. गागरे ..... एल 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.25666.....

डॉ.राजेंद्र शिंगणे.....

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांमध्ये याबाबत मोठया प्रमाणावर प्रकरणे जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे प्राप्त झाली आहेत. त्याची आकडेवारी माझ्याकडे आहे. या सगळया प्रकरणाचा निपटारा करण्याचा प्रयत्न त्यांच्या स्तरावर चालू आहे. ही प्रक्रिया अजून जलद गतीने व्हावी याकरीता संबंधितांना सूचना देण्यात येतील. नियमानुसार ज्यांचा हक्क प्रस्थापित होत असेल त्यांना ताबडतोब कुळहक्क देण्यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना संबंधितांना देण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : शंकरराव म्हसकर समितीने जी शिफारस शासनास केली आहे, त्या नुसार सावकार किंवा जे जमीनदार कुळाच्या जमिनीचा हक्क सांगत नाहीत त्यांची नोंद ताबडतोब रद्द करण्यात येईल, असे आपण मागील अधिवेशनात सांगितले आहे, याबाबत काय कार्यवाही इ ालेली आहे, याची माहिती देण्यात येईल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याची माहिती माझ्याकडे नाही. याबाबत कार्यवाही करण्याचे जे आदेश त्यावेळी दिले होते. त्या बाबत सविस्तर उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील वस्तीशाळा शिक्षकांच्या मागण्यांबाबत

(७) * २४४०३ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री.कपिल पाटील , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जुलै, २००१ पासून सर्वशिक्षा अभियानांतर्गत वंचित मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम वस्तीशाळेच्या माध्यमातून होत असून त्याची अंमलबजावणी करण्याकरीता अत्यल्प मानधनावर शिक्षक काम करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरहु वस्तीशाळेतील शिक्षकांना तीन वर्ष सेवा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य वस्तीशाळा शिक्षक संघाने डिसेंबर, २००६ च्या शेवटच्या सप्ताहात शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास दिनांक २३ मार्च, २००६ रोजी विधीमंडळामध्ये विधानसभेच्या सभागृहात सदरहु वस्तीशाळा शिक्षकांच्या समस्यांबाबत सन्माननीय अध्यक्ष महोदयांनी शासनाला दिलेल्या निर्देशानुसार याबाबतची पुढील कार्यवाही आजतागायत झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य वस्तीशाळा शिक्षक संघाने शासनाकडे एका लेखी निवेदनाद्वारे केलेल्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(५) सदरहु निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री.हसन मुश्रीफ, प्रा. वसंत पुरके यांच्याकरिता : (१) होय.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र राज्य वस्तीशाळा शिक्षक संघाने शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे केलेल्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत :-

(अ) तीन वर्ष पूर्ण करणाऱ्या वस्तीशाळा शिक्षकांना नियमित सेवेत सामावून घ्यावे.

(ब) प्राथमिक शाळेत रुपांतर होणाऱ्या वस्तीशाळांवर त्याच वस्तीशाळा शिक्षकांना कायम करावे.

(क) डी.एड./बी.एड. अशी पात्रता असलेल्या वस्तीशाळा शिक्षकांना शिक्षण सेवकांच्या बरोबरीने मानधन द्यावे.

(ड) वस्तीशाळा शिक्षकांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे.

(५) वस्तीशाळा शिक्षकांच्या समस्यांबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य शासनाने एक अभ्यास गट गठीत केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

.....३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न 23.3.2006 रोजी विधान सभेत विचारला गेला होता. वस्तीशाळा जुलै 2001 पासून राज्यात सुरु झाल्या आहेत. जवळपास सात वर्षांपासून वस्तीशाळेच्या शिक्षकांचा प्रश्न प्रलंबित आहे. त्यावेळी विधानसभेचे अध्यक्ष यांनी दिनांक 23.3.206 रोजी असे निर्देश दिले होते की, "वस्तीशाळांविषयी राज्य सरकारला केव्हा तरी विचार करावा लागेल. दुर्गम भागामध्ये वस्तीशाळा सुरु करण्याचा क्रांतिकारक निर्णय शासनाने घेतलेला आहे. शिक्षण समिती नेमावी असा निर्णय शासनाने त्यावेळी घेतलेला आहे. शिक्षकांना प्रशिक्षित करुन, त्यांच्या वेतनामध्ये वाढ करुन त्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी शासनाला नाकारता येणार नाही. शासनाने आजच उत्तर द्यावे असे मी म्हणणार नाही. आपण तपासून घ्या. वेगळया माध्यमातून आपण यावर चर्चा घेऊ. सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना मी माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून दिलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. "

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय प्रा.वसंत पुरके यांनी 23.3.2006 रोजी विधानसभेत असे उत्तर दिले होते की, "वस्तीशाळांनी तीन वर्ष पूर्ण केल्यानंतर त्यांचे नियमित शाळांमध्ये रुपांतर करण्यास काही अडचण नाही. परंतु मुलींची संख्या लक्षात घ्यावी लागेल. शिक्षकांची नियुक्ती करताना मात्र गुणवत्ता प्राप्त डी.एड. उमेदवारांचेच सिलेक्शन होईल याची दखल घेऊ"

सभापती महोदय, अशा प्रकारचे उत्तर सन्माननीय शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात दिले असताना सुध्दा आजपर्यंत त्यावर कोणताही निर्णय झालेला नाही. यामध्ये असे सांगण्यात आले आहे की, वस्तीशाळेच्या शिक्षकांच्या समस्येबाबत राज्य सरकारने एक अभ्यासगट गठीत केलेला आहे. या संदर्भात माझा असा प्रश्न आहे की, याबाबत काय निकष लावले आहेत ? अभ्यासगट अहवाल कधी सादर करणार आहे ? या अभ्यासगटाचे अध्यक्ष व सदस्य कोण आहेत ? ज्या शाळांना तीन वर्ष झालेली आहेत, त्यांच्या बाबतीत शासनाने अंतिम निर्णय घेतला आहे काय ? अशा शाळांसाठी डी.एड. समकक्ष अशी पात्रता असणाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणार आहात काय ? महाराष्ट्र राज्य वस्तीशाळा संघाने शासनाकडे अशा 3-4 मागण्या केलेल्या आहेत. या मागण्यासंबंधी आजपावेतो निर्णय घेण्यात आलेला नाही, हा निर्णय केव्हा घेणार आहात ?

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24403.....

श्री.हसन मुश्रीफ : वस्तीशाळेतील शिक्षकांच्या मागण्याच्या संदर्भात चिकित्सकपणे अभ्यास करुन शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे अभ्यासगट गठीत करण्यात आलेला आहे.

1. श्री.ज.मो. अभ्यंकर, राज्य शैक्षणिक गुणवत्ता नियंत्रक, मुंबई — अध्यक्ष
2. श्री.आर.आर.पवार, शिक्षण उपसंचालक, अमरावती — सदस्य
3. श्री.नेटके, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प. औरंगाबाद — सदस्य
4. श्री.महेश करजगावकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. नागपूर — सदस्य
5. श्रीमती चंद्रकला ठोके, प्राचार्य, डायट, संगमनेर, जि.अहमदनगर — सदस्य
6. श्रीमती गिता महाशब्दे, नवनिर्मिती संस्था, मुंबई (एन.जी.ओ) — सदस्य
7. श्री.हेरंब कुलकर्णी, विषय तज्ञ, अहमदनगर — सदस्य
8. श्री.प्रकाश आंधळे, उप शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक — सदस्य
9. श्री.संजय पाटील, वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी, म.प्रा.शि.प्र.मुंबई — सदस्य सचिव

यामध्ये खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांचाही सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

1. श्रीमती सुमन देशमाने, शिक्षण उपसंचालक (प्राथमिक,), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे — सदस्य
2. श्रीमती शोभा ओव्हटकर, पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण शाखा पुणे, — सदस्य
3. श्रीमती मयुरा देशपांडे, संशोधन अधिकारी, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय मुंबई, सदस्य
4. श्री.रामचंद्र बेगूर, शिक्षणाधिकारी (युनिसेफ), मुंबई — सदस्य

.....नंतर श्री.सरफरे

अशुद्धीरित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

अशाप्रकारे या सदस्यांची नेमणूक करण्यात आली असून या अभ्यास गटाचा अहवाल 30 एप्रिल 2007 पर्यंत अपेक्षित आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या शिक्षकांना नियमित सेवेमध्ये सामावून घेण्याकरिता अभ्यास गट नेमण्यात आला असतांना वस्ती शाळेचे पूर्ण वेळ शाळेमध्ये रुपांतर करुन दुसऱ्या बाजूने शिक्षकांची भरती प्रक्रिया सातारा आणि सांगली जिल्हयामध्ये वर्तमानपत्रामध्ये जाहिराती देऊन केली जात आहे. ही भरतीची प्रक्रिया थांबविणार आहे काय? एका बाजूला अभ्यास गट नेमून त्यासंबंधीचा अहवाल सादर करण्यासंबंधी निर्णय घेतल्याबद्दल मंत्रिमहोदयांचे कौतुक करण्यात आले. आणि त्याचप्रमाणे या शिक्षकांना आपण वाऱ्यावर सोडणार नाही असे सांगून दुसऱ्या बाजूला नवीन डी.एड. शिक्षकांची भरती प्रक्रिया आपण सुरु केली आहे ती थांबविणार आहात की नाही?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय. अभ्यास गटाचा अहवाल दोन महिन्यामध्ये प्राप्त होणार आहे...

श्री.पांडुरंग फुंडकर : आपण गेल्या सात वर्षामध्ये निर्णय घेतला नाही तर आता काय निर्णय घेणार आहात?

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, नवीन डी.एड. शिक्षकांना नेमण्यात आले तर हे सर्व शिक्षक वाऱ्यावर पडतील. त्याकरिता शासनाने भरतीची जाहिरात थांबविली पाहिजे. एका बाजूला अभ्यास गट नेमला जात आहे आणि दुसऱ्या बाजूला शिक्षकांना नियमित सेवेमध्ये घेण्यापूर्वी नवीन डी.एड. शिक्षकांची नेमणूक करुन आपण दोघांमध्ये भांडण लावणार आहात काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, फक्त वस्ती शाळेच्या शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी नव्हेतर सर्वच शाळांमधील शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी शासनाला विचार करावा लागणार आहे. केंद्र सरकारने शिक्षणाच्या बाबतीत सूचना केल्याप्रमाणे यापुढे एज्युकेशन गॅरंटी स्किम रहाणार नसून तो पर्याय आता आपल्याला बंद करावा लागेल. म्हणून आपल्याला वस्ती शाळा सुरु ठेवाव्या लागणार आहेत. या शाळांमध्ये शिक्षकांना 1535+500 मिळून 2000 रुपये मानधन ठेवणार आहोत. यासंबंधी अभ्यास गटाचा अहवाल 30 एप्रिल 2007 पर्यंत प्राप्त झाल्यानंतर त्यासंबंधी निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विषय गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. या सदनामध्ये काही गोष्टी आग्रहपूर्वक मांडल्या जातात त्यावेळी सरकारकडून त्यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा केली जाते. युती सरकारच्या काळामध्ये या वस्ती शाळा सुरु करण्यात आल्या, त्यानंतर सैनिकी शाळा सुरु करण्यात आल्या, वृद्धाश्रम सुरु करण्यात आले या सर्वांची वाट लावण्यात आली. या वस्ती शाळांच्या संदर्भात आतापर्यंत झालेली चर्चा लक्षात घेतल्यानंतर त्या चर्चेच्या अनुषंगाने शासनाकडून निर्णय घेण्याच्या बाबतीत एवढी प्रतिक्षा करावी लागणार असेल तर या निर्णय प्रक्रियेसंबंधी देखील आपल्या मनामध्ये शंका निर्माण होईल. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विधानसभेमध्ये झालेल्या चर्चेचे इतिवृत्त वाचून दाखविले. या विषयासंबंधी निर्णय घेण्याकरिता आपण टाईमबाऊंड कार्यक्रम करण्यासंबंधी निदेश दिल्यानंतर देखील 7-8 वर्षापासून हा विषय प्रलंबित अवस्थेमध्ये आहे. म्हणून माझा सवाल असा आहे की, अशावेळी या शिक्षकांनी काय करावे? सभापती महोदय, या प्रश्नाच्या सोडवणुकीकरिता आपण नेतृत्व करावे आणि या सदनाच्या माध्यमातून या प्रश्नासंबंधी शासनाला निर्णय घेण्यामध्ये मदत करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, गेल्या सात वर्षापासून हा विषय प्रलंबित आहे. या प्रश्नासंबंधी पीठासीन अधिकाऱ्यांनी निदेश दिले आहेत.तरीसुध्दा या सरकारने कोणतीही कारवाई केली नाही. सभापती महोदय, माझी आपणास अशी विनंती आहे की, पीठासीन अधिकारी म्हणून आपण दिलेल्या निदेशाचे पालन हे शासन करीत नाही. सात वर्षापासून अभ्यास गटाचा अहवाल प्राप्त होत नाही. हे असेच चालत राहणार असेल तर या सभागृहाची प्रतिष्ठा कशी राहणार आहे? या प्रश्नाच्या बाबतीत हे शासन इतके गाफीलपणे वागणार असेल तर या सभागृहामध्ये आम्ही मनोरंजनासाठी यावयाचे काय? ही वस्तुस्थिती लक्षात घेता हे अधिवेशन संपण्यापूर्वी अभ्यास गटाचा अहवाल प्राप्त करुन शासनाने त्यासंबंधीचे आपले धोरण जाहीर केले पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रिका नाही

ता.प्र.क्र.24403 (पुढे सुरु....

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु.....

अशाप्रकारे विधिमंडळाला वारंवार टाळणे, वेळ निभावून नेणे, सभापतींच्या निर्देशाचे पालन न करणे हे शासनाच्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही. याचे पालन शासनाकडून केले जात नसेल तर सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी विनंती केल्याप्रमाणे सभापती महोदय, आमचे म्हणणे सत्य असेल तर शासनाला आपण निर्देश देऊन सांगितले पाहिजे म्हणजे काहीतरी न्याय मिळेल.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, आपण या संदर्भात दिनांक 23-3-2006 रोजी निर्देश दिलेले होते. अभ्यास गटाला आणखी एक महिन्याचा अवधी हवा आहे... (अडथळा)... केवळ वस्तीशाळांतील शिक्षकांचा प्रश्न नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलत असतात.)

सभापती : एकाचवेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलत आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांचे उत्तर ऐकायला येत नाही. कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मंत्री महोदयांचे काय म्हणणे आहे ते त्यांनी सांगावे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशाप्रमाणे या संदर्भात त्वरित समिती गठीत केली, अभ्यासगट नेमला. या अभ्यास गटाला एक महिन्याचा अवधी पाहिजे. संधी शाळेतील शिक्षकांचा तसेच अन्य शाळांतील शिक्षकांच्याबाबतीत संयुक्तपणे अभ्यास करावा म्हणून त्यांनी एक महिन्याचा अवधी देण्यासाठी विनंती केलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : वस्तीशाळांमधील शिक्षक हे 1 हजार रुपये पगारावर काम करीत आहेत. सभापती महोदय, शेतामध्ये काम करणारा शेत मजूरही दिवसाला 30 रुपयाच्या वर मजुरी घेतो, रोजगार हमी योजनेवर काम करणारा मजूर हा यापेक्षा जास्त मजुरी घेतो, घरी पोळ्या लाटणारी बाई दिवसाला 30 रुपयापेक्षा जास्त मजुरी घेते. वस्ती शाळेमधील शिक्षकांना तुम्ही दिवसाला 30 रुपये पगार देणार असाल तर ते बरोबर नाही. तेथील शिक्षक हे सात-सात वर्षे काम करत असूनही यासंबंधाने निर्णय घेतला जात नसेल तर आम्ही सरकारचा निषेध करून सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ KGS/

ता.प्र.क्र.24403 (पुढे सुरु....

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, आम्ही यासंबंधाने शिक्षकांना महिन्याला 6,800 रुपये पगार देण्याबाबत केंद्र सरकारकडे विनंती केलेली आहे. कारण दुर्गम भागातील मागासलेल्या भागातील पालकांची मुले त्या ठिकाणी शिकतात. याबाबत निश्चित न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे.

सभापती : याबाबतचा अहवाल अधिवेशन संपण्याच्या अगोदर आपल्याकडे यावा आणि त्यावर आपल्याला धोरणात्मक निर्णय घेता आला तर तो घ्यावा.

प्रा.वसंत पुरके : ठीक आहे.

सभापती : आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. व मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने किराणा बाजार व दुकाने मंडळाचे सन 1995-96, 1996-97, 1997-98 व 1998-99 चे अनुक्रमे सव्वीसावा, सत्तावीसावा, अठ्ठाविसावा व एकोणतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती :किराणा बाजार व दुकाने मंडळाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले.

--

एन-4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ KGS/

पृ.शी. व मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी " परभणी येथे दिनांक 21-11-2003 रोजी झालेल्या दंगलीच्यावेळी तेथील कुप्रसिध्द गुंड मेहबुब खान पठाण व वसीम खान पठाण यांनी दिनांक 1-12-2003 रोजी कु.विद्या देशमुख हिच्यावर बलात्कार करुन निघृण हत्या केल्या प्रकरणी दोन्ही आरोपींवर जलदगती न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी विलास देशमुख यांनी दिनांक 20 मार्च,2007 पासून आपल्या कुटुंबियांसमवेत आमरण उपोषण सुरु केल्याबाबत" नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र सूचनेतील घटना जुनी असली तरी या प्रकरणाची निश्चित वस्तुस्थिती सभागृहासमोर येण्यासाठी शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर,वि.प.स.यांनी "मुंबई शहराला वीज पुरवठा करणाऱ्या बेस्टने मुंबईतील सर्वात जास्त थकबाकी असणाऱ्या टॉप टेनच्या प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये काही खाजगी संस्था, व्यक्ती व शासकीय कार्यालये यांची नावे नसल्याबाबत" नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील यांनी "जांभूळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड येथील कु. सागर काशिनाथ वाघमारे वय 10 वर्षे हा कुसगांव येथून बेपत्ता झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "अभ्युदयनगर वसाहतीच्या पुनर्विकासासंदर्भात विजय ग्रुपचे रश्मीकांत शहा यांचा काटा काढण्यासाठी श्रीपती बिल्डर्सचे आर.आर.चतुर्वेदी यांनी सुमारे 50 लाख रुपयांची सुपारी दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील, श्री. जयंत प्र. पाटील यांनी "सन 2003 मध्ये सेल्स टॅक्स ऐवजी व्हॅट लागू करताना जकातीसह सर्व पर्यायी कर रद्द करण्याचे आश्वासन शासनामार्फत जकात हटाव, महाराष्ट्र बचाव कृती समितीला देण्यात येऊनही जकात कर रद्द न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे यांनी "राज्यातील शासकीय / निमशासकीय कर्मचारी व शिक्षक यांना महागाईभत्त्याची रक्कम न मिळाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या सदनाचे जे सर्व सन्माननीय सदस्य आहेत त्यांना त्यांच्या वाहनावर लावण्यासाठी प्रोटोकॉल या नावाचा एक बॅज दिला जातो. गेली दीड पावणेदोन वर्षे हा विषय प्रलंबित आहे. या सदनामध्ये अनेक वेळा हा विषय मांडलेला आहे. प्रत्येक वेळी कोणत्याही वाहनातून जात असताना अडचण येते. प्रामुख्याने हल्ली टोल नाक्यावर टोल वसुलीचे काम कंत्राटदारांकडे दिलले आहे. त्या ठिकाणी काय गोंधळ चालतो हा आजचा विषय नाही त्यामुळे मी त्यावर भाष्य करणार नाही. परंतु या सदनाचे आणि विधानसभा सभागृहाचे सन्माननीय सदस्य ज्यावेळी प्रवास करतात त्यावेळी तेथील कंत्राटदारांची माणसे ही प्रामुख्याने बिहार आणि उत्तर प्रदेशमधील भरलेली असल्यामुळे त्यांना आमदार किंवा विधायक वगैरे काही कळत नाही. त्यामुळे ते सभ्यता सोडून बोलतात. अशा वेळी प्रोटोकॉल बॅज असेल तर हा प्रश्न उपस्थित होणार नाही. मी हा विषय या सदनामध्ये मांडला होता. अन्य सन्माननीय सदस्यांनीही हा विषय मांडला होता. याबाबतीत आपण सुध्दा मान्य केले होते की, सर्व सबंधितांची बैठक घेऊन ठरवू. आपण जर लोकसभेमधील माहिती घेतली तर त्या ठिकाणी खासदारांना प्रोटोकॉलचा बॅज, एम.पी.चा पास दिला जातो. त्यावर पार्लमेंटचे चित्र असते. माजी खासदार किंवा राज्यसभा सदस्यांसाठी पास असतो. अशा तऱ्हेचा एखादा बॅज विधानसभा आणि विधान परिषद सदस्यांसाठी तयार करुन, त्यावर विधानसभेचे चित्र असेल असा बॅज, कॉमन नाही तर केवळ सदस्यांकरिता तयार केला तर लोकसभेसारखी व्यवस्था होईल. तो बॅज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये चालू शकतो. लोकसभेच्या माजी खासदाराचा बॅज माझ्याकडे आहे. तो बॅज मी महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये कोठेही वापरु शकतो. तशी व्यवस्था करण्यासाठी आपण शासनाला निदेश द्यावेत असा मी माझा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला याच औचित्याच्या मुद्यावर बोलावयाचे आहे. तीन वर्षापूर्वी हाच मुद्दा मी या सभागृहामध्ये उपस्थित केला होता. टोलनाक्यांवर आमदारांची होणारी अडवणूक याबाबतचा मुद्दा होता. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

सभागृहात उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, अशा प्रकारचे दोन बॅज म्हणजे प्रोटोकॉलचा बॅज आणि सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे एक बॅज असे दोन बॅज देऊ शकत नाही, असे आर्ग्युमेंट त्यावेळी बैठकीमध्ये करण्यात आले होते. मुंबईमध्ये ट्राफिक पोलीस विचारतात की, तुम्ही प्रोटोकॉलचा बॅज का घेत नाही ? काही लोकांकडून गैरवापर करण्यात आल्यामुळे सुप्रीम कोर्टाने स्टे देऊन असा बॅज लावण्यावर बंदी घातलेली आहे. यामध्ये आपण पुढाकार घेऊन लवकरात लवकर तोडगा काढणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत पुढे सुरु...

सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सूचना केल्याप्रमाणे एखाद्या वेगळा बॅज विद्यमान आणि माजी सदस्यांसाठी देता आला तर त्याबाबतीत आपण जरुर लक्ष घालावे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून अत्यंत महत्वाची बाब उपस्थित केलेली आहे. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि माझी माझ्या दालनामध्ये मिटींग देखील झालेली आहे. येत्या 15 दिवसामध्ये या बाबतीतील निर्णय पूर्ण होईल आणि अनेक दिवस प्रलंबित राहिलेला निर्णय एक्झीक्यूट करण्याच्या बाबतीत मी लक्ष घालीन. याबाबतीत संबंधित अधिका-यांना बोलावून त्यांच्या बरोबर बैठक घेईन.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैं आपके ध्यान में यह बात लाना चाहती हूँ कि सभागृह में ए.सी. की कूलिंग बहुत ज्यादा हो रही है. इसकी तकलीफ पीछे बैठने वाले माननीय सदस्यों को अधिक है.

सभापती : विधानमंडळाच्या अधिका-यांनी याची नोंद घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

लक्षवेधी सूचना क्रमांक 1 संबंधी

सभापती : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक 1 वरील लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांना याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध न झाल्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत त्यांनी मला विनंती केली होती. ही लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा घेण्यात येईल.

..3.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आरे दुधाच्या भावात केलेली वाढ

मु. शी : आरे दुधाच्या भावात केलेली वाढ यासंबंधी सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त व सुधीर सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय दुग्ध विकास मंत्र्यांचे लक्षवेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासकीय दूध पुरवठा करणाऱ्या आरे दूध योजनेअंतर्गत मुंबई शहरामध्ये दैनंदिन साडेचार ते पाच लाख लीटर दुधाची विक्री होत असणे, आरे दुधाच्या भावात लीटर मागे सरासरी एक रुपयाची वाढ केल्याने दररोजच्या विक्रीवर त्याचा विपरीत परिणाम होणे, गायीच्या दुधाची 17 रुपये दराने मिळणारी दुधाची पिशवी आता 18 रुपये दराने मिळत असून स्पेशल दूध लीटर मागे 24 रुपया ऐवजी 25 रुपये होणे, शासनाने शेतकऱ्यांना 6 महिन्यांच्या कालावधीत दूध खरेदीकरिता केलेली वाढ, त्यादृष्टीने महानंदा, गोकुळ, अमुल, वारणा, मदर इत्यादी दूध डेअरीनी आपल्या दुधाच्या दरात वाढ केलेली नसणे, पूर्वी आरे दुधाची चांगल्या प्रकारे विक्री होणे, भाव वाढीमुळे आरे डेअरीच्या दूध विक्रीवर परिणाम होणे, यापूर्वी शासकीय दूध पुरवठा योजना सरकारी दूध संघाने ताब्यात घेण्याचा केलेला प्रयत्न, इतर दूध डेअरीच्या तुलनेत आरे या शासकीय दूध डेअरीच्या दुधाच्या भावात वाढ झाल्याने गोरगरीब ग्राहकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने आरे दुधाची झालेली भाववाढ कमी करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अनिस अहमद (दुग्ध विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.... 4 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : आरे दुधाचे भाव वाढवून त्याच्या विक्रीवर विपरित परिणाम करण्याच्या दृष्टीने कृत्रिमरित्या भाव वाढवून खाजगी डेअरीची दूध विक्री वाढविण्याचा कट करण्यात आलेला आहे असा समज पसरलेला आहे, हे खरे आहे काय ? शासकीय दूध योजनेचे शासन खाजगीकरण करु पहात आहे काय ? शासकीय डेअरीच्या बाबतीत शासनाचे धोरण काय आहे ? सामान्य माणसाला न परवडणा-या दुधाचे भाव शासन कमी करणार आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, विदर्भ और मराठवाडा में जो किसान आत्महत्या कर रहे थे, उनको दूध का जोड़ धन्धा करना चाहिए, उनको प्रोत्साहन देने के लिए दिसम्बर के महीने में एक रुपया प्रति लीटर भाव किसानों को बढ़ाकर दिया. प्राइवेट डेयरी महानंदा, गोकुल, अमूल, वारणा और मदर डेयरी ने भी दूध का भाव 1 दिसम्बर 2006 से 1 रुपया प्रति लीटर बढ़ा दिया है. आरे के दूध का भाव दिनांक 5 मार्च 2007 से एक रुपया प्रति लीटर बढ़ा दिया है. इस प्रकार से 17 रुपए प्रति लीटर के दूध का भाव 18 रुपए प्रति लीटर हो गया है और स्पेशल दूध जो पहले 24 रुपए प्रति लीटर के भाव से मिलता था, अब उसका भाव 25 रुपए प्रति लीटर हो गया है.

माननीय सदस्य का दूसरा प्रश्न यह है कि हम खाजगीकरण वालों को मदद करने का काम कर रहे हैं. मैं माननीय सदस्य को बताना चाहता हूँ कि सरकार इस धंधे में है, इसलिए प्राइवेट डेरी के दूध का भाव कंट्रोल में है. अगर सरकार इस धंधे में नहीं रहेगी तो प्राइवेट डेयरी वाले दूध के भाव बढ़ा देंगे. सरकार की वजह से आज प्राइवेट डेयरी कंट्रोल में हैं.

श्री. मधुकर चव्हाण : आरे डेअरीच्या मोक्याच्या जागा खाजगी डेअरीला देण्याचा विचार आहे काय ? मागील 3 महिने वर्तमानपत्रामध्ये, आरे डेअरीच्या जागा बिल्डरला देण्याचा कट चालला आहे, अशा प्रकारच्या बातम्या येत आहेत. लक्षवेधीच्या निवेदनामध्येही, "आरे डेअरीच्या मोक्याच्या जागा खाजगी डेअरीच्या ताब्यात अद्याप दिलेल्या नाहीत", असे नमूद करण्यात आलेले आहे. मग पुढे या जागा देण्यात येणार आहेत काय ? "अद्याप" याचा अर्थ Something is under consideration.

Shri Anees Ahmed : Nothing is under consideration.

श्री. मधुकर चव्हाण : कधीच देणार नाही काय ?

श्री. अनिस अहमद : कभी नहीं देंगे.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2.....

श्रीमती फौजिया खान :सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने यहां पर बताया कि जहां पर किसान आत्महत्या कर रहे हैं, वहां पर दूध के धन्धे को प्रोत्साहन मिले, इसके लिए शासन कदम उठा रहा है. मुझे यह पूछना है कि शासन की तरफ से ग्रामीण भाग में दूध देने वाले जानवर बांटे जाते हैं तो उस क्षेत्र के पुढारी लोग उन जानवरों को लेकर बेच देते हैं और इस प्रकार से यह पूरा धन्धा समाप्त हो जाता है. ग्रामीण भाग में दूध का काम महिलाएं करती हैं, इसलिए क्या शासन महिला बचत गट को 100 प्रतिशत जानवर देने का धोरण निश्चित करेगा ?

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, जानवर लेने के लिए अगर महिलाएं आएंगी तो उनको पहली प्राथमिकता दी जाएगी.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरा प्रश्न यह है कि क्या शासन यह पॉलिसी बनाएगा कि ग्रामीण भाग में जो भी जानवर बांटे जाएंगे, वे केवल महिला बचत गट को ही दिए जाएंगे ?

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, मराठवाडा और विदर्भ के जिन इलाकों में किसान आत्महत्या कर रहे थे तो उनको दूध का जोड़ धन्धा मिले, इसके लिए शासन ने गाय बांटने का काम शुरु किया था. शुरु में महिला बचत गट हमारे पास गाय लेने के लिए नहीं आए. माननीय सदस्या ने सुझाव दिया है कि महिला बचत गट को गाय देने की पॉलिसी बनानी चाहिए. शासन की यह पॉलिसी है कि महिलाओं को पूरक धंधा करने के लिए ज्यादा से ज्यादा गाय मिलें.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, उत्तरामध्ये माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, महाराष्ट्रातील आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या शेतकऱ्यांना दुधाच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक मदत व्हावी म्हणून हा निर्णय घेतला आहे. आरे डेअरीकडून मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांचे दूध कलेक्शन करण्यामध्ये नेमकी किती वाढ झाली? निवेदनामध्ये म्हटले आहे की, 5 लाख लिटरवरुन तीन ते साडेचार लाख लिटर दूध विक्री झाली. आरे डेअरीचा सेल कमी झाला का? कमी झाला असेल तर शेतकऱ्यांचा फायदा होण्याऐवजी नुकसानच झाले असावे. मागास भागातील शेतकऱ्यांकडून दरमहा किती हजार लिटर दूध अधिक खरेदी करण्यास सुरुवात केली आहे?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2.....

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, विदर्भ और मराठवाडा के इलाके में जहां पर किसान आत्महत्या कर रहे थे, वहां पर किसानों को जोड़ धन्धा मिलना चाहिए, इसलिए गाय बांटने का काम सरकार ने शुरु किया है. सी.एम. पॅकेज के मार्फत 6 जिलों के अन्दर 7536 गायें बांटी गई हैं और पी.एम. पॅकेज से जो पैसा आया है, उसके मार्फत 4575 गायें बांटी गई हैं. इस प्रकार से कुल 12 हजार गायें 6 जिलों में बांट दी हैं. माननीय सदस्य ने पूछा है कि दूध का उत्पादन बढ़ा है या नहीं तो मैं उनको बताना चाहता हूँ कि अमरावती में 2006 में दूध का उत्पादन 15 हजार लीटर था, जबकि 2007 में 17 हजार 900 लीटर दूध का उत्पादन है. अकोला में 2006 में दूध का उत्पादन 12 हजार 700 लीटर था, जबकि 2007 में 18 हजार 900 लीटर दूध का उत्पादन है. वाशिम जिले में 2006 में दूध का उत्पादन 1 हजार 500 लीटर था, जबकि 2007 में दूध का उत्पादन 4 हजार 300 लीटर प्रतिदिन है.

सभापती : मंत्रीमहोदयांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, लक्षवेधी सूचनेचा गाभा हा दूधाच्या दरवाढीच्या अनुषंगाने आहे. दूध विक्रीसंबधात उपप्रश्नाच्या अनुषंगाने अधिक माहिती सदनाला दिली जात आहे. परंतु उत्तराचा सगळा भाग त्या माहितीवर असू नये. मूळ लक्षवेधी सूचनेच्या आशयासंबंधी उत्तर द्यावे.

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, माननीय सदस्य ने प्रश्न पूछा था कि दूध का उत्पादन 5 लाख लीटर से 3 लाख लीटर हो गया है, इसलिए मैंने इस बारे में विस्तार से जबाब दिया.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अशुधारित प्रत / शिघ्रटीपाठी नही

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी दुधाचा जो प्रश्न आहे तो अत्यंत स्पेसिफिक आहे. लक्षवेधी सूचनेचा विषय शासकीय दूधपुरवठा करणा-या आरे दूध योजनेअंतर्गत मुंबई शहरामध्ये दैनंदिन साडेचार ते पाच लिटर दुधाची विक्री होण्याच्या संदर्भातील आहे. शासकीय दूधपुरवठा करणा-या आरे दूध डेअरीने दुधाचे दर लिटरमागे एक रुपयांने वाढविले एवढाच या लक्षवेधीचा विषय आहे. परंतु माननीय मंत्रीमहोदय, वारंवार विदर्भातील पॅकेज, विदर्भात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या गायींच्या संदर्भात या ठिकाणी माहिती देत आहेत. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी जी काही माहिती दिलेली आहे त्या माहिती आधारे माझा प्रश्न असा आहे की, 1985-86 मध्ये विदर्भामध्ये दररोज 4 लाख लिटर दुधाचे उत्पादन होत होते. परंतु विदर्भात आता 40 लाख लिटर दुधाची मागणी असतांना 2 लाख लिटर दूध केवळ विदर्भ रिजनमध्ये मिळते. त्यामुळे विदर्भात 38 लाख लिटर दुधाचा कसा पुरवठा केला जाणार आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावी. माननीय मंत्रीमहोदयांनी अगोदर सांगितल्या प्रमाणे 8 हजार गाईं दूध कधी देणार आणि विदर्भातील 38 लाख लिटरच्या दुधाची मागणी कधी पूर्ण होणार आणि विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या कधी थांबणार याची माहिती माननीय मंत्रीमहोदय देतील काय?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, माननीय सदस्य ने कहा कि 40 लाख लीटर की डिमांड है. इस समय पूरे विदर्भ में 40 लाख लीटर दूध की जरुरत नहीं है. जो दूध पहले मिल रहा था, उससे 3 गुना दूध का उत्पादन बढ़ा है. हम आने वाले 3 साल के अन्दर विदर्भ के अन्दर किसानों के माध्यम से इतना दूध लाएंगे कि पूरे विदर्भ के लोग उसे कन्ज्यूम कर सकेंगे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाडयामध्ये शेतकरी मोठया प्रमाणात हत्या करीत आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांचे म्हणणे बरोबर असून शासनाने शेतक-यांच्या हत्या केलेल्या आहेत असे त्यांना म्हणावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य हे कोकणातील असल्यामुळे कोकणात सध्या हत्या सुरु आहेत, तर विदर्भात आत्महत्या सुरु आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझ्याकडून चुकून शब्द निघाला आहे. मी माझे शब्द मागे घेतो. सभापती महोदय, मराठवाडा आणि विदर्भात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतक-यांच्या आत्महत्या थांबाव्यात यासाठी शासन अनेक उपाययोजना करीत आहे. त्या उपाययोजनांपैकी माननीय मंत्री महोदय जी माहिती देत आहेत तो एक यासंदर्भातील उपाय आहे. मराठवाडा आणि विदर्भ जसा मागासलेला आहे तसाच कोकणसुध्दा मागासलेला आहे. त्यामुळे कोकणाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने मराठवाडा आणि विदर्भाला ज्या प्रकारचे पॅकेज दिलेले आहे तशाच प्रकारचे पॅकेज शासन कोकणासाठी देणार आहे काय?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, कोंकण में 720 किलोमीटर का समुद्र तट है और वहां पर मछली पकड़ने वाले लोग हैं. उनके लिए पॅकेज दिया था. उस इलाके के अन्दर फिशरीज डिपार्टमेंट की तरफ से अलग से काम किया जा रहा है.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी दुधाच्या पुरवठयाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झालेला आहे. 13500 गोईंचे वाटप करण्यात आलेले आहे माननीय मंत्रीमहोदयांनी या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सांगितलेले आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

मी नागपूर येथील महानंद डेअरीला भेट दिली होती. त्यावेळी मला अशी माहिती समजली की, त्याठिकाणी नगरमधून दूध पुरवठा होतो, नागपूर येथून जास्त दूध मिळत नाही. नागपूर येथे 13500 गाईंचे वाटप करण्यात आले असे सांगण्यात आले, तर मग त्या गाईंच्या दुधाचा कोठे पुरवठा केला जातो ? यापूर्वी महानंद डेअरीतून दररोज आठ लाख लीटर दूध पॅक होत होते. आता फक्त चार ते पाच लाख दूध पॅक होते. आरे डेअरीतून 3 लाख दूध पॅक होते. पूर्वी या डेअरींतून संपूर्ण मुंबई शहर आणि ठाणे परिसराला दुधाचा पुरवठा होत होता. आता मदर,कृष्णा अशा खाजगी डेअऱ्या आल्या. त्यांचे प्रतिनिधी शासनामध्ये बसलेले असल्यामुळे महानंद व आरे डेअऱ्यांना दूध पुरवठा न होता तो खाजगी डेअऱ्यांना होत आहे. त्यामुळे शासकीय दूध उपक्रम बंद पडतो की काय शंका आम्हाला येत आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की,आता शासनाने दुधाचे भाव वाढविले, परंतु खाजगी दूध पुरवठा करणाऱ्या डेअऱ्या आहेत त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे बंधन घालण्यात आलेले नाही. खाजगी दूध डेअऱ्यांना सवलतीच्या दरात दूध देण्याचे बंधन घालण्यात येणार आहे काय ? ज्यांना गाई पुरविण्यात आल्या ते खाजगी डेअऱ्यांना दूध देत आहेत. त्यामुळे शासकीय डेअऱ्यांना दूध मिळत नाही तेव्हा जनतेला सवलतीच्या दराने दूध मिळण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, अभी तक नागपुर डेयरी नुकसान में चल रही थी और यहां की महानंदा डेयरी में भी नुकसान हो रहा था. पॅकेज की वजह से 6 महीने के अन्दर 3 गुना दूध का उत्पादन बढ़ गया है. सभी जिलों के अन्दर दूध का उत्पादन बढ़ाने का सरकार की ओर से प्रयास किया जा रहा है. जिन जिलों में 50 हजार लीटर से कम दूध का उत्पादन है वहां के किसानों को प्रति लीटर 1 रुपया 25 पैसे अधिक दे रहे हैं. अधिक दूध का जो उत्पादन हो रहा है वह महानंदा और आरे डेयरी में आ रहा है.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबईतील आरे दुधाच्या दरात वाढ केल्या संबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. पण ती विदर्भ व कोकण विभाग फिरुन आली. आरे दुधाच्या भावात एक रुपयाने वाढ करण्यात आली. ही वाढ कोणत्या निकषावर करण्यात आली ? मघाशी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी प्रश्न विचारला की, आरेची जमीन खाजगी व्यक्तीला देण्याचा मानस आहे काय ? मंत्रिमहोदयांनी त्याचे उत्तर "नाही" असे सांगितले. आरे येथील जमीन स्टुडिओसाठी भाड्याने दिलेली आहे. तेव्हा मंत्रिमहोदयांना त्यांच्या उत्तरात काही दुरुस्ती करायची आहे काय ? आरे डेअरीची जागा खाजगी व्यक्तीला दिली आहे काय किंवा यापुढे देण्याचा विचार आहे काय ?

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, 1 रुपया भाव बढ़ाने के बारे में माननीय सदस्य ने सवाल पूछा है. पूरे महाराष्ट्र के अन्दर 1 दिसम्बर 2006 से प्राईवेट डेयरी जिसमें गोकुल है, अमूल है, वारणा है, इन सभी डेयरी ने 1 दिसम्बर 2006 से दूध का भाव 1 रुपया प्रति लीटर बढ़ाया है. हम लोग किसानों से दूध ले रहे हैं और किसानों को एक रुपया भाव बढ़ाकर दिया है, इसलिए दूध का भाव 1 रुपया प्रति लीटर बढ़ाया गया है.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : निकष काय आहेत ?

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, निकष यह है कि जब हम किसान को 1 रुपया प्रति लीटर बढ़ाकर दे रहे हैं तो 1 रुपया प्रति लीटर कन्ज्यूमर से बढ़ाकर लेना पड़ेगा.

सभापती : यामध्ये दोन उप प्रश्न होते. एक म्हणजे, एक रुपया वाढविण्याचे निकष काय ? आणि दुसरा प्रश्न हा जागा व अन्य कारणासंबंधीचा होता. माननीय मंत्रिमहोदयांनी या प्रश्नासंबंधी परत रिप्लाय द्यावा.

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, माननीय सदस्य ने सवाल पूछा है कि आपने 1 रुपया भाव क्यों बढ़ाया. जब हम किसान से दूध लेते हैं तो उसको 8 रुपए की बजाय 9 रुपया 20 पैसा दे रहे हैं. इसलिए सरकार ने 1 रुपया कन्ज्यूमर से लिया है.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्ड होत आहे. गोकुळ आणि वारणा या खाजगी संस्था नाहीत. या शेतकऱ्यांच्या संस्था असून त्या संस्थांना शासनाकडून निधी मिळतो. या शेतकऱ्यांच्या संस्था असून त्या मार्केटमध्ये दूध आणतात. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये सुधारणा करावी. खाजगी आणि सहकारी संस्थांमध्ये फार फरक आहे.

सभापती : बरोबर आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा पुन्हा तोच प्रश्न आहे की, आरे व महानंद डेरीच्या बाबतीत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, सरकार की ऐसी कोई पॉलिसी नहीं है. किसी भी प्राइवेट आदमी को आरे कॉलोनी की जमीन देने की शासन की पॉलिसी नहीं है.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबईमध्ये दूध पुरवठा करण्याचे दूध संघाचे वेगळे नाते आहे. पहाट झाल्यानंतर आजही नित्यनेमाने आरेच्या दूध केंद्रावर दूध आणण्यासाठी आपण जातो. मुंबईमध्ये जवळपास 1800 दूध केंद्रे आहेत. गेल्या 30-30 वर्षांपासून ही दूध केंद्रे त्याचठिकाणी असून ती आजही व्यवथित चालू आहेत. या दूध केंद्राच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी चांगली भूमिका घेऊन त्या दूध केंद्राना संरक्षण दिले, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. सभापती महोदय, सुप्रिम कोर्टामध्ये बेकायदेशीर फेरीवाल्यांचा व बेकायदेशीर स्टॉलवाल्यांचा विषय आहे. याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, गेल्या 30-30 वर्षापासून ज्यांच्या ताब्यात ही

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

दूध केंद्रे आहेत, त्यांना आपण कायमस्वरुपी संरक्षण देणार का ? कारण, गेल्या 30-30 वर्षांपासून ती दूध केंद्रे सतत, सातत्याने व निष्ठेने सरकारची दूध योजना राबवित आहेत, त्या दूध केंद्रांना आपण भविष्यात कायमस्वरुपी संरक्षण देणार का ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, दूध केन्द्रों के बारे माननीय सदस्य ने सवाल पूछा है. शासन इस बारे में बैठक लेकर उनके हित में अच्छा रास्ता निकालेगा और कोर्ट में भी हम उनके हित के लिए कोशिश करेंगे.

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत

सभापती : सन्माननीय सदस्य, श्री.जयंत प्र.पाटील व प्रा.शरद पाटील यांनी उपस्थित केलेली ही लक्षवेधी सूचना आहे. सन्माननीय पर्यावरणमंत्री यांनी पत्राव्दारे मला अशी विनंती केली आहे की, संपूर्ण माहिती संकलन करण्याकरिता आणखी एक-दोन दिवस लागतील त्यामुळे ही लक्षवेधी सूचना दोन दिवस पुढे ढकलावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गेल्या तीन अधिवेशनांमध्ये मी ही लक्षवेधी सूचना प्रस्तावित करीत आहे परंतु ती दरवेळा तहकूब होते आहे.

सभापती : कुठल्याही परिस्थितीत उद्या किंवा परवा ही लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला घेतली जाईल.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई येथील जे.जे.रुग्णालयातील एन्जिओग्राफीची मशीन बंद असणे

मु.शी.: मुंबई येथील जे.जे.रुग्णालयातील एन्जिओग्राफीची मशीन बंद असणे संबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, गुरुनाथ कुलकर्णी, भास्कर जाधव, रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वयें पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई येथील जे.जे. रुग्णालयातील एन्जिओग्राफीची मशीन दिनांक 6 फेब्रुवारी, 2007 पासून बंद असणे, त्यामुळे रुग्णालयातील 57 शस्त्रक्रीया पुढे ढकलण्यात येणे, आजाराची तीव्रता अधिक असणाऱ्या रुग्णांना जवळच्या के.ई.एम्. रुग्णालयात पाठविण्यात येणे तथापि, तेथेही हृदयरोगावरील रुग्णांची संख्या अधिक असल्याने तेथील डॉक्टरांची भेटही रुग्णांना न मिळणे, याशिवाय जे.जे. रुग्णालयात सिटी स्कॅन व एम्.आर.आय. मशिन्स बंद असणे, त्यासाठी मंजूर झालेला 20 कोटी रुपयांचा निधी वापरण्यात न येणे, औषधांचा तुटवडा, एअर कंडीशन मधून पाणी गळणे, अपुरा कर्मचारीवर्ग इत्यादींमुळे रुग्णांची सतत होणारी गैरसोय, प्रशासनातील गलथानपणामुळे व अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी ती अधिकच बिघडणे, शासनाचे या सर्व बाबींकडे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. याच विषयाच्या संदर्भात इतर सन्माननीय सदस्यांनी काही मुद्दे उपस्थित केले होते. परंतु, लक्षवेधी सूचना व शासनाने केलेले निवेदन यामध्ये त्यांचा समावेश झालेला नाही.

सभापती : मुंबईतील जे.जे.रुग्णालयाच्या कारभाराशी संबंधित जनतेच्या हिताच्या दृष्टीने ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली आहे. या लक्षवेधी सूचनेवर चर्चा होत असतांना सन्माननीय सदस्यांनी काही उपप्रश्न विचारले तर त्यांना आपण परवानगी देऊ.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मूळ लक्षवेधी सूचनेची भाषाच बदलली आहे.

सभापती : या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे निवेदन प्राप्त झाले आहे त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न विचारल्यास आपण त्याला परवानगी देऊ आणि त्यातूनही एखादी बाब राहिली, असे सन्माननीय सदस्यांनी माझ्या निदर्शनास आणून दिले तर वेगळया पद्धतीने तो विषय सभागृहात उपस्थित करण्याबाबत मी परवानगी देईन.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, एखादा विषय राहिला असेल आणि सन्माननीय सदस्यांनी त्यासंदर्भात चर्चेच्या अनुषंगाने प्रश्न विचारला तर मी उत्तर देण्यास तयार आहे.

सभापती : माझी विनंती अशी आहे की, या लक्षवेधी सूचनेवर जी चर्चा होईल ती होऊ द्यावी. त्यानंतर जर सन्माननीय सदस्यांच्या असे लक्षात आले की, एखाद्या महत्वाच्या बाबीवर चर्चा करण्याकरिता पुन्हा सदनासमोर यावे लागेल तर मी तशी परवानगी आपल्याला देईन.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांनी या लक्षवेधी सूचनेच्यासंदर्भात हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांचा रोख असा आहे की, लक्षवेधी सूचनेच्या ढाच्यात बदल केला गेला आहे. सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेचे जसे प्रारुप दिले असेल तसेच ते कायम असावयास हवे, मात्र त्यामध्ये परिवर्तन केले गेले आहे. हे परिवर्तन कोणी केले आहे ?

सभापती : याच विषयावर आणखी तीन-चार लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या होत्या व त्यांचा विषय सर्वसाधारणपणे एकच होता. त्यामुळे हे सर्व विषय क्लब करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. एकाच विषयावरील वेगवेगळया लक्षवेधी सूचना क्लब करुन जर एखादी लक्षवेधी सूचना सभागृहापुढे आली आणि एखाद्या सन्माननीय सदस्यांचे नांव त्यामध्ये समाविष्ट झाले नाही तर नांव

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

आले नाही, असा आक्षेप सन्माननीय सदस्यांकडून घेण्यात येतो. हे जसे म्हटले जाते तसेच एकच व्हर्जन असलेल्या चार लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आणि त्या वेगवेगळया घेतल्या तर एकाच विषयावर चार वेळा सभागृहात चर्चा होईल व सभागृहाचा बहुमोल वेळ वाया जाईल. त्यामुळे आज सभागृहासमोर असलेल्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा करु, जर एखादा महत्वाचा प्रश्न राहिला असेल तर सन्माननीय सदस्यांनी माझ्या दालनात येऊन तसे निदर्शनास आणून द्यावे, मी त्याबाबत निश्चित विचार करेन.

आता सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या लक्षवेधी सूचनेवरील निवेदनासंबंधी आपला प्रश्न विचारावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुंबई मधील जे.जे.रुग्णालय हे असे रुग्णालय आहे की, या रुग्णालयामध्ये सर्व महाराष्ट्रातील रुग्ण येतात. विशेषत: विदर्भातून फार मोठया संख्येने रुग्ण या रुग्णालयात उपचारासाठी येत असतात.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, दिनांक 6 फेब्रुवारी, 2007 रोजी जे.जे. रुग्णालयातील एन्जिओग्राफी व एन्जिओप्लास्टी यंत्र बंद पडले. हे यंत्र बंद पडल्यामुळे 50 ते 55 शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात आल्या. ज्या रुग्णांच्या इमर्जन्सी शस्त्रक्रिया करावयाच्या होत्या त्या रुग्णांना दुस-या हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले. सभापती महोदय, जे.जे.रुग्णालयातील मशिनरीचाच प्रश्न नाही तर रुग्णालयातील एअर कंडीशनर देखील जुने झालेले आहेत व त्यातून सतत पाणी गळत असते. माझा प्रश्न असा आहे की, मागच्या वेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जे.जे. रुग्णालयातील मशिनरी खरेदी करण्यासाठी 20 कोटी रुपये दिले जातील असे आश्वासन दिले होते. लक्षवेधी सूचनेला दिलेल्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, "20 कोटी रुपयांची तरतूद चालू आर्थिक वर्षी उपलब्ध होती, ही वस्तुस्थिती नाही." या रुग्णालयातील मशिनरी 1995 साली खरेदी केलेली आहे. सन 1995 ते 2007 म्हणजे मशिनरी खरेदी करुन 10 वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. आता आपण 21 व्या शतकामध्ये जात आहोत. आता आधुनिक यंत्र सामुग्री येत आहे. जे.जे. रुग्णालयामध्ये राज्यातून हजारो लोक उपचारासाठी येत असतात. जे.जे. रुग्णालयाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मागच्यावेळी उपोषण करण्याचा उशारा दिला होता. त्यानंतर या रुग्णालयाला थोडाफार निधी देण्यात आला. लक्षवेधी सूचनेला दिलेल्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "सन 2007-08 च्या वार्षिक योजनेमध्ये नियतव्यय राखून ठेवण्यात आला..." हा निधी कोठे आहे ? व तो निधी जे.जे. रुग्णालयाला कधी मिळणार आहे ? नवीन यंत्रांची खरेदी कधी होणार आहे ? की शासन जुनीच यंत्रे चालू ठेवणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी इतके प्रश्न विचारले की, ते माझ्या सुद्धा लक्षात नाहीत. तरी देखील मी त्यांच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देण्याचा प्रयत्न करीन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी हा प्रश्न लाईटली घेऊ नये.

..2.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, सन 2007-08 च्या वार्षिक योजनेमध्ये जो नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे तो किती आहे ? तो निधी जे.जे.रुग्णालयाला कधी मिळणार आहे ? आणि नवीन यंत्रसामुग्री कधी खरेदी करण्यात येणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जे.जे. रुग्णालयामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून रुग्ण उपचार घेण्यासाठी येत असतात. या रुग्णालयातील मशिनरी जुनी झालेली आहे. या रुग्णालयातील मशिनरी काही दिवस बंद पडली होती. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी 50 रुग्णांना परत पाठविण्यात आले व त्यापेकी काही रुग्ण सिरिअस होते असे सांगितले. सभापती महोदय, 35 रुग्ण प्रतिक्षा यादीवर होते. एन्जिओग्राफी व एन्जिओप्लास्टी करणा-या रुग्णांची ती लिस्ट होती. त्या रुग्णांना डॉक्टरांनी विनंती केली की, तातडी असेल तर तुम्हाला के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये रेफर करु. परंतु ते रुग्ण के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये जाण्यास तयार नव्हते. कार्डिओलॉजिस्टला त्या रुग्णांनी लिहून दिले की, आम्हाला दुस-या हॉस्पिटलमध्ये जायचे नाही. मशिनरी दुरुस्त झाल्यानंतर याच रुग्णालयामध्ये आमचा उपचार करा. दुसरा प्रश्न एअर कंडिशनर संदर्भात विचारण्यात आला. जे.जे. रुग्णालयातील एअर कंडिशनर बंद होते हे मी मान्य करतो. परंतु आता ते दुरुस्त झालेले आहेत. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी असे सांगितले की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या रुग्णालयासाठी सभागृहामध्ये 20 कोटी रुपये देण्याचे मान्य केले होते. त्यावेळी मी सभागृहामध्ये उपस्थित होतो.

यानंतर कु.खर्चे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

जे 20 कोटी रुपये देण्याबद्दल या सदनात अनाऊन्स करण्यात आले होते, त्यावेळी मुंबईच्या आमदारांनी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी जे.जे. रुग्ण्यालयामध्ये नवीन इक्विपमेंट्स खरेदी करण्यासाठी आणि सिव्हील वर्क करण्यासाठी जेवढे पैसे लागतील ते आमच्याकडून देण्यात येतील, अशी या सदनात उभे राहून घोषणा केली होती.

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे, तो असा की, जे.जे. रुग्णालयामध्ये एम.आर.आय,सिटीस्कॅन कॅथलॅब इत्यादि मशिनरी अत्यंत दुरावस्थेत आहे त्याकरिता पैसे देण्यासाठी आम्ही मागणी केली होती आणि त्यावेळेस ती मान्यही करण्यात आली होती. सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येत आहे. एम.एम.आर.डी.ए. त्यावेळेस इन्फ्रास्ट्रक्चरकरिता पैसे देणार आहे, परंतु आपण हा पैसा काढून मशिनरी खरेदी करण्याकरिता देणार होता, असे सांगण्यात आले होते, आमची त्यावेळेस दिशाभूल करण्यात आली होती, आणि हे आमच्या कोणाच्याही लक्षात आले नाही की, एम.एम.आर.डी.ए. इक्विपमेंट खरेदी करण्याकरिता पैसे देत नाही तर फक्त इन्फ्रास्ट्रक्चर खरेदीसाठी देते. सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी हा हरकतीचा मुद्दा मांडला.

श्री.सुरेश शेट्टी :सन्माननीय सदस्य डॉ. दिपक सावंत साहेब हे स्वत: डॉक्टर आहेत, आपल्याला हे ठाऊक असावयाला पाहिजे की, कोणतेही इक्विपमेंट बसविण्यासाठी सिव्हील वर्क किंवा इनफ्रास्ट्रक्चरची गरज भासतेच नवीन इक्विपमेंट आणून कुठे ठेवणार त्याकरिता ट्रंकी प्रोजेक्ट संबंधित कंपनीला द्यावे लागतात. आऊटलेट द्यावे लागते वगैरे, so that's all consist in civil work.

श्री.विनोद तावडे : कॅथलॅब बिघडत चाललेल्या आहेत, अस्तित्वात असलेले इक्विपमेंट बिघडलेले व दुरावस्थेत असल्याकारणाने त्यांच्याएवजी नवीन उपकरणे किंवा इक्विपमेंट आणण्याकरिता कोणत्याही सिव्हील वर्कची गरज नाही जुन्याच्या जागी नवीन आणून बसविण्याकरिता कोणत्याही इन्फ्रास्ट्रक्चरची गरज नाही. काहीही सांगता का ?

श्री.सुरेश शेट्टी : तावडे साहेब, आपण या बाबतीत टेक्नीकली साऊंड आहात म्हणून हा मुद्दा आपल्या लक्षात आला.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ही बाब आरोग्य खात्याकडून अतिशय लाईटली घेण्यात येत आहे.

W-2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : तुम्हाला हे काम किती दिवसात करुन पाहिजे ?

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, हे काम लवकरात लवकर तर झालेच पाहिजे परंतु या कामासाठी 20 कोटी रुपये देखील मिळालेच पाहिजेत.

श्री.विनोद तावडे : नाही, सभापती महोदय, आम्हाला येथे बोलावयाचे आहे, आम्हाला बोलू द्यावे.

श्री.सुरेश शेट्टी : या बजेटमध्ये आम्ही कॅथलॅबकरिता आवश्यक ती प्रोव्हिजन करुन ठेवलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : 2007 -2008 या वर्षाच्या वार्षिक योजनेमध्ये नियतव्यय राखून ठेवण्यात आलेल आहे असे सांगण्यात आले आहे परंतु तो किती राखून ठेवण्यात आला आहे आणि राखून ठेवलेला नियतव्यय कधी मिळणार आहे? रुग्णालयास आवश्यक ती यंत्रसामुग्री कधी पुरविण्यात येणार आहे? एवढे प्रश्न मी विचारलेले होते, त्यांची उत्तरे अद्यापही आलेली नाहीत.

श्री.सुरेश शेट्टी : मी यावर असे सांगू इच्छितो की, या अर्थसंकल्पामध्ये रुग्णालयामधील यंत्रसामुग्रीकरिता आवश्यक ती तरतूद केलेली आहे परंतु ती किती केलेली आहे, हे मी सांगू शकत नाही, तरी पण सर्वसाधारणपणे सिटीस्कॅन या यंत्राकरिता साडे सहा कोटी रुपये लागतात व एम.आर.आय. या मशिनरीकरिता अडीच कोटी रुपयांची आवश्यकता असते. अशा प्रकारे कॅथलॅबकरिता आवश्यक ती तरतूद या अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्रीमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे आरोग्य खात्यामध्ये एकूण तरतुदीपैकी फक्त 40 टक्केच पैसा खर्च झालेला आहे असे आपण आरोग्य खात्याच्या अहवालामध्ये सांगितलेले आहे. सभापती महोदय, हे कल्याणकारी राज्य आहे, या राज्यात मुंबई शहरातील सामान्य माणूस गंभीर आजारी पडल्यावर तो जसलोक व हिंदूजासारख्या महागडया रुग्णालयांमध्ये न जाता जे.जे.सारख्या शासकीय रुग्णालयामध्येच धाव घेतो आणि तेथे 16 दिवस आवश्यक ती मशिनरी बंद होती, हे काय चालले आहे या कल्याणकारी राज्यामध्ये ? गरिबांशी संबंधित असलेल्या ज्या ज्या गोष्टी आहेत, त्यांच्याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही. अर्थसंकल्पीय तरतुंदीपैकी आरोग्य खात्याची 60 टक्के रक्कम शिल्लक असतांना पैसे नसल्याचे का सांगितले जात आहे ? 60 टक्के रक्कम अद्यापही खर्च झालेली नाही.

यानंतर श्री. सुंबरे.....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

तेथील पैसे येथे का वळविले नाहीत ? तसे करण्यामध्ये आपल्याला काय अडचण होती ? नाही तरी आपण एका हेडची बजेटेड प्रोविजन दुसरीकडे नेहमीच वळवित असता, त्याप्रमाणे यासाठी आपण काय केले नाहीत ? तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्याप्रमाणे यासाठी 20 कोटी रूपये आपल्याला काही तांत्रिक अडचणीमुळे देता येत नाहीत तरी आरोग्य खात्यामध्ये खर्च न झालेली रक्कम आपण यासाठी वळवून ती या मशिनरीसाठी का खर्च केली नाही ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग हे दोन वेगवेगळे विभाग आहेत आणि त्यामुळे एका विभागाचा फंड अशा प्रकारे दुसरीकडे ट्रान्स्फर करू शकत नाही. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या 20 कोटी रूपयांचा मुद्दा येथे माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, प्रधान मंत्री यांच्या योजनेतून केंद्र सरकारकडून आपल्याकडे निधी येणार होता तो आम्ही आता यासाठी राज्य सरकारचा म्हणून ॲड केला होता. आता जेव्हा केंद्र सरकारकडून 100 कोटी रूपये येणार तेव्हा हे 20 कोटी रूपये जे.जे.रूग्णालयातील या मशिनरीसाठी खर्च होणार.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मुळात माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेले 20 कोटी रूपये या मशिनरी खरेदीसाठी खर्च होणार नाहीत वा खर्च करता येणार नाहीत ही यांना नंतर झालेली उपरती आहे. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सामान्य रूग्णांचे या मशिनरी अभावी होणारे हाल लक्षात आणून दिल्यानंतर आणि या मशिनरीची तातडीने आवश्यकता असल्याचे लक्षात आणून दिल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी जेव्हा हे पैसे देण्याचे घोषित केले त्यावेळी त्यातील अडचण माननीय मुख्यमंत्र्यांच्या वेळीच चिठ्ठी पाठवून विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्षात आणून दिले नव्हते. परंतु तरीही आता मुख्यमंत्र्यांनी केलेली घोषणा, तेथे रूग्णांचा, सामान्य जनतेच्या दृष्टीने असलेला महत्त्वाचा प्रश्न लक्षात घेऊन या 20 कोटी रूपयांच्या निधीचे समायोजन विभागाने केले पाहिजे, सरकारने केले पाहिजे होते ते का केले गेले नाही ? माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेचे विभागाच्या मंत्र्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या लेखी काहीच महत्त्व नाही का ? तसे असेल तर ते आपण स्पष्ट करावे. दुसरे असे की, सध्या जे.जे.रूग्णालयात असलेल्या कॅथलॅब मशीनवर अतिरिक्त ताण आहे, खरे म्हणजे त्या मशीनची क्षमतास संपून गेली आहे तरीही आपण

..... एक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे .....

ते परत परत दुरूस्त करीत घेत आहात. पण आता बराच काळ ते सलगपणे बंद होते म्हणून त्याबाबत मोठी ओरड झाली. तत्पूर्वी आपण त्यासाठी येणाऱ्या अनेक रूग्णांना बाहेरच्या बाहेर परत पाठविले आहे ते वेगळेच. तेव्हा त्या मशीनची मुदत संपण्यापूर्वी नवीन मशीन खरे तर तेथे आले पाहिजे होते आणि तशी मागणी जे.जे.रूग्णालयाकडून आपल्याकडे केली आहे काय ? असल्यास ती आपण नाकारली आहे काय ? नसल्यास, त्यासाठी आपण तरतूद केली आहे काय ? नसल्यास, यासाठी तरतूद न करणारा माणूस, मग तो आपला अधिकारी असो वा मंत्री असो, तो संबंधित रूग्णाला आवश्यक ते उपचार न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाल्यास जबाबदार आहे. तरी त्याचे उत्तर आपण द्यावे. तिसरी गोष्ट म्हणजे जे.जे.रूग्णालयामध्ये कार्डिओलॉजिस्ट विभागामध्ये ॲनास्थेसिस्टची 13 पदे आहेत त्यापैकी केवळ 3 पदे भरलेली आहेत आणि त्यामुळेच तेथील ऑपरेशन्स पुढे ढकलली जात आहेत आणि त्यामुळे देखील अत्यावश्यक गरजू रूग्णांचे मृत्यू होत आहेत. त्याला जबाबदार कोण आहेत ? तेव्हा ही जी पदे भरायची आहेत ती आपण केव्हा पर्यंत भरणार आहात आणि त्यामध्ये आपल्याला काय अडचण आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ज्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी 20 कोटी रूपये निधी देण्याची घोषणा केली होती त्यापैकी एमआरआय आणि सीटी स्कॅन मशीन्स खरेदी करण्यासाठी आपण या बजेटमध्ये तरतूद केलेली आहे आणि हे बजेट पास झाल्यानंतर ही मशीन्स घेऊन जे.जे.रूग्णालयात बसविली जातील. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न हा ॲनास्थेसिस्ट पदांच्या संबंधात विचारला आहे. त्याबाबत मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, आपण किती प्रयत्न केला तरी हे लोक मिळत नाहीत आणि म्हणूनच आपण आता बीएमसी आणि इएसआय हॉस्पिटल्स यांच्याकडून 9 लोक घेतले असून ते लवकरच जे.जे.रूग्णालयात काम करण्यास सुरूवात करतील.

(यानंतर श्री.गागरे ....वाय 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीय नोंद

श्री. आर. आर. पाटील...

सभापती महोदय, माझे मित्र माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, राष्ट्रपतींचे पारितोषिक देण्याकरिता नाव सुचवावयाचे झाले तर मी श्री. प्रकाश जावडेकर यांचे नाव सुचवीन. काल मी तासगाव तालुक्यामध्ये कोणत्या वातावरणामध्ये बिनविरोध निवडणुका झाल्या यासंबंधी सांगितले आहे. शेवटच्या काही मिनिटामध्ये एवढया मोठया प्रमाणावर उमेदवारी अर्ज कसे परत घेतले जातात यासंबंधी निवडणूक आयोगाला सुरुवातीला शंका आली. निवडणुकीच्या संदर्भात असलेल्या अनेक तज्ज्ञांकडून मी यासंदर्भातील प्रक्रिया जाणून घेतली. ज्यावेळी मतदानाची वेळ 5 वाजता संपते त्यावेळी मतदान केंद्राच्या बाहेर मतदान करण्यासाठी रांगेमध्ये उभ्या असलेल्या शेवटच्या मतदाराने मतदान करण्याची प्रक्रिया पार पडेपर्यंत ते मतदान सुरु ठेवले जाते. आणि अशावेळी शेवटच्या मतदाराने जरी वेळ संपल्यानंतर मतदान केले तरी ते वेळेमध्ये केलेले मतदान समजले जाते.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या पार पडलेल्या निवडणुकीची माहिती घेतली. काही मतदान केंद्रावर संध्याकाळी 7 वाजेपर्यंत मतदान सुरु होते. शेवटच्या मिनिटामध्ये मतदान करण्यासाठी जितके लोक येतात त्या सर्वांचे मतदान झाल्याशिवाय मतदानाची प्रक्रिया संपविता येतच नाही. त्यामुळे शेवटच्या क्षणापूर्वी आलेल्या मतदारांनी केलेले मतदान हे उशिरा केलेले मतदान मानले जात नाही. त्यांनी केलेले मतदान हे ठराविक वेळेत केलेले मतदान मानले जाते व त्याप्रमाणे त्याचे काऊटींग होत असते. अनेक वेळा निवडणुकीकरिता उमेदवार आपले अर्ज भरीत असतात त्यावेळी अगदी शेवटच्या क्षणी मोठया प्रमाणावर उमेदवार आपले अर्ज भरण्याकरिता येत असतात. त्यावेळी सर्व उमेदवारांना कक्षामध्ये घेऊन मुख्य दरवाजा बंद केला जातो. त्यावेळी उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांचे अर्ज वेळेमध्ये आले आहेत असे समजून शेवटच्या वेळी ती सर्व प्रक्रिया पूर्ण केली जाते. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, त्यावेळी मी तासगावमध्ये नसल्यामुळे शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी कॉग्रेसने आपली यादी उशिरा घोषित केली. आणि शेवटच्या क्षणी मोठया संख्येने उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी उमेदवार आले. त्यावेळी कक्षाच्या पाठीमागील दार उघडे होते असा उल्लेख करण्यात आला. माझी आपणास विनंती आहे की, आपण शिष्टमंडळ पाठवून पाठीमागील दार उघडे होते काय हे आपण तपासून पहावे?. त्या कक्षाला पाठीमागे दार आहे काय तेही पहावे. अशाप्रकारची कोणतीही परिस्थिती नसतांना सुध्दा निवडणूक आयोगाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील...

थोडा संशय आला. निवडणूक आयोगाने या बाबतीत सरकारकडे इतक्या संशयी नजरेने कां बघावे याचे आपल्याला उत्तर सापडत नाही. यामध्ये छोटया छोटया गोष्टींमध्ये लाभ गृहीत धरला जातो आणि पदावर असलेल्या व्यक्तींकडून चूका होणारच असे गृहीत धरुन पुढील कारवाईला सुरुवात केली जाते हे बरोबर नाही. तरीसुध्दा तासगाव तालुक्यामध्ये अशा गोष्टी करण्यात आल्या. आणि त्या दिवशी उमेदवारांनी अर्ज पाठीमागे घेण्याची प्रक्रिया पूर्णपणे रद्द करण्यात आली. उमेदवारांना आपले अर्ज मागे घेण्याकरिता वाढीव तारीख देण्यात आली. त्यानंतर देखील सर्व उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दुसऱ्यांदा मागे घेतले. त्यावेळी निवडणूक आयोगाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्या सर्व प्रक्रियेचे शूटींग व्हिडिओ कॅसेटमध्ये करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी लागलेला निकाल संशयास्पद वाटल्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा निकाल घेण्यात आला, त्यावेळी पहिल्या दिवशी मागे घेण्यात आलेल्या अर्जाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही चूक नव्हती ही गोष्ट स्पष्ट झाली. सभापती महोदय, दुसऱ्या वेळी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पुन्हा एकदा जिल्हा परिषदेच्या 4 गटामध्ये आणि पंचायत समितीच्या 9 गणामध्ये बिनविरोध निवड झाल्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घोषित केला. अशाप्रकारे त्याठिकाणी निवडणुकीचा निकाल बिनविरोध झाला. त्यामुळे त्या संदर्भात दाखल करण्यात आलेला एफ.आय.आर. रद्द झाला. ज्यांनी तो करावयास लावला त्यांच्यावरील केसचा निकाल लागल्यामुळे त्यामध्ये कोणताही संशय वाटत नाही. सभापती महोदय, काल माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचे भाषण ऐकल्यानंतर माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी आणि मला क्षणभर वाटले की, आमच्या पक्षामध्ये खरेच गुंड आहेत काय? आम्ही या यंत्रणेचा गैरवापर केला आहे काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु...

सभापती महोदय, कालच्या निवडणुकीमध्ये पोलीस यंत्रणेने नि:पक्षपातीपणाने काम केलेले आहे. प्रत्येक निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर काही ना काही गोष्टी घडलेल्या आहेत. निवडणुकीनंतर या उमेदवाराला मते दिली नाहीत, त्या उमेदवाराला मते दिली नाहीत म्हणून स्थानिक पातळीवर काही ठिकाणी गुन्हे नेहमीच घडलेले आहेत. कालच्याच निवडणुकीमध्ये असे घडले असे नाही. त्या ठिकाणचे सगळे गुन्हे पोलिसांनी नोंद केलेले आहेत. या राज्याच्या गृहमंत्र्यांवरही पोलिसांनी गुन्हा नोंदविला. मी गृहमंत्री म्हणून अटकाव केला असता तर गुन्हा नोंदला जाऊ शकला नसता. राज्याच्या गृहमंत्र्यांवर गुन्हा नोंदविला जातो, यावरुनच स्पष्ट होते की, राज्याची पोलीस यंत्रणा अतिशय नि:पक्षपातीपणाने काम करते. प्रसंगी आपल्या गृहमंत्र्यांवर देखील गुन्हा नोंद करायला मागेपुढे पहत नाही. राज्यातील पोलीस यंत्रणा नि:पक्षपातीपणाने काम करत आहे याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. सन्माननीय श्री. गडकरी साहेब, मी पोलीस यंत्रणेचा गैरवापर केला असता तर निवडणुकीपूर्वी आणि निवडणूकी नंतर ज्या गुन्ह्यांची नोंद झालेली आहे त्यामध्ये भाजप, शिवसेना सदस्यावर गुन्ह्यांचीच नोंद झाली असती. कारण सत्तेवर आम्ही आहोत म्हणून आम्ही पोलीस यंत्रणेचा वापर करून दुसऱ्या बाजूच्या सदस्यांवर अधिक गुन्हे नोंद करायला पाहिजे होते.

श्री.नितीन गडकरी : या संदर्भाने तुमचेच सहकारी बोलले.

श्री.आर.आर.पाटील : आपण काहीही बोलता, काहीही वाचता. आपण नको ते वाचण्याचे सोडून द्यावे.

श्री.नितीन गडकरी : मुख्यमंत्री दौऱ्यावर असताना ते आपल्याबद्दल बोलले. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे भारती विद्यापीठाचे गाईड ॲन्ड फिलोसॉफर आहेत, ते भारती विद्यापीठाचे कूलगुरु आहेत. प्रोटोकॉलप्रमाणे राज्यपालांच्या नंतर ते येतात. खरे तर त्यांना तिकडे खुर्ची दिली पाहिजे. त्यांनी वक्तव्य केले की, महाराष्ट्राची इभ्रत गेली, माझे मित्र भरकटले. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, पोलिसांच्या दंडुक्याच्या जोरावर निवडणूक लढवू नका तर कार्यकर्त्यांच्या बळावर निवडणूक लढवा. राष्ट्रवादी काँग्रेसने बी.ओ.टी.तत्वावर पोलीस स्टेशन काढून चालवायला दिलेले आहे, असे त्यांनी सांगितले. खरे म्हणजे माननीय मुख्यमंत्री आणि आपण कॅबीनेटमध्ये एकत्र येता,एकमेकांशी हसता, निर्णय घेता, पेढे खाता. माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

आपले ज्येष्ठ भ्राता आहेत. परंतु आपण त्यांच्यावर वार करत नाही. त्या ज्येष्ठांपासून आपण सावध रहा. त्यांच्याबद्दल काही तरी बोला.

श्री.आर.आर.पाटील : मी जे काही बोलत आहे ते आपल्यामार्फत त्यांच्यासाठीच बोलत आहे.

श्री.नितीन गडकरी : म्हणजेच लेकी बोले सुने लागे, असा प्रकार आहे.

उपसभापती : हे बोलणे रेकॉर्डवर ठेवायचे काय ?

श्री.आर.आर.पाटील : रेकॉर्डवर ठेवण्यासाठीच मी बोललेलो आहे. माझी विनंती आहे की, रेकॉर्डवरील एक कॉपी सन्माननीय श्री.गडकरी साहेबांना द्यावी.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री क्लिअरकट स्पष्टीकरण देत आहेत. त्याची एक कॉपी मुख्यमंत्री महोदयांनाही पाठवावी. म्हणजे तेही खुलासा करतील आणि संभ्रमावस्था दूर होईल.

श्री.आर.आर.पाटील : आपण मधून मधून एकत्र भेटता अशी माझी माहिती आहे. तेव्हा याची एक कॉपी आपल्याकडे ठेवावी.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

अध्यक्ष महाराज, या राज्यातील पोलीस यंत्रणेने पक्ष बघून कारवाया केलेल्या नाहीत. पक्ष बघून गुन्हे नोंद केले नाहीत. तसे असते तर विरोधी पक्षावंर अधिक गुन्हे नोंद झाले असते. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यामध्ये एकंदर 400 दखलपात्र आणि अदखलपात्र गुन्हे नोंद झाले. त्यामध्ये 93 गुन्हे काँग्रेस (आय) पक्षावर नोंद झालेले आहेत. मी ज्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आहे त्या पक्षावर सर्वात कमी गुन्हे नोंद असावयास पाहिजे होती परंतु तसे घडलेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांवर नंबर 2 चे म्हणजे 79 गुन्हे नोंद झालेले आहेत. नंबर 3 चे गुन्हे शिवसेनेकडून अपेक्षित होते. या ठिकाणी आपला पक्ष बाजूला फेकला गेला आहे. शिवसेना पक्ष तिसऱ्या क्रमांकावर आहे. शिवसेनेवर 36 गुन्हे नोंद झालेले आहेत आणि भारतीय जनता पक्षावर 28 गुन्हे नोंद झालेले आहेत. त्यामानाने सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, आपण थोडे प्रगतीवर आहात. 31 गुन्हे शेतकरी कामगार पक्षावर नोंद झालेले आहेत आणि राज्यातील सर्व अपक्ष आणि इतर पक्ष यांच्यावर 222 गुन्हे नोंद झालेले आहेत. पोलीस यंत्रणेचा गैरवापर केला असता तर विरोधकांवर जास्त गुन्हे नोंद झाले असते पण तसे झालेले नाही. पोलिसांनी अतिशय नि:पक्षपातीपणे काम केलेले असल्यामुळे या ठिकाणी जो सापडेल त्यांच्यावर गुन्हा नोंद करुन नि:पक्षपातीपणाची साक्ष पोलिसांनी आपल्या कर्तृत्वाने आणि आपल्या कार्यवाहीतून पटवून दिलेली आहे. महानगरपालिकांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कॉग्रेस (आय) पक्षावर 95, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर 74 गुन्हे नोंद झाले आहेत. या ठिकाणी मात्र जिल्हा परिषद निवडणुकीच्या तुलनेत सेनेची बरी प्रगती झाली आहे. 69 गुन्हे शिवसेना पक्षाच्या विविध कार्यकर्त्यांवर नोंद झालेले आहे. यामध्ये भारतीय जनता पक्षाची पिछेहाट आहे. भारतीय जनता पक्षावर 39 गुन्हे नोंद झालेले आहेत. आर.पी.आय. पक्षावर 14 आणि अन्य पक्षांवर 343 गुन्हे नोंद झालेले आहेत. मी ही आकडेवारी यासाठी दिली की, कोणत्या पक्षाचा कार्यकर्ता आहे हे बघून गुन्हे नोंदण्याचे काम होत नाही. जो गुन्हा करतो त्याच्यावर महाराष्ट्रामध्ये गुन्हा नोंदवला जातो. पोलीस नि:पक्षपातीपणे काम करीत आहे. एक दोन उदाहरणे सांगून जणूकाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष गुंडांचा पक्ष आहे असा आपला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

समज व्हावयास नको. माझी अशी स्पष्ट धारणा होती आणि आहे आणि आपण जर या निवडणुकांकडे बारकाईने पाहिले तर कोणालाही वाईट वाटावे अशी दिवसेंदिवस परिस्थिती बिघडत चाललेली आहे. मते देत असताना लोक जातीचा विचार करावयास लागले. मते देत असताना लोक धर्माचा विचार करावयास लागले. अध्यक्ष महाराज, आज जिल्हा परिषदा आणि नगरपालिकांच्या निवडणुकीचा खर्च सुध्दा लाखो रुपयांपर्यंत पोहोचलेला आहे. लहान मुलांना व्यसनी बनविले जात आहे. सर्व पक्षांनी मिळून कोठे तरी याचा गांभीर्याने विचार करण्याची निश्चित गरज आहे. या सर्व पार्श्वभूमीवर ज्यांच्या पाठीमागे पोलिसांनी बेड्या घेऊन धावले पाहिजे असे लोक निवडून येत आहेत. पोलिसांना त्यांच्या समोर उभे राहून सॅल्यूट ठोकावा लागतो. याच्याशिवाय दुसरी कोणतीही लोकशाहीची शोकांतिका असू शकत नाही. ज्यावेळी सिस्टीममध्ये बिघाड होत आहे त्यावेळी ती सिस्टीम सगळ्यांनी मिळून दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये जरुर आपापल्या परीने आपण प्रयत्न करीत आहोत. कोठे तरी चार सहा माणसे गुंड आहेत म्हणून एखादा पक्ष गुंडांचा आहे असा कोणाचा दावा असेल तर ते बरोबर नाही. सर्वच पक्षामध्ये आज निवडून येणारा उमेदवार कोण आहे हा उमेदवारीचा निकष बनला आहे. हे कधी ना कधी सगळीकडे घातक होऊ शकते. आपण जी नावे सांगितली त्यांची मी नोंद घेतलेली आहे. मागे त्यांनी जे दुष्कृत्य केले ते मी थांबवू शकत नाही. मी खात्री देईन की, या लोकांना पक्षामध्ये राहून, पदावर राहून पुन्हा कायदा हातात घेण्याची संधी दिली जाणार नाही. जर त्यांनी कायदा हातामध्ये घेण्याचा प्रयत्न केला तर अशा लोकांवर चोखपणाने कारवाई केली जाईल हे मी सदनाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला सांगू इच्छितो. पण सन्माननीय श्री. गडकरी साहेब, आपण सुध्दा तपासून पहावे. श्री. बंडू उर्फ सुरेश तळवेकर यांच्यावर एकूण 9 गुन्हे आहेत.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील पुढे सुरु...

तळवेकर यांच्यावर कलम 395, 135 बी.पी. ॲक्ट, तसेच कलम 144, 441, 188, 448, 427, 336, 147, 148, 149, 324, 352, 448, 143, 144, 145, 148, 149, 327... मला ही कलमे वाचताना दम लागतोय. ... (अडथळा)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कृष्णा खोपडे हा आमच्या पक्षाच्या एका मंडळाचा अध्यक्ष आहे. राजकीय स्वरुपाची जी आंदोलने झाली त्यासंबंधीचे गुन्हे त्याच्यावर आहेत. बलात्कार, चो-या, दरोडे अशा प्रकारचे गुन्हे त्याच्यावर नाहीत. सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटीलसाहेब हे फार सुंदर बोलतात. परंतु राष्ट्रवादीचा जो एक नगरसेवक निवडून आलेला आहे त्याला एमपीडीअे अंतर्गत नोटीस देण्यात आलेली होती. ती नोटीस रद्द करण्यात आली. वालवंशीला एमपीडीअेची नोटीस देऊन तडीपार करण्याची कारवाई झाली होती. कृष्णा खोपडे हा काँग्रेसचा कार्यकर्ता होता. तो आता आमच्या बरोबर आहे. त्याच्यावर कोणतेही क्रिमिनल स्वरुपाचे गुन्हे नाहीत. आंदोलने, सत्याग्रह, अनलॉफूल असेम्ब्ली ही कलमे माझ्या देखील नावावर असू शकतील. मला हे सांगावयाचे आहे की, राजकीय स्वरुपाचे गुन्हे आणि चो-या, बलात्कार, दरोडे असे क्रिमिनल गुन्हे यामध्ये फरक करा. (अडथळा)...

श्री. आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांची सूचना मला मान्य आहे. राजीव दुगे हा पराभूत उमेदवार आहे. पिंपरी-चिंचवड येथून तो निवडणुकीसाठी उभा राहिला होता. त्याच्यावर 188 कलम लावलेले आहे. हे साधे कलम आहे....(अडथळा)... श्री. नागेश आप्पा अगज्ञान...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सदनामध्ये राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात आपण चर्चा उपस्थित केलेली असल्यामुळे माननीय गृह मंत्री महोदयांनी त्यानुषंगाने बोलणे अपेक्षित आहे. याठिकाणी गुन्हेगारांची देवाण-घेवाण होत असल्यासारखे वक्तव्य होत आहे. माननीय गृह मंत्र्यांनी मघाशी असे एक वाक्य सांगितले की, ज्यांच्याकडे अशी माणसे नाहीत असा एकही पक्ष नाही. कोणाकडे किती माणसे आहेत याची जंत्री वाचण्या ऐवजी त्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात बोलावे...

श्री. आर.आर.पाटील : नागेश आप्पा अगज्ञान हा आपण दिलेला उमेदवार पराभूत झाला होता. त्याच्यावर 302 कलमाखाली गुन्हा नोंदलेला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय गृह मंत्र्यांना मी काल सांगितले की, कॅश, कास्ट आणि क्रिमिनल हे पॉलिटिक्सचे तीन इम्पॉर्टन्स आहेत. आमच्या पक्षाचे किती ? अशा प्रकारची भूमिका माननीय गृहमंत्र्यांनी पब्लिकली मांडली. ज्यांच्यावर चो-या, दरोडे, बलात्काराचे गुन्हे आहेत त्यांना मते देऊ नका, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांच्या पक्षाने कलम 302 चे गुन्हे असलेले 5 उमेदवार दिलेले आहेत असे मी सांगितले. आमच्या गुन्हेगारांबद्दल माननीय गृह मंत्री महोदयांना चिंता असेल तर त्यांचे विचार स्तुत्य आहेत. माझे म्हणणे एवढेच आहे की, राजकीय स्वरुपाचे गुन्हे आणि क्रिमिनल गुन्हे यामध्ये फरक करायला पाहिजे. याठिकाणी मी माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख आणि माननीय सहकार मंत्री डॉ. पतंगराव कदम हे जे काही बोलले तेच मी वाचून दाखविले.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, श्री.शरद बाराते याच्यावर कलम 307 व 302 चा गुन्हा दाखल आहे. आमचे पक्ष नवीन आहेत. इकडून-तिकडून पार्सल आलेले, रिजेक्टेड, डॅमेज्ड ठरलेले. प्रत्येक नवीन पक्षाची हीच स्थिती असते. दुसरीकडून कार्यकर्ते घ्यावेच लागतात. परंतु आम्ही स्क्रिनिंग करु. स्क्रिनिंग केल्यानंतर जो माल रिजेक्टेड करण्यासारखा असेल तो ज्या मूळ पक्षात पाठविण्यासारखा आहे त्या पक्षाकडे पाठवून देऊ आणि चांगला माल ठेवून घेऊ.

सभापती महोदय, श्री.नेताजी चव्हाण याच्यावर कलम 302 खाली गुन्हा दाखल आहे. एकदा निवडणूक जिंकायची म्हटले की, पुढच्या बाजूने खून करणारा उभा असेल तर काऊंटर अटॅक करायला दुसऱ्या पार्टीला उमेदवार उभा करावा लागतो. हे थांबवायचे असेल तर सदनामार्फत माझी विनंती आहे, सगळयांनी एकत्रित बसू या. मी एक गोष्ट करतो, पुढील सहा महिन्यात सगळया पक्षात निवडून आलेली जी माणसे आहेत, ज्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे ती जनतेसाठी उपलब्ध करुन देऊ. सगळयांची जंत्री जाहीर करु. मग ते पक्ष कितीही असोत, किमान लोकांना तरी कळले पाहिजे, आपण कोणाला निवडतो. अशा लोकांना निवडणे चुकीचे आहे. म्हणून कोणत्या एका पक्षावर गुन्हेगारीचे आरोप करणे, कोणाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा नैतिक अधिकार कोणाला नाही. आपण दोन घटना मांडल्या. मी आपल्या मताशी सहमत आहे. डोकी फुटायला लागली, हात तुटायला लागले या गोष्टी सहजपणाने घेणे उपयोगाचे नाही, गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. म्हणून काल आपण लांडगे आणि शितोळे यांच्या संदर्भात मागणी केली. शितोळे यांच्या घटनेमध्ये आरोपींना अटक करण्यात आली. तपास योग्य झाला की नाही? फेरतपास करण्याची आवश्यकता असेल तर सी.आय.डी.मधील आय.जी.लेव्हलच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल आणि तीन महिन्याच्या आत तपास पूर्ण करुन चार्जशीट दाखल करण्यात येईल. कोणाला पाठिशी घातले जाणार नाही ही भूमिका घेण्याची मी ग्वाही देतो. या दोन्ही घटनांचा धागा पकडून शरसंधान करण्याचा प्रयत्न झाला. त्याचबरोबर सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांची साक्ष काढून आमच्यात अगोदरच अंतर आहे ते अंतर वाढविण्याचा आपला नेहमीच प्रयत्न होतो. परंतु सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.गडकरी महोदय, तुम्हाला काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस कळलेली नाही. या दोन्ही पक्षातील लोक भांडतील आणि एकत्र येतील ते सुध्दा फायद्यासाठीच. भांडण फायद्यासाठी असेल तर भांडतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

एकत्र येणे फायद्याचे असेल तर एकत्र येतील. त्यामुळे काही वेळा आपण खेड्यामध्ये बघतो की, शिक्यावर एखादे लोण्याचे गाडगे असते आणि मांजर खाली बसलेले असते.....

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, मी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना आपल्या परवानगीने थांबवू इच्छितो. सभापती महोदय, ज्यावेळी केंद्रात जनता पक्षाचे सरकार होते त्यावेळी स्व.यशवंतराव चव्हाण यांनी प्रस्ताव मांडला होता आणि त्या प्रस्तावाला श्री.जॉर्ज फर्नांडिस यांनी अनुमोदन दिले होते. स्व.यशवंतराव चव्हाण त्यावेळी विरोधी पक्षनेते होते. मी त्यावेळी लोकसभेच्या गॅलरीमध्ये बसलो होतो. त्याठिकाणी दुहेरी सदस्यत्वाच्या प्रश्नावर स्व.यशवंतराव चव्हाण यांनी प्रस्ताव मांडला होता. या जनता पक्षाच्या सरकारवर आमचा विश्वास नाही असा प्रस्ताव मांडल्यानंतर कै.राजनारायण आणि श्री.जॉर्ज फर्नांडिस यांनी समर्थन दिले आणि ताबडतोब पत्त्यासारखे ते सरकार गडगडल्याचे आम्ही पाहिले. काँग्रेस पक्ष मग तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल, मूपनार असेल किंवा दुसरा पक्ष असेल,

(नंतर श्री.जुन्नरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस सरकार पडावे म्हणून कधी बाहेर पडली नाही आणि आम्ही कधी आमचे सरकार पाडलेले नाही. सत्तेसाठी बाहेर पडणे आणि सरकार कोसळणे अशा घटना आपल्या राज्यात कधी घडल्या नाहीत आणि कधी घडणारही नाहीत.

श्री. नितीन गडकरी : मी माझे मित्र ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, खरे म्हणजे आपली गॅलरीतच बसण्याची जागा आहे. आम्ही संघाचे, जनसंघाचे लोक आहोत. ज्यांनी आम्हाला जातीयवादी म्हटले त्यांनीच या महाराष्ट्रामध्ये धर्मनिरपेक्षतेचे डमरु वाजवून, आपल्याच नेत्यांनी माननीय उत्तमराव पाटलांची मदत घेऊन काँग्रेसच्या पाठीत खंजीर खुपसून महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद पटकावले होते, हे आपण विसरला आहात काय? भाजप-शिवसेना कधीही जातीय वाद करीत नाही. तुम्ही आयुष्यात कधी मंत्रीही होऊ शकत नाहीत, हे आपण लक्षात घ्यावे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

उपसभापती : माननीय उपमुख्यमंत्री चर्चेला उत्तर देत असतांना त्यांच्या भाषणात अडथळा आणला जात आहे. त्यामुळे मी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांचा रिप्लाय संपलेला आहे, असे समजावे काय ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझे मित्र माननीय गुरुनाथ कुलकर्णी ब्राम्हण असल्यामुळेच त्यांना खासदार बनविले जात नाही. ते ब्राम्हण असल्यामुळेच त्यांना गॅलरीत बसविले जाते.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय गुरुनाथ कुलकर्णी यांच्यावरील अन्यायाची मी नोंद घेतलेली आहे. योग्य वेळ येईल तेव्हा त्यांचा बॅकलॉग भरुन काढला जाईल तसेच सन्माननीय सदस्यांच्या उंचीचे भान ठेऊन त्यांना पद देण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्यांवरील अन्याय दूर केला जाईल.

सभापती महोदय, मुख्यमंत्री काहीतरी स्टेटमेंट करतील आणि सरकार अडचणीत येईल असा आपण कोणताही अर्थ काढू नका. खेडयात बोका शिक्याच्या खाली उभा राहून दोरी कधी तुटते आणि त्यातील लोणी मी कधी खातो, हे आम्ही बघितलेले आहे. परंतु दोरी काही तुटत नाही आणि बोक्याला लोणी काही मिळत नाही. तशीच परिस्थिती आता विरोधी पक्षाची झालेली आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

तुम्ही आमच्या भांडणाची पुष्कळ वाट बघितली, परंतु तुम्हाला अजून तरी पुढील निवडणुका होईपर्यंत विरोधी बाकावरच बसावे लागणार आहे. तसेच आताच्या निवडणुकीचा निकाल बघितला तर पुढील काळात तुम्हाला सत्ता मिळण्याची संधी मिळेल असेही वाटत नाही. जिल्हापरिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या वेळी आपली भाषणे ऐकल्यानंतर या निवडणुकीचा निकाल वेगळाच लागेल, असे आम्हाला वाटत होते, या निवडणूकांमध्ये बोलण्यासाठी अनेक मुद्दे आपल्याकडे होते परंतु निवडणुकीमध्ये जनतेने आमच्या बाजूने योग्य कौल दिलेला आहे. जिल्हा परिषदेचा निकाल बघितला तर दोघानांही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, असे वाटते. सभापती महोदय, लोकशाही जर सक्षम बनवायची असेल तर त्यासाठी सक्षम असा विरोधी पक्ष असणे आवश्यक आहे. संसदीय लोकशाहीमध्ये जर विरोधी पक्ष कमजोर असला तर सत्तेत असणारे लोक भरकटण्याची शक्यता असते. आम्ही राज्य करण्यासाठी तुम्ही मजबूत असणे आवश्यक आहे. परंतु विरोधी पक्षाची तब्येत दिवसेंदिवस बिघडत आहे. आमचा विचार करण्याऐवजी आपण आपला विचार करा. आपण मनापासून सांगा, भाजप आणि शिवसेना पूर्वीसारखी एकसंघ राहिलेली आहे काय ? मधल्या काळात शिवसेना थोडीशी अडचणीत आल्या बरोबर भाजपने आपला पक्ष मोठा कसा होईल, हे बघण्याचे काम केलेले आहे की नाही?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय उपमुख्यमंत्री जी माहिती देत आहेत त्याबाबत सांगू इच्छितो की, त्यांचे ज्ञान मोठे आहे. त्यांचे डावपेच चांगले आहेत. सत्ता मिळविण्यासाठी लक्ष्मीदर्शन हा महत्वाचा भाग आहे. आम्ही कोणावरही अन्याय करीत नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, ते ज्या जागेवर बसलेले आहेत त्याच्या बाजूच्या जागेवर उपसभापती बसतात आणि लोकशाही संकेताप्रमाणे त्या पदावर विरोधी पक्षातील सदस्याची नियुक्ती होते. परंतु आम्ही एक निवडणूक लढविली आणि उपसभापती पदावर त्यांनी कायम स्वरुपी हक्क सांगितला. हे लोकशाहीच्या कोणत्या संकेतामध्ये बसते याचा त्यांनी खुलासा केला तर बरे होईल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एकदा निवडणूक झाली आणि त्याचा परिणाम सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव डावखरे उपसभापती झाले. माननीय डावखरे साहेब उपसभापती झाल्यापासून त्या पदाला इतके घट्ट चिकटले आहेत की, ते निवृत्त झाल्याशिवाय त्यांना त्या पदावरुन इतक्यात काढणे शक्य होणार नाही आणि ते इतक्यात निवृत्त होणार नाहीत हे विरोधी पक्षांनी लक्षात घ्यावे.

उपसभापती : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी येथे एखाद्या पक्षाचा सदस्य म्हणून बसलेलो नाही. आपण सर्वांनी मला येथे आणून बसविले आहे. मी उपसभापती म्हणून काम पहावे अशी माननीय श्री.शरद पवार यांची इच्छा होती, काँग्रेस पक्षातील सदस्यांची तसेच शिवसेना प्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांची इच्छा होती. वाटल्यास आपण त्यांना विचारावे. ते जर नाही म्हणाले तर मी माझ्या पक्षश्रेष्ठींशी परवानगी घेऊन मग निर्णय घेईन.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी लोकशाही संकेताबद्दल बोलत होतो.

उपसभापती : माननीय बाळासाहेब ठाकरे लोकशाही मानतात.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी मूळ विषयावर येतो. तोंडुलीची घटना आहे. त्याठिकाणी काँग्रेसचे उमेदवार श्री.विजय मोहिते उभे होते. त्याठिकाणी श्री.पृथ्वीराज देशमुख हे अपक्ष आमदार म्हणून निवडून आलेले आहेत. युती सरकारला त्यांचा पाच वर्षे पाठिंबा होता. तेव्हा ते त्यांना चालत होते.तेव्हा ते गुन्हेगार नव्हते, गुंड नव्हते. सभापती महोदय, श्री.विजय मोहिते हे पूर्वी पोलीस दलात काम करीत होते. ते कामावर सतत गैरहजर असत, चोरीच्या मोटार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सायकलच्या प्रकरणामध्ये त्यांनी बेकायदेशीरपणे डिस्पोझल केल्यामुळे त्यांना नोकरीतून बडतर्फ करण्यात आले होते. ते काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणुकीसाठी उभे होते. निवडणुकीत ते पराभूत झाले. पण गावामध्ये त्यांची मेजॉरीटी असल्यामुळे त्यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली. त्याची कडी म्हणून काही लोकांनी त्या गावात जाऊन काही घरांची मोडतोड केली आणि लोकांना मारहाण केली. ही गोष्ट मी कबूल करतो. पण घटनेची सुरुवात श्री.मोहिते यांच्याकडून झाली व त्याचे पर्यावसान दुसऱ्या गटाकडून घरांची मोडतोड आणि लोकांना मारहाण करण्यात झाली. सरकार म्हणून मी या घटनेचे कधीच समर्थन करणार नाही. या प्रकरणात एकूण 21 लोकांना अटक करण्यात आली आहे. माननीय मंत्रिमहोदय डॉ.पतंगराव कदम यांना त्यांच्या मतदारसंघात एस.पी.चे संरक्षण घेऊन जावे लागते अशी परिस्थिती नाही. डॉ.पतंगराव कदम हे त्या जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यामुळे त्याठिकाणी जाणार होते. घटनास्थळी भेट देण्यासाठी पालकमंत्री जाणार म्हटल्यावर एस.पी.सुध्दा त्यांच्याबरोबर गेले. याचा अर्थ पालकमंत्री एस.पी.च्या संरक्षणाखाली गेले असा होत नाही. सांगली जिल्ह्यात आपणही पोलीस संरक्षणाशिवाय भेट देऊ शकता. एका गावातील घटनेवरुन पोलिसांविरुध्द काहूर उठविणे योग्य नव्हे.

यानंतर श्री.पुरी.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.नितीन गडकरी : डॉ.पतंगराव कदम यांनीच मला फोन केला होता.

श्री.विनोद तावडे : आम्ही परवा माननीय मुख्यमंत्र्याकडे चहापानासाठी गेलो होतो. त्यावेळी माननीय आबा, आपणच सांगितले होते की, मीच एस.पीं.ना त्यांच्यासोबत जाण्यास सांगितले होते.

उपसभापती : चहापानाच्यावेळी झालेल्या गोष्टी सगळयाच खऱ्या धरावयाच्या का ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, डॉ.पतंगराव कदम यांनी मला स्वत: फोनवर माहिती दिलेली आहे. मी, एस.पी.ला बरोबर घेऊन गेलो, असे त्यांनी स्वत: मला सांगितलेले आहे. त्यांनी हेही सांगितले की, 35 लोक घर जाळण्याचा प्रयत्न करत होते. हवे तर, त्यांना आपण आता सभागृहात बोलवावे व विचारावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल सदनामध्ये स्वत: डॉ.पतंगराव कदम यांनीच सांगितले की, अशी परिस्थिती नव्हती. त्याठिकाणी एस.पीं.ना घेऊन जाण्यासारखी परिस्थिती नव्हती तर पालकमंत्री त्याठिकाणी भेट देणार होते म्हणून एस.पी. त्याठिकाणी उपस्थित होते. तसेच, माननीय मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याबद्दल, माननीय गडकरी साहेब काल बोलले, त्याबद्दल मी सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांना चहापानाच्यावेळी ज्यावेळी पत्रकारांनी प्रश्न विचारला त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत:च इन्कार केला आहे की, मी तसे बोललो नव्हतो. आम्ही राजकीय अभिनिवेशातून भाषण गाजावे म्हणून एखादे स्टेटमेंट दिले तर ते एवढे गांभीर्याने घेऊ नये. आमच्यामध्ये दुही नाही. 5 वर्षे अजिबात सरकारला अस्थीर करणारा निर्णय होणार नाही. त्यामुळे कुठेतरी लोण्याचा गोळा पडेल अशी वाट पाहण्यामध्ये आपला वेळ वाया जाईल. माननीय सरपोतदार साहेब, आपण लोकशाहीतील संकेतांबद्दल बोलत आहात. ....(अडथळा) कुठेतरी हे रेकॉर्डवर आले पाहिजे की, राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष मैत्री जोपासणारा पक्ष आहे. माननीय फुंडकर साहेब, याठिकाणी उपस्थित आहेत, आपण त्यांना विचारावे. ते स्वत:हून माझ्याकडे आले होते व मला त्यांनी विचारले होते की, आबा, आपले अकोल्यामध्ये कमी नगरसेवक आहेत. परंतु आपल्याला जर त्याठिकाणी महापौर बनवायचा असेल तर आम्ही आपणास बाहेरुन पाठिंबा देण्यास तयार आहोत. आमचा महापौर बनवा असे ते सांगण्यासाठी माझ्याकडे आले होते. त्यांची व माझी ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी मी त्यांना सांगितले की, आमची निवडणूकपूर्व युती असल्यामुळे व

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

आम्हाला जरी महापौर पद मिळणार असले तरी आम्ही पदासाठी वेगळी भूमिका घेणार नाही वा भूमिका घेतली नाही. अमरावतीमध्येही महापौर पद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षास द्यायची बीजेपी आणि सेनेची तयारी होती. अशाप्रकारचा प्रस्ताव माझ्याकडे आला होता, परंतु त्याचवेळी मी सांगितले की, आपण बिलकूल असे करु नका. त्या दोन्ही ठिकाणी आम्ही काँग्रेस पक्षाचा महापौर केला. कारण त्याठिकाणी काँग्रेस पक्षाचे सदस्य आमच्यापेक्षा जास्त होते. परंतु पुण्यामध्ये काँग्रेस पक्षापेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्यांची संख्या जास्त होती. दोन ठिकाणी संधी मिळण्यासरखी परिस्थिती असताना व त्याठिकाणी आम्ही आमच्या पक्षाचा महापौर न करता, काँग्रेस पक्षाचा महापौर करुन आम्ही आघाडीचा धर्म पाळला असला तरी आमची अशी अपेक्षा होती की, पुण्याचे महापौर पद आम्हाला मिळावे. परंतु आम्हाला अपेक्षा नव्हती की, शिवसेनेचे लोक आम्हाला पाठिंबा देतील. माननीय सरपोतदार साहेबांचा व माननीय रावते साहेबांचा मी आभारी आहे. त्याठिकाणी आम्ही आमचा उमेदवार उभा केला व त्यास सेनेने पाठिंबा दिला व आमच्या पक्षाचा महापौर झाला.

श्री.पांडुकर फुंडकर : सभापती महोदय, माझ्या नावाचा उल्लेख माननीय आर.आर. आबांनी केला. त्यामुळे मला माझा खुलासा केला पाहिजे. ज्यावेळी अकोला महानगरपालिकेच्या महापौर पदाच्या निवडीसाठी स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी माझ्याशी चर्चा केली की, आपण एकत्र बसून चर्चा करु या काय ? त्यावेळी चर्चा झाली व आमची स्थानिक लेव्हलवर तयारी आहे, असे त्यांनी सांगितले व आपण माननीय आबांशी बोलावे, असे ठरले. त्यावेळी मी आपल्याशी चर्चा केलेली आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत/शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय श्री.आर.आर.पाटील हे राज्याचे उपमुख्यमंत्री व ज्येष्ठ नेते आहेत. गेल्या आठ दिवसात मला अनेक वेळा माननीय श्री.शरद पवार, श्री.अजित पवार, स्वत: श्री.आर.आर.पाटील यांचे फोन आले. परंतु, अशा खाजगी बाबींचा उल्लेख सभागृहातील चर्चेत करावयाचा नसतो. सन्माननीय उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील साहेब, आपण मोठे नेते आहात, असा लहान-सहान कपडे धुण्याचा कार्यक्रम हाती घेऊ नका. सन्माननीय मंत्री, श्री.अजित पवार माझ्याकडे दहा वेळा आले, असा जर मी सभागृहात उल्लेख केला तर ते योग्य होईल का ? सन्माननीय श्री.अजित पवार यांना बदनाम करावयाचे असेल तर अशी वक्तव्ये करा. सभापती महोदय, हे कुठे तरी थांबले पाहिजे. आपल्या दालनात आपली जी चर्चा होते त्याबाबत आपण कधी सभागृहात बोलतो का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल सभागृहात कायदा व सुव्यवस्थेवरील चर्चेमध्ये भाग घेतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी राजकीय वक्तव्ये केली. त्याबाबत उत्तर देण्याचा मला अधिकार आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांचे नाव घेऊन केला. पुणे महापौर निवडणुकीत सन्माननीय मंत्री, श्री.अजित पवार यांनी पाठिंबा मागितल्यानंतर आम्ही तो दिला. सन्माननीय मंत्री, श्री.अजित पवार यांनी व्यक्तिश: मला फोन केला होता. आम्ही उभ्या केलेल्या उपमहापौर निवडणुकीतील उमेदवाराला राष्ट्रवादी पक्षाच्या सदस्यांनी मतदान केले आहे. म्हणून मला उपमुख्यमंत्री महोदयांना असे सांगावयाचे आहे की, त्यांनी केवळ एका बाजूची माहिती देऊ नये. राष्ट्रवादी काँग्रेसने आम्हाला प्रस्ताव दिला होता, हे देखील सांगावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, अशा प्रकारे राजकीय वक्तव्य करणे सभागृहाच्या एथिक्सच्या दृष्टीने योग्य नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एथिक्सच्या दृष्टीने चांगले नसेल तर आपण सन्माननीय सदस्य, श्री.नितीन गडकरी यांना विचारुन ही वक्तव्ये कामकाजातून काढून टाकावीत, माझी काही हरकत असणार नाही. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात राजकीय वक्तव्ये केली म्हणून मला हे बोलणे भाग पडले. अन्यथा, केवळ आपल्यालाच बोलता येते आणि आम्ही बोलत

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

नाही, असा समज झाला असता. मला जे राजकीय बोलावयाचे होते ते बोलून झाले आहे. आता मी कायदा व सुव्यवस्थेवर बोलतो.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी जी राजकीय वक्तव्ये केली असतील ती कामकाजातून काढून टाकावीत, अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जनतेच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे राज्य सरकारचे प्रथम कर्तव्य आहे. राज्यातील परिस्थिती खूप बदलली आहे, गुंड सर्वत्र वावरत आहेत, असा उल्लेख चर्चेत झाला. वर्षभरात गुन्हयांमध्ये 10 टक्के वाढ झाली तर ती नॉर्मल असल्याचे जगभरात मानले जाते. राज्यातील विविध गुन्हयांची आकडेवारी पाहिली तर सन 1994 मध्ये 2777 खून झाले, सन 1995 मध्ये 2895, सन 1996 मध्ये 2768, सन 1997 मध्ये 2825, सन 1998 मध्ये 3000, सन 1999 मध्ये 3015, सन 2000 मध्ये 2854 व यावर्षी 2651 खून महाराष्ट्रात झाले. एवढया मोठया प्रमाणात खूनाचे गुन्हे घडणे हे जरी गंभीर असले तर खूनाची टक्केवारी घटत चालली आहे. जगभरामध्ये 10 टक्के गुन्हयांची वाढ हे नॉर्मल समजत असतांना आपल्या राज्यात गुन्हयांमध्ये घट होत चालली आहे, ही बाब मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, राज्यामध्ये जीवित सुरक्षित नाही तसेच मालमत्तेचे रक्षण करण्यामध्ये पोलीस यंत्रणा दुबळी ठरली आहे. परंतु, वस्तुस्थिती तशी नाही. राज्यामध्ये घडलेल्या दरोडयांच्या गुन्हयांचे प्रमाण बघितले तर सन 1994 मध्ये 693, सन 1997 मध्ये 709, सन 2002 मध्ये 547, सन 2004 मध्ये 619, सन 2005 मध्ये 636 व सन 2006 मध्ये 625 दरोडे राज्यामध्ये पडलेले आहेत. यावरुन ही गोष्ट स्पष्ट होते की, राज्यातील दरोडयांच्या प्रमाणामध्ये घट झालेली आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

पोलीस यंत्रणा सक्षमपणे काम करीत असल्यामुळे दरोडे पडण्याचे प्रमाण घटलेले आहे. अर्थातच 625 दरोडे पडणे म्हणजे एका दिवशी दोन दरोडे पडणे ही गोष्ट चांगली नाही. यासाठी ज्या काही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे त्या करण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, जातीय दंगलींचे प्रमाण बघितले तर सन 2003 मध्ये 52, सन 2004 मध्ये 33, सन 2005 मध्ये 19, सन 2006 मध्ये 9 आणि फेब्रुवारी, 2007 पर्यंत केवळ 1 जातीय दंगल महाराष्ट्र राज्यामध्ये झालेली आहे. जातीय दंगली, खून, दरोडे अशा महत्वपूर्ण गुन्हयांमध्ये घट झालेली आहे.

सभापती महोदय, एका बाबतीत मात्र पोलीस दलाने आणि शासनाने अतिशय कठोर भूमिका घेतलेली आहे. राज्यामध्ये होणा-या बलात्काराच्या प्रकरणांमध्ये मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी घट झालेली आहे. सन 2005 मध्ये 1549 आणि यावर्षी 1342 बलात्काराच्या घटना घडलेल्या आहेत. बलात्काराच्या प्रकरणामध्ये 13 टक्के घट झालेली आहे. साधारणत: 12 टक्के बलात्कार 16 वर्षाच्या आतील मुलींवर, 30 टक्के बलात्कार 16 वर्षापर्यंतच्या मुलींवर, 15 टक्के बलात्कार 16 ते 18 वयोगटातील मुलींवर आणि 24 टक्के बलात्कार 18 ते 25 वयोगटातील महिलांवर झालेले आहेत. बलात्काराची कारणे बघितली तर 80 टक्के बलात्कार करणारे एकाच धर्माचे आढळून आले. 12.53 टक्के बलात्काराची प्रकरणे प्रेमसंबंधामुळे, 32 टक्के बलात्काराची प्रकरणे लग्नाचे खोटे आश्वासन देऊन आणि 2.17 टक्के बलात्काराची प्रकरणे नोकरीचे आमिष दाखऊन केली गेली आहेत. वाईट गोष्ट अशी आहे की, बलात्काराची 1.13 टक्के प्रकरणे वडिलांच्या प्रोत्साहनामुळे, 1.83 टक्के प्रकरणे भावाच्या प्रोत्साहनामुळे घडलेली आहेत. बलात्काराच्या प्रकरणामध्ये घट का झाली याचे विश्लेषण करण्यात आले आहे. पोलिसांनी वेळेत दखल घेतल्यामुळे बलात्काराच्या प्रकरणांमध्ये 13 टक्के घट झाल्याचे दिसून येत आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत हे प्रमाण कमी असले तरी पुरोगामी महाराष्ट्रात 1342 बलात्काराच्या घटना वेगवेगळया वयोगाटात झालेल्या आहेत. आम्ही केंद्र शासनाकडे कायदा करण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी महिला आमदारांची या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी एक बैठक आयोजित करण्यात येईल. बलात्काराच्या घटनेचा एका वर्षामध्ये निकाल लागला पाहिजे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महिला आमदारांची बैठक घेण्यात येणार आहे. त्या बैठकीला पुरुष आमदारांना निमंत्रित करावे, जेणे करुन पुरुष आमदारांना आपले मत मांडता येईल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्या पुरुष आमदारांना सूचना करावयाच्या आहेत त्यांना या बैठकीला बोलावण्यात येईल. सभापती महोदय, 1 ते 5 क्रमांकांचे जे प्रमुख गुन्हे आहेत त्यावर नियंत्रण मिळविण्यामध्ये पोलिसांना चांगले यश आलेले आहे. राज्यातील तरुण पिढी बिघडू नये म्हणून डान्स बार बंदीचा निर्णय घेतला गेला. त्याच बरोबर अलिकडच्या काळात अंमली पदार्थांचे सेवन करणे हा तरुणांमध्ये पसरत जाणारा भयानक रोग आहे. परवा पुण्यातील रेव्ह पार्टीमध्ये 280 तरुणांना अटक करण्यात आली. ही मुले अतिशय हुशार आणि चांगल्या घरातील आहेत. ही मुले इंजिनिअरींगमध्ये शिकणारी आहेत. रेव्ह पार्टीमध्ये मोठया प्रमाणावर अंमली पदार्थांचे सेवन केले जाते.

यानंतर कु.खर्चे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

अंमली पदार्थांच्या सेवनाने आपल्या देशाची तरुण पिढी ही वाममार्गाला लागत आहे त्याकरिता आपल्या राज्याने एक स्क्वाड नेमले आहे, हे पथक अतिशय सक्षमरित्या काम करीत आहे अे.टी.एस. या पथकाने अंमली पदार्थांची विक्री करणा-यांना अटक केलेल्या व्यक्तींची संख्य बघितली तर आपल्या ध्यानात येईल. सदर पथकाने 2001 मध्ये 633 ,2002 मध्ये 707 आणि सन 2006 मध्ये 4085 लोकांना अटक केलेले आहे. परदेशातून अंमली पदार्थ विकणारे लोक आणि देशविरोधी कारवाया करणारे आणि देशाच्या तरुण पिढीला वाममार्गाला लावून देशाचे आर्थिक आणि मानसिक खच्चीकरण करणारे लोकच हे सर्व घडवून आणत आहेत. आतापर्यंत फक्त अंमली पदार्थांचा व्यापार करणारे लोकच पकडले गेले आहेत. या लोकांचे प्रमाण एखाद्या भयानक रोगासारखे देशभर फैलावत आहे, या गोष्टीची प्रचिती आपल्यालाही येईल. शासनाच्या वतीने राज्यातील जनतेला ग्वाही देण्यात येईल की, अंमली पदार्थ आपल्या देशात व राज्यात येणार नाहीत याची पोलीस खात्याकडून व इतर सुरक्षा यंत्रणांकडून पुरेपूर काळजी घेतली जाईल.

राज्यामध्ये अतिरेक्यांशी व नक्षलवाद्यांशी लढतांना काही नवीन प्रश्नही निर्माण होत आहेत त्यामुळे सामान्य जनतेत असंतोषाचे वातावरण निर्माण होत आहे. शेवटी कामगारांचे प्रश्न असतील,शेतक-यांचे प्रश्न असतील तरी त्याकरिता पोलिसांनाच जबाबदार धरले जाते, काही ठिकाणी तर मी असाही उल्लेख ऐकला आहे की, पोलीस आपल्या शस्त्रास्त्रांचा वापर अधिक करतात व त्यामुळे अनेक नाहक बळी जातात, परंतु अध्यक्ष महोदय, पोलिसांना बंदूक व तत्सम शस्त्रास्त्रे काही फक्त दाखविण्याकरिता देण्यात आलेली नसून त्यांचा समाजकंटकांविरुध्द वापर करण्यासाठी देण्यात आलेली आहेत. गेल्या काही वर्षात पोलिसांनी अतिशय मर्यादित स्वरुपात त्यांच्या शस्त्रास्त्रांचा वापर केलेला आहे हे आपल्याला पुढील आकडेवारीवरुन दिसून येईल. सन 1997 मध्ये पोलीस गोळीबारामध्ये 66 नागरिकांचा बळी गेला व सन 1998 मध्ये 39,सन 1999 मध्ये 114,सन 2000 मध्ये 97,सन 2001 मध्ये 95,सन 2002 मध्ये 72, सन 2003 मध्ये 72, सन 2004 मध्ये 16, सन 2005 मध्ये 17 लोक पोलीस फायरिंगमध्ये मृत्यू पावलेले आहेत. सन 1999 मध्ये ही संख्या 114 पर्यंत पोहोचली होती. सगळे असले तरी यासंदर्भात कोर्टातूनच न्याय मिळाला पाहिजे. पोलिसांना गोळीबाराचा कमीत कमी वापर करुन कमीत कमी जीवितहानी झाली पाहिजे, हीच भूमिका कायम घेतलेली आहे, हे यावरुन स्पष्ट होत आहे. या प्रस्तावामध्ये "

JJ - 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

अल कायदा " या संघटनेचा उल्लेख आहे. अध्यक्ष महोदय, आतापर्यंत घडलेल्या कुठल्याही घटनेमध्ये अल कायदा या संघटनेचा संबंध आढळून येत नाही परंतु " लष्कर -ए - तोयबा " आणि " सिमी " या संघटनांचा संबंध आढळून आलेला आहे. राज्यातील अतिरेकी कारवायांवर नियंत्रण ठेवण्याकरिता ए.टी.एस. हे पथक नेमण्यात आलेले आहे, हे पथक अतिशय सक्षमरित्या काम करीत आहे. पोलिसांवर टीका ही होतच असते परंतु त्याबाबत मी एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, 11 जुलै,2006 रोजी झालेल्या मुंबइ रेल्वे ' बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास मुंबई पोलीसांनी किती शिताफीने लावला याचे वर्णन लंडन येथील स्कॉटलँड यार्डच्या एका पोलीस अधिका-याने अतिशय चांगल्या रितीने केलेले आहे, महाराष्ट्राच्या मुंबई शहरातील पोलिसांची तारीफ लंडनमधील शहराचे पोलीस करतात म्हणजे मुंबई पोलिसांनी काहीतरी प्रशंसनीय काम केलेले आहे ना ? गडकरी साहेब, कदाचित आपला लंडन पोलिसांवर विश्वास नसेल परंतु आपल्या भाजप पक्षाचे एका राज्याचे मुख्यमंत्री व स्ट्राँग नेते यांनी नागपूर येथील पोलिसांच्या कामाबद्दल 10 लाख रुपयांचा चेक पाठविला याचे आम्हाला देखील आश्चर्य वाटले. आम्ही ते बक्षीस स्वीकारावयाचे की नाही याचा विचार करीत होतो परंतु आता आमचा निर्णय झालेला आहे की, ते बक्षीस स्वीकारुन त्यात पाच लाख रुपयांची या राज्यसरकारची भर टाकून रुपये 15 लाख हे नागपूर येथील ज्या पोलिसांनी अतिरेक्यांविरुध्द कारवाई केली त्यांना पोहोचविण्यात येतील.

यानंतर श्री. सुंबरे.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील ....

आपले श्री.नरेंद्र मोदी 10 लाख रूपयांचे बक्षिस देऊन महाराष्ट्राच्या पोलीस दलाचे कौतुक करीत असतील तर त्याच पोलीस दलाबद्दल 10 चांगले शब्द बोलण्यास आपल्याला काय हरकत आहे ? तेव्हा आपण आमच्या पोलिसांबद्दल चांगले बोला किंवा श्री.नरेंद्र मोदींनी पाठविलेले 10 लाखाचे बक्षिस परत पाठविण्यास तरी आम्हाला परवानगी द्या अशी माझी आपणास विनंती आहे. ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपल्या पोलिसांनी नागपूरमध्ये जे चांगले काम केले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन केलेले आहे, त्यांना धन्यवाद देखील दिलेले आहेत. तेथील पोलीस आयुक्त श्री.यादव हे अतिशय चांगले आहेत. आणि त्या कामगिरीतून जे पोलीस दवाखान्यामध्ये आहेत त्यांना देखील मी स्वत: जाऊन भेटलो आहे व त्यांचे अभिनंदन केलेले आहे. तेव्हा चांगल्या गोष्टीचे मी नेहमीच अभिनंदन केलेले आहे आणि त्याप्रमाणे नागपूरमधील कामगिरीबद्दल देखील तेथील पोलिसांचे मी अभिनंदन केलेले आहे. केवळ आपल्या सारख्या सुसंस्कृत आणि चांगल्या माणसाने बक्षिस म्हणून दिलेले 10 लाख रूपये स्वीकारण्यास 10 महिने लावले त्याबद्दल मला दु:ख आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री.गडकरी हे येथे बोलताना व्यथित झाल्याचे दिसत होते आणि आज देखील ते दु:खी असल्याचे दिसते आहे. कदाचित त्यांची तब्येत चांगली नसेल म्हणूनही असेल, पण त्यांनी आनंद राहिले पाहिजे. असो. सभापती महोदय, केवळ पोलिसांची संख्या अधिक वाढवून ते कार्यक्षम होणार नाहीत तर पोलीस दलातील इंटेलिजन्स मशिनरी सक्षम बनविली पाहिजे. गुन्हेगारांची आगाऊ माहिती मिळत नाही तोपर्यंत पोलीस देखील काही करू शकत नाहीत म्हणून त्या दृष्टीने पोलीस दल अत्याधुनिक बनविण्याचा आपला प्रयत्न आहे. त्यासाठी केंद्रीय आय.बी.च्या धर्तीवर स्टेट इंटेलिजन्स विभाग करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. त्या विभागामध्ये असलेल्या कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या तीन वर्षांनी बदल्या होतात आणि त्यामुळे त्यांनी निर्माण केलेले, तयार केलेले नेटवर्क बिघडून जाते. परिणामी अतिरेकी संघटनांची माहिती, विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची, चळवळींची माहिती मिळणे कठीण जाते. म्हणूनच केंद्रीय आय.बी.च्या धर्तीवर राज्य गुप्तवार्ता विभागाची बांधणी करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. या विभागामध्ये नेमले गेलेले कर्मचारी-अधिकारी हे शेवटपर्यंत तेथेच राहतील आणि तेथेच निवृत्त होतील. जेणे करून गुप्तवार्ता, माहिती मिळण्यामध्ये

..... केके 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यत्यय येतो तो येणार नाही. अशा पद्धतीने आपण आपला हा विभाग सक्षम करणार आहोत. सभापती महोदय, गडचिरोली, चंद्रपूर आणि गोंदियाच्या जंगलामध्ये जे पोलीस दलाचे जवान रात्रीचा दिवस करून पहारा ठेवत आहेत त्यांना आपण खरोखरी मनापासून धन्यवाद दिले पाहिजेत. अनेकदा आपण पोलीस दलावर टीका करताना महाराष्ट्राच्या पोलीस दलाने प्रत्येक विभागामध्ये आपली चमक दाखविली आहे. नक्षलग्रस्त भागामध्ये काम करताना, अतिरेक्यांबरोबर लढताना देखील त्यांनी आपली चमक दाखविली आहे. विशेषत: नक्षलग्रस्त भागामध्ये काम करताना अन्य राज्यांतील पोलिसांनी आपली शस्त्रे खाली ठेवली परंतु महाराष्ट्राच्या पोलीस दलाने युद्धाच्या भूमिकेतून तेथे सातत्याने काम केले आणि गेल्या वर्षी त्यात बऱ्यापैकी यश देखील मिळविले आहे. आतापर्यंत नक्षलवाद्यांबरोबर झालेल्या चकमकींमध्ये 22 नक्षलवाद्यांना महाराष्ट्र पोलिसांनी कंठस्नान घातले आहे, 20 नक्षलवाद्यांना अटक केलेली आहे, 24 नक्षलवादी जखमी झालेले आहेत आणि 37 जणांना महाराष्ट्राच्या पोलिसांपुढे आत्मसमर्पण करावे लागले आहे. देशभरातील कोणत्याही राज्याच्या पोलीस दलापेक्षा महाराष्ट्राच्या पोलीस दलाने केलेली कामगिरी ही देशस्तरावर सेट झालेली आहे, उजवी ठरलेली आहे. गेल्या वर्षभरामध्ये जवळ जवळ 44 अतिरेक्यांना अटक करून, देशाच्या बाहेर राहून देशविरोधी कारवाई करणाऱ्या शत्रूंना मर्यादा घालण्याचे काम महाराष्ट्राच्या पोलिसांनी केलेले आहे आणि हे करीत असताना आपल्या पोलिसांबद्दल गैरसमज निर्माण होणार नाहीत, त्यांच्याकडून चुका होणार नाहीत याची प्रत्येक बाबीमध्ये काळजी घेतली गेली आहे. अनेकदा पोलीस कस्टडीमध्ये कैद्यांचे मृत्यू होतात पण हेही प्रकार महाराष्ट्रात कमी झालेले आहेत, होत आहेत. एका दलाने मनात आणले तर ते काय करू शकते हे आमच्या पोलीस दलाने सिद्ध करून दाखविले आहे. सभापती महोदय, 2002-03 नंतर राज्यामध्ये दारूची दुकाने वाढलेली नाहीत वा त्यावरील करही वाढलेले नाहीत पण असे असताना महसूल उत्पन्न वाढलेले आहे. 2002-03 मध्येक 1925 कोटी रूपये स्टेट एक्साईजचे उत्पन्न होते. ते उत्पन्न या वर्षी 3150 कोटी रूपये`इ ालेले आहे. दुकाने आणि टॅक्स न वाढविता देखील केवळ हातभट्टीच्या दारूवर नियंत्रण आणल्यास हे उत्पन्न हजारो रूपयांनी वाढू शकते. ...

(यानंतर श्री.गागरे ..... एलएल 1 ...

अशोधित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

पोलीस दलाने 2-3 वर्ष हे सिध्द करुन दाखविले आहे. 2-3 वर्षामध्ये महाराष्ट्रात दारुची दुकाने वाढलेली नाहीत पण टॅक्सेशन वाढलेले आहे. 2002-2003 मध्ये 1925 कोटी रुपये स्टेट एक्साईजचे उत्पन्न होते, या वर्षीचे उत्पन्न 3150 कोटी रुपये आहे. दारुची दुकाने व टॅक्सेशन न वाढवितासुध्दा हातभट्टीवर नियंत्रण आणले तर वर्षाला 700 ते 1000 कोटी रुपयांचे उत्पन्न वाढू शकते, हे पोलीस दलाने सतत 2-3 वर्ष सिध्द करुन दिले आहे. 2004-2005 मध्ये 2600 कोटी उत्पन्न होते. 2005-2006 मध्ये 2800 कोटी उत्पन्न होते. 2006-2007 मध्ये 3150 कोटी रुपये उत्पन्न झालेले आहे. हे केवळ दुकाने न वाढविता हातभट्टी बंद केल्यामुळे झाले आहे. म्हणजे लोक अधिकृत दारु पीत आहेत. याचा अर्थ दारुच्या पैशावर राज्य चालावे असे माझे मत नाही. पण अवैध दारु पिऊन निरपराध माणसे मरत होती, त्याच्या प्रमाणात मात्र घट झालेली आहे. सभागृहात उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना ही गोष्ट आवडणार नाही पण मी त्यांना आवडणारी दुसरी गोष्ट सांगणार आहे, ज्याचे विश्लेषण गृह खात्याने केले आहे.

उपसभापती : मी आपणास विचारु इच्छितो की, राज्यात दारु पिणाऱ्यांची संख्या वाढली आहे असे आपणास वाटत नाही का ?

श्री.आर.आर.पाटील :- सभापती महोदय, राज्यात दारु पिणाऱ्यांची संख्या वाढलेली नाही, तर ती कमी झालेली आहे. ही संख्या कमी का झाली याचे विश्लेषण केले आहे. जे लोक पितात ते आपला अनुभव सांगत असतात. दारु प्यायल्यानंतर माणसाला शूर झाल्यासारखे वाढते. त्याला सारखी भांडणे काढावीसी वाटतात. कोणाला तरी मारावे वाटते. गरीब माणसे हातभट्टीची पिऊन बायकोलाच मारत होते कारण दुसरा कोणी त्यांचा मार खात नाही. आता आम्ही चार शहराचे विश्लेषण केले आहे. रात्रीच्या वेळी नवऱ्याने बायकोला मारण्याच्या तक्रारीमध्ये 30 टक्के घट महाराष्ट्रामध्ये झालेली आहे. हातभट्टया बंद केल्या तर संसार सुखाने चालतात आणि महिलांवरचे अत्याचार थांबत आहेत, ही गोष्ट सिध्द झालेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांना कदाचित दारुमुळे राज्याचा महसूल वाढला आहे ही बाब आवडणार नाही. परंतु एका बाजूने महसूल वाढला आहे, आणि जे नकली दारु पीत होते, ते थांबले आहे. हा महसूल वाढल्यामुळे त्या पैशाने राज्य चालते असे तुम्हाला वाटत नाही तसेच मलाही वाटत नाही. कारण डॉ.नीलम गोऱ्हे या नेहमी दारुबंदीवर बोलत असतात. महिलासंबंधी गुन्हे मागे घ्या म्हणत असतात. त्यांची सातत्याने हीच मागणी माझ्याकडे असते. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, अवैध वाहतूक काही प्रमाणात नियंत्रित केल्यामुळे आज एस.टी. पुन्हा एकदा नफयाकडे वाटचाल करायला लागली आहे. कोठडीतील मृत्यूचे प्रमाण घटलेले आहे. बेकायदेशीर शस्त्रे जप्त करण्याचे प्रमाण वाढले आहे. एकंदरीत पोलीस दलाकडून ज्या अपेक्षा आहेत, त्या अपेक्षा पार पाडण्यासाठी या दलातील जवान अहोरात्र काम करीत आहेत. मी गृहमंत्री झाल्यानंतर मॅकेन्झी समिती नेमली होती. त्यावेळी असे लक्षात आले होते की, 81 टक्के पोलीस कर्मचाऱ्यांना आठवडयातून साप्ताहिक सुट्टीसुध्दा मिळत नाही. हे प्रमाण आता आम्ही 70 टकेपर्यंत खाली आणलेले आहे. कामाचे योग्य नियोजन केले तर पैशाची बचत होते आणि लोकांना एक सुट्टी देता येते ही गोष्ट 70 टक्के लोकांच्या बाबतीत आम्ही सत्य व सिध्द करुन दाखविली आहे. दरवर्षी 11 हजार पोलिसांची भरती करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. नव्याने जवान पोलीस दलामध्ये सामील होतील. पूर्वीच्या मानकानुसार आजही 55 हजार पोलिसांची कमतरता आहे. एका बाजूने कामे वाढत आहेत, दुसऱ्या बाजूला लोकांना 18-18 तास काम करावे लागत आहे. यातून कोठेतरी रिलीफ द्यावा म्हणून गेल्या वर्षी आपण 11 हजार पोलीसांची भरती केली. दोन महिन्यामध्ये त्यांचे ट्रेनिंग संपल्यानंतर पोलीस दलामध्ये 100 टक्के कर्मचाऱ्यांना आठवडयातून एक हक्काची सुट्टी देणे राज्य सरकारला शक्य होणार आहे. त्यामुळे त्यांचे कामाचे काही तास कमी होतील. अतिशय अडचणीच्या काळामध्ये ते काम करीत असतात. 1996 साली वेतन आयोग ठरवित असताना 3050 ची वेतनश्रेणी त्यांना देण्यात आली होती. यामध्ये एकच घटकांसाठी बदल करुन सुधारीत वेतनश्रेणी 3200 ची देण्यात आली आहे, तसेच या व्यतिरिक्त पाचशे रुपये विशेष वेतन देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना सांगतो की, काही कामे करण्यासाठी मुहुर्तावर माझा विश्वास नाही. पण मुहूर्त नावाची गोष्ट असू शकते असे वाटण्याइतकी माझी परिस्थिती झालेली आहे. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला पण काल्पनिक वाढ कधीपासून द्यावयाची याकरिता सचिवांनी तीन महिन्याचा कालावधी घेतला ही गोष्ट खरी आहे. त्यानंतर आचारसंहिता सुरु झाली. महाराष्ट्राचे निवडणूक आयुक्त श्री.नंदलाल यांच्याकडे हा प्रस्ताव पाठविला होता. आचारसंहिता संपणार त्या दिवशी मान्यता मिळणार असे वाटत होते पण

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

त्यांची आचारसंहिता तीन वाजता संपली व एक वाजता लोकसभेची आचारसंहिता सुरु झाली. त्यामुळे महाराष्ट्र निवडणूक आयोगाकडून हा पगारवाढीचा प्रस्ताव त्या राष्ट्रीय निवडणूक आयोगाकडे पाठविला आहे. नेहमी नेहमी आचारसंहिता व निवडणूका लागू नयेत बाबतीत कोठेतरी विचार केला पाहिजे अशी सध्याची परिस्थिती आहे.

.....नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

जळगावची पोटनिवडणूक आपण कशासाठी घेत आहात? ही निवडणूक कां लादण्यात आली याच्या खोलात मी जात नाही आणि पुन्हा राजकारणावर येत नाही. अशाप्रकारे पोटनिवडणुका पुन्हा पुन्हा लागू नयेत यासाठी भाजपच्या नेत्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या प्रशासकीय यंत्रणेवर ताण पडत असल्यामुळे चांगल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. या पोटनिवडणुका कां लागल्या याचा आपण गांभीर्याने विचार करावा. जरी आचारसंहितेमुळे पोलिसांना द्यावयाच्या पगारवाढीची अंमलबजावणी करण्यास विलंब होत असला तरी 1 ऑक्टोबरपासून त्यांना पगारवाढ देण्याचा शासनाचा निर्णय आहे. त्याकरिता मांडण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये वार्षिक खर्चाकरिता 111 कोटी रुपये आणि थकबाकीकरिता 45 कोटी रुपये असे मिळून 156 कोटींची तरतूद करण्याचा निर्णय घेतला आहे. अशाप्रकारे सरकारने प्रस्तावित केलेली पगारवाढ पोलिसांना देण्यास आचारसंहितेमुळे विलंब लागला तरी 1 ऑक्टोबर 2006 पासून पोलीस कर्मचाऱ्यांना ही पगारवाढ देण्यात येईल.

सभापती महोदय, या सदनामार्फत राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, अन्य कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्रामधील पोलीस दल सक्षमपणे काम करीत आहे. या राज्यातील कायदा व सुव्यवस्था टिकविण्यासाठी, जातीय सलोखा टिकविण्यासाठी हे दल काम करीत आहे. राज्यामध्ये आज विविध विचारधारा चुकीचे काम करुन राज्याची शांतता बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे महाराष्ट्र राज्य पुरोगामी आणि शांत प्रवृत्तीचे आहे. अशावेळी आपण सर्वांनी सहकार्य केले तर राज्यामध्ये शांतता प्रस्थापित करणे सोपे होईल. आणि जरी नाही केले तरी राज्यातील पोलीस दल राज्यामध्ये शांतता टिकविण्यासाठी सक्षम आहे. परंतु काही विचारधारा या राज्याचे नेहमी नुकसान करीत आहे. जाती जातीमध्ये तणाव, धर्मामध्ये तणाव निर्माण करुन दंगली निर्माण करीत आहेत. या दंगलीचा इतिहास बघितला तर त्यामध्ये गरिबांची घरे जळतात. चुकून सुध्दा एखाद्या नेत्याला गोळी लागत नाही किंवा नेत्याचे, पुढाऱ्याचे घर जळत नाही. गरिबाच्या जळणाऱ्या घरावर राजकारणाच्या पोळ्या भाजल्या पाहिजेत अशाप्रकारची विचारधारा सोडून देऊन एकसंघपणे सर्वांनी पोलीस दलाला सहकार्य देण्याची भूमिका घेतली तर हा महाराष्ट्र एकसंघ बनेल आणि हे राज्य आणखी पुढे जाईल. अशाप्रकारे राज्यातील जनतेला आवाहन करीत असतांना मी त्यांना विश्वास देतो. अजूनही पोलीस दलाला मिळणारी माहिती अपूरी असली तरी त्या माहितीव्दारे मागोवा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील....

काढून अतिरेक्यांना रोखण्याचे सामर्थ्य आपल्या पोलीस दलामध्ये आहे. त्यामुळे कार्यक्षमतेच्या बाबतीत महाराष्ट्राचे पोलीस दल संपूर्ण देशामध्ये यापूर्वी पहिल्या क्रमांकावर होते, आणि आजसुध्दा ते पहिल्या क्रमांकावर आहे. एकसारखी टीका करुन अहोरात्र काम करणारी व्यक्ती नाउमेद होणार नाही याची दक्षता ज्या ज्यावेळी या सदनामध्ये पोलीस दलासंबंधी चर्चा होईल त्यावेळी या सदनाने घेण्याची आवश्यकता आहे. आणि मी पुन्हा महाराष्ट्रातील तमाम जनतेला ग्वाही देतो की, या राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेचे नेहमी पावित्र्य राखण्याचे काम पोलीस दल अहोरात्र करीत राहणार आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, लोकशाहीमध्ये वावरतांना माझ्या हातून चुकीचे सुध्दा काही घडणार नाही याची मी नेहमी दक्षता घेत आलो आहे. मी ज्या कुटुंबामधून आलो, तेथील परिस्थिती बघितल्यानंतर उप मुख्यमंत्री पदापर्यंत राज्यातील जनतेने मला आणले, मला खूप मोठे केले. त्यामुळे 10 कोटी जनतेच्या मनातून मी उतरेन आणि विरोधकांना वाईट वाटेल अशाप्रकारचे कृत्य माझ्याकडून होणार नाही. त्यामुळे तासगावचा एपिसोड आपण विसरुन जावून दुखामधून बाहेर यावयास हरकत नाही. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी याठिकाणी चांगल्या प्रकारच्या सूचना केल्या आहेत. पोलीस दलाचे संपूर्ण वर्षभराचे बजेट करीत असतांना आपल्या चांगल्या सूचनांची अंमलबजावणी गृह विभागामार्फत केली जाईल. आपण थोडेसे राजकीय अभिनिवेशामधून बोलला आणि मी देखील थोडेसे बोललो. आणि मित्र म्हणून आपले सुध्दा अनुकरण करावेसे वाटल्यामुळे माझी गाडी भरकटली. आज मी आपले अनुकरण केले असलेतरी यापुढील काळात पुन्हा माझ्याकडून अनुकरण होणार नाही असा मी आपणास शब्द देतो. आणि ही चांगली चर्चा घडवून आणल्याबद्दल सभागृहातील दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांना धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

आता मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येत आहे. यानंतर सभागृहाची बैठक दुपारी 4-00 वाजता सुरु होईल.

(दुपारी 3.15 ते 4.00 मध्यंतर)

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्यंतरानंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

विशेष उल्लेख

पृ. शी. : पनवेल,नवीन पनवेल, खांदा वसाहत आदी भागातील शाळा व कॉलेज परिसरात नवतरुणी विद्यार्थीनी मोटार सायकल वाहतुकीचे नियम न पाळता भरधाव व बेदरकारपणे चालवित असल्याने अपघातात झालेली चिंतनीय वाढ.

मु. शी. : पनवेल, नवीन पनवेल, खांदा वसाहत आदी भागातील शाळा व कॉलेज परिसरात नवतरुणी विद्यार्थीनी मोटार सायकल वाहतुकीचे नियम न पाळता भरधाव व बेदरकारपणे चालवित असल्याने अपघातात झालेली चिंतनीय वाढ याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ए□ विशेष उल्ले□ाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडते.

"पनवेल, नवीन पनवेल, खांदा वसाहत आदी भागातील शाळा व कॉलेज परिसरात नवतरुणी विद्यार्थीनी मोटार सायकल वाहतुकीचे नियम न पाळता भरधाव व बेदरकारपणे चालवित असल्याने तेथील आसपासच्या परिसरात छोट्या मोठ्या अपघातात झालेली चिंतनीय वाढ. या भागात मोटार सायकलच्या स्वारांमुळे तेथील जेष्ठ नागरिकांना, महिलांना जाणे-येणे अत्यंत जिकिरीचे झाले आहे. या भागातील बेदरकारपणे चालविण्यात येणाऱ्या मोटार सायकल स्वारांविरुध्द तेथील पोलिसांनी मोहीम उघडली होती परंतु सध्या ही मोहीम बंद केल्याने पुन्हा तेथे मोटार सायकलस्वारांनी घातलेला धुडगूस लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची नितांत आवश्यकता असताना पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतल्याने बेजबाबदारपणे मोटार सायकल स्वारांवर कोणती कारवाई करण्यात येत आहे याबाबत तात्काळ निवेदन करावे, ही विनंती."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/ MAP/ SBT

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सभापती महोदय, धूम नावाचा चित्रपट आल्यापासून वेगवेगळ्या प्रकाराने बेदरकारपणे मोटारसायकल चालविणाऱ्या तरुण मुलांचा उच्छाद बऱ्याच शहरात चालू आहे. पुणे शहरामध्ये सुध्दा अशा प्रकारचे अपघात झालेले आहेत. त्या ठिकाणी वृध्दांना धक्का लागून ते जखमी झालेले आहेत. विशेषत: पनवेल, नवीन पनवेल आदी भागामध्ये शाळा आणि कॉलेजच्या परिसरामध्ये अनेक नवतरुणी देखील विद्यार्थ्यांच्या बरोबर वाहतुकीचे नियम न पाळता भरधाव बेदरकारपणे मोटारसायकल चालवितात. त्यामुळे जेष्ठ नागरिकांना जाणे-येणे अत्यंत जिकिरीचे झाले आहे. पोलिसांनी मोहीम उघडली होती परंतु ज्यावेळी अतिरेक झाला त्यावेळी पोलिसांची मोहीम बंद झाली. परत मोटार सायकारस्वारांची धूम चालू झाली. पोलिसांनी बघ्याची भूमिका न घेता महाराष्ट्रात धूम प्रकाराने जे मोटारसायकल चालवितात त्यामुळे अपघातांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे या दृष्टीकोनातून दखल घ्यावी यासाठी मी या विशेष उल्लेखाव्दारे लक्ष वेधत आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नेरळ आरोग्य केंद्राची झालेली दुर्दशा व कोसळण्याची निर्माण झालेली शक्यता

मु. शी. : नेरळ आरोग्य केंद्राची झालेली दुर्दशा व कोसळण्याची निर्माण झालेली शक्यता याबाबत श्री. जयंत प्र. पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" जुलै, 2006 मध्ये नेरळ परिसरात चक्रीवादळाचा तडाखा बसून लाखो रुपयांची वित्तहानी झाली होती. मार्च व एप्रिल, 2006 मध्ये रायगड जिल्ह्यातील नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रावर रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने खर्च करुन दवाखाना अद्ययावत केला होता. परंतु चक्रीवादळाच्या तडाख्यात दवाखान्याच्या पहिल्या मजल्यावरील 100 पत्रे उडून गेले. परिणामी संपूर्ण दवाखान्यात पावसाळ्यात पाणी गळू लागले होते.

पहिल्या मजल्यावर निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी खोल्या आणि तळमजतल्यावर आरोग्य केंद्र अशी रचना असलेल्या नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रावरील छप्पर उडून गेल्याने तळमजल्यावरच्या भिंतीमधून गळणारे पावसाचे पाणी लादीवर साचले होते.

अशा स्थितीत रुग्णावर उपचार करणे कठीण झाले असून जमिनीवर कोणतीही व्यक्ती बसू अथवा झोपू शकत नाही. त्यामुळे नव्याने संपूर्ण दवाखान्याचे बांधकाम करण्याची मागणी सल्लागार समिती बैठकीमध्ये करण्यात आली आहे. तरी या विभागातील जनतेची दवाखान्याअभावी होणारी अडचण लक्षात घेता या दवाखान्याच्या बांधकामास खास बाब म्हणून शासनाने सत्वर मान्यता देण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/ MAP/ SBT

पृ. शी. : केंद्र शासनाच्या डोमॅस्टिक व्हायोलन्स बिलाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत करावयाची कार्यवाही

मु. शी. : केंद्र शासनाच्या डोमॅस्टिक व्हायोलन्स बिलाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत करावयाची कार्यवाही याबाबत श्रीमती उषाताई दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्रीमती उषाताई दराडे यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडते.

" केंद्र सरकारने डॉमॅस्टिक व्हायोलन्स बिल पास केले व त्याची अंमलबजावणी सुरु केली. महाराष्ट्र सरकारने अद्याप नियम केलेले नाहीत. राज्यात उपरोक्त कायद्याची अंमलबजावणी कशी करावी याबाबत महाराष्ट्र शासनाने त्वरित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

समाजात दररोज महिलांवर सामुदायिक व कौटुंबिक अत्याचार होत आहेत. डोमॅस्टिक व्हायोलन्स बिल प्रत्यक्ष खूप चांगले आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने त्वरित रुल्स तयार करावेत."

सभापती महोदय, केंद्र सरकारने जे डोमॅस्टिक व्हॉयोलन्स बिल पास केलेले आहे त्या बिलाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने जे रुल्स करावयास पाहिजे ते अद्याप फ्रेम झालेले नाहीत. 26.10.2006 पासून हा कायदा ऑपरेशनल पार्ट म्हणून केंद्र सरकारने जाहीर केलेला आहे. हा कायदा करण्यामागे केंद्र शासनाची जी भूमिका आहे त्यामध्ये 1995 मध्ये व्हिएन्ना येथे झालेला समझोता तसेच संयुक्त कृती समिती 1989 च्या 12 व्या सामान्य शिफारशीमध्ये संबंधित देशांनी महिलांवरील कौटुंबिक अन्यायाविरुध्द पावले उचलावीत असे सांगितले. 1995 चे कृती व्यासपीठ आहे त्यांनी मान्यता दिली. घटनेच्या आर्टिकल 14, 15 आणि 21 नुसार महिलांना घटनेने दिलेले अधिकार मिळावेत याचा अन्वयार्थ देऊन केंद्र सरकारने डॉमॅस्टिक व्हायोलंस बिल पास केलेले आहे. या बिलामध्ये दोन तीन महत्वाच्या गोष्टी राज्य शासनाला करावयाच्या आहेत. यामध्ये रजिस्ट्रेशन ऑफ प्रोटेक्शन ऑफीसर हा महत्वाचा मुद्दा आहे.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 4.05

(श्रीमती उषाताई दराडे...)

मेडिकल एडस् एनजीओज्ने द्यावयाच्या आहेत. ऑफिसरचे ज्युरिस्डिकशन फिक्स करावयाचे आहे. व्हिक्टिमला सुरक्षित निवास देण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. संरक्षण अधिकारी व सेवा देणारे सदस्य हे लोकसेवक असले पाहिजेत, प्रोटेक्शन ऑफिसरने दखल घेतली नाही तर त्यालासुध्दा पनिशमेंट दिलेली आहे. तसेच हा दखलपात्र, नॉन-बेलेबल ऑफेन्स आहे. अशा प्रकारच्या गाईड लाईन्स केन्द्र सरकारने केलेल्या कायद्यामध्ये दिलेल्या आहेत. केन्द्र सरकारने केलेल्या कायद्याप्रमाणे आपल्या महाराष्ट्र सरकारने डोमेस्टिक व्हायलन्सच्या संदर्भात रुल्स फ्रेम केलेले नाहीत. मला सभागृहाला विनंती करावयाची आहे की, महाराष्ट्रामध्ये अनेक सेवाभावी संस्था ह्या महिला सक्षमी करणाच्या कार्यामध्ये कार्यरत आहेत. महाराष्ट्र शासनाने या सर्वांच्या सूचना विचारात घेऊन या डोमेस्टिक व्हायोलन्स बिलाच्या संदर्भात रुल्स करण्यासाठी ताबडतोबीने पावले उचलणे गरजेचे असल्यामुळे मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

--

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वर्धा जिल्ह्यातील शिक्षकांनी केलेल्या आंदोलनासंबंधीचे खटले मागे घेण्याबाबत

मु.शी. : वर्धा जिल्ह्यातील शिक्षकांनी केलेल्या आंदोलनासंबंधीचे खटले मागे घेण्याबाबत श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"वर्धा जिल्हयातील एक लोकप्रतिनिधी व इतर 361 शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रलंबित शेकडो मागण्या/समस्या निकाली काढणे व नागपूर जिल्ह्यातील विविध विभागातील व्यपगत झालेली 52 पदे पूर्ववत नियमित करावी यासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ व एका लोकप्रतिनिधींनी शासनाशी वारंवार पत्रव्यवहार करुन ही समस्या न सोडविल्याच्या कारणाने नाईलाजास्तव दिनांक 25 सप्टेंबर 2001 रोजी कार्यालयास कुलूप ठोक आंदोलन केले.

लोकप्रतिनिधी व 361 शिक्षक कर्मचा-यांवर भा.द.वि. कलम 143, 147, 149, 341 व मु.पो. कायदा कलम 135 अन्वये खटले दाखल झाले आहेत. हे खटले मागे घेण्यात यावे यासाठी सरकार्यवाह विमा शिक्षक संघ व शिक्षक प्रतिनिधी यांनी माननीय उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक 12 डिसेंबर 2005च्या निवेदनाद्वारे खटले मागे घ्यावे अशी विनंती केली. हे निवेदन गृहविभाग (विशेष) महाराष्ट्र शासन यांना प्राप्त झाले आहे. असे दिनांक 16.1.2006 रोजी निवेदनकर्त्यांना कळविले.

या उपरही विभागाने दखल न घेतल्यामुळे एका लोकप्रतिनिधीने माननीय उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांना पत्र क्र. 1105/2006, दिनांक 30.9.2006 अन्वये उपरोक्त खटले व 5 सप्टेंबर 1996 रोजी नागपूर येथे केलेल्या आंदोलनकर्त्यांपैकी 5 शिक्षक व एक लोकप्रतिनिधी यांनी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. व्ही.यू. डायगव्हाणे...)

आंदोलनकर्त्यांवरील खटले मागे घ्यावेत अशी विनंती केली आहे. न्याय्य हक्कासाठी व प्रशासनातील अनियमितता दूर करण्याच्या दृष्टीने आंदोलन करण्यात आले होते. तरी वर्धा व नागपूर येथील शिक्षक कर्मचा-यांवरील खटले (दाखल खटला क्रमांक 1866/2003) मागे घेण्यात यावे यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित केली आहे."

--

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड

पृ.शी. : मुंबई ठाण्यातील काही बिल्डरांनी खाडी किनारी असलेल्या शेत जमिनीवर कब्जा केल्याबाबत

मु.शी. : मुंबई ठाण्यातील काही बिल्डरांनी खाडी किनारी असलेल्या शेत जमिनीवर कब्जा केल्याबाबत श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबई ठाण्यातील काही बिल्डरांनी खाडी किनारी असलेल्या शेतक-यांची शेत जमीन पाण्यापासून सुरक्षित रहावी यासाठी राखीव असलेल्या शेत जमिनीवरच बिल्डर लॉबीने शासकीय यंत्रणेला हाताशी धरुन कब्जा करणे, तसेच ठाणे पालिका हद्दीतील काही ठिकाणी परवानगी न घेता शेत जमिनीवर टॉवर्स बांधणे व सी.आर.झेड कायद्याचा भंग करणे, इमारतींच्या पाठिमागील खाडी किना-यात सर्वत्र भराव टाकून कामगारांसाठी झोपड्या बांधून देणे, त्यामुळे शासनाने अशा कोणत्या कायद्यात बसून सदर ठिकाणी बांधकाम करण्यास परवानगी दिली याची तातडीने चौकशी होणे नितांत आवश्यक आहे."

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील खाडी किनारी जी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत त्यासंबंधीचा विषय मी या ठिकाणी विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित केलेला आहे. ठाणे जिल्ह्यात लहानमोठ्या 12 खाड्या आहेत. या खाडी किनारी 13631 हेक्टर इतकी खाजगी जमीन असून या जमिनीला सोन्यापेक्षा अधिक भाव मिळू लागले आहेत. परिणामी खाडी किनारी असलेल्या या जमिनीवर बिल्डर लॉबी आणि शासकीय यंत्रणा यांनी संगनमताने कब्जा केलेला आहे. या शेत जमिनीवर टावर्स तसेच छोटी-मोठी घरे उभारलेली आहेत. या खाडी किनारी बांधकाम करुन सीआरझेड कायद्याचा भंग केलेला आहे. तेव्हा कोणत्या कायद्यांतर्गत या ठिकाणी बांधकाम करण्यास शासन यंत्रणेने आणि महानगरपालिकेने परवानगी दिली याबाबतची चौकशी होणे गरजेचे असल्यामुळे मी हा विषय येथे उपस्थित केलेला आहे.

--

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबईला करण्यात येणा-या पाणी पुरवठा विभागाचे आधुनिकीकरण न झाल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जाणे

मु.शी. : मुंबईला करण्यात येणा-या पाणी पुरवठा विभागाचे आधुनिकीकरण न झाल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जाणे याबाबत श्री. मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबईला करण्यात येणा-या पाणी पुरवठा विभागाचे म्हणावे तसे आधुनिकीकरण झालेले नाही. या यंत्रणेच्या इंग्रजांनी उभ्या केलेल्या कारभारामध्ये आजही सुधारणा झालेली नाही. जुन्या झालेल्या जलवाहिन्या व पाण्याच्या चोरीमुळे रोज 700 दशलक्ष लिटर पाणी वाया जात आहे. 2005-06 च्या लेखा परीक्षण अहवालामध्ये या वर्षामध्ये मुंबईच्या नागरिकांना पाठविण्यात आलेल्या पाणी बिलापैकी 51.49 टक्के बिले जलमापके बंद असल्यामुळे अंदाजे देण्यात आलेली आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. तसेच या आर्थिक वर्षामध्ये जलवहन, प्रक्रिया संयंत्र व बाषीभवनामुळे पाणी खात्याचे सुमारे 27 कोटी 45 लाख रुपयांचे नुकसान झाले. राज्य शासन, रेल्वे, मुंबई बंदर विश्वस्त व कापड गिरण्या यांच्याकडून जल आणि मलनिस्सारण आकारापोटी 1091 कोटी 47 लाख रुपये थकीत आहेत. त्यातील काही गिरण्यांच्या जागा विकल्यामुळे थकीत पैसे महापालिकेला मिळणे शक्य नाही. त्यातच चुकीचा आधार, चुकीचा दर, कमी वापराची स्वीकृती आणि संगणकामध्ये भरलेली चुकीची सॉफ्टवेअर यामुळे वर्षभरात सुमारे 2 कोटी 41 लाख 22 हजार रुपयांचे महापालिकेचे नुकसान झाले.

...नंतर श्री.भोगले...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

मुंबई महानगरपालिकेच्या लेखापरीक्षकांनी अहवालामध्ये मारलेले ताशेरे धूळ खात पडले आहेत. यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या पाणी खात्याच्या कामाच्या पध्दतीमध्ये सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित केला आहे. आपण परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद. शासनाने यासंबंधी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना कळवून त्वरित कारवाई करावी अशी आग्रहाची विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

उपसभापती : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी मांडला असून माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी अनुमोदन दिले आहे. सदरहू प्रस्ताव प्रस्तुत झालेला आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेकरिता आज शुक्रवार, दिनांक 16 मार्च व शनिवार, दिनांक 17 मार्च, 2007 अशी एकूण दोन दिवस चर्चा होणार आहे. चर्चेसाठी एकूण सुमारे 4 तास उपलब्ध आहेत. मुख्यमंत्र्यांच्या उत्तराचा एक तास सोडून उर्वरित तीन तासांचा वेळ सदस्यांना भाषणाकरीता देण्यात येईल. प्रस्तावकांना 10 मिनिटे देण्यात येतील व प्रस्तावाला पाठिंबा देणारे अनुमोदक 10 मिनिटे भाषण करतील. तसेच विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणासाठी 30 मिनिटे देण्यात येतील. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे आपल्या पक्षाच्या प्रतोदांमार्फत माझ्याकडे 10 मिनिटात पाठवावीत. नावे प्राप्त झाल्यानंतर वेळेचे बंधन घालावे काय, याचा विचार करता येईल. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडते :

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरीता जमलेले महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

सभापती महोदय, या सभागृहात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव चार वेळा मांडण्याची मला संधी मिळाली याबद्दल खरोखरच मी माझे हे महद्भाग्य समजते. माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे सरकारच्या कामाचे प्रतिबिंब असते. राज्य शासनाने आजपर्यंत केलेल्या कामाचा आढावा आणि भविष्यात करावयाच्या विकासाच्या कामांचे दिग्दर्शन या अभिभाषणामध्ये असते. या अभिभाषणाची प्रथा अनेक वर्षापासूनची आहे. पूर्वीच्या काळातील सन्माननीय सदस्यांची भाषणे पाहिली व वाचली तर त्यांच्या भाषणामध्ये देशप्रेम, दूरदृष्टी, मौलिक विचार, शासनाला केलेल्या विधायक सूचना, राज्य विकासाचे नियोजन या सर्वांचा

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

अंतर्भाव प्रकर्षाने जाणवतो. आज समीकरणे बदलली आहेत. आज विधायक सूचनांऐवजी टीकाटिप्पणीकडे सदस्यांचा कल असल्याचे दिसून येते. हे टाळता आले आणि सकारात्मक भूमिका घेऊन सरकारला मार्गदर्शन करता आले तर ते अधिक चांगले होईल असे मला वाटते. हे आघाडी सरकार सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून कारभार करीत आहे हे अभिभाषणामध्ये स्पष्टपणाने जाणवते. 2006-07 हे वर्ष अनेकविध घटनांनी अविस्मरणीय असे ठरले आहे. भरपूर पाऊस पडला, अनेक ठिकाणी पुराचा तडाखा बसला. अतोनात अशी जनावरांची आणि माणसांची प्राणहानी झाली, प्रचंड वित्तहानी झाली आणि पिकांचे फार नुकसान झाले. परंतु आघाडी सरकारने नैसर्गिक आपत्तीला जनतेच्या सहकार्याने धैर्याने तोंड दिले.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भास्करराव जाधव.)

श्रीमती सुधा जोशी ....

आणि शीघ्र कारवाई करुन मदत पोहचविण्याचे कार्य केलेले आहे. सर्वतोपरी जनतेचे अश्रू पुसण्याचा शासनाचा विस्तृत कार्यक्रम होता. एक विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे सरकारने पोलीस दल, होमगार्ड, अग्निशमन दल, स्वयंसेवक अशा 500 निवडक व्यक्तींना आपत्ती व्यवस्थानाचे प्रशिक्षण देऊन तयार केलेले आहे. हे मास्टर ट्रेनर्स आता त्यांच्या त्यांच्या विभागात जाऊन इतरांना प्रशिक्षण देऊन शिक्षित स्वयंसेवकाचा तांडाच निर्माण करतील याची मला खात्री आहे. 9 वी आणि 11 वी च्या अभ्यासक्रमामध्ये या विषयाचा समावेश केल्यामुळे तरुणांमध्ये आत्मबल नक्कीच निर्माण होईल. सरकारच्या या अभिनव कल्पनेचे मी स्वागत करते.

सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्या ही फार मोठी चिंतेची बाब आहे. राज्यातील 58 टक्के जनता ग्रामीण भागामध्ये राहते. त्यातील 80 टक्के लोक शेतीवर उदर्निवाह करीत असतात. राज्यातील 43,711 खेडयांमध्ये राहणारे 45.93 टक्के जिरायत जमिनीवर अवलंबून असणा-या शेतक-यांना दुष्काळ, महापूर, अतिवृष्टी, अनियमित वीजपुरवठा अणि वाढती महागाई यामुळे जगणे अशक्य झाले आहे. शेती पुढील अनेकविध समस्येमुळे निर्माण झालेल्या कर्जबाजारीपणाला कंटाळून आणि उपजीविकेचे कुठलेच साधन हाती नसल्यामुळे केलेला आयुष्याचा शेवट ही अतिशय हृदयद्रावक कहाणी आहे.

सभापती महोदय, शेती आणि शेतीशी निगडित अनेक प्रश्न आज वर्षानुवर्षे थोडयाफार प्रमाणात दुर्लक्षित झाले आणि त्याचा हा परिपाक आहे. लगेचच हे प्रश्न सुटतील असे नाही पण लवकरात लवकर या प्रश्नावर उत्तरं शोधून कारवाई करुन शेतक-यांच्या जीवनात आनंद फुलवणे हाच सरकारचा गंभीर प्रयत्न आहे यांत दुमत नाही.

सभापती महोदय, परंपरागत शेती व्यवस्थापनात अडकलेल्या शेतक-यांना आता नवीन तंत्रज्ञानाची माहिती होणं आवश्यक आहे. त्यासाठी कृषिपदवीधारक, व्हेटरनरी पदवीधारक यांना एक वर्षाची इंटर्नशीप ग्रामीण भागात देऊन शासनाच्या सर्व योजना त्यांच्यापर्यंत पोचवून शेतीतली प्रगती साधणं आवश्यक आहे. वाढती महागाई अन्नधान्याची टंचाई दूर करण्यासाठी जास्तीत जास्त जिरायत जमीन ओलिताखाली आणली पाहिजे आणि चालू असलेले पाटबंधारे लघु, मध्यम, मोठे प्रकल्प तातडीने पूर्ण केले पाहिजेत. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ....

सभापती महोदय, राज्यातल्या दारिद्रय निर्मूलन प्रश्नावर एक तोडगा म्हणून स्वयंसहाय्यता बचत गट ही एक प्रभावी चळवळ बनली आहे. 1,37,000 बचत गटांपैकी 70 टक्के हून अधिक बचत गट महिलांचे प्रकल्प तातडीने पूर्ण केले पाहिजेत. आहेत, तसेच आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीच्या सहाय्याने तेजस्विनी ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबवण्याचा सरकारचा विचार आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

महिला आर्थिक महामंडळामार्फत हा कार्यक्रम तसेच बचत गटांमार्फत कार्यक्रम राबवून महिलांचे सक्षमीकरण साधायचे आहे. मला खात्री आहे की, माननीय वित्तमंत्री आर्थिक विकास महामंडळाला भरपूर अनुदान देतील आणि पैशाची कमतरता पडू देणार नाही. एका महिलेचा विकास हा फक्त तिचा विकास नसून तो कुटुंबाचा विकास असतो. तेव्हा मोठ्या प्रमाणावर महिलांचा विकास झाला तर अनेक दारिद्रय रेषेखालील कुटुंबांच्या विकासाचा हा मूलमंत्र ठरणार आहे.

सभापती महोदय, अंगणवाड्यातील बालकांना पूरक पोषण आहाराचा पुरवठा महिला मंडळ आणि बचत गटामार्फत होतो. परंतु फक्त 60 टक्के काम या बचत गटांना आणि महिला मंडळांना दिले जाते. माझे असे म्हणणे आहे की, पूरक पोषण आहाराचे 100 टक्के काम महिला मंडळाला आणि बचत गटांना देणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील दोन-तीन वर्षात धडक कार्यक्रम राबवून 100 टक्के हे उद्दिष्ट साधावे.

सभापती महोदय, माझे शासन गेली तीन वर्षे मुंबई शहराच्या पायाभूत सुविधांकडे सर्वार्थाने लक्ष पुरवित आहे. निरनिराळ्या प्रकल्पांचे नियोजन करुन त्यासाठी आर्थिक व्यवस्था आणि फायनान्शिअल क्लोझर करुन तातडीने कामाला सुरुवात केलेली आहे. मेट्रोसारख्या योजनांना लागणारी केंद्राची मान्यता हा महत्वाचा टप्पा पार पडला आहे. एमएमआरडीएतर्फे रस्ते विकासाचा कार्यक्रम राबवला जातो, पण त्यात अजून बऱ्याच त्रुटी आढळतात. विशेषत: सांताक्रुझ - चेंबूर ब्रिज आणि एस.व्ही.रोडचे रुंदीकरण फारच संथ गतीने सुरु आहे. एस.व्ही.रोड संदर्भात मला एक महत्वाची सूचना करावीशी वाटते की, या रस्त्यावर ठिकठिकाणी अनेक उपरस्ते काटकोनात येऊन मिळतात आणि त्यावरुन येणाऱ्या वाहनांना उजवीकडे वळायला मुभा ठेवली आहे. त्यामुळे एस.व्ही.रोड कितीही रुंद झाला तरी अंधेरी-बांद्रा अंतर कापायला किमान पाऊण तासापेक्षा जास्त वेळ लागणार आहे. जर उप रस्त्यावरुन येणाऱ्या वाहनांना फक्त चार-पाच ठिकाणी राईट टर्न किंवा यु टर्न ची सोय ठेवली तरच एस.व्ही.रोडवर अंधेरी-बांद्रा अंतर जलद गतीने कापले जाईल. तेव्हा याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

मुंबई शहराच्या सर्वांगीण विकासात अनेक अडचणी येतात. त्यात झोपडपट्टीची समस्या ही मोठी समस्या आहे. नुकतेच शासनाने गृहनिर्माण धोरण जाहीर केले आहे. परंतु या धोरणातही अनेक त्रुटी आहेत. या धोरणावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. तसेच मुंबई शहराच्या सर्वांगीण विकासाठी मुंबईतील सर्व लोकप्रतिनिधीची स्वतंत्र बैठक घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, माझ्या शासनाने राज्यातल्या अनेक घटकात काम करणाऱ्या सामान्य माणसांना त्यांच्या हक्काची घरे दिली आहेत. त्यामध्ये माथाडी कामगार, विडी कामगार, शासकीय नोकर यांचा समावेश आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करते की, रेल्वे स्टेशन्स, एस.टी.स्टॅन्डस्वर ओझी उचलून घाम गाळणाऱ्या हमालांसाठी आणि मुंबईतील डबेवाल्यांसाठी म्हाडा अंतर्गत हौसिंग कॉलनी बांधावी आणि आणखी एक पुढचे पाऊल टाकून समाजातील या उपेक्षित घटकांना न्याय द्यावा.

मुंबईतल्या म्हाडा वसाहतींमध्ये पुनर्विकासाचे वारे वाहत आहेत.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी....

परंतु एफएसआय वाटपाच्या गोंधळाच्या उलटसुलट बातम्या येत असतात आणि त्यामुळे अल्प व मध्यम उत्पन्न गटातील लोक ज्याठिकाणी राहतात, त्याठिकाणी त्यांना घरे मिळतील की नाही, याबाबत शंका आहे. म्हणून त्यांनाही त्या घरांमध्ये प्रवेश मिळावा की जेणेकरुन तो समाज सुधारु शकेल. मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत सुरु असलेल्या योजना अर्धवट अवस्थेत आहेत. हजारो लाभार्थी अनेक वर्षे संक्रमण शिबिरात अडकून पडले आहेत. या स्कीममधील लाभार्थी आणि सेस बिल्डींगचा आढावा घेऊन म्हाडांतर्गत विशेष निमंत्रण अधिकारी नेमून संबंधित विकासकांना किमान विशिष्ट कालावधीत काम पुरे करण्यास भाग पाडून स्कीममधील लाभार्थींना आणि सेस बिल्डींगमध्ये लाखो रुपये भरुन बुकींग केलेल्या सामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काचे घर मिळवून देण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, सध्या राज्यामध्ये विजेचा अत्यंत तुटवडा आहे. त्यामुळे जनता अडचणीत आहे. पण त्याचे राजकीय भांडवल करुन अराजकता पसरवण्याचा प्रयत्न करणे हे अत्यंत दुर्दैवी आहे, असेच म्हणावे लागेल. पण जनतेने सगळया अडचणी असतानाही सरकारच्या या समस्यांकडे बघण्याचा विधायक दृष्टीकोन ठेवला आणि शासनाने हाती घेतलेल्या बहुविध कार्यक्रमांना सकारात्मक प्रतिसाद दिला. ग्रामीण भागात विजेचा सर्वात जास्त प्रश्न असतानाही जनतेने पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांमध्ये सरकारला पाठिंबा दिला. विरोधक काहीही म्हणोत पण जनता भक्कमपणे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी उभी आहे. विजेचा तुटवडा भरुन काढण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकार ठोस प्रयत्न करीत आहेत. माझी खात्री आहे की, येत्या 2-3 वर्षांमध्ये या ठोस उपायांचा दृश्य परिणाम दिसेल आणि राज्यापुढल्या संकटाचे निवारण होईल.

सभापती महोदय, पर्यटन विकासासाठी खास प्रयत्न करण्याचा विचार आम्हा कोकणवासियांना सुखावतो आहे. पण दरवर्षी या संबंधीच्या ठोस योजना मांडल्या जात नाहीत, ही खंतही आमच्या मनात राहते. सागर किनाऱ्याच्या आकर्षणामुळे पर्यटन हा कोकणाच्या स्थानिक जनतेच्या उत्पन्नाचा मोठा स्त्रोत आहे. पण केरळ आणि गोवा राज्याच्या मानाने आपण अगदीच मागे दिसतो. त्याठिकाणी समुद्रावरच्या स्थळांचे मार्केटींग ज्या पध्दतीने केले जाते, त्याच्या काही अंशीही महाराष्ट्र पर्यटन महामंडळ कोकणाचे लक्ष पुरवित नाही.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी....

सभापती महोदय, मी मुरुड जंजिऱ्याला वारंवार जाते. जंजिऱ्यासारख्या सागरी किल्ल्याची दुर्दशा मी याच सभागृहात मांडली होती. परंतु पुरातत्व विभागाचे कारण सांगून आपण काही करु शकत नसल्याचे सांगण्यात आले. आता माननीय राज्यपालांनी उल्लेख केलेल्या Adopt the monument Scheme खाली हा किल्ला घ्यावा, असे मी शासनाला सुचवू इच्छिते.

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी पुढे सुरु.....

सभापती महोदय, प्रतापगडावर अद्याप जिवा महालेचं स्मारक उभं राहिलेलं नाही, याची जाणीव मी शासनाला या निमित्ताने करुन देते.

सभापती महोदय, जागतिक बँकेच्या सहाय्याने चक्रीवादळ व्यवस्थापनासाठी पाच सागरी जिल्हयांना मिळणा-या निधीतून किना-यालगतच्या गावांचं व्यवस्थापन, संरक्षण, पुनर्वसन ही कामे होत असतात, त्यासाठी स्वतंत्र नियंत्रण अधिकारी नेमावा व या निधीतूनच सागरी किना-यांचा आणि बंदरांचा विकास व्हावा, अशी माझी या निमित्ताने सूचना आहे.

सभापती महोदय, सामुहिक विवाह योजनेअंतर्गत अनुदान योजनेचा उल्लेख माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात केला आहे. हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. लग्न खर्चामुळेच सामान्य जनता आणि शेतकरी कर्जबाजारी होतात. यासंदर्भात मी असे सुचवू इच्छिते की, अनेक इ ाती समाजाच्या संस्था वधु-वर केंद्र चालवतात, त्यांना या योजनेत सहभागी केल्यास हे काम अधिक प्रभावीपणे होऊ शकेल.

सभापती महोदय, मुंबई विश्वविद्यालयाला शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त दिलेली देणगी तसेच बेळगांव जिल्हयात दोन सार्वजनिक मराठी ग्रंथालयांसाठी अनुदान देण्याच्या निर्णयाचे मी स्वागत करते.

सभापती महोदय, बेळगांव प्रश्नावर सरकारची जागरुकता माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात व्यक्त केली आहे, ही देखील अतिशय स्तुत्य बाब आहे.

सभापती महोदय, सरकारने केलेल्या उत्तम कार्याची पावती आणि पुढील वर्षात करावयाच्या गोष्टींचे मार्गदर्शन माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात केले आहे, त्याबद्दल पुन्हा एकदा मी त्यांचे आभार मानते. धन्यवाद. जय हिंद.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाच्या ज्येष्ठ सदस्या, श्रीमती सुधा जोशी यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर अभिनंदनाचा प्रस्ताव सभागृहात मांडला आहे आणि माननीय राज्यपाल महोदय आणि शासनाचे या निमित्ताने अभिनंदन केले आहे. माननीय राज्यपालांचे विधिमंडळात होणारे अभिभाषण किंवा माननीय राष्ट्रपतींचे संसदेत होणारे अभिभाषण ही एक संसदीय लोकशाहीची परंपरा आहे. माननीय राज्यपाल या निमित्ताने आपले स्वत:चे विचार मांडत नसतात तर ते सरकारचे विचार आपल्या भाषणाच्या माध्यमातून दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांसमोर मांडत असतात. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होण्यापूर्वी आणि अर्थसंकल्प सभागृहात मांडला जाण्यापूर्वी गेल्यावर्षी शासनाच्या माध्यमातून कोणत्या योजना राबविल्या गेल्या, कोणत्या योजना त्यावेळी शासनाने लोकांसमोर ठेवल्या होत्या, सभागृहासमोर, सन्माननीय सदस्यांसमोर ठेवल्या होत्या, त्या योजनांची अंमलबजावणी कशा पध्दतीने केली, जो मार्ग, ज्या सुधारणा, जे कार्यक्रम राज्य शासनाने राज्यासमोर अर्थसंकल्पाच्या माध्यमातून ठेवले होते त्याची बरोबर अंमलबजावणी झाली आहे, होते आहे किंवा नाही, याबाबतचे मार्गदर्शन माननीय राज्यपाल त्यांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून करीत असतात.

सभापती महोदय, या सभागृहाच्या ज्येष्ठ सदस्या, श्रीमती सुधा जोशी यांनी अतिशय व्यापकपणे या अभिभाषणाचा परामर्श घेतला आहे. मी या निमित्ताने एक महत्वाचा विषय मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. मला आठवते की, माझे परममित्र आणि या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी एक वही ठेवली होती आणि गेल्या काही अधिवेशनांमध्ये दरदिवशी सभागृहाचे कामकाज सुरु होण्याअगोदर या वहीमध्ये त्या दिवशी किंवा त्या दोन-तीन दिवसांमध्ये किती शेतक-यांनी आत्महत्या केल्या याची ते नोंद ठेवीत असत.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी .....

अशा प्रकारे ते कोणत्या प्रोसिजर अंतर्गत नोंद ठेवत असत याची मला कल्पना नाही. परंतु विदर्भ आणि मराठवाडयातील आत्महत्या करणा-या शेतक-यांची ते नोंद ठेवत असत आणि सभागृहाला अवगत करुन देत असत. विदर्भामध्ये आणि मराठवाडयामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या होता कामा नयेत म्हणून राज्य शासनाने शेतक-यांना मोठया प्रमाणावर मदत करण्याची व सहकार्य करण्याची भूमिका घेतली होती. नागपूरच्या अधिवेशनामध्ये विदर्भातील 6 जिल्हयांसाठी राज्य शासनाने 1 हजार 75 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते आणि त्या पॅकेजची अंमलबजावणी सुरु केली होती. त्यानंतर स्वत: माननीय पंतप्रधान विदर्भाच्या दौ-यावर आले आणि त्यांनी 3 हजार 700 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. त्या पॅकेजवर देखील सभागृहामध्ये चर्चा झाली. एवढे प्रयत्न करुन देखील विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या का कमी होत नाहीत ? कारण विदर्भातील शेतकरी वैफल्यग्रस्त झालेला आहे, गोंधळलेला आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्र.10 मध्ये असे नमूद केलेले आहे की, "केंद्र व राज्य शासनाच्या पॅकेज अंतर्गत विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत असल्यामुळे, आत्महत्या केलेल्या एकूण शेतक-यांपैकी नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्जपरतफेडीचा तगादा या कारणांमुळे आत्महत्या करणा-या शेतक-यांचे एप्रिल, 2006 मध्ये असलेले 66 टक्के हे प्रमाण डिसेंबर, 2006 मध्ये 28 टक्के इतके कमी झाले आहे." राज्य शासनाने व केंद्र शासनाने शेतक-यांना मदत करण्याची भूमिका घेतल्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी होत आहे. राज्य शासन शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रयत्न करीत होते. त्यावेळी विरोधी पक्ष शेतक-यांच्या आत्महत्यांच्या प्रश्नावर आक्रमक होता. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दिंडी काढून संपूर्ण विदर्भाचा दौरा केला. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या मनामध्ये शासनाच्या कृतीसंदर्भात, योजनांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात अनास्था होती, हे आम्ही समजत होतो. आम्ही सत्ताधारी बाकावर बसलेलो असलो तरी त्यांच्या वेदना समजून घेत होतो. देशाचे पंतप्रधान आणि माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचा मी प्रामुख्याने उल्लेख करीन. केंद्रामध्ये एन.डी.ए. सरकार असतांना शेतक-यांना आर्थिक मदत करण्यासाठी कृषी खात्यासाठी 88 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु माननीय श्री.शरद पवार साहेब कृषी मंत्री झाल्यानंतर दीड-दोन वर्षामध्ये कृषी खात्यासाठी 1 लाख 50 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी .....

माननीय श्री.शरद पवार साहेबांनी केंद्र सरकारला ही तरतूद करावयास लावली. बिस्लेरीची एक लिटर पाण्याची बाटली 12 रुपयांना मिळते आणि एक लिटर दुधाची किंमत 8 ते 9 रुपये आहे अशी चर्चा आपण त्यावेळी करीत होतो. शेतक-यांने बँकेकडून कर्ज घेऊन ट्रॅक्टर खरेदी केला तर त्या कर्जावर 16 टक्के व्याज दर होता आणि एखाद्याने टाटासुमो गाडी खरेदी केली तर त्यासाठी 6.5 टक्के व्याज दर होता. शेतक-यांना कर्ज पुरवठा करीत असतांना कमीत कमी व्याज दर असला पाहिजे, अशी भूमिका घेण्यात आली व त्याला राज्य शासनाने दुजोरा दिला. शेतक-यांना 6 टक्के व्याज दराने 3 लाखापर्यंत कर्ज दिल्यानंतर त्यांनी त्या कर्जाची परतफेड वेळेमध्ये केली तर 6 टक्के व्याज दरामध्ये त्यांना 2 टक्के सूट देऊन 4 टक्के व्याजदर आकारला जाईल, असे शासनाने जाहीर केलेले आहे.

यानंतर कु.खर्चे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलर्णी.....

चार लाखापुढे हा कर्जपुरवठा होता कामा नये ही खबरदारी घेतल्यामुळे आज विदर्भच नाही तर महाराष्ट्राच्या निरनिराळया भागामध्ये शेतक-याला अल्पदरामध्ये कर्जपुरवठा करणे शक्य झालेले आहे, असा राज्यपाल महोदयांनी जो उल्लेख केलेला आहे त्याबद्दल मी आपल्या सर्वांच्या वतीने माननीय राज्यपाल महोदयांचे या निमित्ताने या ठिकाणी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, निरनिराळे प्रसंग निरनिराळया ठिकाणी घडून येतात त्यापैकी कोकणावर देखील असे प्रसंग येतात त्यावरुन मला कवी रामदास फुटाणे यांच्या " केव्हातरी भारत देश मेरा महान " या पंक्ती आठवतात. सभापती महोदय, संत्र्यावर संकट आले,कापसावर लाल्या रोग पडला,बाजरीवर संकट कोसळले तर आम्ही ताबडतोब मदत जाहीर करतो परंतु कोकणामध्ये जर हापूस आंब्यावर खारवट पडली तर आम्हाला एक पैसाही कोणी मदत म्हणून जाहीर करीत नाही. फुंडकर साहेब, माझे असे म्हणणे नाही. आपले राज्य हे एकच आहे मदत ही प्रत्येकाल द्यावयालाच पाहिजे पण कोकणावरच का अन्याय होतो ? कोकणाला आपण केव्हातरी 800 ते 1000 रुपये दिले होते का ? आमच्याकडे तुमचा बघण्याचा दृष्टीकोन निराळा आहे. विदर्भामध्ये कापसाचे उत्पादन करणा-या शेतक-याला दोन हेक्टरपर्यंत 1500 रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यामुळे राज्यपाल महोदयांचे या ठिकाणी या निमित्ताने मी अभिनंदन करतो. या ठिकाणी शेतक-याला मदत करण्याकरिता राज्यशासनाने वेळोवेळी योग्य भूमिका घेतलेली आहे आणि त्या भूमिकेला सर्व सदस्यांचा पाठिंबा राहिला आहे, हे या निमित्ताने मला येथे नमूद करावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : हापूस आंब्याची पेटी सुरुवातील 11,000 रुपयांना विकली जाते, त्याचे काय ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : हे सर्व पैसे मधल्या दलालांच्या खिशात जातात, आमच्या कोकणच्या शेतक-याला काहीही मिळत नाही, आंबे पिकविण्याचा व खोक्यांचा मोबदलाही योग्य प्रमाणात मिळत नाही. कोकणवासियांना मदत न करण्याच्या अनेक भूमिका घेण्यात आल्या परंतु कोकणवासीय हा हे राज्य सोडून इतर ठिकाणी कोठेही स्थलांतरित होणार नाही, हे राज्यशासनाला माहित आहे आणि म्हणून कितीही अडचणी आल्या तरी त्या सोसण्याची भूमिका ही कोकणातील लोकांनी स्वीकारलेली आहे.

. WW -2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलर्णी.....

सभापती महोदय, जंगली हत्तींच्या कळपांनी कोकणातील फळबागांची नासधूस केली, त्यामुळे शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले, पूर्वी सिनेमामध्ये पाहून आम्हालाही हत्ती पाळीव प्राणी आहे असे वाटावयाचे, " हाथी मेरे साथी "या सिनेमात दाखविल्याप्रमाणे लहान मूल त्याच्या अवती भोवती फिरतात असेच दृश्य आमच्याही डोळयासमोर यायचे परंतु आता या जंगली हत्तींच्या कळपांनी आमच्या शेतक-यांच्या पिकांचे अतोनात नुकसान केले. त्याकरिता एकदा गृहमंत्र्यांची आणि वनमंत्र्यांची मिटींग आमच्या सिंधुदूर्ग आणि वेंगुर्ला या जिल्हयांच्या बाबतीत घडवून आणली पाहिजे तरच या समस्येवर गांभीर्याने विचार होईल, असे मला वाटते. या रानटी हत्तींची अवस्था एखाद्या बॉलसारखी झालेली आहे, या हत्तींना आम्ही हकलल्यावर ते गोव्यात जातात आणि गोव्यातून हकलल्यावर ते कर्नाटकात जातात आणि कर्नाटकातून परत हे रानटी हत्ती कळपांनी आमच्या कोकणातच येऊन नासधूस करतात. अशी ट्रॅंग्यूलर सिच्युएशन या ठिकाणी निर्माण झालेली आहे. याबाबत शासनाने बघ्याची भूमिकाच अद्यापर्यंत मांडलेली आहे. अशा प्रकारची समस्या जर देशात कुठे निर्माण झाली तर वन खात्यांतर्गत त्या विभागाला 50 ते 6 हजार रुपये नुकसान भरपाई पुरविली जाते परंतु मागच्या वेळेला वनमंत्री जेव्हा कोकणात आले होते त्यांनी त्या वेळी फक्त "Elephants go back to home " अशी मोहीम हाती घेतली होती.

यानंतर श्री. सुंबरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी ...

त्या योजनेचे पुढे काय झाले ते आपल्या सगळ्यांना माहीत आहे. परंतु त्यावेळेस एक झाले, हत्तींच्या त्रासामुळे, हल्ल्यांमुळे जे शेतकरी मरण पावले त्याप्रत्येक व्यक्तीला 2 लाख उरूपये देण्याचा प्रयत्न शासनाने केलेला होता. हे मी समजू शकतो. परंतु आज कोकणातील, विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील केळी, पोफळी, नारळीच्या बागा जंगली हत्ती उद्ध्वस्त करून चालले आहेत. म्हणून माझी विनंती राहील की, जंगली हत्तींच्या या उपद्रवांमुळे तेथील शेतकऱ्यांची पंचाईत झालेली आहे. जंगली हत्ती शेतकऱ्याच्या शेतात हैदोस घालून त्यांच्या बागांची नासधूस करीत असतील तर अशा शेतकऱ्यांना शासनाने भरीव मदत दिली पाहिजे, सध्या दिल्या जात असलेल्या मदतीत वाढ केली पाहिजे. सभापती महोदय, हत्तींच्या उपद्रवाप्रमाणेच कोकणामध्ये वानरांचा देखील मोठा उपद्रव शेतकऱ्याला होतो आहे. हत्ती, रानडुक्कर आणि वानरे या प्राण्यांच्या उपद्रवामुळे कोकणातील शेतकरी रंजीस आलेला आहे. वानरांकडून जी नासधूस केली जाते त्याबद्दल काही लोकांना गंमत वाटते पण मी या निमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो की, वानरांची टोळी शेतकऱ्यांच्या केळी, नारळांच बागांमध्ये घुसली की ती वानरे एकदम माडाच्या शेंड्यावर जाऊन कोवळी शहाळी देखील काढून त्यांची नासधूस करीत असतात आणि त्यांना त्याबद्दल अटकाव करण्याचा प्रयत्न केला की, तीच शहाळी, नारळ काढून ते माणसांच्या डोक्यावर फेकून मारतात. अशा या वानरांचा बंदोबस्त करण्यासाठी राज्य सरकारने काही योजना आखावी आणि शेतकऱ्यांना त्यांच्यापासून संरक्षण द्यावे अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी बचत गटांबद्दल चांगला उल्लेख केला आहे. आता आपल्याकडे देखील ग्रामीण भागामध्ये महिलांचे बचत गट मोठ्या प्रमाणात कार्यान्वित झालेले आहेत. मी या संदर्भात काही बाबतीत माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांचे अभिनंदन करीन. तसे पाहिले तर बांगला देशचे श्री.नुरूल उस्मान हे या बचत गट योजनेचे संस्थापक आहेत. तेथील ग्रामीण भागामध्ये महिलांची मोठी कठीण परिस्थिती झाली होती. त्यांना कोणी काम देत नव्हते, त्यामुळे त्यांना मदत मिळत नव्हती वा कर्जही कामासाठी कोणी देत नव्हते. म्हणून त्यांनी बचत गटाची संकल्पना मांडली आणि ती प्रत्यक्षात उतरविली व यशस्वी करून दाखविली. त्यामुळे आज महिलांना मोठ्या प्रमाणात काम मिळाले आणि त्या स्वयंसिद्धा झाल्या. श्री.नुरूल उस्मान यांना या कामासाठी जागतिक स्तरावर पुरस्कार देण्यात

.....एक्सएक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी ...

आलेला आहे. आज महाराष्ट्रामध्ये या बचत गटांचे लोण मोठ्या प्रमाणात पसरलेले आहे. स्वत: श्री.शरद पवार यांनी श्रीमती फौजिया खन आणि काही महिला कार्यकर्त्यांना महिला बचत गटांचे कार्य दाखविण्यासाठी हैद्राबादला, चेन्नईला घेऊन गेले होते. तेथे महिलांच्या बचत गटांचे काम कशा पद्धतीने चालले आहे ते दाखविले. एकट्या आंध्र प्रदेश राज्यामध्ये 5 लक्ष 80 हजार बचत गट निर्माण केले गेलेले आहेत. वेळ पडल्यास सरकारला पैसे पाहिजे असतील तर रिझर्व बँकेकडे जायला नको, या बचत गटांमार्फत दर वर्षाला 1 कोटी 40 लाख रूपये जमा केले जात आहेत. त्याप्रमाणे आता महाराष्ट्रात देखील बचत गटांचे काम उभे राहिले आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये महिलांचे बचत गट तयार करून त्याद्वारा महिलांना काम आणि पैसा मिळू लागला आहे. या बचत गटांच्या माध्यमातून तयार होणारा मालाला बाजारपेठ मिळवून देण्याचे काम शासनाकडून झाले, त्यासाठी काही योजना आखली गेली तर त्या कष्टकरी महिलांना त्याचा फायदा मिळू शकेल. सभापती महोदय, आपल्या राज्याचे राज्यपाल महोदय हे कर्नाटक राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत. मध्यंतरी त्या ठिकाणी सीमा प्रश्नावरून बेळगावला काय परिस्थिती निर्माण झाली हे आपल्याला माहिती असेलच. खरे तर कर्नाटक राज्याचे विधीमंडळाचे अधिवेशन कायद्याने बंगलोर शिवाय अन्य ठिकाणी घेता येत नाही, कायद्यामध्ये दुरूस्ती केल्याशिवाय हे अधिवेशन ठरलेल्या ठिकाणाशिवाय अन्य ठिकाणी घेता येत नाही. ...

(यानंतर श्री. गागरे ..... वायवाय 1 ...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी .....

महाराष्ट्र विधिमंडळाची दोन अधिवेशने मुंबईला तर एक अधिवेशन नागपूरला घेण्याबाबत कायद्यामध्ये तरतूद आहे, याबाबत नुसताच संकेत नाही. सध्या पावसाळी अधिवेशन नागपूरला घेण्याचीही चर्चा सुरु आहे.

सभापती महोदय, बेळगाव व सीमा भागामध्ये काही प्रश्न निर्माण झाले आहेत. मराठी बांधवांवर अन्याय व अत्याचार करण्याचा प्रयत्न झाला आहे. कर्नाटक सरकारच्या कोणत्याही कायद्यामध्ये बेळगाव येथे अधिवेशन घेण्याची तरतूद नव्हती. परंतु साधारणपणे आठ दिवसाचे अधिवेशन बेळगाव येथे घेण्याची भूमिका कनार्टक सरकारने घेतली आहे. अधिवेशन घेण्याच्या विषयावरुन हा प्रश्न चिघळला आहे. सीमा प्रश्नाचा दावा सुप्रीम कोर्टामध्ये प्रलंबीत आहे. त्यामध्ये कर्नाटकची बाजू मजबूत होत असून आमची बाजू कमकुवत होत आहे, हा त्यांचा दृष्टीकोन आहे. सभापती महोदय, अशा परिस्थितीत कर्नाटकातील सीमा भागातील मराठी भाषिकांसाठी दोन मराठी वाचनालये काढण्याचा निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी चांगले काम केले आहे. तसेच महाराष्ट्र कर्नाटकच्या सीमा भागातील मराठी भाषिकांचे प्रश्न सोडविण्याची भूमिका व्यक्त केली आहे.

सभापती महोदय, सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये मोठया प्रमाणावर वीज टंचाईचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मी ग्रंथालयात जाऊन श्री.शरद पवार साहेबांचे 1994-95 मधील भाषण वाचले. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद व विरोधी पक्षनेतेपदही भुषविले आहे. त्यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी आवाहन केले होते की, सत्ताधाऱ्यांनी सावध राहावे. विजेच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका घेतल्यानंतर एन्रॉन प्रकल्प महाराष्ट्रात यावा किंवा नाही याबाबत संकल्पना त्यांनी मांडली होती. त्यावेळी एन्रॉनवर खूप चर्चा झाली होती, परंतु त्यांनी हा प्रश्न चांगल्या प्रकारे हाताळला होता. आता एन्रॉन गेल्यानंतर सातत्याने त्याचा उल्लेख होत असतो. त्यावेळी महाराष्ट्राकडे सरप्लस वीज होती. महाराष्ट्र राज्य गोवा, कर्नाटक, गुजरात अशा काही राज्यांना वीज देत होते. दरवर्षी पाचशे कोटीची बजेट प्रोव्हीजन केली जात होती. 250 मेगावॅट वीज ही दरवर्षी निर्माण व्हावयास पाहिजे ही महाराष्ट्राची जबाबदारी होती. परंतु एन्रॉन प्रकल्पाच्या संदर्भात नंतर काय

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी .....

झाले, तो इतिहास आपल्या सर्वांना माहिती आहे. युती शासनाच्या 4-5 वर्षाच्या काळात एक मेगावॅटही वीज निर्माण झालेली नाही. लोकशाही आघाडी सरकारच्या काळातही एक मेगावॅटही वीज निर्माण झालेली नाही. त्यावेळी एन्रॉनचे भूत आपण काढावयाचे म्हटले तर या राज्याला साडे सत्तावीस हजार कोटी रुपये द्यावे लागले असते. संपूर्ण अर्थव्यवस्था कोलमडून पडली असती. एन्रॉनचे पुनरागमन झाले आहे, पुढच्या वर्षी 2100 ते 2200 मेगावॅट वीज त्या ठिकाणी उपलब्ध होणार आहे. आज साडे सतरा हजार मेगावॅट वीजेची मागणी आहे. 550 मेगावॅट विजेचा तुटवडा आहे. महाराष्ट्रासमोर काही प्रश्न उभे राहिले आहेत, मी त्या प्रश्नांच्या ठिकाणी राजकारण आणू इच्छित नाही. कालच्या दोन निवडणूकामध्ये आपण हा प्रश्न गांभीर्याने लोकांसमोर घेऊन गेला आहात. भाजपा शिवसेनेचे सन्माननीय सदस्य श्री.रावते व श्री.फुंडकर इत्यादी नेत्यांनी नगरपरिषद, जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत विजेच्या प्रश्नांचे भांडवल करुन भावनिक प्रश्न केला होता. महाराष्ट्र राज्यात काही ठिकाणी 15-16 तास लोड शेडींग असते असे निवडणूकीतून सांगितले जात होते. तरीही सत्ताधारी पक्षाला लोकांची सहानुभूती मिळाली. लोक समजदार असल्याने सत्ताधारी पक्षाच्या मागे उभे राहिले आहेत. नाही तर या निवडणुकीतून त्याचे अत्यंत गंभीर परिणाम सत्ताधारी पक्षाला भोगावे लागले असते.

..... नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

परंतु सुदैवाने या राज्यातील जनता समजदार आहे, या राज्यातील जनता अधिक समंजस आहे. हा ज्वलंत प्रश्न सुटला पाहिजे याकरिता राज्यातील जनतेने लोकशाही आघाडी सरकारला भरभरुन मते देऊन पुन्हा सत्तेवर आणून बसविले आहे. म्हणून माननीय राज्यपालांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी हे शासन गांभीर्याने प्रयत्न करीत आहे असे सांगितले आहे. माननीय राज्यपाल महोदय या राज्यामध्ये राज्यपाल म्हणून आल्यानंतर त्यांनी प्रत्येक अभिभाषणामध्ये सीमा प्रश्नाचा उल्लेख केलेला आहे...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला माननीय सदस्यांना प्रामाणिकपणे विनंती करावयाची आहे की, आपण एकदा या महाराष्ट्राचे ॲटर्नी जनरल होऊन सीमा प्रश्नाच्या सोडवणुकीकरिता सुप्रीम कोर्टामध्ये काळा कोट चढवून उभे राहिलात तर हा महाराष्ट्र आपल्याला विसरणार नाही, आम्ही आपले स्वागत करु. सीमा प्रश्न सोडविला गेला पाहिजे अशी सर्वांची इच्छा आहे, हा राजकारणाचा विषय होऊ शकत नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण सरकारी वकील होऊन काळा कोट चढवून सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन हा प्रश्न सोडविलात तर आपण महाराष्ट्रामध्ये अजरामर व्हाल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी धन्यवाद देतो. माननीय राज्यपाल हे या राज्यामध्ये येण्यापूर्वी ते कर्नाटक राज्याचे माननीय मुख्यमंत्री होते. सुदैवाने त्यांना या राज्याचे राज्यपाल म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे त्यांच्या मुखामधून हे स्टेटमेंट बाहेर आले असल्यामुळे ते महत्वाचे आहे...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी मघाशी भाषण करतांना "जरी माननीय राज्यपालांचे अभिभाषण असले तरी ते माननीय राज्यपालांचे नसते" असा उल्लेख केला होता. त्यामुळे आता आपण त्यांचे कौतुक करु नका, कौतुक करावयाचे असेल तर ते सरकारचे करा.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणासंबंधी त्यांचे आभार व्यक्त करण्याचा प्रस्ताव याठिकाणी मांडण्यात आला असल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. या राज्याची अर्थव्यवस्था सुधारण्याकरिता या राज्याने स्वीकारलेल्या पुरोगामी कार्यक्रमाची अंमलबजावणी सन 2006-07 मध्ये कशापध्दतीने केली याचे दिग्दर्शन माननीय राज्यपालांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

आपल्या अभिभाषणामध्ये केले म्हणून आपणा सर्वांच्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने आणि व्यक्तिश: माझ्या वतीने मी त्यांचे आभार मानून माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावास काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. सुधारणांची एकत्रित यादी माननीय सदस्यांना मिळाली आहे व सुधारणा मांडावयाच्या नाहीत असे मी समजतो.

आता विरोधी पक्षनेत्यांनी आपले भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, या सभागृहाच्या माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी जो राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव याठिकाणी मांडला आहे, आणि आपले सहकारी मित्र माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्या प्रस्तावाला अनुमोदन दिले त्याच्याशी मी सहमत होऊ शकत नाही. लोकशाही परंपरेमध्ये राज्यातील कोणत्याही कृतीला विरोधी पक्षाने विरोध करणे अपेक्षित नाही. म्हणून माननीय राज्यपालांची प्रतिष्ठा, महिमा, गरिमा अबाधित ठेवून शासनाच्या धोरणांचे चुकीचे निर्णय, अंमलबजावणीतील विसंगती इत्यादी मुद्दे व भूमिका विरोधी पक्षनेता या नात्याने मांडणे मी माझे कर्तव्य समजतो.

माननीय राज्यपाल महोदयांनी भाषण करतांना अभिभाषणाच्या परिच्छेद क्रमांक 3 मध्ये असे सांगितले आहे की, "माझ्या शासनाने अतिवृष्टीमध्ये महाराष्ट्राची जी हानी झाली, त्या अतिवृष्टीची, आपत्तीची झळ पोहोचलेल्या लोकांना तात्काळ आर्थिक मदत दिली". माननीय राज्यपालांनी हे वाक्य वाचण्यासाठी आणि आपण सर्वांनी ते ऐकण्यासाठी छापण्यात आले असले आणि आपल्याला जरी ते चांगले वाटत असले तरीसुध्दा वस्तुस्थिती वेगळी आहे. यामध्ये म्हटले आहे की, 491 कोटी रुपयांचे तात्काळ वाटप करण्यात आले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु..

तर दळणवळण व अन्य पायाभूत सुविधांच्या पुनर्निर्माणासाठी 113 कोटी रुपये खर्च करण्यात आले." असा यामध्ये उल्लेख करण्यात आला.

सभापती महोदय, माझ्या कार्यालयामध्ये डाकेने पत्र आलेले आहे. पिंपळखुटा, ता.पातूर, जि.अकोला येथील गजानन सिताराम राऊत व अन्य अकरा पूरग्रस्त गावक-यांनी जिल्हाधिकारी, अकोला याना दिनांक 26-10-2006 रोजी निवेदन दिलेले आहे, ते मी वाचून दाखवितो.

"अर्जदार:- गावकरी नागरीक, रा.पिंपळखुटा,ता.पातूर,जिल्हा अकोला.

विषय :- या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे घराची पडझड झालेल्या घराच्या वाटपामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याताबबत.

महोदय,

आम्ही खालील सह्या करणार विनंती अर्ज सादर करतो की, आमच्या येथील अतिवृष्टीमुळे पडझड झालेल्या घराच्या वाटपामध्ये गावातील काही दलालांनी अधिकाऱ्यांच्या सहकार्याने जुनी यादी सर्वेची गहाळ करून अंदाजे 1 ते 2 लाखाचा भ्रष्टाचार केलेला आहे, तो या प्रमाणे.. लाभार्थी सरकारी जागेत रहात असून त्यांचे कुळाचे घर आहे. नुकसान काहीच नाही तरी वाटप, झाले. ते सरकारी जागेत रहात असून त्यांचे पक्के विटा व सिमेंटचे घराचे नुकसान झालेले नाही तरी वाटप झाले. स्वत:चे घर पण नुकसान काहीच नाही तरी वाटप, स्वत:च्या नावाने जागा नाही तरी वाटप झाले, इंदिरा आवास योजनेत घरकुल घेतले आहे, नुकसान झालेले नाही अशांनाही वाटप झाले. एकाच घरातील दोन-तीन लोकांची नावे टाकून त्यांच्या पूर्ण नावाने घराचे वाटप झाले. याच तारखेला पडझडीत घराचे नुकसान झालेले नसूनही त्यांच्या घरातील एकाच जागेचे घरातील दोघांच्या नावाने 1 महिन्याच्या अंतरावर दोन वेळा वाटप झाले अशा 100 ते 125 लोकांना खोटे वाटप करुन त्यांच्याजवळून दलालांनी 200 ते 1000 रुपये गोळा केले. काही लाभार्थींनी पैसे न दिल्यामुळे ते वंचित राहिले. तसेच काही लाभार्थींनी दलालांना पैसे न दिल्यामुळे त्यांना कमी पैशांचे वाटप करण्यात आले. दलालांना पैसे देणाऱ्यांना त्यांचे नुकसान जास्त झालेले नसून जास्त वाटप झाले. तरी कृपया आपण स्वत: स्पॉटवर चौकशीला येऊन चौकशी करावी व वंचित राहिलेल्या लाभार्थींना लाभ देण्याची कृपा करावी व भ्रष्टाचार केलेल्या दलालांवर, भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी, अशी आशा बाळगून विनंती अर्ज सादर करीत आहोत."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशी असंख्य प्रकरणे त्या त्या वेळेला शासनाच्या निदर्शनास आणलेली आहेत. या ठिकाणी 491 कोटी रुपयाचे वाटप झाल्याचे म्हटलेले आहे. परंतु किमान प्रत्येक गावामध्ये, प्रत्येक तालुक्याध्ये ज्या लोकांचे नुकसान झालेले नाही, अशा लोकांनाही मदत दिलेली आहे. तळ मजल्यावर रहाणाऱ्या लोकांच्या घरात पाणी शिरले त्यांना मदत न मिळता तिसऱ्या मजल्यावर रहाणाऱ्यांना मदत दिलेली आहे. ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देऊनही त्याबाबतची चौकशी झालेली नाही. परंतु या ठिकाणी मात्र शासनाने आपली पाठ थोपटून घेतलेली आहे. अशा ग्रामीण भागामध्ये असंख्य तक्रारी ऐकायला मिळतात. तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी 2 डिसेंबर 2006 रोजी या पत्राच्या संदर्भाने तहसिलदारांना चौकशी करायला सांगितले परंतु अद्याप कोणत्याही प्रकारची चौकशी झालेली नाही, संबंधितांवर कारवाई केलेली नाही.

सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनामध्ये वितरित झालेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या तिसऱ्या यादीमधील दुसरा प्रश्न "ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पूरग्रस्त शेतकऱ्यांनी कर्ज वसुलीसाठी केलेली जप्तीची कारवाई" यासंबंधीच्या प्रश्नाला उत्तर देताना सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी उत्तर दिलेले आहे. प्रश्न विचारलेला होता की, "ठाणे मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्जाचे हप्ते थकल्यामुळे पूरग्रस्त शेतकऱ्यांवर कर्जवसुलीसाठी जप्तीची कारवाई केल्याची घटना 22 डिसेंबर 2005 च्यासुमारास घडली, हे खरे आहे काय ? याला "होय",असे उत्तर दिलेले आहे. दुसरा उपप्रश्न विचारलेला होता की, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्ज वसुलीसाठी खडी भाताने (जि.ठाणे) परिसरातील पूरग्रस्त शेतकऱ्यांची भांडीकुंडी अधिकाऱ्यांनी जप्त करून शिरवली येथील गोदामात आणून ठेवली होती, हे खरे आहे काय ? "या उपप्रश्नाला "होय", असे उत्तर दिलेले आहे. पूरग्रस्तांना मदत देण्याऐवजी त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम शासनाच्या अधिकाऱ्याच्या वतीने, स्थानिक कार्यकर्त्यांच्या वतीने,पुढाऱ्यांच्या वतीने करण्यात आले.

यानतर श्री.बरवड.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, आताच या ठिकाणी आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी माननीय पंतप्रधानांच्या पॅकेजचा तसेच माननीय मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजचा उल्लेख केला. माननीय मुख्यमंत्र्यांनी 1050 कोटी रुपयांचे पॅकेज विदर्भातील सहा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी जाहीर केले. त्या पाठोपाठ 1 जुलै, 2006 रोजी माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे विदर्भाच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. हे पॅकेज जाहीर होण्यापूर्वी विदर्भातील सहाही जिल्ह्यांचे सर्वेक्षण झाले होते. 1 जुलै, 2006 रोजी माननीय पंतप्रधानांनी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आणि या ठिकाणी असा उल्लेख झाला की, हे पॅकेज जाहीर झाल्यानंतर विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण घटले. सहा जिल्ह्यांचे सर्वेक्षण झाले होते. आजच्याच प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधीचा माझा प्रश्न होता. त्यामध्ये महसूल मंत्र्यांनी असे उत्तर दिलेले आहे की, माहे नोव्हेंबर, 2006 ते माहे फेब्रुवारी, 2007 या कालावधीत म्हणजेच साधारणत: तीन चार महिन्यांच्या कालावधीत राज्यात एकूण 656 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. म्हणजे जुलै महिन्यामध्ये माननीय पंतप्रधानांचे पॅकेज जाहीर झाल्यानंतर या ठिकाणी आम्ही चारच महिन्यांची आकडेवारी मागितली होती. नोव्हेंबर ते फेब्रुवारी या चार महिन्यांमध्ये 656 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले असे उत्तर आजच्याच प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये आलेले आहे. माननीय पंतप्रधानांचे पॅकेज जाहीर झाले, माननीय मुख्यमंत्र्यांचे पॅकेज जाहीर झाले आणि हे पॅकेज आल्यानंतरही विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. खरे म्हणजे सन 2007 हे वर्ष सुरु झाल्यानंतर पहिल्या 40 दिवसांमध्ये विदर्भातील 150 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. पॅकेज आल्यानंतर त्या पॅकेजमुळे कोणाचे भले झाले ? या पॅकेजमुळे खरी संजीवनी बँकांना मिळाली. जे पॅकेज आले ते डायरेक्ट बँकेकडे गेले. जिल्हा ग्रामीण बँकेमध्ये गट सचिवांचे पगार थांबलेले होते. त्या संस्थांना त्यांचा पगार करता आला नाही परंतु पॅकेजचे पैसे बँकेमध्ये जमा झाल्यानंतर पहिल्यांदा जर कोणाचा फायदा झाला असेल तर तो म्हणजे गट सचिवांचा फायदा झाला. त्यांचे पगार झाले. या बँका भ्रष्टाचारात बुडालेल्या होत्या. त्यांचे जे कर्ज थकित झालेले होते त्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

झालेला आहे. त्या बँकांचे व्याज शेतकऱ्यांकडे थकित होते. या बँकांना पैसे मिळाले आणि त्यामुळे त्या बँका ऊर्जितावस्थेत आल्या. कर्जाच्या पुनर्गठनाबाबत या ठिकाणी सांगण्यात आले की, 1300 कोटी रुपयांचे कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले. कर्जाचे पुनर्गठन म्हणजे त्या शेतकऱ्यांच्या छातीवर ते कर्ज तसेच कायम ठेवून, 1384 कोटी रुपयांचे कर्ज त्यांच्या छातीवर कायम ठेवून पुन्हा त्या शेतकऱ्यांना तेवढे कर्ज देतात. यामध्ये 1700 कोटीचे कर्ज अधिक हे 1300 कोटी रुपये असे मिळून 4 हजार कोटीच्या कर्जाने विदर्भातील शेतकरी पुन्हा कर्जबाजारी झाला. एक हंगाम इ ाल्यानंतर पुन्हा ते कर्ज थकित राहणार आणि कर्ज थकल्यामुळे पुन्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालू होणार. 1700 कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले. हे 1700 कोटी रुपये आणि कर्जाचे झालेले पुनर्गठन असे एकूण 4 हजार कोटीचे कर्ज या पॅकेजमुळे विदर्भाच्या शेतकऱ्यांच्या छातीवर झाले. यामध्ये कर्जमाफी झालेली नाही. यामध्ये फक्त कर्जावरील व्याज माफ केले गेले. कर्ज मात्र शेतकऱ्यांच्या छातीवर तसेच कायम ठेवले. मी हिशेब केला. 3750 कोटी रुपयांचे माननीय पंतप्रधानांचे पॅकेज आणि 1050 कोटी रुपयांचे माननीय मुख्यमंत्र्यांचे पॅकेज याचा हिशेब केला तर 4000 कोटी रुपये होतात. विदर्भातील आणि या महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतकऱ्यांवर जिल्हा सहकारी बँकाचे आणि ग्रामीण भागातील बँकांचे कर्ज याची बेरीज केली तर 5 हजार कोटी रुपयांच्या वर शेतकऱ्यांवर कर्ज नाही. म्हणून आम्ही मागणी करीत होतो की, शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून मुक्त करावयाचे असेल तर जोपर्यंत या महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतकरी कर्जमुक्त होणार नाही तोपर्यंत या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...

माननीय मुख्यमंत्र्यांनी पॅकेज दिले परंतु कर्ज मात्र शेतक-याच्या उरावर कायम ठेवले. माननीय मुख्यमंत्र्यांनी 1050 कोटी पॅकेज दिले. या पॅकेजमध्ये त्यांनी शेतक-यांना काहीही दिले नाही. कापूस उत्पादक शेतक-यांकडून कापूस एकाधिकार खरेदी योजनेमध्ये तीन टक्के चढ-उतार म्हणून जी रक्कम घेतली होती ती 750 कोटी रु. इतकी होती. ही रक्कम पणन महासंघामध्ये जमा झालेली होती. ही रक्कम शासनाने जाहीर केलेल्या 1050 कोटीच्या पॅकेजमध्ये समाविष्ट करण्यात आली. 750 कोटी रु. हे शेतक-यांच्या मालकीचे हक्काचे पैसे आहेत. या पैशाचा पॅकेजमध्ये समावेश करुन शेतक-यांना 1050 कोटीच्या पॅकेजचे गाजर दाखवण्यात आले. प्रत्यक्षात पॅकेजमधील 1050 कोटी ऐवजी दोनशे-अडीचशे कोटी रुपये शासनाने वेगवेगळ्या माध्यमातून खर्च केले. म्हणजे काही ठिकाणी गायी दिल्या, काही ठिकाणी बक-या दिल्या. विदर्भातील 6 जिल्ह्यामध्ये 13 हजार गायींचे वाटप झाल्याचे शासनाने सांगितले. प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील शेतक-याला किती गायी मिळाल्या, किती बक-या मिळाल्या ? हा एक संशोधनाचा विषय आहे. माननीय पंतप्रधांनाचे पॅकेज तसेच माननीय मुख्यमंत्र्यांचे पॅकेज शेतक-यांना देण्यात आल्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या दोन्ही पॅकेजेस्चा परिणाम म्हणून नोव्हेंबर 2006 ते फेब्रुवारी 2007 या कालावधीत 656 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यावरुन या पॅकेजचा किती शेतक-यांना लाभ झाला हे आपल्या लक्षात येईल. भारिप-बहुजन महासंघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी कोर्टामध्ये एक जनहित याचिका दाखल केली होती. पुनर्निधारण निधीचा योग्य वापर करण्याच्या संदर्भात केन्द्र सरकारकडे जे शपथपत्र सादर केले गेले त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, 1296 कोटीचा निधी हा कर्ज माफीसाठी नाही तर कर्ज पुनर्निधारणासाठी आहे. त्यामुळे शेतक-यांचे कर्ज माफ केले, हा शासनाचा दावा फोल आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शेतक-यांसाठी पॅकेज दिल्याचा उल्लेख करुन शेतक-यांप्रती सहानुभूती दाखविलेली आहे. खरे म्हणजे माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्री यांनी शेतक-यांसाठी जाहीर केलेल्या पॅकेजच्या संदर्भात श्वेतपत्रिका जाहीर केली पाहिजे. केन्द्र सरकारने महाराष्ट्र सरकारला किती रक्कम दिली ? महाराष्ट्र सरकारने किती रक्कम खर्च केली ? विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतक-यांना किती पैसे मिळाले ? किती शेतक-यांची कर्जे माफ केली ? यासंबंधी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

शासनाने श्वेतपत्रिका काढावी अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

विदर्भ हा कापूस उत्पादक शेतक-यांचा भाग आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी शेतक-यांवर फार मोठे उपकार केल्यासारखे सांगितले की, हेक्टरी 1500 रु.चे अनुदान दिलेले आहे. कापूस एकाधिकार खरेदी योजना बंद करुन ख-या हमी भावापासून शेतक-याला वंचित करण्याचे पाप या सरकारने केलेले आहे. आता हेक्टरी 1500 रुपये अनुदान दिल्याचे सांगितले जाते. विदर्भामध्ये कापसाचे सरासरी पीक एकरी 5 ते 7 क्विंटल येते. हेक्टरी 1500 रु. दिल्यानंतर क्विंटलला 100 रु. याप्रमाणे ही रक्कम येते. कापसाला केन्द्राच्या हमी भावाप्रमाणे .....

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

म्हणजे 1600 ते 1800 रुपये दरम्यान भाव मिळाला आणि 100 रुपये क्विंटलवर अधिक दिले. आज मार्केटमध्ये 2500 ते 2600 रुपये क्विंटलचा भाव आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांची शासनाने लूट केली. शासनाने शेतकऱ्यांना कापूस खरेदीची हमी दिली होती. त्यापासून हे शासन मुक्र झ ाले आहे. कापूस खरेदी केली नाही. खाजगी व्यापाऱ्यांनी खरेदी केलेला कापूस आणि शासनाने खरेदी केलेला कापूस याच्या भावामध्ये महद्अंतर आहे. शासनाने शेतकऱ्यांना फसविले आहे. 1500 रुपये हेक्टरी अनुदान दिले, ते देखील 2 हेक्टरपर्यंत दिले. 5 हेक्टर जमीन असलेल्या शेतकऱ्यांनाच दिले. विदर्भातील 15 ते 20 हेक्टर जमीन असणारे शेतकरी यापासून वंचित राहिले. 1500 रुपये हेक्टरी अनुदान देणे म्हणजे महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांची ही घोर फसवणूक आहे, हा शेतकऱ्यांचा केलेला घात आहे असे मी म्हणतो. राज्य शासनाने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून स्वत:ची पाठ थोपटून घेण्याचा प्रयत्न केला आहे. 1500 रुपये हेक्टरी अनुदान कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिले, ते देखील 2 हेक्टरपर्यंत दिले. कापसाचा भाव महाराष्ट्रात 2600 रुपये क्विंटलपर्यंत गेला. परंतु शासनाने 100 रुपये हेक्टरी अनुदान दिले ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे. पॅकेजच्या माध्यमातून खऱ्या शेतकऱ्यांना मदत मिळाली नाही. या पॅकेजची रक्कम वाटप करीत असताना प्रचंड भ्रष्टाचार कृषि खात्याच्या माध्यमातून सुरु आहे. या पॅकेजचे वाटप करीत असताना प्रचंड भ्रष्टाचार सुरु असून काम होत नसताना पैसे काढले जातात अशी असंख्य उदाहरणे पॅकेजच्या माध्यमातून निर्माण झाली आहेत.

सभापती महोदय, सहकार खात्याबद्दल मी काय सांगावे? महाराष्ट्राच्या विकासामध्ये आणि विस्तारामध्ये सहकार क्षेत्राचे फार मोठे योगदान आहे. कै.वैकुंठभाई मेहता आणि कै.वसंतदादा पाटील यांनी सहकाराचे रोपटे महाराष्ट्रात लावले. या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला लाभ मिळाला पाहिजे. ग्रामीण भागातील माणसाचे उत्पन्न वाढले पाहिजे, त्याची उन्नती झाली पाहिजे यासाठी सहकाराची स्थापना केली गेली. सभापती महोदय, सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी कृषि उत्पन्न बाजार समित्या, सहकारी बँका, सहकारी उपसा जलसिंचन योजना, सहकारी पतपेढ्या अशा अनेक प्रकारच्या संस्था निर्माण झाल्या. सहकारातून स्वाहाकार हा नवा मंत्र रुढ झाला आहे. सहकारातून सर्वसामान्य माणसाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

लाभ मिळण्याऐवजी त्या त्या संस्थातील संचालक मंडळी गब्बर झाली आणि सर्वसामान्य माणूस नाडला गेला असे चित्र आज पहावयास मिळत आहे. संस्था चालकांनी या संस्था गिळून टाकल्या. याचे एक उदाहरण म्हणून मी सांगू इच्छितो. बनसारोळा सेवा सहकारी सोसायटी, ता.केज, जि.बीड या सेवा सहकारी सोसायटीसंबंधी औरंगाबाद, बीड, मराठवाडा येथील विविध वृत्तपत्रातून ऑक्टोबर, 2000 पासून सतत बातम्या प्रसिध्द होऊ लागल्या. माझ्याकडे वृत्तपत्रातील कात्रणे उपलब्ध आहेत. "बनसारोळा सेवा सहकारी सोसायटीमध्ये 1 कोटी रुपयांचा अपहार" या मथळयाखाली दै.लोकमत वृत्तपत्रामध्ये दिनांक 14.10.2000 रोजी बातमी छापून आली. "बनसारोळा सेवा सहकारी सोसायटीच्या विरुध्द गुन्हा दाखल" या मथळयाखाली दै.सकाळ या वृत्तपत्रात दिनांक 17.10.2000 रोजी बातमी प्रसिध्द झाली. "बनसारोळा सेवा सहकारी सोसायटीचे रेकॉर्ड जप्त, लाखो रुपयांचा गैरव्यवहार" या मथळयाखाली दै.झुंझार या वृत्तपत्रात दिनांक 17.10.2000 रोजी बातमी प्रसिध्द झाली. "बनसारोळा सेवा सहकारी सोसायटीची चौकशी न केल्यास आत्महत्या" या मथळयाखाली दै.झुंझार या वृत्तपत्रात दिनांक 19.10.2000 रोजी बातमी प्रसिध्द झाली. भ्रष्टाचाराने बरबटलेल्या बनसारोळा सेवा सहकारी सोसायटीच्या सभासदांनी धरणे, उपोषणे आणि निवेदने या लोकशाही मार्गाने आंदोलने सुरु केली. या आंदोलनामुळे आणि सभासदांनी घेतलेल्या परिश्रमामुळे जिल्हा विशेष लेखापरीक्षक (वर्ग.1), सहकारी संस्था, बीड श्री.एस.के.पोकळे या अधिका-याची दिनांक 3 ऑक्टोबर, 2000 रोजी चौकशी करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, चौकशी अधिकाऱ्यांनी आपला चौकशी अहवाल सादर केल्यानंतर दिनांक 6 डिसेंबर, 2000 रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना पत्र पाठवून आपण केलेली चौकशी योग्य नसल्याचे मान्य केले.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाडुंरंग फुंडकर .....

त्यांनी स्वत:च सह निंबधाकांना पत्र लिहून कळविले आहे की, चौकशी बरोबर झालेली नाही. चौकशी बरोबर झाली नसल्यामुळे आपण मला जी शिक्षा द्याल ती मी भोगण्यास तयार आहे. त्यांनी जे पत्र सह निबंधकांना पाठविलेले आहे ते पत्रच माझ्या हातात आहे. या पत्रामध्ये जो मजकूर आहे तो ऐकण्यासारखा आहे त्यामुळे मी या पत्रातील मजकूर वाचून दाखवितो :-

"**विषय** : ज्ञापन खुलासा सादर करणेबाबत

संदर्भ: आपले न्यायालयीन ज्ञापन जा.क्र. विसनि ले.प्र./ आस्था-1/ विचो / एसकेपो/ 1375 / 2006 दि.1.12.2006.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन विनंती की, संदर्भिय ज्ञापनानुसार जोडपत्र क्र.1 ते 4 मधील नमूद दोषारोपाबाबत खालिलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

जोडपत्र 1 अंतर्गत नमूद केलेले सर्व दोषारोप मला मान्य असून या पूर्वी मी कोणत्याही संस्थेचे चौकशीचे काम केलेले नाही. सदरची चौकशी कालमर्यादेत असल्याने व दिपावलीच्या सुट्टया दरम्यान असल्याने सदर चौकशी करतांना बँकेतील रेकॉर्ड तसेच सभासदांच्या रुजवाती व तलाठी कार्यालयातील रेकॉर्ड पहाता आलेले नाही.

सदर चौकशी दरम्यान झालेल्या चुका अनावधानाने व अनुभव नसल्याने झालेल्या असून सर्व दोषारोप मला मान्य आहेत.

या बाबत अशी विनंती करतो की, माझ्या खुलाश्याचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मला कमीतकमी शिक्षा देण्यात यावी."

सभापती महोदय, या पत्राची एक प्रत मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग सह संस्था बीड यांनाही माहिस्तव सादर करण्यात आलेली आहे.

पहिल्या चौकशीबाबत हे असे झाल्यामुळे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लेखापरीक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी श्री. व्ही.आर. देव चौकशी प्रमुख लेखापरीक्षक श्रेणी 2, सहकारी संस्था ता. बिलोली, जि. नांदेड यांची दुस-या चौकशीचे, चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली. श्री. देव यांनी या संस्थेतील भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे बाहेर काढली.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

संस्थेच्या अध्यक्षांनी एकाच जागेचे 3-3,4-4 सातबारा व आठ-अ चे उतारे सादर करुन जादा कर्ज मंजूर करुन घेतल्याचे दाखवून दिले.

सुमारे 17 ते 18 लाख रुपयांचा भ्रष्टाचार या सोसायटीत झालेला आहे. हे त्यांनी सप्रमाण सिध्द केले आणि या संस्थेविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 78 अन्वये संचालक मंडळाला दूर करण्याची कारवाई सुरु केली. जवळपास 4 वेळा या कारवाईस मुदतवाढ मिळाली आणि शेवटी दिनांक 12 डिसेंबर, 2006 रोजी बरखास्तीची कारवाई होणार इतक्यात राज्य शासनाचे सुस्त असलेले प्रशासन अचानक गतीमान झाले. दिनांक 12 डिसेंबर, 2006 या एकाच दिवशी काय काय झाले हे पहाण्यासारखे आहे.

1) संस्थेच्या संचालक मंडळाने दिनांक 12.12.2006 रोजी औरंगाबाद येथे ॲडव्होकेट टोपे यांचेमार्फत पिटीशन तयार केले.
2) हे पिटीशन त्याच दिवशी नागपूर येथे आले.
3) याचदिवशी ते राज्य मंत्री महोदयांच्या कार्यालयात गेले व दाखल झाले.
4) पिटीशनवर तात्काळ टिपणी तयार करुन पिटीशन राज्यमंत्र्यांकडे गेले.
5) राज्यमंत्र्यांनी याच दिवशी प्रकरण सुनावणी घेण्याचे आदेश दिले.
6) याचदिवशी वादी व प्रतिवादी यांची समकक्ष सुनावणी झाली.
7) सुनावणीतील चर्चेनुसार याच दिवशी राज्यमंत्र्यांनी बरखास्तीच्या आदेशास स्थगिती दिली.
8) याचदिवशी हा आदेश लातूर येथे गेलो.
9) याचदिवशी हा आदेश लातूर येथून डी.डी.आर., बीड यांच्याकडे गेला.
10) याचदिवशी डी.डी.आर., बीड यांचा असिस्टंट रजिस्टार, केज यांना स्थगिती आदेश मिळाला.

सभापती महोदय, हेलिकॉप्टरपेक्षा जास्त गतीने या प्रकरणात काम झालेले आहे. आपण कशासाठी भ्रष्टाचाराची प्रकरणे दाबता हे आम्हाला काही समजत नाही. या राज्याचा कारभार पारदर्शी आहे असे माननीय राज्यपाल महोदय सांगतात परंतु या प्रकरणात जवळ जवळ 1 कोटी

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

रुपयाच्यावर भ्रष्टाचार झालेला आहे. या भ्रष्टाचारामध्ये राज्यमंत्री सुध्दा सामील आहेत. कलम 78 ची कारवाई तसेच बरखास्तीची कारवाई त्वरीत थांबविण्याचे काम आपल्या सरकारने केलेले आहे.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात इंदिरा आवास योजनेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सध्या या योजनेत कोणता प्रकार सुरु आहे ? राज्यपालांच्या अभिभाषणात सांगण्यात आले आहे की, इंदिरा आवास योजने अंतर्गत 70 हजार पेक्षा जास्त नवीन घरांची बांधणी केली आहे. तर सुमारे 24 हजार घरांची दुरुस्ती केली आहे. तसेच ग्रामीण घर योजनेस उत्तेजन देण्यासाठी राजीव गांधी निवारा योजने अंतर्गत येत्या दोन वर्षात एक लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे. त्यापैकी 50 हजार घरे ही दारिद्रय रेषेखालील कुटुंबांसाठी बांधण्यात येणार आहेत. मला या संदर्भात सांगावयाचे आहे की, या योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील लोकांना घरे दिली काय ? पंचायत समिती स्तरावर राजकारण केले जाते व जी दारिद्रय रेषेखालील कुटुंबे नाहीत त्यांना घरे दिली जातात. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांच्या शिफारशींवरुन घरे मिळतात. ग्रामपंचायतीमध्ये ठराव होऊन ज्यांची नावे घोषित होतात त्यांना घरे मिळत नाहीत. ग्रामपंचायतीच्या ठरावामध्ये ज्यांची नावे असतात ती नावे गहाळ होतात आणि ज्यांनी शिफारस आणली आहे त्यांनाच घरकुले मिळतात.याठिकाणी फक्त आकडेवारी देऊन ग्रामीण भागातील लोकांना फसविण्याचे काम झ ालेले आहे.

सभापती महोदय, माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्यांच्या भाषणात महाराष्ट्र-सीमा प्रश्नाचा उल्लेख केला. खरे म्हणजे महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न वर्षानुवर्षे रखडत पडला आहे. हा सीमा वादाचा प्रश्न सुटण्यासाठी या सभागृहाने अनेकदा ठराव केले. मागील वर्षी सुध्दा ठराव केला होता. गेल्या वर्षी आझाद मैदानावर बेळगाव-निपाणी भागातील लोक उपोषणास बसले होते. तेव्हा दोन्ही सभागृहाचे कामकाज बंद ठेवून त्यांना भेटण्यासाठी आणि त्यांना पाठिंबा देण्यासाठी आपण सर्वजण गेलो होतो. त्यानंतर माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांना भेटण्यासाठी दिल्लीला एक शिष्टमंडळ देखील गेले होते. त्या शिष्टमंडळात मी देखील होतो. त्यावेळी आपल्या राज्यातील खासदार आणि केंद्रीय गृहमंत्री माननीय श्री.शिवराज पाटील देखील उपस्थित होते. त्यावेळी माननीय केंद्रीय गृह मंत्री यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सांगितले की, महाराष्ट्राच्या बाजूने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात येईल. परंतु माहिती अशी आहे की, माननीय केंद्रीय गृहमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या विरोधात प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. दिल्लीमध्ये आपले वर्चस्व नाही. तसे असते तर केंद्रीय गृहमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या विरोधात प्रतिज्ञापत्र सादर केले नसते. खरे म्हणजे या सरकारलाच हा प्रश्न सोडवावयाचा नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये अनेक योजनांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सरकारने मागील वर्षी कोणती कामे केली आणि पुढच्या वर्षी कोणती कामे करणार आहेत ते सांगितलेले आहेत. मी दोन गोष्टींबाबत सरकारचे अभिनंदन करणार आहे. मी विरोधासाठी विरोध करणारा कार्यकर्ता नाही. शासनाने पॅकेज अंतर्गत शेतकऱ्यांच्या मुलींच्या सामूहिक विवाहासाठी 10 हजार रुपये मंजूर केलेले आहेत. त्याचा लाभ शेतकऱ्यांना घेता येईल.या योजनेचा प्रचार आणि प्रसार होण्याची गरज आहे. तसेच ही रक्कम 10 हजारांहून 15 हजार पर्यंत करण्यात यावी म्हणजे या योजनेला अधिक प्रोत्साहन मिळेल. तसेच जीवनदायी आरोग्य योजनेची अनुदान मर्यादा दुपटीहून अधिक म्हणजे 1 लाख 50 हजार इतकी केली त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

आतापर्यंत हृदय, मूत्रपिंड व मेंदूच्या आजारासाठी ही योजना लागू होती. ती आता आपण कर्करोगाच्या उपचारासाठीही लागू करीत आहात. याचबरोबर आपण एन्जिओग्राफीसाठीही मदत देत होतात. परंतु त्यासोबत आपण एन्जिओप्लास्टीसाठी मदत देत नाहीत. आज आमच्या हजारो गोरगरिबांच्या हृदयाचा व्हॉल्व गेल्याची अनेक प्रकरणे आमच्याकडे येतात. परंतु त्यासाठी आपण कुठल्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. त्यामुळे यासाठीही आपण तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, कर्जाचा मुद्दा प्रामाणिकपणे हे सरकार कबूल करेल असे मला वाटले होते. परंतु तसे काही झालेले नाही. आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर गेल्या 7 वर्षामध्ये या प्रगतीशील महाराष्ट्रावर 1 लाख 37 हजार कोटी रुपयांच्यावर कर्जाचा बोजा या सरकारने महाराष्ट्रातील जनतेच्या बोडक्यावर नेवून बसवला आहे. सन 1995 मध्ये ज्यावेळी युतीचे राज्य महाराष्ट्रामध्ये आले त्यावेळी 22 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. युतीने राज्य सोडल्यानंतर 37 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. परंतु आज गेल्या 7 वर्षात महाराष्ट्रावर 1 लाख 37 हजार कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहे. आपण एवढे कर्ज काढले, परंतु तो पैसा गेला कुठे ? तो आपण कुठे खर्च केला ? युतीचे सरकार होते, त्यावेळी आम्ही कर्ज काढले. परंतु त्यावेळी आम्ही राज्यामध्ये उड्डाण पूल बांधले, हायवे बांधले, अनेक योजना महाराष्ट्रात आणल्या. परंतु आपण एवढे कर्ज काढून काय केले ? आज आपण महाराष्ट्राला फक्त कर्जाच्या खाईत लोटलेले आहे. आपण जेवढे कर्ज काढले, त्याचे काय केले ? याची माहिती आपण महाराष्ट्राच्या जनतेला द्यावी. आपण कर्जाच्यासंबंधीची एक श्वेतपत्रिका प्रसिध्दी करावी व जनतेसमोर सत्य आणावे, अशी माझी मागणी आहे. महाराष्ट्रातील जनतेला कळले पाहिजे की, आपण एवढे कर्ज काढून कोणकोणती कामे केली ?

सभापती महोदय, मी माझा शेवटचा मुद्दा मांडणार आहे. त्या मुद्यासंबंधी मी जर बोललो नाही तर त्याची प्रतारणा झाल्यासारखे होईल. आज महाराष्ट्रामध्ये विजेचा प्रश्न फारच भेडसावत आहे. विजेच्या प्रश्नासंबंधी याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्य बोलले. माझे मित्र, ॲड.गुरुनाथ कुलकर्णींनी या विषयाला हात घातला. आज महाराष्ट्रात विजेचे संकट फारच आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून आजतागायत विजेचे संकट महाराष्ट्रामध्ये कधीही आले नव्हते, तेवढे

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

संकट आज आपल्या राज्यावर आलेले आहे. गेल्या 7 वर्षाच्या काळात या सरकारच्या नाकर्तेपणामुळे हे संकट आलेले आहे. एकवेळ अशी होते की, या महाराष्ट्राजवळ पुरेशी वीज होती, महाराष्ट्रामध्ये कुठेही भारनियमन होत नव्हते. परंतु आता 18-18 तासाचे भारनियमन या महाराष्ट्रामध्ये होत आहे. आमचे मित्र, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी साहेब विजेच्या प्रश्नाबद्दल बोलले. त्यांना मी सांगू इच्छितो की, सन 2010 मध्येसुध्दा 5 तासाचे भारनियमन राहील, असे वीज वितरण कंपनीचे कार्यकारी संचालक, श्री.विजय सोनवणे यांचे स्टेटमेंट आहे. अशाप्रकारे राज्यामध्ये सन 2010 सालीसुध्दा 5 तासांचे भारनियमन कायम राहणार असल्याचे महावितरण कंपनीने स्पष्टपणे सांगितलेले आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले आहे की, वीज निर्मितीची वाढ झालीतरी 4,138 मेगावॅट विजेचा तुटवडा कायम राहून भारनियमनमुक्त महाराष्ट्र राज्य हे आणखी काही वर्षे स्वप्नच ठरणार आहे, असे वीज वितरण कंपनीने सांगितले आहे. त्यांनी जे सांगितले त्याची आकडेवारीही माझ्याजवळ आहे. सन 2007-2008 या वर्षात 4,359 मेगावॅट विजेचा तुटवडा राहणार असून 8 तासांचे भारनियमन राहणार आहे. सन 2008-2009 मध्ये 4,204 मेगावॅट विजेचा तुटवडा राहणार असून 6 तासांचे भारनियमन राहणार आहे. सन 2009-2010 मध्ये 4,138 मेगावॅट विजेचा तुटवडा राहणार असून 5 तासांचे भारनियमन राहणार आहे. अशाप्रकारची भरपूर आकडेवारी माझ्याकडे आहे, त्यामध्ये मी जात नाही. परंतु याठिकाणी ज्याप्रमाणे हे सरकार महाराष्ट्रातील शेतकऱ्याला आणि महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला छळत आहे, ते योग्य नाही. माझे मित्र, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये भारनियमन असूनही आत्ताच ज्या पंचायत समित्यांच्या व जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या त्यामध्ये जनतेने आम्हाला निवडून दिलेले आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

विरोधी पक्षनेता पुढे सुरु.....

जनतेने मते दिली म्हणून त्यांचे तुम्ही अभिनंदन केले, आणखी पाच तास भारनियमन वाढवा, आमचे काही नुकसान नाही. परंतु, याचा परिणाम काय होतो आहे, याचीही नोंद घ्या. डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये मी सांगितले होते की, आतापर्यन्त या महाराष्ट्रातील शेतक-यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्या, आता यापुढे महाराष्ट्रातील शेतकरी विजेच्या भारनियमनामुळे आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतील आणि पंधरा दिवसांपूर्वीच अमरावती जिल्हयात अंजनगांव तालुक्यातील एका शेतक-याने आत्महत्या केली. हा गरीब शेतकरी होता, त्याच्याकडे फक्त पाच एकर शेती होती. या शेतक-याने कर्ज काढून विहीर खोदली, कर्ज काढून विहिरीवर पंप बसविला, वीज कनेक्शन घेतले. ज्या डी.पी.वरुन शेतक-याला कनेक्शन दिले होते तो डी.पी. 50 कनेक्शन्स क्षमतेचा होता, मात्र त्यावर 100 कनेक्शन्स देण्यात आली होती. या शेतक-याने पाच एकर शेतीमध्ये गहू लावला, पण पाणी देण्यासाठी पंप सुरु होत नव्हता, कारण विजेचा दाब कमी होता. या प्रयत्नामध्ये या शेतक-याच्या पंपाची मोटार दोन वेळा जळली. शेतातील गहू वर आला होता मात्र पाणी मिळत नसल्यामुळे हा गहू जळून जात होता म्हणून हा शेतकरी तेथील वीज मंडळाच्या कार्यालयात गेला, अधिका-यांना डी.पी.बाबतची तक्रार केली, कनेक्शन्स कमी करा किंवा क्षमता वाढवा म्हणून विनंती केली. कर्ज काढून बियाणे घेतलेले आहे, विहिर खोदली आहे, गहू पेरला आहे, खत घेतले आहे, जर गहू आला नाही तर कर्जापायी जीव देण्याची पाळी येईल, असे सांगण्याचाही त्याने वारंवार प्रयत्न केला. परंतु, त्या अधिका-यांनी या शेतक-याची समजूत काढली नाही तर त्याला कार्यालयाच्या बाहेर ढकलून दिले आणि आताच जीव देऊन टाक म्हणून त्याला सांगितले गेले. तो शेतकरी स्वाभिमानी होता, त्याने कृषि केंद्रावर जाऊन जंतुनाशकाची बाटली घेतली आणि कार्यालयात येऊन अधिका-यांना दाखवली, तक्रारीची दखल घ्या अन्यथा आत्महत्या करतो, असेही सांगितले. परंतु, अधिका-यांनी ऐकले नाही म्हणून त्याने आत्महत्या केली. सभापती महोदय, या शेतक-याच्या आत्महत्येला कोण जबाबदार आहे ? शासन केवळ समाजवादाच्या गप्पा मारते. आज ग्रामीण भागात शेतक-यांनी गहू, कांदा, ऊस लावलेला आहे. मी जळगाव जिल्हयाच्या दौ-यावर गेलो होतो, त्यावेळी मला तेथील शेतकरी भेटले. त्यांनी मला सांगितले की, साहेब आपण कापूस उत्पादक आहात, आम्ही केळी उत्पादक आहोत. परंतु,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विरोधी पक्षनेता पुढे सुरु.....

या विजेमुळे आत्महत्या करावी लागेल, अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आहे. आम्हाला शासनाने पुढचे स्वप्न दाखवू नये, दोन-तीन वर्षांनी काय होणार, सन 2010, 2012 मध्ये काय होणार, हे सांगू नये. आज महाराष्ट्राला तुम्ही वीज देऊ शकता काय ? हे आम्हाला सांगा. दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आणि अभ्यासासाठी वीज नाही, अशी स्थिती या महाराष्ट्रामध्ये आहे. विद्यार्थी देखील विजेमुळे आत्महत्या करु लागले आहेत. केवळ दोन मार्कस् विजेमुळे कमी पडले अशी चिठ्ठी लिहून एका विद्यार्थीनीने आत्महत्या केली. हे शासन आणखी किती पाप आपल्या डोक्यावर घेणार आहे ? अशा परिस्थितीत आम्ही कशाबद्दल अभिनंदन करायचे ? आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या कुटुंबाची अवस्था, हे शासन पाहणार आहे की नाही ? मी या अभिनंदनाच्या प्रस्तावाला कधीच समर्थन देऊ शकणार नाही. अशा पद्धतीने महाराष्ट्रातील जनतेचा विश्वासघात करणारे हे अभिभाषण आहे. शेतक-याला यामधून काहीही मिळणार नाही म्हणून मी या अभिनंदन प्रस्तावाशी कधीही सहमत होणार नाही, पाठिंबा देऊ शकणार नाही. या प्रस्तावाला विरोध करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना शासकीय मदत म्हणून 491 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले, तर दळणवळण व अन्य पायाभूत सुविधांच्या पुनर्निर्माणासाठी 113 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी बोलल्या. मागच्या अधिवेशनामध्ये मी रायगड जिल्हयातील पुरग्रस्तांना वाटप करण्यात आलेल्या निधीच्या संदर्भात बोललो. पेण तालुक्यामध्ये 9 कोटी रुपयांचे वाटप झालेले आहे. माननीय मंत्री महोदय श्री.रविशेठ पाटील यांच्या गावामध्ये 3 कोटी रुपयांचे वाटप झालेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी याची चौकशी करण्यात येईल असे सांगितले होते. परंतु अजूनपर्यंत एकही पेपर हललेला नाही. पूरग्रस्तांचे 9 कोटी रुपये खाण्याचे काम तहसीलदार आणि तहसील कार्यालयातील कर्मचा-यांनी केलेले आहे. मला खेद वाटतो की, याचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोठेही उल्लेख नाही. रायगड जिल्हयातील महाड तालुक्यामध्ये ख-या अर्थाने नैसर्गिक आपत्ती आली होती. महाड तालुक्यातील पूरग्रस्तांचे पुनर्वसन झालेले आहे. परंतु पूनर्वसनाचा ताबा तेथील पूरग्रस्तांना आणि धरण ग्रस्तांना न देता, तेथे अतिक्रमण झालेले आहे. आमदार म्हणून मी 3 पत्रे दिली तरी देखील अतिक्रमण हटविण्यात आले नाही.

सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी निवडणुकीचा उल्लेख केला. मी ज्यावेळी निवडणुकीच्या प्रचारासाठी फिरत होतो त्यावेळी लोकांना सांगत होतो की, काँग्रेसवाले निवडून आले तर असे सांगतील की, जनतेला भारनियमन मान्य आहे. काँग्रेसवाले असे म्हणतील की, शेतक-यांच्या ज्या आत्महत्या होत आहेत त्या जनतेला मान्य आहेत. काँग्रेसवाल्यांना मत देऊ नका असे मी निवडणूक प्रचारामध्ये सांगत होतो. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी सांगतात की, महाराष्ट्र राज्यामध्ये लोडशेडींग असले तरी जनतेने आम्हाला निवडून दिले आहे. मागच्या 50 वर्षापासून राज्यामध्ये तुमचेच सरकार आहे. तुमच्या सरकारने वीज निर्मितीसाठी कोणतेही नियोजन केले नाही. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेब, मागच्या 50 वर्षापासून हे राज्य कोण चालवित आहे ? कोठे गेले तुमचे नियोजन ? राज्यामध्ये फक्त 5 वर्षे युतीचे सरकार होते. तुम्ही नियोजनाच्या गोष्टी करता. परंतु तुमचे नियोजन चुकलेले आहे. तुमच्या सरकारने वीज निर्मिती केली नाही. राज्यामध्ये होणा-या भारनियमनामुळे गरीब शेतकरी, उद्योगपती भरडला जात आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

पिठाची गिरणी चालविणारा भरडला जात आहे. पिठाची गिरणी चालविणारा बँकेच्या कर्जाचे हप्ते भरु शकत नाही. तो बँकेचे रिपेमेंट करु शकत नाही. हे सर्व बघून आमच्या डोळयातून पाणी येते. दोन तास कारखाने चालू शकत नाहीत. तुम्ही कोणत्या नियोजनाच्या गोष्टी करीत आहात ? माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये सांगण्यात आले आहे की, आम्ही मतदारांना ओळख पत्र देऊ. मतदारांना ओळख पत्रांचे वाटप करण्यावर करोडो रुपये खर्च झालेले आहेत. रायगड जिल्हयातील मोरबा मतदारसंघातील 196 लोक परदेशामध्ये राहतात. परंतु निवडणुकीमध्ये त्यांचे नावे मतदान झालेले आहे. 50 लोक मयत झालेले आहेत. त्यांचे नावे सुध्दा मतदान झालेले आहे. मी यासंदर्भात निवडणूक अधिका-यांकडे जाणार आहे. माझी भगिनी निवडणुकीसाठी उभी होती ती फक्त 150 मतांनी पडली. परदेशामध्ये राहणा-या लोकांजवळ पासपोर्ट असतो. ते कोणत्या विमानाने आले आणि मतदान करुन गेले याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. माझी अशी विनंती आहे की, प्रत्येक मतदाराकडे ओळखपत्र असले पाहिजे. मतदारांना ओळखपत्र देण्यासंदर्भात नेहमी घोषणा केल्या जातात. परंतु त्यासाठी निधीची तरतूद केली जात नाही. मतदारांना ओळखपत्र देण्यासाठी मोठया प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर कु.खर्चे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

सभापती महोदय, केंद्रसरकारच्या बजेटमध्ये शिक्षणासाठीची तरतूद पाच हजार कोटी रुपयांची आहे, अशी पंतप्रधानांनी घोषणा केली. प्राथमिक आणि माध्यमिक या शाळांना पूर्ण अनुदान तुकडयांमध्ये वाटावे असे सांगण्यात आले होते परंतु सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी त्याचे काय केले हे मला माहित नाही. 40 विद्यार्थ्यांची एक तुकडी होती. आता सध्या निदान प्राथमिक शाळांमध्ये 20 विद्यार्थ्यांची एक तुकडी करण्यात येणार आहे अशी माहिती केंद्रसरकारकडून प्राप्त झालेली आहे. गेल्या वर्षी या ठिकाणी या अभिभाषणाच्या निमित्ताने मी बोलत असतांना टप्प्याटप्प्याने आपण अनुदान देऊ असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. सभापती महोदय, विनाअनुदानित तत्वाचे धोरण आपण बदलले पाहिजे, असे आश्वासन राज्यपालांनी अभिभाषणाच्या वेळी गेल्यावर्षी दिले होते. परंतु आताच्या त्यांच्या अभिभाषणामध्ये त्याचा काहीही कुठेही उल्लेख दिसून येत नाही. या ठिकाणी केंद्रसरकार किती पैसे देणार आहे आणि राज्यसरकारची मॅचिंग ग्रँट प्राथमिक शिक्षणासाठी किती आहे ? याचा उल्लेखही झाला पाहिजे. शासनाने त्याच्यामध्ये ठामपणे याबद्दल सांगितले पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी बोलल्या की, हळूहळू मुरुड तालुका आपल्याकडून गेलेला आहे, त्या मुंबईला आल्या, मुरुड तालुका पूर्वी सन्माननीय मुख्यमंत्री साहेबांचा होता परंतु आता तो शेतकरी कामगार पक्षाने आपला करुन टाकला आहे, तेथे जिल्हापरिषदेच्या निवडणुकीतही गेली काही वर्ष शेतकरी कामगार पक्षच निवडून येत आहे.

सभापती महोदय, येथे किल्ल्याच्या विकासाची मागणी करण्यात आलेली आहे, त्याला माझा पाठिंबा आहे. कोकणामध्ये पर्यटनाकरिता पोषक वातावरण आहे, गेल्यावर्षी मी उदयपूरला गेलो होतो, उदयपूरला त्या ठिकाणी किल्ला आणि बाकीच्या ज्या पुराण वास्तू आहेत त्याचे बी.ओ.टी.तत्वावर खाजगीकरण केलेले आहे. पुनर्वसन करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाकडे जर पैसा नसेल तर आमचा जो कुलाबा किल्ला आहे, राजापूरचा किल्ला आहे, सिंधुदूर्गचा किल्ला आहे,मालवणचा किल्ला आहे, या सर्व किल्ल्यांचे बी.ओ.टी.तत्वावर खाजगीकरण व्हावयास हवे, असे मला वाटते. पर्यटनाच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करण्याबाबतचा एकही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिसून येत नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी मच्छिमार समाजाच्या समस्येच्या बाबतीत कोणत्याच प्रकारचा

3J-2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिसून येत नाही. राज्यसरकारने गेल्यावर्षी जाहीर केलेले धोरणच या वर्षी पुन्हा जाहीर केलेले आहे. सभापती महोदय, मी वयाच्या 18 व्या वर्षापासून राजकारणात आहे, बेळगाव - कारवारसह महाराष्ट्र - कर्नाटक सीमाप्रश्नाच्या चळवळीमधून तयार झालेला मी कार्यकर्ता आहे, आता आमची मुलेही 25 वर्षाची झाली, तरीही सीमाप्रश्न अजूनही तसाच आहे. सभापती महोदय, हे शासन सीमाभागातील लोकांची चेष्टा करीत आहे, असे मला वाटते, फक्त एक सदर भरावयाचे म्हणून सीमाप्रश्नाचा विचार केला जातो, उपाय काही केला जात नाही, सीमाप्रश्न सोडविण्याकरिता प्रयत्नही केले जात नाही. सीमाभागातील मराठी माणूस महाराष्ट्रावर नाराज आहे. त्या दृष्टीकोनातून सभापती महोदय, या अभिभाषणाबाबत मी खेद व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी माननीय राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानणारा प्रस्ताव येथे मांडला आहे आणि त्यांना अनुमोदन देताना सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी भाष्य करताना जे काही म्हटले आहे ते अत्यंत वेदनादायी असल्याने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे मी समर्थन करू शकत नाही. खरे म्हणजे माननीय राज्यपालांचे अभिभाषण झिडकारताना देखील ते अत्यंत सन्मानाने, आदरपूर्वक आणि विनयाने झिडकारावे लागते. परंतु सरकारच्या वतीने अभिनंदन प्रस्तावाला समर्थन देताना सन्माननीय श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी या भाषणाची मूळ आवृत्तीच आमच्यापुढे सादर करताना सांगितले की, हे राज्यपालांचे अभिभाषण असले तरी ते सरकारचे आहे आणि राज्यपाल महोदय हे यासाठी नाममात्र असतात आणि त्यांच्या मुखातून सरकारने आपले धोरण, आपल्या भूमिका वदवून घेतलेल्या आहेत. अर्थात हे सारे घटनादत्त आहे. परंतु आपण याचा खुलासा केला आहे आणि तसे करताना आपल्याच पाठीवर थाप मारून म्हटले आहे की, हे सरकार किती चांगले आहे. पण अशा प्रकारे सरकार माननीय राज्यपालांच्या मुखातून असत्य वदवून घेत असेल तर ते अत्यंत दुर्दैवी आणि राज्यपाल पदाचा अवमान करणारे आहे, त्यामुळे सरकारने ते करू नये तरीही या माध्यमातून ते सरकारने केलेले आहे हेच येथे सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, राज्यात, विशेषतः मुंबईत झालेल्या अतिवृष्टीच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या मुखातून वदवण्यात आलेली जी परिस्थिती आहे त्यासंबंधात येथे इतक्या वेळा आतापर्यंत पंचनामा झालेला आहे की, ते सारे अगोदर माननीय राज्यपालांना इंग्रजीतून लिहून पाठविले असते तर त्यांनी आपण हे जे काही भाषण करून दिले आहे त्यावर काट मारून आपल्याकडे परत पाठविले असते. त्या काळामध्ये मुंबईत जे धान्य वाटप झाले ते करताना आपल्या लोकांनी, आपल्या अधिकाऱ्यांनी, राज्यमंत्र्यांनी देखील त्याचे वाटप कसे केले या साऱ्याचा पंचनामा यापूर्वीच येथे झालेला आहे. तेव्हा माननीय राज्यपालांच्या मुखातून अशी अभद्र वाणी कशासाठी आपण वदविली ? मुडद्याच्या टाळूवरील लोणी देखील घेण्याचा त्यावेळी कसा प्रयत्न केला गेला त्यावर या सभागृहामध्ये यापूर्वीच दोन दोन तास चर्चा झालेली आहे. तरीही त्याबाबतीत जे येथे म्हटलेले आहे त्याबाबतीत मी एवढेच म्हणेन की, राज्यपालांच्या प्रतिष्ठेला शोभेल अशा काही गोष्टी सरकारने सांगितल्या पाहिजेत आणि त्यातून महाराष्ट्राला कळले पाहिजे की, आम्ही म्हणजे

..... 3 के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सरकारने काय केले आणि पुढे काय करणार आहे. परंतु आपल्या लांड्या-लबाड्यादेखील राज्यपालांकडून मांडल्या गेल्या आहेत हे मी येथे अत्यंत खेदपूर्वक सांगू इच्छितो. सभापती महोदय, या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 5, 6, 7, 8, 9 आणि 10 यामध्ये चक्रीवादळ, प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन, शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या आणि त्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने जाहीर केलेले पॅकेज इत्यादी बाबत सांगितले आहे. सभापती महोदय, मुंबईमध्ये मुंबईच्या डीपीडीसीच्या झालेल्या बैठकीला मी देखील उपस्थित होतो. पण त्यासंबंधात यात काय म्हटले आहे ? '.... जागतिक बँकेने अर्थसहाय्य दिलेल्या राष्ट्रीय चक्रीवादळ व्यवस्थापन कार्यक्रमास माझे शासन आवश्यक ते सहकार्य करीत आहे. या कार्यक्रमाचा राज्यातील सागरी जिल्ह्यांना फायदा होणार आहे. ' पण हे केव्हा होणार आहे तर चक्रीवादळ येईल तेव्हा मुंबई सह कोकणातील 6 जिल्ह्यांचा, ज्यांना सागरी जिल्हे असेही आपण म्हणतो, त्यांचा फायदा होणार आहे. पण हे सारे त्सुनामी आल्यानंतर. मुंबईमध्ये, कोकणामध्ये त्सुनामी आली तर काय नियोजन करायचे याबाबत चर्चा झाली होती आणि त्यानंतर शासनाने आपले धोरणही जाहीर केले. मुंबईच्या डीपीडीसीमध्ये मुंबईत त्सुनामी आली तर त्याबाबतीत काय खबरदारी घ्यायची हे सांगताना मुंबईच्या पालक मंत्र्यांनी मुंबईत सागरी किनाऱ्यावर भिंत बांधणार म्हणून सांगितले होते. ही भिंत कुलाब्यापासून चालू करून माहीम पर्यंत नेणार असेही सांगितले होते. त्यावर त्या बैठकीत खूप चर्चा झाली होती. पण आजवर ती भिंतच काय पण त्याची एक वीट देखील लागलेली नाही. त्या बैठकीमध्ये शासनाचे अधिकारी तसेच मुंबईचे पालक मंत्री खूप काही सांगत होते आणि आम्ही ते एक चांगले काम होणार म्हणून सारे ऐकत हातो. पण एक वीट देखील येथे हलली नाही. म्हणजे किती असत्य आपण राज्यपालांच्या मुखातून वदवित आहात ते पहा. त्यानंतर परिच्छेद क्र. 6 मध्ये राज्यपालांनी म्हटले आहे की, 'राज्याच्या काही भागांमध्ये होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही माझ्या शासनासाठी अतिशय चिंतेची बाब आहे. त्या अनुषंगाने माननीय पंतप्रधान यांनी तसेच माझ्या शासनाने बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या सहा जिल्ह्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर केले आहे. त्या पॅकेजमध्ये सिंचन सुविधा सुधारणे, चांगल्या प्रतीचे बी-बियाणे पुरविणे व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे या बाबी अंतर्भूत आहेत.' ..

(यानंतर श्री. गागरे .....3एल 1 ..

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

श्री. दिवाकर रावते...

ही शासनाने दिलेली आकडेवारी आहे. एप्रिलपर्यंत 311 इतकी संख्या होती. माननीय राज्यपालांच्या मुखामधून आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण 66 टक्के व त्यानंतर 28 टक्के इतके कमी झाले असल्याचे सांगण्यात आले आहे. आपल्याकडील आकडेवारीमध्ये काही फेरफार झाला असेल, किंवा मुद्रण दोष असेल. कारण प्रिंटींग मिस्टेक करणे हा कॉग्रेसचा पिढीजात धंदा आहे, असे त्यांच्या प्रदेशाध्यक्षांनी जाहीर केले आहे. प्रिटींग मिस्टेकच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्री आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करतील. महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर जाहीर झालेली ही आकडेवारी आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या माध्यमातून आपण ही आकडेवारी याठिकाणी मांडीत असला तरी तिरडीवरील फुले वेचण्यामध्ये आपण वस्ताद आहात म्हणून आम्हाला दु:ख होते.

सभापती महोदय, मी सदनाला सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांचे सदनामध्ये आगमन झाले त्यावेळी मी घडयाळाकडे पहात होतो. ते नेहमीप्रमाणे एक मिनिट उशिराने आले. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे विधानसभेचे अध्यक्ष होते, त्यामुळे त्यांना प्रोटोकॉल माहीत आहे. त्यावेळी एक मिनिट अगोदर माननीय राज्यपाल येत. त्यांच्या आगमनाच्या विषयावर बोलण्याचा माझा विषय नाही. सभापती महोदय, माननीय राज्यपाल हे इतर राज्यामधून या राज्यामध्ये नेमण्यात येतात. ते मराठी भाषिक असले पाहिजेत असे आम्ही म्हणत नाही. माननीय राज्यपालांनी अभिभाषण करीत असतांना असा एक प्रघात आहे की, पहिले वाक्य ते मराठीमध्ये बोलतात आणि त्यानंतर पुढील वाक्य "He respects mother language, He respects State language" अशाप्रकारे इंग्रजीमध्ये बोलतात. परंतु याठिकाणी त्यांनी भाषणाची सुरुवात इंग्रजीमध्ये केली. माननीय राज्यपालांचा निषेध करता येत नाही हे आपले दु:ख आहे. मराठी भाषेचा अनादर करणे हा या राज्याचा अवमान आहे. ज्यावेळी मराठी भाषेवरील प्रस्ताव चर्चेला येईल त्यावेळी या विषयावर आम्ही बोलू, अगदी कै. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या काळापासून बोलू. तो तुमच्या आमच्या सर्वांच्या अस्मितेचा प्रश्न आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातील क्रमांक 13 वरील परिच्छेद वाचून दाखविला. त्यामध्ये म्हटले आहे की, "माझ्या शासनाने या 6 जिल्हयांत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी नागपूर संत्री तंत्रज्ञान अभियान सुरु केले आहे. या अभियानामुळे ठिबक सिंचन व सेंद्रिय शेती यांच्या माध्यमातून उत्पादनात तसेच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

लागवडीखालील क्षेत्रात वाढ होणार आहे". हे ठिबक सिंचनाचे अभियान सुरु होते त्यावेळी देशाच्या विविध भागामध्ये अतिवृष्टी झाली. आणि महाराष्ट्रातील वरुड आणि मोर्शी या जिल्हयामध्ये नेमकी तशी परिस्थिती निर्माण झाली. त्यामध्ये संत्रा पिकाचा जो बहर आला होता, त्याचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले, संपूर्ण संत्र्याचे पीक उद्ध्वस्त झाले.या सरकारच्या पापाचे घडे कसे भरत आहेत ते पहा. हे सरकार याठिकाणी जे सांगते त्याच्याविरुध्द प्रत्येक वेळी निसर्ग त्यांना शिक्षा करतो. प्रचंड पावसामुळे संत्रा आणि गव्हाचे पिक उद्ध्वस्त झाले याबाबत माननीय मंत्री प्रा. वसंतराव पुर्के साहेबांना माहीत आहे. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कापसाच्या पिकाला 1500 रुपये अनुदान देण्यासंबंधी मुद्दा मांडला. माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आपण सरकारचे वकील असल्यामुळे आपण सरकारचे कौतुक करणे आम्ही समजू शकतो. आपण शेतकऱ्याला 1650 चा भाव जाहीर केला त्यावेळी शेतकऱ्यांची मागणी होती की आम्हाला किमान 500 रुपये अग्रीम द्यावे. त्यावेळी आपण आश्वासन दिले परंतु ते पॅकेजमध्ये कन्वर्ट करीत असतांना मागील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी शेतकऱ्यांसाठी खास पॅकेज जाहीर केले. आणि त्यामध्ये हेक्टरी 1560 रुपये भाव देऊन ढोल वाजविण्यात आला. शेतकऱ्याच्या पदरामध्ये 110 आणि 115 रुपये टाकून तुम्हाला समाधान मिळाले परंतु शेतकरी समाधानी नाही. त्यावेळी बाजारामध्ये 2600 रुपये भाव होता. सभापती महोदय, मी त्यावेळी विदर्भामध्ये सांत्वन दिंडी काढली, ती माझी व्यथा असल्यामुळे तो राजकारणाचा विषय करीत नाही. परंतु शेतकऱ्यांना 3 टक्के दराने कर्ज देण्याचा प्रश्न सदनामध्ये लावून धरला. शेतकरी अडचणीमध्ये असल्यामुळे त्याला आपले कर्ज फेडावयाचे असेल तर त्याला काहीतरी मिळाले पाहिजे. म्हणून आपण 3 टक्क्याने कर्ज देण्याचे मान्य केले. त्यावेळी आपण जून महिन्यापर्यंत 751 कोटी रुपये अधिक व्याज देऊ असे सांगितले. आपण त्यांना तीन हप्त्यामध्ये रक्कम दिली ती त्यांना मिळाली.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

परंतु येथे साडे तेवीस कोटी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. यामध्ये पणन मंडळाचे भागभांडवल होते. त्यामधील साडे तेवीस कोटी रुपयाचा भ्रष्टाचार अधिकाऱ्यांनी केला. त्या शेतकऱ्यांचे पत्ते मिळत नाहीत असे सांगितले गेले आणि त्यांच्या नावाने दहा-दहा लाखाचे चेक काढले. हा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आला होता. त्याला उत्तर देताना असे काही घडलेले नाही, याबाबतचा शोध घेत आहोत, असे मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले. त्यानंतर 11 लोकांवर केस घालण्यात आली. मंत्री भ्रष्टाचार करतात, आता अधिकारीही भ्रष्टाचार करु लागले आहेत. राजा तशी प्रजा,असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. या साडे तेवीस कोटी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे या संबंधाने खुलासा केव्हा करणार आहात ? ते सांगावे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संबंधाने काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. कापूस उत्पादक शेतकऱ्यांबरोबर आता ऊस उत्पादक शेतकरीही आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संबंधात या ठिकाणी एक शब्दही नाही. माननीय शरद पवार साहेब महाराष्ट्रामध्ये येतात तेव्हा ते सार्वजनिक सभा घेतात. त्यामध्ये ते ऊस आणि साखरेबाबत बोलतात परंतु ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्यादृष्टीने काही बोलत नाहीत. आज मराठवाड्यातील लाखो टन ऊस गाळपाअभावी पडून आहे. ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल झालेला आहे. त्यापैकी एका शेतकऱ्यांने निवडणुकीच्याच कालावधीमध्ये आत्महत्या केलेली आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी मला जेव्हा केव्हा वेळ मिळेल तेव्हा त्यांना भेटण्यासाठी जात असतो. त्याप्रमाणे श्री.राजाभाऊ बापूराव बोबडे, रा.चाटे पिंपळगाव, ता.पाथरी, जिल्हा परभणी या ऊस उत्पादक शेतकऱ्याने स्वत:ला जाळून घेऊन आत्महत्या केली. याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना माहिती आहे. त्यांच्या पत्नीला आणि भावाला भेटण्यासाठी गेलो होतो. त्या शेतकऱ्याची पाच एकर शेती आहे. त्यापैकी साडे तीन एकरवर त्यांनी ऊस लावलेला आहे. त्या शेतकऱ्याच्या घरावर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा होता. त्याची पत्नी सरपंच होती. म्हणजे ओघानेच पती सरपंच होता. त्यानी आपला ऊस साखरकारखान्याला घालण्यासाठी सगळीकडे जाऊन प्रयत्न केले परंतु त्याचा ऊस कोणी गाळपासाठी घेतला नाही. सन्माननीय राज्यमंत्री श्री.दांडेगावकर हे जेट विमानाच्या वेगाने निर्णय घेत असतात. एक राष्ट्रवादीच्या ताब्यात असलेला दुधना सहकारी साखर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

कारखाना सन्माननीय श्री.मुंडे साहेबांच्या वैजनाथ सहकारी साखर कारखान्याने चालविण्यास घेतला त्यानंतर कारखान्याला 6 कोटीचा नफा झाला. परंतु त्या भागामध्ये भाजप-शिवसेना पक्ष वाढू नये म्हणून तो कारखाना बंद पाडण्यात आला. श्री.बाबा जानी आणि श्री.वरपुडकर यांच्या भांडणामध्ये कारखाना बंद पडला. याचीच परिणती म्हणून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्याला शेवटी जाळून घ्यावे लागले. त्याच्यावर 50 हजाराचे कर्ज होते.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

या ऊस उत्पादक शेतकऱ्यांबद्दल कोणती आशा दाखवित आहोत याबद्दल या अभिभाषणामध्ये एकही शब्द लिहिलेला नाही. महाराष्ट्रातील दहा टक्के कारखाने तसेच पडून आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी जे म्हणाले ते मान्य आहे. आपण सभागृहात बोलल्यानंतर ते मान्य करावे लागते. सन 2006-07 या वर्षात शेतकऱ्यांना 3 लाख रुपये इतक्या रकमेपर्यंतचे अल्पमुदतीचे पीक कर्ज 6 टक्के या अल्प व्याजदराने उपलब्ध होईल याची माझ्या शासनाने दक्षता घेतली आहे असा उल्लेख या अभिभाषणामध्ये केलेला आहे. हे कर्ज अजून वाटलेले नाही. किती लोकांना 6 टक्के व्याजाने कर्ज दिले याची यादी शासनाने सदनाला सादर करावी. पश्चिम विदर्भामध्ये आत्महत्येच्या बेल्टमध्ये 33 लाख शेतकरी खातेधारक व्हावयास पाहिजे होते. आपण 3 लाख लोकांना कर्ज दिले. 30 लाख लोकांना अजूनही कर्ज वाटप केल्याचे दिसले नाही. 6 टक्के दराने किती लोकांना कर्ज वाटले ते शासनाने सांगावे. याबाबत खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. नुसते शासनाचे अभिनंदन करुन चालणार नाही. शेतकऱ्यांच्या संदर्भामध्ये सांगताना दु:ख होते. शासनाच्या धोरणाप्रमाणे शेतकरी कर्जबाजारी असेल तर त्यालाच आत्महत्येमध्ये मोजतात. त्याव्यतिरिक्त मी शेकडो कुटुंबांना जाऊन भेटी दिलेल्या आहेत. शेतमजुराच्या आत्महत्येला कवडीमोलाची किंमत नाही. तो माणूस नाही काय ? शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात त्या आत्महत्येच्या संदर्भात त्यांना 1 लाख रुपये देतो. परंतु शेतमजुरांच्या बाबतीत काय करणार ? 33 टक्के शेतकरी, 36 ते 40 टक्के शेतमजूर आणि बाकीचे इतर व्यावसायिक अशी ग्रामीण भागाची बांधणी आहे. 33 टक्केतील जे शेतकरी उद्ध्वस्त होतात त्यांच्या बाबतीत बोलत असताना बाकीच्या शेतमजुरांच्या बाबतीत काय करणार आहात ? माझी शासनाला विनंती आहे. ज्यांच्याकडे काहीच नाही, ज्यांच्याकडे शेतीचा तुकडा देखील नाही त्याला किमान पाच-पंचवीस हजार, पन्नास हजार रुपये मदत करा. त्यांच्या उद्ध्वस्त होणाऱ्या लेकराबाळांना जगवा. सभापती महोदय, मी किती उदाहरणे देऊ ? हे सांगत असताना मी व्यथित होतो. हे शासन शेतकऱ्यांचाच विचार करीत नाही तर शेतमजुरांचा विचार कोठून करणार ? अशी परिस्थिती आहे. मी शासनाला नम्रपणे सांगत आहे. हा राजकारणाचा विषय होऊ शकत नाही. या सदनात जनतेच्या व्यथा सांगितल्या. माझी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

शासनाला नम्रपणे हात जोडून विनंती आहे की, हे सगळे थांबवावे. गेलेल्या माणसाबद्दल आपण वाईट बोलत नाही. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांना सांगू इच्छितो की, मला वाईट वाटते. एवढे मोठे शासन आहे. 72 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आहे. 3 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. 3 हजार शेतकऱ्यांना 1-1 लाख रुपये दिले तर किती रक्कम होईल ? एकूण 30 कोटी रुपये होतील. ही खूप मोठी रक्कम नाही. शासनाने किती कीस काढावयाचा ? मला या राज्याच्या माझ्या मुख्यमंत्र्यांबद्दल लाज वाटते. निवडणुकीच्या काळात मुख्यमंत्री बेदरकारपणे म्हणतात की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या मानसिक विकृतीतून होत आहेत. शेतकऱ्यांची एवढी निर्भत्सना करणार असतील तर त्यांच्याकडे आमचे राज्यकर्ते म्हणून कसे पाहावयाचे ? आमच्याकडे भारनियमन आहे. भारनियमाचा कोणताही परिणाम निवडणुकीवर होणार नाही असे त्यांचे भाषण आहे. आम्ही काय समजावयाचे ? जनता राज्यकर्त्यांकडे माझा पोशिंदा म्हणून आशेने पाहात असते. तुमच्याकडून शेतकऱ्यांची अशी निर्भत्सना ऐकावयाची काय ? श्री. नंदनाल यांनी फक्त तुम्ही उडविलेल्या हेलिकॉप्टरचे बिल लावले त्याची किंमत मोजा. या ठिकाणी कोणत्या पध्दतीने बोलावयाचे ? दारु पिऊन मेला, बायकोच्या भांडणाने मेला अशी कारणे सांगितली जातात. दोन प्रकरणे सांगून पुन्हा ते रिपीट करावयाचे काय ? तुमच्या अधिकाऱ्यांनी हायकोर्टामध्ये ॲफिडेव्हिट केले. कोर्टाने विचारले की, 70 वर्षाच्या शेतकऱ्याने आत्महत्या का केली ? यांनी सांगितले की, पत्नीचा वियोग सहन न झाल्यामुळे आत्महत्या केली. हायकोर्टाने सर्टिफिकेट मागितले. 15 वर्षापूर्वी त्याची पत्नी मयत झाली होती. दुसऱ्या एका 67 वर्षाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली त्याबाबत कोर्टाने विचारले. यांनी सांगितले की, 50-60 वर्षे वयाच्या बाईवर त्याचें प्रेम होते आणि प्रेमभंग झाल्यामुळे त्याने आत्महत्या केली. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची एवढी निर्भत्सना केली जाते. शेतकरी मेल्यानंतर तुम्ही त्याच्या प्रेताला लाथा घालता. ही तुमची भावना आहे काय ? या जनतेकडे पाहण्याची ही तुमची निती आहे काय ?

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

ही सरकारची जाणीव आहे काय ? सरकारने शेतक-यांना वेदना देण्याचे काम केलेले आहे. या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी एक मिनिटसुध्दा मुख्यमंत्रीपदावर राहाता कामा नये असे माझे प्रामाणिक मत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतक-यांनी मनोविकृतीतून आत्महत्या केल्याचे सांगितले हे धादांत चुकीचे आहे. प्रेतावरची फुले वेचणा-या या सरकार बद्दल काय बोलावे हेच कळत नाही. सभापती महोदय, या ठिकाणी संताप व्यक्त करण्याला मर्यादा पडतात. त्यामुळे मानसिकदृष्ट्या मी या विषयी बोलण्याच्या मन:स्थितीत नाही.

सभापती महोदय, 2006-07 या वर्षामध्ये मुंबई विद्यापीठास दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांसाठी प्रशिक्षण अकादमी स्थापन करण्याकरिता मुंबई विद्यापीठाला 10 कोटी रुपये इतके अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. ही अभिनंदनीय बाब आहे.

गरीब रुग्णांना मदत व्हावी म्हणून जीवनदायी आरोग्य योजनेची अनुदान मर्यादा दुपटीहून अधिक म्हणजे 1 लाख 50 हजार रुपये इतकी केलेली आहे. या योजनेमध्ये कर्करोगाच्या उपचाराचाही समावेश करण्यात आलेला आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असा उल्लेख केलेला आहे की, " महाराष्ट्र राज्याने भारतातील व विदेशी गुंतवणूकदारांमध्ये देशात प्रथम पसंतीचे राज्य म्हणून आपला लौकिक कायम राखला आहे. औद्योगिक वाढीचा दर सरासरी 9 टक्के इतका आहे. राष्ट्रीय स्थूल उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा वाटा 13.1 टक्के इतका आहे. या गुंतवणुकीद्वारे सुमारे 23 लाख व्यक्तींसाठी रोजगार निर्माण होईल." पुढे असे म्हटलेले आहे की, "माझ्या शासनाने जून, 2005मध्ये जाहीर केलेले महाप्रकल्प धोरण यशस्वी ठरले आहे. केवळ 18 महिन्यांच्या अल्प कालावधीत 38 महाप्रकल्पांत 43 हजार 200 कोटी रुपये एवढ्या गुंतवणुकीचे आश्वासन मिळाले आहे. यामध्ये महिंद्र रेनॉल्ट, मायको बॉश, बोईंग, जनरल मोटर्स, डेमलर क्रायस्लर, बजाज, टाटा-फियाट आणि फोक्सवॅगन यासारख्या जगप्रसिध्द प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पासंमुळे लाखो व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध होईल." सभापती महोदय, मला हे सांगावयाचे आहे की, हे प्रकल्प येण्याने या ठिकाणी रोजगार उपलब्ध होणार आहे काय ? संभाजीनगर या ठिकाणी स्कोडा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

मोटारींचा प्रकल्प उभारण्यात आला. विधानसभेतील सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे म्हणतात की, हा प्रकल्प मी आणला, खासदार श्री. चंद्रकांत खैरे म्हणतात की, मी आणला, श्री. एकनाथराव गणपतराव खडसे-पाटील म्हणतात की, मी हा प्रकल्प आणला. या प्रकल्पाचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. लोकांना वाटले की, बजाज स्कूटर्स् सारखा हा उद्योग असेल. परंतु लोकांची घोर निराशा झाली. बजाज स्कूटर्स उद्योगामध्ये तीन हजार कामगार आहेत. या स्कोडा उद्योगामध्ये फक्त 240 कामगार आहेत. या 240 मधील फक्त 20 टक्के कामगार स्थानिक, म्हणजे महाराष्ट्रातील आहेत आणि उर्वरित 80 टक्के कामगार हे परप्रांतीय आहेत. या स्कोडा उद्योगाला सरकारने 10 वर्षासाठी सवलती दिल्या. या सवलती या उद्योगाला कशासाठी दिल्या ?या स्कोडा उद्योगामध्ये फक्त 20 टक्के कामगार स्थानिक आहेत. हे 20 टक्के कामगार देखील झाडूवाले असतील. शेवटी स्थानिकांच्या नशिबी हेच आहे. बजाज स्कूटर्स उद्योगामध्ये तर पश्चिम महाराष्ट्राची, खानदेशाची वेगवेगळी लॉबी आहे. हे जे मोठे प्रकल्प येणार आहेत त्यांचे कौतूक आम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही. हे प्रकल्प कोणासाठी येणार आहेत ? सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी म्हणाले ते बरोबर आहे. मोटारी विकत घेण्यासाठी 4 ते 7 टक्के व्याज दराने कर्ज मिळते. शेतक-याने जर आपल्या जमिनी गहाण ठेवल्या तर त्यावर गहाणवट येत नाही तर 7/12चा उता-यावर बोजा येतो. ज्या शेतक-यांनी जमिनी गहाण ठेवून गाड्या घेतलेल्या आहेत त्यांची आज काय अवस्था आहे ? या प्रकल्पांचे कौतुक किती करायचे याचा विचार करावा लागेल. मुंबईच्या मलनिस्सारणासंबंधी जेव्हा वेगळा प्रस्ताव देण्यात येईल त्यावेळी मी त्यावर सविस्तरपणे बोलेन. गृहनिर्माणाच्या संदर्भातील धोरण अत्यंत संशयास्पद आहे. या विषयासंबंधी मुंबईमध्ये झालेल्या चर्चासत्रामध्ये मी भाग घेतलेला आहे. या सदनामध्ये देखील त्यासंबंधी चर्चा व्हावी अशी माझी अपेक्षा आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

या महाराष्ट्रातील सामान्य लोकांकरीता गृहनिर्माण धोरण आहे की परप्रांतीय लोंढ्यांची व्यवस्था करण्याकरीता आहे अशी शंका घेण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या गृहनिर्माण धोरणामध्ये मुंबई स्वतंत्र करण्याचे जे नियोजन आहे त्याची संकल्पना मुरत आहे अशी शंका वाटते. त्यामुळे आम्ही आमचे विचार मांडू शकतो. नवीन गृहनिर्माण धोरण हा शाप आहे की वरदान आहे हे याठिकाणी ठरेल, त्याचा तुम्हा-आम्हा सर्वांना गांभीर्याने विचार करावा लागेल आणि तो करावा अशी माझी इच्छा आहे.

सभापती महोदय, दोन महत्वाचे मुद्दे आहेत, त्यापैकी एक विजेच्या संदर्भातील आहे. माझ्याकडे दिनांक 19.2.2007 रोजी वृत्तपत्रात "भारनियमन हा शेतकऱ्यांना मिळालेला शाप" अशा सदराखाली चार शेतकऱ्यांची मते छापून आली आहेत. ते शेतकरी काय म्हणतात? मते तुम्हाला मिळाली. परंतु लोक काय म्हणतात? दै.लोकमत या वृत्तपत्रामध्ये श्री.नंदकिशोर तोटे हा शेतकरी काय म्हणतो? "सकाळी साडेतीन तास आणि सायंकाळी साडेतीन तास असे एकूण 7 तासांचे भारनियमन खेड्यामध्ये सुरु आहे. उन्हाळ्यामध्ये केळी, ऊस, भुईमूग, भाजीपाला या पिकांना पाणी द्यायचे असते. जी वेळ पिकांना पाणी द्यायची असते त्याचवेळी नेमके भारनियमन केले जाते. यामुळे पिकांना पाणी कसे द्यायचे हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. खरीप पिकांचे उत्पादन कमी झाल्यामुळे आधीच हवालदिल झालेला शेतकरी रब्बी पिकाचेही भारनियमनामुळे समाधानकारक उत्पन्न होणार नाही याच विवंचनेत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी सरकारने अनेक उपाययोजना राबविल्या, परंतु त्या कुचकामी ठरल्या. खरा प्रश्न आहे तो उत्पादनावर आधारित खर्चाच्या तुलनेत भाव मिळणे व शेतकऱ्यांना त्याच्या कामाच्या वेळात वीजपुरवठा होणे. परंतु या बाबीवर शासन अजिबात लक्ष देत नाही. एक दिवस भारनियमन हीच बाब उग्र रुप धारण करुन या बाबतीत गावोगावी आंदोलने झाल्यास त्याचे नवल वाटणार नाही. शेतकऱ्यांच्या आंदोलनाची पार्श्वभूमी सरकारला माहित नाही, शरद जोशींच्या काळात शेतकऱ्यांची झालेली आंदोलने सर्वश्रृत आहेत. तेव्हा शासनाने वेळीच खबरदारी घेऊन यावर तोडगा काढावा, अन्यथा भारनियमन हा शेतकऱ्यांना मिळालेला एक शाप ठरल्याशिवाय राहणार नाही." मुख्यमंत्री म्हणाले, आत्महत्या आणि भारनियमनाने फरक पडत नाही. आम्हाला मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसला 467 आणि काँग्रेसला 480 जागांवर यश मिळाले. शिवसेना व भारतीय जनता पक्षाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

युती होती. तुम्ही स्वतंत्रपणे लढलात. आम्हाला दोघांना मिळून 455 जागांवर यश मिळाले. आम्ही आडवे पडलो, फार मोठा पराभव झाला असे काही घडले नाही. तेव्हा कौतूक करुन घेऊ नका. घोडा मैदान जवळ आले आहे. तेव्हा सावध व्हा. आम्ही तुम्हाला कधी आडवे करुन पुढे निघून जाऊ हे कळणार नाही. भारनियमनाची शासनाला पूर्ण जाणीव आहे. तेव्हा राज्यपाल महोदयांनी अभिभाषणात भारनियमनाचा खेद होतो असे म्हणायला पाहिजे होते. भारनियमन सहन करुन लोक कंटाळले आहेत. 1999 साली सत्तेवर आलात तेव्हा भारनियमन कमी करु असे सांगून 4 तासांचे भारनियमन सुरु केले. पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्या आणि हे भारनियमन 4 तासावरुन 8 तासांचे झाले. नगरपालिकांच्या निवडणुका झाल्या आणि हे भारनियमन 8 तासांऐवजी 14 तासांचे झाले. जिल्हा परिषदांच्या निवडणुका संपल्या आणि 14 तासाऐवजी 18 तास भारनियमन सुरु झाले. आता शासनाने अधिकृतपणे जाहीर केले की, 20 तास भारनियमन करावे लागेल. मनाची नाही, जनाची नाही, काही नाही. तुम्हाला खात्री आहे, निवडणुकांमध्ये महात्मा गांधी आमच्या मदतीला येतात. घराघरामध्ये रात्री काळोखामध्ये फिरतात, त्यांना जे करायचे ते व्यवस्थित करतात. आत्महत्याचे जे प्रकरण मांडले ते चुकीचे मांडले आहे म्हणून सांगणे भाग आहे. मी तेथे फिरलो आहे. अंजनगावला जी आत्महत्या झाली ती इशाऱ्याची घंटा आहे. त्या शेतकऱ्याने गहू लावला होता असे सांगितले. प्रत्यक्षात तसे नाही. त्याचे संत्रा पीक होते. शेतामध्ये विहीर होती. विहिरीवर त्याने पंप लावला आणि विहीर सुकली म्हणून तेथून पाच फुटावर 55 हजार रुपये कर्ज काढून दुसरी बोअर मारली. मी स्वत: त्याच्या शेतात जाऊन आलो आहे. त्याने कनेक्शन घेतले आणि त्या बोअरवर पंप लावला. अधिकाऱ्यांचे मस्तक फिरले. त्याने कनेक्शन बदलले म्हणून ते कापण्यात आले आणि त्याला 30 हजार रुपये दंड लावण्यात आला. विजेच्या निमित्ताने होणाऱ्या आत्महत्या हा भयंकर प्रकार असून त्याबद्दल मी नंतर बोलणार आहे. मी जे प्रकरण सांगत आहे ते वेगळे आहे. सभापती महोदय, 30 हजार रुपये दंड लावल्यानंतर तो वीज मंडळाच्या कार्यालयात गेला आणि अधिकाऱ्यांना गयावया करु लागला. माझे पीक वाया जात आहे. मी 55 हजार रुपये कर्ज घेतले आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, वीज मंडळातील अधिकारी या शेतक-याचे काहीही ऐकण्यास तयार नव्हते. हा शेतकरी जवळ जवळ 1 महिना सायकलवरुन अधिका-यांकडे चकरा मारत होता, परंतु त्याचा काही एक उपयोग झाला नाही. शेवटी या शेतक-याने त्या अधिका-याचे पाय पकडले परंतु या अधिका-याने या शेतक-याला लाथेने उडविले. शेवटी या शेतक-याने अधिका-याला सांगितले की, आपण जर मला न्याय दिला नाही तर मला आत्महत्येशिवाय पर्याय राहणार नाही. हे सांगून सुध्दा या अधिका-याला काहीही दया आली नाही. त्याने सांगितले की, बरेच शेतकरी आत्महत्या करतात, तु आत्महत्या केली तर काही बिघडणार नाही. आमच्या पाठीशी मुख्यमंत्री आहेत. या शेतक-याच्या शेताला लागून असलेले अजून दोन शेतकरी दुस-या दिवशी अधिका-याच्या समोर गेले. परंतु यातील एक शेतकरी मरणाच्या भितीने पळून गेला. या दोन शेतक-यांनी अधिका-याला सांगितले तुम्ही आता सुध्दा आम्हाला न्याय दिला नाही तर आम्ही तुमच्या समोर, आम्ही आणलेली एंड्रीनची बाटली पिऊ. त्यावेळेस अधिका-याने सांगितले वेळ वाया घालवू नका लवकर एंड्रीन पिऊन टाका. आम्हाला काही फरक पडत नाही. या दोन शेतक-यांनी त्या अधिका-याच्या समोरच एंड्रीन प्याले. या दोन शेतक-यापैकी एक त्याच ठिकाणी मृत्यू पावला तर दुस-या शेतक-याला हॉस्पीटलमध्ये ॲडमिट करावे लागले. ज्यावेळेस मला हा प्रकार कळाला त्याच वेळेस मी वरिष्ठ अधिका-यांना भेटलो आणि संबंधित अधिका-यांचे निलंबन केले.

सभापती महोदय, या राज्यातील शेतक-यांवर नापिकी, कर्जबाजारीपणा यामुळे आत्महत्या कराव्या लागत आहेत, परंतु आता विजेमुळे आत्महत्या होऊ लागल्या आहेत. कापूस पिकविणारा शेतकरी आत्महत्या करीत आहे, आता तर ऊस पिकविणा-या, केळीचे पिक घेणा-या शेतक-याला आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. हे सरकार सत्तेवर होते तेव्हा 1972 चा दुष्काळ पडला होता त्या दुष्काळापेक्षा आज महाराष्ट्रात गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. मदमस्त हत्तीला तरी काही वाटेल परंतु या सरकारला यासंदर्भात काहीही वाटत नाही. या सरकारला वाटते की, आम्ही जिल्हा परिषदेच्या, पंचायत समितीच्या निवडणुका जिंकल्या आहेत, आपण कसेही वागलो तरी लोकांनी आपल्याला निवडून दिलेले आहे. आम्ही जे करतो ते बरोबर आहे. हे सरकार तंगडीत तंगडी घालून सत्ता उपभोगत आहे. परंतु सभापती महोदय, जनता वेडी नाही. तुम्हाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

धडा शिकविल्याशिवाय ती राहणार नाही याचे आपण भान ठेवा. महाराष्ट्रातील जनता आपल्याकडे आशेने पहात याकडे सुध्दा आपले लक्ष असू द्या.

सभापती महोदय, या शासनाचे मला एका बाबतीत अभिनंदन करावयाचे आहे. मराठी नाटकाला 15 हजार , संगीत नाटकासाठी 20 हजार रुपये तसेच एकपात्री नाटकासाठी 5 हजार रुपये हे शासन देणार आहे परंतु एक पात्री नाटकाची आपण काय व्याख्या ठेवलेली आहे त्याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. "कुटूंब रंगले काव्यात" हे एकपात्री नाटक आहे त्या नाटकाचाही यामध्ये समावेश केला जाणार आहे का? शासनाने नाटकांसाठी जी मदत देण्याची ठरवलेली आहे ती चांगली बाब आहे. त्यामुळे ही बाब शासनाने तातडीने अंमलात आणावी.

सभापती महोदय, राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयात मराठी भाषेचा वापर झाला पाहिजे न्यायालयाचा कारभार मराठी भाषेतून व्हावा यासंदर्भात उच्चन्यायालयाने निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे न्यायालयात मराठीचा वापर लवकरात लवकर सुरु करण्यात यावा.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात ज्या मुद्यांना स्पर्श केलेला आहे त्याच्याशी मी सहमत होऊ शकत नाही. मला तर वाटते की, हे अभिभाषण फाडून फेकून द्यावे परंतु माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण असल्यामुळे हे अभिभाषण फाडून फेकून देता येत नाही, असे केले तर माननीय राज्यपाल महोदयांचा अवमान होईल त्यामुळे तसे करता येत नाही. हे सरकार एवढे सुस्त झाले आहे की, मुडद्यावरच्या टाळूवरील लोणी खाण्यास मागे पुढे पाहणार नाही, प्रेतावरील फुले वेचन त्याचा हार गळयात घालून हे फिरु शकतील. हे सरकार महाराष्ट्रातील शेतक-यांना, जनतेला न्याय मिळवून देईल, सुखी समाधानी ठेवील, महाराष्ट्राचे भले करेल असे तर मुळीच वाटत नाही. पुन्हा एकदा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खंत व्यक्त करुन, विरोध करुन, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व अन्य सदस्यांनी आपले विचार मांडले. माननीय राज्यपालांनी मांडलेले मुद्दे व शासनाने त्यासंबंधी केलेली कार्यवाही त्यावर मी बोलणार आहे.

गेल्या दोन वर्षात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील जनतेला खूप हाल सोसावे लागले. या अतिवृष्टीमध्ये 200 हून अधिकजण मृत्युमुखी पडले. अशा नैसर्गिक आपत्तीला तोंड देणे खरोखर कठीण काम आहे. राज्यातील जनतेने या नैसर्गिक आपत्तीचा सामना यशस्वीपणे केलेला आहे. यासाठी मी त्यांचे आभार मानतो. या आपत्तीच्या काळात ज्यांना झळ सोसावी लागली त्यांना शासनाने तात्काळ मदत उपलब्ध करुन दिली. त्यांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तुंची टंचाई भासू दिली नाही. आपत्तीच्या काळात शासनाने केलेली कामे सर्व जनतेला दिसून आली. पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 411 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले. आपत्तीच्या काळात लष्करी आणि निमलष्करी दलाकडून शासनास सहाय्य करण्यात आले. आपत्तीच्या काळात वा पूरग्रस्त परिस्थितीमध्ये लोकांना मदत कार्य कसे करावे यासाठी 500 लोकांचे मास्टर ट्रेनर दल तयार केले. तसेच आठवी आणि नववीच्या अभ्यासक्रमामध्ये डिझॅस्टर मॅनेजमेंट या विषयाचा समावेश केला. डिझ्रास्टॅर मॅनेजमेंट हा अतिशय महत्वाचा विषय आहे. आपणा सर्वांना या विषयाची सखोल माहिती असणे गरजेचे आहे. सन 1980 मध्ये डिझॅस्टर मॅनेजमेंटचा मी सदस्य होतो. तेव्हा मुंबईत बॉम्बस्फोट झाला तर मुंबईचे पॉप्युलेशन इव्हॅक्युलेशन कसे करायचे या विषयावर तीन दिवस चर्चा झाली होती. त्यावेळी एक पॉलिसी ठरविण्यात आली होती. कुलाबा ते दादर या भागात बॉम्ब हल्ला झाला तर उपाययोजना कशी करायची. त्याबाबत साऊथ मुंबई आणि नॉर्थ मुंबई असे दोन भाग करावेत आणि पॉप्युलेशन इव्हॅक्युलेशन करण्यासासाठी बसेस, टॅक्सीजचा वापर करावा. परंतु नंतर असे लक्षात आले की, जर दादर येथे बॉम्ब हल्ला झाला तर साऊथमधून नॉर्थमध्ये गाड्या जाऊ शकणार नाहीत. तेव्हा यासंबंधी सखोल अभ्यास करुन डिझॅस्टर मॅनेजमेंट आपल्याला तयार करावे लागेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज.....

पुनर्वसनासंबंधीच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करण्यासाठी पुणे, औरंगाबाद, नागपूर येथे ग्राहक निवारण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. परंतु मला सांगावयाचे आहे की, ग्राहक निवारण केंद्र स्थापन करुन उपयोगाचे नाही तर लोकांना त्वरित न्याय मिळण्याची गरज आहे.

राज्यात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन व्याजमाफीसाठी 356 कोटी रुपये तसेच 1384 कोटी पीक कर्जाचे पुनर्गठन करण्यासाठी 1700 कोटी रुपयांचे वाटप केलेले आहे.

यानंतर श्री.पुरी.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

डॉ.एम.ए.अझिज....

माननीय पंतप्रधान यांनी विदर्भातील 6 जिल्हयांतील सिंचन सुविधा वाढविण्यासाठी बरेचसे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी योग्य ते पाऊल उचलले आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या मुला मुलींच्या लग्नासाठी 10 हजारांची मोठी रक्कम अनुदानापोटी उपलब्ध करुन दिली आहे, ही लक्षणीय बाब आहे.

सभापती महोदय, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी अंदाजे 500 कोटी रुपयांचे वितरण करण्यासंबंधी मी असे सूचित करु इच्छितो की, रोख मानधन देण्याऐवजी शासनाने त्यांच्या शेतीकरिता अवजारे व खाद्य बी-बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन द्यावेत. त्यामुळे त्यांच्या शेतीच्या उत्पादनात वाढ होऊन शेत जमिनीच्या मूल्यात वाढ होऊ शकेल. तसेच जी जमीन ओसाड राहील त्या शेतीचे मूल्य शेतकऱ्यांना शून्य राहील. ओसाड शेतीबाबत प्रसिध्द ऊर्दू कवी ईकबाल म्हणतात की,

"जिस खेत से किसान को मयस्सर नही रोटी,
उस खेत के हर खोशीय गुंदुम को जला दो."

ज्या शेतीपासून शेतकऱ्यांना फायदा नाही, ती शेती राखून काहीच उपयोग नाही. त्या शेतीचे मूल्य वाढविण्याच्या दृष्टीने रोख रक्कम देऊनही फायदा होत नाही, असे आपल्या निदर्शनास येते. कारण, हा पैसा दुसऱ्या कामाला वापरला जातो. त्यासंबंधी अशाप्रकारची दक्षता घ्यावी की जेणेकरुन शेतीची कामे व शेती चांगली राहण्याच्या दृष्टीने या पैशांचा उपयोग होईल.

सभापती महोदय, राज्यातील 26 जिल्हयातील ग्रामीण भागातील पेय जल पुरवठयासाठी ग्राम संस्थांच्या सहभागातील जल स्वराज्य प्रकल्प राबविण्यात येत असून 130 ग्राम पंचायतीमध्ये पाणी पुरवठा सुरु झाला आहे ही उल्लेखनीय बाब आहे, असे मी समजतो.

सभापती महोदय, शासनाने इंदिरा आवास योजनेंतर्गत 70 हजारांपेक्षा जास्त घरे बांधलेली आहेत. तसेच राजीव गांधी निवारा योजनेंतर्गत 2 वर्षात 1 लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ही राज्यकर्ते व गोरगरिबांच्या दृष्टीने महत्वाची बाब आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, रत्यांची कामे तसेच बाल कामगारांच्या शिक्षणासाठी 7 जिल्हयात 187 विशिष्ट शाळा सुरु केल्या. दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्राथमिक शिक्षणासाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. आरोग्य सुविधा सुधारण्यासाठीसुध्दा शासनाने मोलाची कामगिरी बजावलेली आहे. तसेच, आदिवासीच्या 25 लाख मुलांमध्ये आयर्न डेफेशिअन्सी रोखण्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज....

शासनातर्फे एक मोठा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यासंबंधी आयर्न टॅबलेट देण्यात येत आहे, ही चांगली बाब आहे. तसेच, जीवनदायी आरोग्य योजनेची रक्कम जरी दुप्पटीने वाढविली तरी या रक्कमेचे वितरण लवकर होत नाही, असा आपला अनुभव आहे. ऑपरेशन फिक्स झाल्यानंतर 10-15 दिवस होऊनही सदरचा पैसा दवाखान्याला मिळत नाही. त्यामुळे सदरचा पैसा आपण ताबडतोबीने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

सभापती महोदय, गेल्या दोन वर्षामध्ये रेल्वेमध्ये, मालेगांव व नांदेड येथे बॉम्बस्फोट झाले, राज्यात बॉम्बस्फोटाचे मोठे एपिसोड घडले. परंतु याबाबतीत सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने शासनाने कमालीची कर्तबदारी दाखवलेली आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.अे.अझिज पुढे सुरु.....

यासंबंधी अे.टी.एस.मार्फत चौकशी करुन आरोपींवर शासनाने कारवाई केली आहे. तरीही लोकांचे समाधान झालेले नाही. न्याय मिळालेला नसल्यामुळे, They are stil out of the Government machinery म्हणून आता शासनाने याबाबत सी.बी.आय.चौकशीचे आदेश दिलेले आहेत.

सभापती महोदय, राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयात मराठी भाषेचा वापर व्हावा या अनुषंगाने 50 टक्के निर्णय मराठी भाषेतून द्यावेत, असे माननीय उच्च न्यायालयाने सूचित केले आहे. शासनाने या निर्णयाची अंमलबजावणी करतांना केवळ 50 टक्केच नव्हे तर 100 टक्के मराठीतून न्यायनिर्णय व्हावेत म्हणून प्रयत्न करावेत, अशी माझी विनंती आहे. शेवटी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत समाधान व्यक्त करुन व आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अशासकीय कामकाजाबाबत</u>

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, आज अशासकीय कामकाज होणार आहे किंवा नाही याबाबतची विचारणा करण्यासाठी आम्ही आपल्याकडे चिठ्ठी पाठविली होती. हे कामकाज आज होणार नाही असे उत्तर मिळाले असते तरीही आमची तक्रार नाही. परंतु, कामकाज घेण्याबाबत आम्हाला वेळेवर समजले पाहिजे, एवढीच आमची अपेक्षा आहे.

उपसभापती : आताच मला तुमची चिठ्ठी मिळाली आहे.

डॉ.नीलम गो-हे : आपण सभापतीस्थानी येण्यापूर्वी तालिका सभापती महोदयांना आम्ही चिठ्ठी पाठविली होती. आमची विनंती अशी आहे की, आपल्याकडे शासकीय यंत्रणा उपलब्ध आहे, विधिमंडळाचे सचिवालय आहे, त्यांच्यामार्फत आम्हाला कळले तर बरे होईल.

उपसभापती : संध्याकाळी 7 वाजेपर्यन्त सभागृहाचे कामकाज चालेल, असे आपण ठरविले होते. एक तास आपण वाढवू शकू. आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावावर जी चर्चा सुरु आहे त्यासाठी अजून 18 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. ते कामकाजही आज पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे आज अशासकीय कामकाज होऊ शकणार नाही.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, दोन प्रकारचे कामकाज राहिलेले आहे. आता ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे तो एक भाग आणि अशासकीय कामकाज हा दुसरा भाग. अशासकीय कामकाज होणार नसले तरी आमची काही हरकत नाही. परंतु, आम्हाला वेळेवर हे समजले पाहिजे, एवढीच आमची अपेक्षा आहे.

उपसभापती : आज अशासकीय कामकाज होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणवरील अभिनंदनाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने काही महत्वाच्या मुद्यांना मी स्पर्श करणार आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील पृष्ठ क्रमांक 2 वरील परिच्छेद क्रमांक 6 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "राज्याच्या काही भागांमध्ये होत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या ही माझ्या शासनासाठी अतिशय चिंतेची बाब आहे." खरे म्हणजे, यासंदर्भात राज्य शासनाने न्यायालयात जे ॲफेडेव्हिट केले आहे त्याबाबत केंद्र शासनाने आय.बी.चे अधिकारी मंत्रालयात पाठविले आणि चौकशी केली, यासारखी लाजिरवाणी गोष्ट नाही, असे मला वाटते. या घटनेचे राज्य म्हणून आम्हाला वाईट वाटलेले आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील पृष्ठ क्रमांक 9 वरील परिच्छेद क्रमांक 53 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "माझे शासन ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी विशेष लक्ष केंद्रित करीत आहे." आपल्याला माहित आहे की, आरोग्य खात्यामध्ये जो भ्रष्टाचार चाललेला आहे त्याची चौकशी प्रधान सचिवांनी करावी असे आदेश मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात शासनाने दिले होते. मात्र अद्याप याबाबतची माहिती शासनाने सभागृहाला दिलेली नाही, ही बाब या निमित्ताने मी शासनाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. या मुद्याचा उल्लेख अतिशय प्रभावीपणे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.दिवाकर रावते यांनी केलेला असल्यामुळे मी त्या विषयाला स्पर्श करीत नाही.

सभापती महोदय, या शासनाचा स्वप्न विकण्याचा कार्यक्रम जोरात सुरु आहे, हे शासन स्वप्नांचे सौदागर झाले आहे. जनतेला अर्थसंकल्पातून दिलासा मिळेल, आधार मिळेल, भविष्यात हे शासन काय करणार आहे, या वर्षी काय केले आहे, पुढच्या वर्षी काय करणार आहे याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

काहीही उल्लेख नाही. या राज्यात उद्योग कसे येणार ? हा महत्वाचा प्रश्न आहे. या राज्यात पुरेशी वीज नाही, पायाभूत सुविधा नाहीत. लोकांनाच हे शासन वीज पुरवू शकत नाही तर उद्योग या राज्यात कसे येणार आहेत ? म्हणून मला म्हणावयाचे आहे की, महाराष्ट्रातील जनतेला दिवास्वप्न दाखविण्याचे पाप या शासनाने करु नये. सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे महागाईमुळे या राज्यातील जनता त्रस्त झालेली असतांना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात एका शब्दानेही त्याबाबत उल्लेख नाही.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

महाराष्ट्रामध्ये 7-8 वर्षापूर्वी युतीचे शासन होते. केंद्रामध्ये देखील आमचे शासन होते. सर्वसामान्य माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असणा-या जीवनावश्यक वस्तू रेशन दुकानामध्ये आमचे शासन स्वस्त दराने देत होते. गहू, साखर, रॉकेल आणि दोन-तीन कडधान्याच्या वस्तूंचे वाटप आम्ही रेशन दुकानांमध्ये करीत होतो. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सहयाद्री अतिथीगृहात आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमात आमचे नेते असे म्हणाले की, बाहेर 180 रुपये किलो चहा आहे. म्हणून आम्ही चहापानाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलो. तुम्ही लोकांना विकत घेऊन मते मिळविलेली आहेत. निवडणुकीमध्ये तुम्ही एका मतासाठी 800 ते 1200 रुपये दिले. तुम्ही लोकांचे अज्ञान, दारिद्रय, अगतिकता आणि गरज विकत घेतली. तुम्ही लोकांना दारु पाजून मते मिळविली. निवडणुकीमध्ये तुम्ही ट्रकच्या ट्रक भरुन लोकांना दारुच्या बाटल्या पुरविल्या. तुम्ही सांगता की, राज्यामध्ये महागाई व भारनियमन असले तरी लोकांनी आम्हाला निवडून दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेब, लोक कसे जगत आहेत हे तुम्ही प्रत्यक्ष बघितलेले आहे काय ? जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडलेले आहेत. परंतु महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेखालील जे 40 टक्के, 30 टक्के, 20 टक्के लोक जो काही शासनाचा आकडा असेल त्याप्रमाणे आदिवासी क्षेत्रामध्ये, गरीब वस्त्यांमधील लोकांना जीवनावश्यक वस्तू स्वस्त दराने किंवा सबसिडी देऊन रेशन दुकानामार्फत पुरविल्या जातील, अशा प्रकारचा निर्णय माझ्या शासनाने घेतलेला आहे, असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोठेही नाही.

सभापती महोदय, एस.ई.झेड. संदर्भात गोंधळ निर्माण झालेला आहे. संपूर्ण महाराष्ट्र अंबानीने विकत घ्यावयाचे ठरविले आहे. शेतक-यांना हेक्टरी 20-30 लाख रुपयांचे आमिष दाखून शेतक-यांच्या चांगल्या जमिनी विकत घेण्यात येणार आहेत. केंद्र शासनाने एस.ई.झेड. च्या अंमलबजावणीबाबत थोडे थांबा, असे आदेश दिलेले असतांना महाराष्ट्रात धनिकांना शेतक-यांच्या चांगल्या जमिनी देण्याचा सपाटा चालला आहे. एस.ई.झेड.बद्दल माननीय राज्यपालांनी त्यांच्या अभिभाषणामध्ये कोठेही उल्लेख केलेला नाही. जालियनवाला बागेमध्ये ज्याप्रमाणे लोकांची हत्या करण्यात आली होती त्याप्रमाणे पश्चिम बंगालमधील नंदीग्राम येथे जमीन वाचविणा-या लोकांवर अत्याचार करुन त्यांना ठार मारण्यात आले. अशाच प्रकारे महाराष्ट्रामध्ये उद्रेक व्हावा असे

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

आपल्याला वाटते काय ? माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये एस.ई.झेड.संदर्भात उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, मुंबई शहराला जवाहरलाल नेहरु योजनेचे आमिष दाखविले गेले आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी हिवाळी अधिवेशनामध्ये दिनांक 15 डिसेंबर, 2006 रोजी असा उल्लेख केला होता की, मुंबईतील मराठी माणूस शहराबाहेर फेकला जाणार नाही. मुंबई शहराला कोण वाचविणार आहे ? जवाहरलाल नेहरु योजनेसाठी निधी देण्यासंदर्भात ज्या अटी घातलेल्या आहेत त्या अटी राज्य सरकार पूर्ण करु शकणार नाही. त्यातील पहिली अट अशी आहे की, महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये बदल करा, अर्बन लॅण्ड सिलींग ॲक्ट रद्द करा. परंतु अजून पर्यंत याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असे सांगितले आहे की, केंद्र शासनाकडून इतके कोटी रुपये येणार आहेत. माननीय राज्यपालांचे स्वप्नवत भाषण लोकांना दिवास्वप्न दाखविण्यासाठी निर्माण केले गेले आहे. In the Overview Book-let issued by the Ministry of Urban Development, it has been stated that: "As a result of the liberalization policies adopted by the Government of India is expected to increase the share of the urban population may increase to about 40 per cent of total population by the year 2021." म्हणजे देशामध्ये सन 2021 सालापर्यंत 40 टक्के शहरीकरण होणार आहे. महाराष्ट्र शासनाने मागच्या वर्षी राज्याच्या प्रगतीचा अहवाल सादर केलेला आहे. त्यामध्ये असे नमूद केलेले आहे की, 48 ते 50 टक्के शहरीकरण आताच झालेले आहे. संपूर्ण देशामध्ये शहरीकरण होणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. तुम्ही परप्रांतीयांचे लोंढे थांबविणार आहात की नाही ? आम्ही अतिशय स्पष्टपणे बोलतो.

यानंतर कु.खर्चे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

भारतीय घटनेनुसार या मुंबई शहरात सर्वांना येण्याचा आणि राहण्याचा अधिकार आहे, परंतु याचा अर्थ असा नाही की, परप्रांतीयांनी येथे येऊन आपल्या येथील भुमिपुत्रांचे सर्व अधिकार हिरावून घेऊन मोठमोठे इमले उभे करावे, आणि म्हणून या ठिकाणी परप्रांतीयांचे येणारे लोंढे थांबविण्यासाठी आपण उपाययोजना केल्या पाहिजेत, या उपाययोजना घटनेतील सर्व अधिकार कायम ठेवून करता येतात. मुंबई शहरामध्ये ज्याला गृहनिर्माण योजनेमधून घर मिळाले अथवा मिळणार आहे ती व्यक्ती मुंबईतच जन्माला आलेला पाहिजे अथवा, त्या व्यक्ती त्याच्याकडे किमान 35 ते 40 वर्षाचे मुंबईचे नागरिकत्व पाहिजे, आणि जो उपरोक्त अटींची पूर्तता करत असेल त्याला गृहनिर्माण योजनेमधून घर दिले जाईल, करा बघू असा कायदा. मुंबईत रिक्षा टॅक्सी किंवा इतर किरकोळ उद्योग असतील त्या सर्व उद्योगांना परवाने देतांना उद्योजक अथवा वाहनचालक हा मुंबईतच जन्माला आलेला असला पाहिजे अथवा त्याच्याकडे 35 ते 40 वर्षाचे मुंबईचे नागरिकत्व असले पाहिजे या अटींवरच परवाने देण्यात यावे. मुंबई शहरामध्ये अनेक ठिकाणी आज ज्या प्रकारच्या सवलती आहेत, त्याबाबत तुम्ही काही करणार नाही, आज या ठिकाणी कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट करा असे माननीय मुख्यमंत्र्यांनी 15 डिसेंबर रोजी जाहीर केले होते. सन 1995 च्या झोपडपट्टयांनाच नव्हे तर सन 2000च्या झोपडपट्टयांना देखील मान्यता देणार असेही माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले, झोपडपट्टीवासियांच्या विरोधात भाजपा कधीच नाही आणि नव्हते. सभापती महोदय, आपल्या घरातील गॅलरीमध्ये एखादी चिमणी ज्यावेळी सुरुवातील काटक्या कुटक्या आणून आपले घरटे बनविण्यास सुरुवात करते, तेव्हा आपण तिच्याकडे कुतूहलाने पाहत असतो, खरेतर याच वेळी आपण त्या चिमणीला ते घरटे बांधण्यापासून परावृत्त करु शकतो कारण की, पुढे त्या घरटयाचा आपल्याला त्रास होणार असतो पण ज्यावेळी ते घरटे पूर्ण होऊन त्यामध्ये तिच्या अंडयातून पिलांचा जन्म होतो त्यावेळी आपण ते घरटे उद्ध्वस्त करु शकत नाही, अशीच परिस्थिती आता मुंबईची झालेली आहे. आपल्याकडे बेकायदेशीर बांधकाम चालू असतांना आपण काही करत नाही या ठिकाणी असे सांगण्यात येईल की, मुंबई महानगरपालिका तुमच्याच हातात आहे, हो ,मुंबई महानगरपालिका आमच्याच हातात आहे परंतु मुंबई महानगरपालिका आमच्या हातात असून काय फायदा ? मुंबई महानगरपालिकेच्या आधारे फक्त सभागृहात आपले मत व्यक्त करता येते, अभिमत व्यक्त करता येते. ठराव मंजूर करता येतात,त्या ठरावांची अंमलबजावणी मंत्रालयातून

3W -2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

पाठविललेले जे आय.ए.एस.अधिकारी असतात, त्यांच्याकडून होत असते आणि कुठल्याही चांगल्या ठरावाची अंमलबजावणी मंत्रालयाच्या माध्यमातून होत असते. नेहरु योजनेच्या माध्यमातून या ठिकाणी मुंबई शहरामध्ये चांगल्या प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचे दिवास्वप्न दाखविले आहे. सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए.ला सर्व अधिकार देण्यात आलेले आहेत, महानगरपालिकेकडे कुठल्याही प्रकारचे प्रभावी अधिकार राहिलेले नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार कमी करुन टाकलेले आहेत. मुंबई महानगरपालिकेकडे कोणत्याही प्रकारचे महत्वाचे अधिकार राहिलेले नसून सर्व अधिकार तुम्ही एम.एम.आर.डी.ए.कडे सोपविलेले आहे.

दिल्लीमध्ये मेट्रो रेल्वे प्रकल्प राबवित असतांना 15 टक्के रक्कम केंद्रशासनाने आणि 15 टक्के रक्कम राज्यसरकारने व उर्वरित 70 टक्के रक्कम ही लोन घेऊन हा प्रकल्प पूर्ण करण्यात आली आहे आणि म्हणून मेट्रो रेल्वेमधून प्रवास करणा-या सर्व प्रवाशांना जे प्रवासी भाडे द्यावे लागेल ते सर्व अतिशय माफक असेल. मुंबईत होणारी मेट्रो रेल्वे देखील अशाच प्रकारे बांधण्यात आली पाहिजे, सध्या या प्रकल्पाचा पहिला टप्पा सुरु झालेला आहे. मेट्रो रेल्वेचे काम महानगरपालिकेकडे दिले पाहिजे म्हणजे 15 टक्के राज्यशासन, 15 टक्के केंद्रशासन उर्वरित 70 टक्के कर्ज घेऊन मेट्रो रेल्वेचा प्रकल्प पूर्ण करण्यात आला पाहिजे.

अर्थसंकल्पाच्या दुस-या पानावर जे टेंडर्स दिलेले आहेत, ते सर्व परदेशी कंपन्यांनी घेतलेले आहेत, म्हणून हे सर्व वर्तमानपत्रामध्ये येत आहे. मुंबई शहर हे एक बेट असल्यामुळे त्याची कुठल्याही प्रकारची व्यवस्था मुंबई महानगरपालिकेला चालवायला दिली पाहिजे. शासनाचे प्रशासनावर कुठल्याही प्रकारचे वजन नाही. दरवर्षी 1343 कोटी रुपये खर्च करुन बाहेरच्या राज्यातून वीज खरेदी करावी लागते. मंत्रीमंडळासमोर ज्या वेळेला हा प्रस्ताव आला त्यावेळेला अर्थखात्याचे प्रधान सचिव श्री. सुबोध कुमार असे म्हणाले की, कोणी माझ्या धोरणाच्या विरोधात गेले तर मी कोर्टात ॲफिडेव्हिट करीन, त्यावर माननीय उर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील म्हणाले की, एकतर मंत्रीमंडळात मी तरी राहीन नाहीतर शासनाच्या या खात्यावर श्री.सुबोध कुमार प्रधान सचिव म्हणून राहतील. शासनाचाच नव्हे तर प्रशासकीय व्यवस्थेचा नोकर असलेला एक अधिकारी महाराष्ट्र अंधारात असतांना बाहेरच्या राज्यातून वीज विकत घेण्यासाठी 1343 कोटी रुपयांची व्यवस्था करावी, अशी मागणी करतो.

यानंतर श्री. सुंबरे....

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

मंत्रिमंडळ सर्वोच्च आहे की, आपले प्रशासनातील अधिकारी सर्वोच्च आहेत ? एकूणच तुमची प्रशासनावर मांड व्यवस्थित नाही. तुम्ही शासन म्हणून प्रामाणिकपणे काही नियम, कायदे करता परंतु त्याचे जी.आर.काढताना किंवा त्यांची अमलबजावणी करताना हे जे आपले अधिकारी आहेत, इ ारीतील शुक्राचार्य आहेत, ते तुमचे ऐकावयास तयार नाहीत आणि जे ऐकणारे चांगले अधिकारी असतात त्यांनी तुम्ही बाजूला फेकून देता, बाहेर पाठविता. उदाहरणादाखल मी आपल्याला सांगेन की, म्हाडामध्ये असेच एक चांगले अधिकारी होते पण त्यांना आपण तेथून उचलून राज्यपाल महोदयांचे सचिव करून ठेवले आहे. तेव्हा सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, सारा महाराष्ट्र अंधारात असताना त्याला प्रकाश देण्यासाठी म्हणून आपण, शासनाने, काही निर्णय घेतले पण आपले अधिकारी ते निर्णय अमलात आणण्यास तयार नाहीत, त्याप्रमाणे कारवाई करण्यास तयार नाहीत. तुम्ही त्यांना सांगावयास पाहिजे होते की, हे तुमचे काम नाही, लोकांनी आम्हाला राज्याचे शासन चालविण्यासाठी निवडून दिलेले आहे त्यामुळे आम्हाला हे राज्य चालविण्याचा, त्यासाठी धोरणे आखण्याचा, नियम, कायदे करण्याचा अधिकार आहे आणि आम्ही घेतलेले निर्णय राबविण्याचे काम तुमचे आहे, तेवढेच तुम्ही केले पाहिजे. उदाहरण सांगावयाचे तर बसचा ड्रायव्हर असे म्हणू शकत नाही की, बसमध्ये सर्व सीट भरल्यानंतरच मी बस चालू करणार. तर त्याने त्याला ठरवून दिलेल्या वेळेनुसार बस चालविली पाहिजे, जेवढे प्रवासी बसमध्ये येतील त्यांना घेऊन बस चालविली पाहिजे. थोडक्यात तुमची तुमच्या प्रशासनावर, अधिकाऱ्यांवर काय पकड आहे हेच यातून दिसून येते.

सभापती महोदय, मी आता माझा शेवटचा मुद्दा येथे मांडणार आहे. गृहनिर्माणाच्या बाबतीत येथे चर्चा होईल तेव्हा आम्ही चर्चा करूच. पण या संदर्भात मी सांगू इच्छितो की, माननीय मुख्य मंत्र्यांनी असे जाहीर केले होते की, आम्ही आमची गृहनिर्माण योजना अशा प्रकारे आखणार आहोत की, मुंबईतील मराठी माणूस मुंबईच्या बाहेर जाणार नाही. त्यासाठी विकासकाला जी काही घरे बांधावयाची असतील ती त्याने बांधावित पण त्यातील काही घरे त्याने 400-500 चौ.फूटाची बांधली पाहिजेत आणि ती केवळ मराठी माणसालाच, येथील भूमिपुत्राला मिळतील. हे तुमचे धोरण आहे. उलट ज्यांच्याकडे पैसा आहे, ते वाटेल तेथे आणि वाटेल त्या क्षेत्रफळाचे घर या मुंबईत घेऊ शकतात. आज धनिक लोक काय करू शकतात हेही आपण पाहिले आहे. बिल्डर व्यवसायातील

..... 3एक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विजय ग्रूपच्या प्रमुखाला ठार मारण्यासाठी दुसऱ्या एका धनिक बिल्डराने सुपारी दिली असल्याचे नुकतेच उघडकीस आलेले आहे. तेव्हा आज ही मुंबई धनिकांची, बिल्डरांची, दोन नंबरचा पैसा असणाऱ्यांच्या हातामध्ये गेलेली आहे. ती शासनाच्या हातामध्ये अजिबात राहिलली नाही. तेव्हा आपले गृहनिर्माणाचे धोरण असे असले पाहिजे की, बिल्डरांना जी काही घरे बांधावयाची असतील ती त्याने बांधावित पण मुंबईतील जो गरीब मराठी माणूस आहे, मग तो ड्रायव्हर असेल, पोलीस असेल, शासकीय कर्मचारी असेल, शिक्षक असेल, तो निवृत्त झाल्यानंतर आज मुंबईत स्वत:ला राहण्यासाठी स्वत:ची अशी जागा घेऊ शकत नाही, त्याच्या प्रॉव्हिडंड फंडातून मुंबईत साधी झ ोपडी घेऊ शकत नाही. अशा वेळेस आपण कल्याणकारी राज्याची भाषा करीत आहात तर मग या महाराष्ट्रात सामान्य, गरीब मराठी माणसाला सहजतेने जगता येईल अशा प्रकारची व्यवस्था माझे शासन करील असे वाक्य यामध्ये असायला पाहिजे होते पण तसे वाक्य या अभिभाषणामध्ये कोठेही नाही. सामान्य माणसाला प्रवास परवडेल अशी व्यवस्था या राज्यामध्ये असेल, त्याला सुखाने, शांतपणे जीवन जगता येईल अशा प्रकारे वाजवी दरांमध्ये जीवनावश्यक वस्तू सहजेते, मुबलकतेने मिळतील, त्याला निर्वेधपणे शिक्षण, अगदी उच्च शिक्षण घ्यावयाचे असेल तरी त्यासाठी सहजतेने प्रवेश मिळेल आणि शिक्षण घेता येईल अशी व्यवस्था असेल... अशा प्रकारची वाक्ये या अभिभाषणामध्ये आम्हाला अपेक्षित होती. पण असे एकही वाक्य राज्यपालांच्या या अभिभाषणामध्ये नाही. माननीय राज्यपालांच्या भाषणाला बोगस, भंकस असे बोलू नये म्हणून मी तसे बोलणार नाही, पण अतिशय खेदजनक, अत्यंत निराशाजनक असेच हे भाषण आहे असे मला खेदाने म्हणावेसे वाटते. महाराष्ट्रातील जनतेला माणूस म्हणून जगता यावे अशा प्रकारे आशा दाखविणारे एकही आशेचा किरण यामध्ये नसल्याने या अभिभाषणाला मी अत्यंत खेदपूर्वक विरोध करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

****

अशुद्धारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

अशासकीय कामकाजाबाबत तसेच सभागृहाची वेळ वाढविण्याबाबत.

उपसभापती : राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी पुढील सदस्यांचे नाव पुकारण्यापूर्वी मी आपल्याला सांगू इच्छितो की, अजून आपल्याला अशासकीय कामकाज घ्यावयाचे आहे. त्यामध्ये अनुक्रमांक 2 आणि 4 वर असलेली सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांची अशासकीय विधेयके घेतली जाणार नाहीत. तेव्हा उर्वरित दोन अशासकीय विधेयकांवरच आपल्याला चर्चा करावयाची आहे. तेव्हा हे अशासकीय कामकाज आजच करावयाचे काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तसे असेल तर उद्या सकाळी अधिक वेळ बसून आपण हे अशासकीय कामकाज पूर्ण करू ... त्यासाठी वाटल्यास आपण सकाळी 10 वाजता विशेष बैठक घ्यावी.

उपसभापती : त्यासाठी माझी हरकत नाही, आपणा सर्वांची तयारी आहे काय ?

काही सन्माननीय सदस्य : आमची हरकत नाही.

उपसभापती : ठीक आहे. उद्या सकाळी सभागृहाची विशेष बैठक 10.00 वाजता सुरू होईल आणि त्यामध्ये अशासकीय कामकाज घेतले जाईल.

तसेच सभागृहाची वेळ आता संपलेली आहे, मात्र सभागृहाचे कामकाज अजून पूर्ण व्हावयाचे असल्याने, सभागृहाची वेळ मी एक तासाने वाढवित आहे. आपण सर्वांनी सहकार्य करावे.

आता यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. सावंत हे भाषण करतील.

***

(यानंतर श्री. गागरे ..... 3वाय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

त्यामुळे कितीही म्हटले तरी आपण केंद्र सरकारच्या मदतीने 9 हजार अंगणवाडया वाढविल्या. परंतु मुले आहारापासून वंचित आहेत. त्यांना आहाराचा पुरवठा करण्यासाठी तांदूळ, गहू इत्यादी निकृष्ट प्रतीचे रॉ मटेरिअल येते. या विषयासंबंधी सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा करण्यात आली, त्यावेळी आपण संबंधित पुरवठादार कंत्राटदाराला काळया यादीमध्ये टाकले आहे. तरीसुध्दा मुलांना पुरविण्यात येणाऱ्या आहारामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाचा निधी उपलब्ध होण्यास काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये विलंब झाल्यास जास्तीत जास्त दोन महिन्यांची आगाऊ रक्कम ॲडव्हान्स म्हणून शासनाकडून उपलब्ध झाल्यानंतर त्यामधून खर्चाची प्रतिपूर्ती करावी अशी आपण तरतूद केली आहे. सभापती महोदय, जिल्हा परिषदेकडे या योजनेकरिता निधी नसतो, आणि शासन देखील वेळेवर निधी देत नाही. अशापरिस्थितीत "आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना" अशी या अंगणवाडयांची अवस्था झ ाली आहे. मंत्रिमहोदय, आपण ग्रामीण भागामध्ये काम करीत असल्यामुळे आपल्याला याविषयी अधिक माहिती आहे.

सभापती महोदय, परिच्छेद क्र. 52 मध्ये असे म्हटले आहे की,"माझे शासन अर्भक मृत्यू दर 36 पर्यंत कमी करण्यात व जननदर 2.1 वर स्थिरावण्यात यशस्वी झाले आहे". इतर राज्यातील अर्भक मृत्यू दराशी तुलना केली तर हे प्रमाण जास्त आहे. त्याप्रमाणे जनन दर असून यावर मत करणे आवश्यक आहे. भारतामध्ये पॉप्युलेशन एक्स्पलोजन फार मोठया प्रमाणात आहे. त्यावर खरोखरच नियंत्रण आणावयाचे असेल तर जनन दरावर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. सभापती महोदय, परिच्छेद क्र. 53 मध्ये म्हटले आहे की, "माझे शासन ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी विशेष लक्ष केंद्रित करीत आहे. याकरिता ग्रामीण राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गत आरोग्य कर्मचाऱ्यांचा "आशा" हा नवीन संवर्ग तयार करण्यात आला आहे. नव्याने निर्माण केलेल्या रुग्ण कल्याण समित्या, ग्रामीण रुग्णालयांचे व आरोग्य केंद्रांचे व्यवस्थापन पाहतील. ग्रामस्तरावर स्थापन केलेल्या ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता या समित्यांनी, आरोग्य योजनांचे व आरोग्यविषयक पूरक योजनांचे समन्वयन साधणे अपेक्षित आहे". सभापती महोदय, या "आशा" संवर्गासंबंधी माझ्याकडे माहिती आहे. त्यानुसार "आशा" म्हणजे "ॲक्रीडेटेड सोशल हेल्थ ॲक्टिव्हिस्ट". आपण सामाजिक चळवळीमधून एक कार्यकर्ता तयार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

करीत आहोत. आपल्याकडे आरोग्य केंद्रामध्ये एएनएम हे संवर्ग असतांना पुन्हा नव्याने संवर्ग तयार करीत आहोत. त्याचप्रमाणे आपल्याकडे "पाडा स्वयंसेवक" हे पद असून नव्याने "आशा" हे पद निर्माण केले आहे. त्याचे ब्रोशर पाहिले तर त्यांचा फार मोठा रोल आहे. ही राज्य व केंद्र सरकारची योजना असल्यामुळे आपण यामध्ये नव्याने काही केलेले नाही. "आशा" या संवर्गामध्ये जी महिला असेल तिचे वय हे 25 ते 45 या दरम्यान असणे आवश्यक आहे. तिची शैक्षणिक पात्रता इयत्ता 8 वी उत्तीर्ण असली पाहिजे. ती मेडिकल डिस्ट्रिब्युशनचे काम करणार आहे. त्यामध्ये ती प्रेग्नंट महिलांना मॉनीटर करणार आहे, मुलांना मॉनीटर करणार आहे. यामध्ये ती कुपोषित मुलांना कशी पाहणार आहे? राज्य शासनाने यासंबंधी दिलेल्या गाईडलाईन्समध्ये म्हटलें आहे की, "ASHA should be with minimum education upto 8th standard, she should be resident of the village."म्हणजे त्यापेक्षा कमी शिकलेली एखादी बाई मिळाली तरी सुध्दा तिला काम दिले जाणार आहे. या योजनेमध्ये तीन संवर्गाचा महत्वाचा रोल आहे. प्रामुख्याने अंगणवाडी सेविका, एएनएम हे दोन संवर्ग यामध्ये क्लॅश होणार आहेत. अंगणवाडी सेविकेच्या हाताखाली काम करणारी बाई अशाप्रकारे यामधून अर्थ ध्वनीत होतो. तिला दिले जाणारे काम हे वैद्यकीय शास्त्रानुसार फार मोठे काम आहे. तिला अंगणवाडी सेविकेबरोबर हेल्थ कँप ॲरेंज करावयाचे आहेत. तिचे अंगणवाडी सेविका आणि एएनएमबरोबर ट्रेनिंग होणार आहे. तिला फक्त 21 दिवसांचे ट्रेनिंग दिले जाणार आहे. यामध्ये पहिल्या आठवडयात दोन दिवस आणि नंतरच्या आठवडयात चार दिवस अशाप्रकारे 4 आठवडे विभागून ट्रेनिंग दिले जाणार आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु...

21 दिवसाचे ट्रेनिंग आहे. एक अशिक्षित मुलगी किंवा बाई हे काम करण्यासाठी, गावच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शिक्षित होईल काय ? तिच्याकडून काय अपेक्षा करणार ? तिला दिवसाला 100 रुपये पगार देणार आहात. तिचे ट्रेनिंग होणार आहे. ती ऐएनएम यांच्याकडून ट्रेनिंग घेणार आहे. तिला जे काम देण्यात आलेले आहे ते तिच्या कुवतीच्या बाहेरचे आहे. अशाप्रकारे मानधनावर काम करणारे लोक गावागावातून मिळणे कठीण होणार आहे. त्याचबरोबर त्यांच्याकडून अशा कामाची अपेक्षा करणे, चुकीचे आहे,असे माझे मत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या भाषणातील 54 क्रमांकाच्या मुद्यामध्ये असे म्हटले आहे की, "आदिवासी क्षेत्रातील अंदाजे 25 लाख मुलांमध्ये लोहाच्या कमतरतेमुळे झालेल्या रक्तक्षयास प्रतिबंध करण्यासाठी जंतनाशक गोळ्या देण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला." गेल्यावर्षी जंतनाशक गोळ्या देण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. महाराष्ट्रातील 30 टक्के गावांमध्ये जंतनाशक गोळया पोहोचल्याचा माझा अभ्यास आहे. त्यामध्ये प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार होतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या भाषणातील मुद्दा क्रमांक 55 मध्ये असे म्हटले आहे की, "गरीब रुग्णांना मदत व्हावी म्हणून जीवनदायी आरोग्य योजनेची अनुदान मर्यादा दुपटीहून अधिक म्हणजे 1 लाख 50 हजार रुपये इतकी केलेली आहे. आतापर्यन्त हृदय, मूत्रपिंड व मेंदूचे आजार यांसाठी ही योजना लागू होती व ती आता कर्करोगाच्या उपचारासाठीही लागू राहील". आता आपण कर्क रोगाचा समावेश केलेला आहे. माझ्याकडे शासनाचे परिपत्रक आहे. 1997 मध्ये युती शासनाने ही योजना राबविली ती आजपर्यन्त चालू आहे. एकूण 10 वर्षामध्ये किडनीच्या 188 शस्त्रक्रिया झालेल्या आहेत, 10,625 या हृदय शस्त्रक्रिया झालेल्या आहेत, 155 मेंदूच्या शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. एकूण 10868 शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. साधारणपणे 342 रुग्णालयांमध्ये ही सुविधा उपलब्ध होती. पंचतारांकित हॉस्पिटल्सना शासनाने सवलती दिल्या त्या संबंधीचा विषय वारंवार चर्चेला आला आहे. पंचतारांकित हॉस्पिटल्सना आपण सवलती उपलब्ध करुन दिल्या त्या ठिकाणी शस्त्रक्रिया होणे आवश्यक होते. यासंबंधातील माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. सन 2006-07 मध्ये केईएम हॉस्पिटलमध्ये 143, सायन 1197,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

डॉ. दीपक सावंत .....

नायर रुग्णालयामध्ये 126, जे.जे. रुग्णालयामध्ये 1576, बॉम्बे हॉस्पिटलमध्ये 2, पी.डी.हिंदुजा हॉस्पिटलमध्ये 2, जसलोक हॉस्पिटलमध्ये 2 इतक्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. नानावटी हॉस्पिटल, हिंदुजा हॉस्पिटल, हरकिसनदास हॉस्पिटल आणि खंबाला हिल हॉस्पिटल या ठिकाणी काहीही शस्त्रक्रिया झालेल्या नाहीत. आपण पंचतारांकित हॉस्पिटल्सना सुविधा देतो परंतु ते गरीब रुग्णांना शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करुन देत नाहीत. या संदर्भात हायकोर्टाने त्यांच्यावर कारवाई करण्यास सांगितलेले होते तरी देखील आपण कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. उलट त्यांना झुकते माप दिलेले आहे. पुणे येथील सर्व 11 हॉस्पिटल्समध्ये 188 शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. नागपूरमध्ये 129 शस्त्रक्रिया झालेल्या आहेत, कोल्हापूरमध्ये 91 शस्त्रकिया झालेल्या आहेत, संभाजीनगरमध्ये 174 शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. आपण त्यांच्यावर करोडो रुपये खर्च करतो परंतु त्यांच्याकडून काहीही सुविधा मिळत नाही. शासनाने जीवनदायी आरोग्य योजनेच्या बाबतीत आपली पाठ थोपटून घेण्याचे काही कारण नाही. कारण सामान्य लोक, दारिद्र्य रेषेखालील लोक यापासून वंचित राहिलेले आहेत, असे सांगितले तर चुकीचे होणर नाही.

सभापती महोदय, अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 56 वर म्हटलेले आहे की, "माझ्या शासनाने एच.आय.व्ही/एड्सला प्रतिबंध करण्याकरिता, त्याचे नियंत्रण करण्याकरिता व त्यावरील उपचारांकरिता 683 समुपदेशन व चाचणी उपचार केंद राज्यभर सुरु केली आहेत. अंदाजे 11000 एड्स रुग्णांना 13 केंद्रामध्ये ॲन्टी रेट्रो व्हायरल उपचार पध्दतीने मोफत उपचार देण्यात येत आहेत." एड्सच्या रुग्ण संख्येच्या बाबतीत जी आकडेवारी दिसते ती हिमनगाचे एक टोक आहे. जी ऑफिशियल आकडेवारी आहे त्याप्रमाणे 2,022 व्यक्ती एड्सच्या रोगाने बाधित आहेत. गेल्या वर्षी एडस्चे रुग्ण एकट्या मुंबईमध्ये 864, सांगलीमध्ये 403 आणि ठाण्यामध्ये 148 एड्सचे रुग्ण मृत्यू पावलेले आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

हे सर्व आकडे पाहिले तर एका वर्तमानपत्रामध्ये असे म्हटले आहे की, महाराष्ट्र उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश ही राज्ये एड्समध्ये अग्रगण्य आहेत. श्री. बिल गेटस् यांनी बिलियन डॉलर्स या योजनेसाठी दिलेले आहेत. श्री. बिल गेटस् यांनी असे म्हटले आहे की, " India will have the largest number of HIV cases in the next 10 years. He is quiet concerned about it. It is a staggering, frightening figure of 25 million."

सभापती महोदय, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईमध्ये सातत्याने देशातून लोकांचा लोंढा येत असतो. त्यामुळे मुंबईमध्ये सर्वात जास्त एड्सचे रुग्ण आढळतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एड्सचे रुग्ण आढळतात त्याचप्रमाणे सांगलीमध्ये, रत्नागिरीमध्ये एड्सचे रुग्ण आहेत. ज्या ज्या ठिकाणचे लोक वास्तव्यासाठी किंवा नोकरीसाठी बाहेर जातात त्या त्या ठिकाणी एड्सचे रुग्ण आढळून येतात. श्री. बिल गेट्स यांनी कोट्यवधी रुपये या योजनेसाठी दिले. ज्या संस्थांना हे पैसे दिले त्या संस्थांकडून हिशेब घेण्याचे प्रयोजन शासनाने करावे. श्री. बिल गेट्स यांनी ज्या ज्या संस्थांना पैसे दिले त्यांनी ते पैसे कसे खर्च केले, त्यांनी फक्त रॅलीज काढल्या काय ? त्यांनी नुसते सेमिनार घेतले काय ? हे शासनाने पहावे. श्री. बिल गेटस् यांनी पुढे असे म्हटले आहे की, " We should have hospitals, hundreds of them all over the country for treating AIDS cases. There must be thousands of beds for the HIV infected persons."

सभापती महोदय, आपल्याला माहीत असेल की, जे. जे. हॉस्पिटलमध्ये दोन रुग्णांनी आत्महत्या केली. जे. जे. हॉस्पिटलची परिस्थिती आपल्याला माहीत आहे. रेट्रो व्हायरल थेरपी घेण्यासाठी 1303 रुपये खर्च येतो. माननीय राज्यपालांच्या या भाषणाप्रमाणे राज्य शासनाने येत्या अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद केलेली आहे हे मला पहावयाचे आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी जो आभारप्रदर्शनाचा प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

या अभिभाषणामध्ये माननीय राज्यपालांनी शिक्षणाच्या बाबतीत आकडेवारी दिलेली आहे त्याकडे मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. 6 ते 14 या वयोगटातील सुमारे 4 लाख 30 हजार मुलांना शाळेमध्ये दाखल करण्यात आले नसल्याचे अथवा त्यांनी शाळा सोडल्याचे माझ्या शासनास आढळून आले असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये म्हटले आहे. सरकारने सर्व शिक्षा अभियान चालविले त्यामध्ये फक्त 2 लाख मुले शाळेमध्ये पुन्हा आली आणि आणखी दोन लाख मुलांसाठी सरकार प्रयत्न करणार आहे असा सरकारचा दावा आहे. सर्व शिक्षा अभियानाचा याआधीच पूर्णपणे बोजवारा उडालेला आहे. यासाठी कोट्यवधी रुपये आले होते ते अक्षरश: फुंकून टाकलेले आहेत. शाळेमध्ये किती मुले आली आणि किती खर्च झाला याचा हिशेब मांडला गेला पाहिजे. तो हिशेब पाहिला तर आलेले पैसे वाया गेले असे म्हणण्याची पाळी येईल.

सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांच्या दालनाच्या बाहेर दोन बोर्ड लावलेले आहेत. त्या बोर्डावरील आकडे पाहिले तर गेल्या पाच वर्षामध्ये शाळा सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस कमी झालेले आहे. गेल्या पाच वर्षामध्ये दोन लाख मुले कमी झाल्याचा बोर्ड आपणच लावलेला आहे. हा प्रगतीचा आलेख आहे की, अधोगतीचा आलेख आहे ? या मोहिमेमध्ये 8 ते 14 वयोगटातील म्हणजे इयत्ता आठवीपर्यंतची मुले परत आली पाहिजेत अशी परिस्थिती आहे. प्रत्यक्षात आठवीपर्यंत मुले सोडून जातात. 27 टक्के मुली पाचवीमध्ये शिक्षण सोडून जातात आणि आठवीपर्यंत मोठ्या संख्येने मुले सुध्दा शिक्षण सोडतात.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील पुढे सुरु...)

सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते

फक्त 15 मुले 10वी चा टप्पा पार पाडतात, अशी या राज्याची स्थिती आहे. या स्थितीला राज्य सरकारचे धोरण कारणीभूत आहे असे मला खेदाने म्हणावेसे वाटते. विनाअनुदान शाळांचा निर्णय या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये झाला. हा निर्णय महाराष्ट्राला मागे नेणारा आहे. याबाबतीत आंदोलने झाली. त्यावेळी शासनाने सांगितले की, फक्त उच्च शिक्षणापुरता हे विनाअनुदानाचे धोरण आहे. पुढे हे धोरण माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षणापर्यन्त लागू करण्यात आले. विनाअनुदानाचे धोरण जेव्हा प्राथमिक शिक्षणापर्यन्त येते त्यावेळी ख-या अर्थाने शिक्षणाचा हक्क हा नाकारला जात असतो हे शासनाने ध्यानात घेतलेले नाही. मात्र हेच धोरण पुढे पुढे रेटण्याचा प्रयत्न होत आहे. दरवर्षी नवनीवन शाळा काढल्या जात आहेत. शाळांची संख्या वाढत आहे. या शाळा विनाअनुदानित असल्यामुळे सहाजिकच शिक्षणाचा दर्जा हा खालावलेला असतो. एकीकडे शासन असे सांगते की, विद्यार्थी आणि पालकांचा इंग्रजी शाळांकडे ओढा आहे. खरे म्हणजे आपल्या शाळांतील शिक्षणाचा दर्जा कमी कमी होत चालल्यामुळे या शिक्षण व्यवस्थेवरील मध्यम आणि कनिष्ठ वर्गाचा विश्वास उडालेला आहे. त्यामुळे ते इंग्रजी माध्यमाकडे वळू लागले आहेत ही वस्तुस्थिती आहे. हे वास्तव जोवर दुरुस्त होत नाही तोवर यामध्ये काही दुरुस्ती होईल असे वाटत नाही. एक विषम व्यवस्था महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रामध्ये निर्माण झालेली आहे. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्यांनीच शिकावे, त्यांनीच चांगले शिक्षण घ्यावे आणि ज्यांच्याकडे पैसे नाहीत त्यांनी महानगरपालिकेच्या, जिल्हा परिषदेच्या शाळेत जावे, अशा पध्दतीची ही व्यवस्था आहे. या पेक्षा वाईट व्यवस्था वस्ती-पाडयांवर सुरु झालेली आहे. या राज्यामध्ये वस्ती-पाडयांवर किती वसतिशाळा सुरु केलेल्या आहेत? वसतिशाळा याचा अर्थ असा की तेथे पूर्णवेळ शिक्षण दिले पाहिजे. राजीव गांधी शिक्षण हमी योजना असेल, महात्मा फुले शिक्षण हमी योजना असेल, या सर्व शिक्षण हमी योजना महाराष्ट्रामध्ये याव्यात यासारखे दुसरे दुर्दैव नाही. खरे म्हणजे शिक्षण हमी योजने ऐवजी शिक्षण हक्क योजना सुरु केली असती तर त्या योजनेचे मी निश्चितच स्वागत केले असते. परंतु त्या ऐवजी साखरशाळा, भोंगाशाळा वसतिशाळा, अनुदानित शाळा, विना अनुदानित शाळा अशा वेगवेगळया शाळा सुरु केलेल्या आहेत. या शिक्षण क्षेत्रामध्ये एक नवा चातुर्वर्ण निर्माण केलेला आहे. हा नवा चातुर्वर्ण संपविणार की नाही हा खरा प्रश्न आहे. गाव तेथे शाळा, पाडा तेथे शाळा या धोरणानुसार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील...)

वसतिशाळा, साखरशाळा, अंगणवाड्या सुरु केलेल्या आहेत. पण या शाळांमध्ये शिक्षक असतात काय ? प्रत्येक इयत्तेला, प्रत्येक वर्गाला एक शिक्षक असला पाहिजे. प्रत्येक शाळेमध्ये पूर्णवेळ अनुदानित शिक्षक असले पाहिजेत. नेमक्या या व्यवस्थेपासून आपण दूर जात आहोत. आजची राज्यातील शिक्षण व्यवस्था पाहिली तर पुरोगामी महाराष्ट्र म्हणविणा-या या सरकारला छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, यांचे नाव घेण्याचा अधिकार राहिलेला नाही. येत्या वर्षभरा मध्ये शिक्षण हमी योजना पूर्णपणे बंद केली जाईल, शिक्षण सेवक योजना पूर्णपणे बंद केली जाईल अशी या सरकारने हमी द्यावी अशी माझी किमान अपेक्षा आहे. शिक्षण सेवकांच्या बाबतीत त्यांना 3 वर्षानंतर कायम करण्यात येईल असे कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट करण्यात आलेले आहे. मला कळत नाही की, या शिक्षण सेवकांची अशी फसवणूक हे सरकार का करीत आहे ? बिहारसारख्या मागासलेल्या राज्याने अडीच लाख शिक्षकांची भरती केली. दोन वर्षानंतर या शिक्षकांना पूर्णवेळ सेवेत सामावून घेतले जाते. हंगामी काळासाठी त्या शिक्षकांना महिना 5 हजार रु. मिळतात. आपल्याकडे 3 ते 4 हजार रुपये मिळतात. मुंबई महानगरपालिकेमध्ये तर दीड हजार रुपयावर शिक्षण सेवक भरले जातात. महानगरपालिकेची ही अवस्था असेल तर ग्रामीण भागाची अवस्था काय असेल याचे चित्र आपल्या डोळयासमोर येते. या शिक्षण व्यवस्थेतील हा चातुर्वर्ण संपुष्टात आणण्याची घोषणा सरकारने या अधिवेशनामध्ये करावी असे माझे सरकारला आवाहन आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत/शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये महात्मा गांधीजींनी सांगितले म्हणून ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांनी कोसबाड येथे बालवाडीचा प्रयोग केला व मॉंटेसरीला पर्याय दिला. हा बालवाडीचा प्रयोग संपूर्ण देशाने स्वीकारला. "बालवाडी" हा मराठी शब्द सर्व राज्यांमध्ये अगदी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पोहोचला. परंतु आपण याची वासलात लावली. याला हे सरकार जबाबदार नाही याची मला जाणीव आहे. केंद्रामध्ये एनडीए सरकार होते त्यांनी ही वासलात लावली. परंतु पुरोगामी सरकारमध्ये जो प्रयोग झाला त्याचे अनुकरण करण्याची गरज नाही. 6 ते 14 वयोगटातील मुलांना शिक्षण देण्याची हमी घटनेनुसार आपण घेतली आहे. परंतु 0 ते 4 वयोगटातील मुलांसाठी किती बालवाड्या सुरु आहेत? बालवाड्यांचे अनुदान थांबले. अंगणवाडी हे शिक्षण नव्हे. शिक्षणमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, उर्दू भाषेसाठी अंगणवाडया सुरु करता येणार नाहीत. अंगणवाडी हे शिक्षण नाही हे शासन मान्य करते. मग त्याला पर्याय म्हणून बालवाड्या का सुरु केल्या जात नाहीत? केवळ श्रीमंतांच्या मुलांसाठी प्ले ग्रूप, मॉंटेसरी, नर्सरी, केजी असे चार वर्ग उपलब्ध असल्यामुळे ती मुले तयार होऊन पहिल्या वर्गात जातात. गरिबांची मुले मात्र सहा वर्षाचे वय पूर्ण करुन पहिल्या वर्गात जातात. त्यांना कोणत्याही आकड्यांची ओळख नसते. पूर्वप्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूत असला पाहिजे. तो कमजोर असल्यामुळे वरचा मजला कमकुवत ठरतो. ग्रामीण भागातील, शहरातील झोपडपट्टयातील लहान मुलांना शिक्षणाची सोय शासनाने उपलब्ध करुन दिली नाही याचा उल्लेख राज्यपालांनी अभिभाषणामध्ये केला पाहिजे होता. प्राथमिक शिक्षणाची आम्ही वासलात लावली हे सांगायला हवे होते.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांनी मुंबई विद्यापीठाला 150 वर्षे पूर्ण झाली म्हणून 10 कोटी रुपये देण्याचा उल्लेख केला आहे. ही अभिनंदनाची बाब आहे. पण बाल शिक्षणाच्या सोयी, ज्याचा मी उल्लेख केला त्याची स्थिती पहा. सावित्रीबाई फुल्यांनी 160 वर्षापूर्वी या महाराष्ट्रामध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांनी सुरु केलेल्या शाळेला 160 वर्षे पूर्ण होतील. पुण्यातील भिडेवाड्यात पहिली शाळा सुरु केली होती. त्या निमित्ताने सरकार किती खर्च करणार आहे? आपण महात्मा फुल्यांचे नाव घेतो. परंतु तो भिडेवाडा विकायला निघालो आहोत. जो प्रयोग महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि फातिमा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

शेख यांनी केला त्यांचे केवळ स्मारक इमारतीच्या रुपाने करावे असे म्हणणे नाही. किमान 1 जानेवारी, 2008 पर्यंत हे बालशिक्षण पुन्हा सुरु केले जाईल याची शासनाने घोषणा करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाल कामगारांच्या संदर्भात राज्यपाल महोदयांनी अभिभाषणात उल्लेख केला आहे. राज्यातील बाल कामगार प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी शासन प्रत्येक जिल्हयात कृति दलाची स्थापना केली आहे असे म्हटले आहे. ज्या रात्रशाळांची चर्चा झाली, त्या रात्रशाळांची काय स्थिती आहे? प्रश्न केवळ शिक्षकांचा आणि व्यवस्थेचा नाही. बाल कामगार हे गरीब घरातील आहेत. त्यांचे कोणी नाही. ते स्वत: कमावतात आणि कुटुंबाला पोसतात असे बाल कामगार आहेत. खरे म्हणजे त्यांना रात्रीच्या शाळेत शिकायला लागणे ही चुकीची गोष्ट आहे. ती वास्तविकता स्वीकारुन त्या मुलांना बाहेर काढले पाहिजे. ते दिवसभर काम करतात त्यामुळे रात्री शिकायला जातात तेव्हा त्यांचा डोळा लागतो, डोळ्यावर झोप असते. शिक्षणाकडे त्यांचे लक्ष लागत नाही. रात्रशाळांमध्ये शासनाने खिचडी योजना सुरु केली. खरे म्हणजे ही मुले त्या वयामध्ये येत नाहीत. परंतु बाल कामगार असल्यामुळे दहावीपर्यंत खिचडी आणि चहाची व्यवस्था केली पाहिजे. केवळ 30 हजार संख्या संपूर्ण राज्याची आहे. ते शिकू मागतात. यासाठी किती खर्च येणार आहे? केंद्राने केले म्हणून तुम्ही द्या असे न करता राज्य शासनाने व्यवस्था केली तर फार खर्च येणार नाही. याचा उपयोग ही मुले टिकण्यासाठी होईल. मुले टिकत नाहीत, त्यामुळे तुकड्या बंद पडतात, शाळा बंद पडतात हे एक कारण आहे. ते दुरुस्त करता येईल.

सभापती महोदय, एड्सचा आणि बिल गेट्सचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला. मला वेगळ्या मुद्याकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

सभापती महोदय, एडस्चा आपणकिती बाऊ करणार आहोत. एडस्वर किती पैसे खर्च करावयाचे याला काही एक मर्यादा आहे की नाहीत? या राज्यातील गरीब जनता जास्त प्रमाणात एडस्ला बळी पडत नाही. या राज्यातील गरीब जनता कुपोषण, मलेरिया, डायरिया, छोटया छोटया आजाराला बळी पडत असते त्यामुळे याबाबत उल्लेख व्हावयाला पाहिजे होता. ग्रामीण भागामध्ये, झोपडपट्टीमध्ये जे बालमृत्यू होतात, जी माणसे मृत्युमुखी पडतात यासाठी शासनाने मोठया प्रमाणात खर्च करावयास पाहिजे. एडस्वर मोठया प्रमाणात पैसे खर्च करायला भारत काही ब्रिटन किंवा अमेरिका नाही. खरे म्हणजे एडस् फार छोटा मुद्दा आहे. हा मुद्दा छोटा असली तरी तो महत्वाचा आहे. पण ज्याने चुकीचे काम केले आहे त्याला शिक्षा मिळालीच पाहिजे. पण सर्व सामान्य जनतेला नागरी सुविधा, आरोग्याच्या सुविधा पुरवणे ही शासनाची जबाबदारी आहे. शासनाच्या दुर्लक्षामुळेच मृत्यूचे प्रमाण वाढलेले आहे त्यामुळे यासंदर्भातील जबाबदारी शासनाने उचलली पाहिजे. आता एडस्च्या निमित्ताने सेक्स एज्युकेशन शाळेमध्ये येऊ घातलेले आहे. सेक्स एज्युकेशन असले पाहिजे याबाबत माझे दुमत नाही. पण कोणत्या वयोगटात सेक्स एज्युकेशन असले पाहिजे याबाबत अनेकानी आक्षेप नोंदविलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांनी लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. किमान प्रायमरीच्या स्तरावर आपण सेक्स एज्युकेशन लादता कामा नये. कारण पाश्चात्यांची पध्दत आणि पौरात्यांची पध्दत याच्यामध्ये मोठे अंतर आहे. आपली जीवन पध्दती, संस्कृती वेगळी आहे पौरात्यांची वेगळी आहे. सगळया गोष्टींत पौरात्यांचे अनुकरण आपण करायला लागलो तर ते चांगले होणार नाही. पाश्चिमात्य देशात आता नवीन प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. त्यामुळे आपण त्या स्तरावर जाता कामा नये. त्यामुळे सेक्स एजूयूकेशनच्या संदर्भात आपण विचार करावा अशी माझी कळकळीची विनंती आहे. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या साठाव्या मुद्यामध्ये अठरा महिन्याच्या अल्पकालावधीत 38 महाप्रकल्पांसाठी 43,200 कोटीची गुंतवणूक झाली असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे मी माननीय मुख्यमंत्र्यांचे, उद्योगमंत्र्यांचे तसेच अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो. पण यामध्ये गरिबाला किती फायदा होणार, किती रोजगार आश्वासीत होणार, भूमीपुत्राला काय फायदा होणार याचा उल्लेख करणे आवश्यक होते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

ज्या भागामध्ये उद्योग येणार आहेत त्या भागातील तरुणांना त्या ठिकाणच्या उद्योगात सामावून घेण्यासाठी जी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. शिक्षणाची, प्रशिक्षणाची तंत्रशिक्षणाची व्यवस्था आपण निर्माण केली नाही तर स्थानिक माणसाला नोकरी मिळत नाही, गरीब माणसाला नोकरी मिळत नाही. तेथील मागासवर्गीयाला नोकरी मिळत नाही. त्यामुळे गरीबाला संधी मिळेल याबाबत आपण हमी देणार आहात काय? या प्रश्नाच्या संदर्भात मी ठाणे जिल्हयाचे उदाहरण देतो. माझ्या जिल्हयामध्ये तारापूर अणू वीज केंद्राचा सहाव्वा टप्प्याचे काम सुरु आहे. दुस-या बाजूला रिलायन्स एनर्जीचा मोठा प्रकल्प उभा आहे. एवढे दोन्ही मोठे प्रकल्प उभे राहूनही स्थानिकांना, तेथील भूमीहिनांना तेथील आदिवासींना, मागासवर्गीयांना, दलितांना यामध्ये हाताच्या बोटावर मोजता येतील एवढयाच जागा मिळाल्या आहेत ? प्रशिक्षणाची, शिक्षणाची सोय नसल्यामुळे स्थानिकांना कमी रोजगार मिळालेला आहे. सफाईची दोन-चार कामे मिळाली म्हणजे रोजगार मिळाला असे मी मानत नाही. या ठिकाणी एम.आय.डी.सी. असली तरी सुध्दा बेरोजगारी आहे. लोकांनी जे उद्योग उभे केले ते उद्योग लोडशेडींगमध्ये होरपळत आहेत. या ठिकाणी लोकांनी डायमेकींगचा धंदा सुरु केला परंतु वीज उपलब्ध नसल्यामुळे डायमेकींगचा धंदा पार बुडालेला आहे. म्हणजे स्वयंरोजगार बुडालेला आहे. मोठे प्रकल्प येतात परंतु त्यांना जागा मिळत नाही. स्वत: लोकांनी उभे केलेले रोजगार, स्वयंरोजगार तर विजे अभावी, सरकारच्या मदती अभावी बंद पडत आहेत. अशा परिस्थिती येथील माणूस कसा जगणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. एम.एम.आर.डी.ए. च्या संदर्भात मी मागील अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता. मुंबईमध्ये आणि मुंबईसारख्या मोठया शहरातील झोपडपट्टयांचे पुनर्वसन होतांना त्या ठिकाणी विस्थापित होणा-या मुलांना शिक्षणाची कोणतीही सोय करुन दिली जात नाही. एस.आर.ए. तसेच एम.एम.आर.डी.ए. मुळे जी गरीब मुले विस्थापित होतात ती शिक्षणापासून वंचित राहतात. गरीब विस्थापित झालेल्या मुलांच्या शिक्षणासंदर्भात कोणताही आराखडा आखला गेला नाही. गेल्या अधिवेशनात यांसदर्भात मी हा मुद्दा उपस्थित केला होता परंतु यासंदर्भात शासनाकडून काहीही हालचाल झालेली नाही. जेव्हा झोपडपट्टया हलवल्या जातात तेव्हा तेथील शाळा बंद पडते, त्या मुलांची गैरसोय होते. झोपडपट्टया हलविल्यामुळे मुंबईमधून गेल्या वर्षी 80 हजार मुले शिक्षणापासून वंचित झालेली आहेत. ही मुले परत दुसरीकडे चांगल्या शाळेत जाऊ शकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

विस्थापित झालेल्या ठिकाणी अनुदानित शाळेची सोय उपलब्ध नसते. एस.आर.ए. योजनेमध्ये आपण घराला घर देतो पण शाळेला शाळा देत नाही. शाळेला शाळा का देऊ नये. ज्याने स्वत:च्या कष्टातून ज्या या शाळा बांधल्या त्यांना अतिरिक्त एफ.एस.आय. देऊन तेथे शाळेचे पुनर्वसन शासनाने करण्याची आवश्यकता आहे. दुस-या बाजूला जे विकास प्रकल्पातून विस्थापित होतील त्यांना त्या शाळा बांधून दिल्या पाहिजेत. या विषयाच्या संदर्भात मागच्या अधिवेशनात आम्हाला आश्वासन मिळाले पण याबाबत साधी बैठक आजपर्यंत झालेली नाही. त्याकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

गृहनिर्माण धोरणाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी त्यांची मते मांडली. मी फक्त एक महत्वाचा मुद्दा उपस्थित करणार आहे, तो अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. मुंबईत जो कष्टकरी माणूस आहे, आपण स्थानिक पुत्र म्हणून ओरड करतो. या कष्टकरी काय,परंतु मध्यमवर्गीय माणसाला मुंबईत घर घेता येत नाही. आता मुंबईत नवीन घरे बांधणी होत आहे ती 700 फुटांच्यावर होत आहे. 700 फुटाचे घर कोणत्याही मध्यमवर्गीय माणसाला, नोकरदाराला, मंत्रालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्याला सुध्दा ही घरे घेता येणार नाहीत इतके जागेचे भाव वाढलेले आहेत. मुंबईत फुटाला पाच हजार रुपये भाव आहे. अगदी वाईटात वाईट भागात तीन हजार रुपये भाव आहे. त्यामुळे मुंबईतील मध्यमवर्गीय कुटुंबे वसई, विरार, डोबिंवलीच्या पुढे कल्याण, कर्जत, कसारा येथे जावे लागते, ही स्थिती आहे. या संबंध बिल्डर व्यावसायिकांना 500 फुटांच्या आतील, 400-300 चौ.फूटांच्या सदनिका बांधण्याची सक्ती केली पाहिजे. घर बांधणीची मंजुरी पाहिजे असेल, इतका एफ.एस.आय.पाहिजे असेल तर इतकी घरे कनिष्ठ मध्यवर्गीयांकरिता बांधली पाहिजेत असे बंधन आपल्याला गृहनिर्माण धोरणामध्ये या पुढच्या काळात टाकले पाहिजे. खरे म्हणजे ही शासनाची जबाबदारी होती. त्यासाठी आपण म्हाडा काढले. पूर्वी म्हाडाचा उद्देश होता की, गरिबांसाठी, मध्यम वर्गीयासाठी किंवा कनिष्ठ मध्यमवर्गियांसाठी भाड्याची घरे बांधायची. हा मूळ उद्देश म्हाडा कधीच विसरलेला आहे. आता म्हाडा स्वत: बिल्डर बनलेला आहे. म्हाडाच्या घरांचा सुध्दा 2500-3000 चौ.फूटाच्या वर भाव गेलेला आहे..म्हाडाचे घर घेणे सामान्य माणसांना तर तो खाजगी बिल्डरचे कोठून घेणार ? तेव्हा म्हाडाने त्यांच्या धोरणाचा पुनर्विचार केला पाहिजे. गिरणी कामगारांच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने जो आदेश दिलेला आहे त्याची दखल आपण घ्याल अशी मी अपेक्षा करतो. .

सभापती महोदय, मराठीच्या मुद्याकडे मी आपले एक-दोन मिनिटांत लक्ष वेधतो. फार महत्वाचा मुद्दा आहे. मराठीचा प्रश्न हा केवळ मराठी किंवा इंग्रजीचा नाही. इंग्रजी शिक्षण पाहिजे. पण मराठीचा प्रश्न हा शासनाने आणि महाराष्ट्राने स्वत:हून निर्माण केलेला आहे. या सरकारची राजभाषा काय आहे, आपण सांगू मराठी आहे, अजिबात नाही. या राज्याची मराठी भाषा इतकी संस्कृतातळी आहे की, साधे सरकारचे पत्र मराठीत शिकलेल्या विद्याविभूषित शिक्षकाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

सुध्दा वाचता येत नाही अशी भाषा असते. आदेश काय होतात निर्गमित होतात. निर्वाण होत की जातात काही पत्ता कळत नाही. फाईल नस्ती म्हणतात. मी नस्ती कटकट म्हणतो. असे किचकट शब्द कशासाठी आहेत ? मराठी राजभाषेच्या ठिकाणी जी राजभाषा संस्कृतातळी आहे त्याठिकाणी जी लोकभाषा मराठी भाषा आहे, जी व्यवहारातील मराठी भाषा आहे, त्या भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाला पाहिजे. तो जोवर आम्ही देत नाही, तोवर आम्ही मराठीचा कितीही आग्रह धरला तरी तो खरा असणार नाही. अधिकारी म्हणतात की, आम्हाला मराठी नोट कळत नाही. मग ते इंग्रजी नोट तयार करतात, काय अधिकाऱ्यांचे चूक आहे. कारण आम्ही भाषा इतकी कडक करुन ठेवली आहे की ती सामान्य माणसाला कळू नये. त्याला त्याचा अर्थच लागू नये आणि तो कागदावरती फिरत रहावा ही भाषा आपण बदलली पाहिजे याकडे मला लक्ष वेधावयाचे आहे.

एका चांगल्या मुद्याकडे राज्यपालांनी लक्ष वेधलेले आहे की,राज्य सरंक्षित स्मारकांचे जतन, दुरुस्ती, देखभाल, सुशोभिकरण, याचे मी स्वागत करतो. पण या राज्यामध्ये अनेक बौध्द लेणी आहेत. यंदाचे वर्ष हे गौतमबुध्दाचे अडीचवर्षानंतरचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. भारत सरकारने त्यासाठी विशेष कार्यक्रम जाहीर केलेला आहे, निधी जाहीर केलेला आहे. मला वाटले होते की, यात महाराष्ट्र शासनाची काही घोषणा येईल. ही जी अनेक बौध्द लेणी आहेत ती लेणी संरक्षित करणे आजुबाजूला पर्यटन सुविधा निर्माण करणे, तो परिसर सुशोभित करणे. ही लेणी पाहण्याकरिता हजारो नाही तर लाखो पर्यटक भारतात येऊ पाहत आहेत. अंजठा व वेरुळला येतात. मुंबईत तीन प्रकारची मोठी बौध्द लेणी आहेत. या सर्वांचे संरक्षण या निमित्ताने केले पाहिजे. त्याच बरोबर साहित्य संस्कृतीचा वारसा जपायचा असेल तर साहित्य क्षेत्रातील, संस्कृती क्षेत्रातील इतकेच नाहीतर सामाजिक न्यायाच्या समतेच्या चळवळीतील जे धुरीण होऊन गेले, समाजसुधारक होऊन गेले त्यांची जी ऐतिहासिक स्थळे आहेत ती आपण जपली पाहिजेत आणि संरक्षित केली पाहिजेत अशी मागणी मी या निमित्ताने करतो आणि जो प्रस्ताव ठेवलेला आहे त्याला समर्थन करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

यानंतर श्री.पुरी.....

अशोधित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, हमारे जैसे नए सदस्यों के लिए यह पहला मौका है, जब हमने जॉइन्ट सेशन में राज्यपाल महोदय का अभिभाषण सुनने का मौका मिला है. उसके बारे में धन्यवाद का प्रस्ताव हमारे सत्ताधारी पक्ष की ओर से रखा गया है. इस अभिभाषण पर विरोधी पक्ष के कई माननीय सदस्यों की बात हमने सुनी. मुझे ऐसा लगा कि राज्यपाल महोदय का अभिभाषण कोई बहुत विस्तृत रिपोर्ट नहीं है. उन्होंने जो कुछ कहा वह पिछले साल भर की सरकार की परफोरमेंस की रिपोर्ट है. उन्होंने हर विभाग के बारे में थोड़ी थोड़ी जानकारी दी है. यह अभिभाषण कस्टमरी है और महाराष्ट्र सरकार की तरफ से एक रिपोर्ट सदन के सामने रखी है. इसके ऊपर सत्ताधारी पक्ष और विपक्ष के माननीय सदस्यों की बातें मैंने ध्यान से सुनी हैं. विरोधी पक्ष के माननीय सदस्यों का ज्यादा ध्यान राजनैतिक बातों के ऊपर है. राज्य के विकास के जितने भी इन्डीकेटर्स हैं, उनको अगर देखा जाए तो पिछले एक साल में राज्य के विकास की दृष्टि से सरकार ने अच्छे काम किए हैं. राज्य के आर्थिक विकास की राह में कभी कभी प्राकृतिक आपदाएं आ जाती है. इसी प्रकार से किसानों की आत्महत्या की बात भी हमारे सामने आती है. इस प्रकार की घटनाएं केवल महाराष्ट्र तक ही सीमित नहीं है, अन्य कई राज्यों में इस प्रकार की घटनाएं हो रही है. इसके कई कारण हैं. कानून और व्यवस्था की स्थिति पर इस सभागृह में चर्चा हुई और हमारे माननीय उप मुख्य मंत्री महोदय ने आज अपनी जानकारी यहां पर पेश की है.

सभापति महोदय, हमारे औद्योगिक विकास और ग्रामीण अर्थ व्यवस्था को मजबूत करने के बारे में राज्यपाल महोदय ने जिक्र किया है और लोड शेडिंग की समस्या के बारे में सरकार की नीति की जानकारी दी. इसके अतिरिक्त स्वास्थ्य, खेल-कूद के बारे में उन्होंने बताया. मैं इन बातों को दोहराना नहीं चाहूंगा, लेकिन हमारे सभागृह के लिए यह संतोष की बात होनी चाहिए. हमारे विरोधी पक्ष के माननीय सदस्य आलोचना करते हैं, लेकिन उसके साथ साथ उनके सुझाव आने चाहिए कि सरकार को क्या करना चाहिए. इस बात की कमी रही है, उनके सुझाव बहुत कम आए हैं. महाराष्ट्र जैसे बड़े राज्य में बहुत सी घटनाएं, दुर्घटनाएं होती हैं और भ्रष्टाचार के मामले भी हमारे सामने आते हैं. अगर हम सभागृह में एक मामले को लेकर, किसी गरीब व्यक्ति के साथ क्या व्यवहार हुआ, इस बात को भावनात्मक बनाएंगे तो इससे विकास की बात ज्यादा

. . . 4G-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा . . . .

नहीं होगी. हमारे सभागृह में सरकार की त्रुटियों के बारे में ज्यादा समय दिया जाना चाहिए और बजट के बारे में विस्तार से चर्चा की जानी चाहिए. आज हमारे कुछ माननीय सदस्यों ने अच्छे सुझाव दिए हैं. सत्तारुढ़ पक्ष की ओर से राज्यपाल महोदय को धन्यवाद देना है और उसका समर्थन करने के लिए मैं यहां पर खड़ा हूँ.

सभापति महोदय, बहुत से इन्डीकेटर्स हैं, जिनसे यह मालूम होता है कि हमारे राज्य में विकास की प्रक्रिया अच्छी तरह से चल रही है. औद्योगिक विकास का रेट अच्छा है. इंटरनेशनल इकॉनॉमी का भी इसमें अच्छा योगदान है. किसानों की आत्महत्या रोकने के लिए सरकार ने बहुत सारे प्रयास किए हैं और अभी भी कुछ उपाय करना बाकी है. ग्रामीण अर्थ व्यवस्था को मजबूत करने के लिए केन्द्रीय सरकार की योजना है, लेकिन उसके साथ महाराष्ट्र सरकार की ओर से भी साथ देकर आगे बढ़ने की बात है. इसलिए अगर हम कुल मिलाकर देखें तो औद्योगिक विकास, आर्थिक विकास, खेलकूद इत्यादि क्षेत्रों में महाराष्ट्र प्रगति कर रहा है. इसके साथ साथ जवाहरलाल नेहरु नेशनल अरबन रिन्यूअल मिशन के द्वारा बहुत सारे शहरों का विकास हो रहा है. पिछड़ वर्गों का विकास करने के बारे में, आदिवासियों का विकास करने के बारे में, महिलाओं और बच्चों के वेलफेयर के बारे में हमारी प्रगति किस ओर जा रही है, इस बात का इंडीकेशन राज्यपाल महोदय ने अपने अभिभाषण में दिया है.

भाषण जारी,नंतर श्री तालेवार

अशुधारित प्रत / शुद्धिपत्र नाही

श्री सय्यद कमरुझ जामा ....

इसलिए मैं माननीय राज्यपाल जी को धन्यवाद देता हूं. कुछ बातें ऐसी भी हैं जिनका जिक्र राज्यपाल महोदय के अभिभाषण में होना चाहिए था, कुछ बातों पर प्रकाश डाला जा सकता था. उदाहरण के तौर पर कामगार क्षेत्र के बारे में प्रकाश डाला जा सकता था. चूंकि मैं कामगार क्षेत्र का प्रतिनिधित्व करता हूं इसलिए मुझे जानकारी है. औद्योगिक कामगार हो, ग्रामीण क्षेत्र में काम करने वाला मजदूर हो, खेत पर काम करने वाला मजदूर हो, दैनिक मजदूरी पर काम करने वाला मजदूर हो, सभी प्रकार के कामगार असंगठित एवं असुरक्षित है. इसलिए इस संबंध में राज्यपाल महोदय के अभिभाषण में जिक्र होना चाहिए था, चर्चा होनी चाहिए थी. हमारे महाराष्ट्र में कामगारों को संरक्षण देने संबंधी कानून तो बहुत है लेकिन उनके कार्यान्वयन में बाधा है. इन कानूनों में कमियां है, इन्फ्रास्ट्रक्चर की कमी है, लेबर मशीनरी में कमियां हैं. इसलिए इस बारे में भी ध्यान दिया जाना चाहिए. उसी प्रकार से श्रमिकों के लिए खास न्याय व्यवस्था भी है, जैसे कि औद्योगिक न्यायालय. लेकिन औद्योगिक न्यायालयों के कामकाज में सुधार करने की आवश्यकता है. औद्योगिक न्यायालयों में न्यायाधिशों की कमी है जिसकी वजह से बहुत सारी संख्या में मामले पेंडिंग है.

सभापति महोदय, यहां अभी मेरे साथियों ने कहा कि माननीय राज्यपाल के अभिभाषण में स्पेशल इकॉनॉमिक झोन के बारे में कोई उल्लेख नहीं है. चूंकि केन्द्रीय सरकार ने स्पेशल इकॉनॉमिक झोन के क्रियान्वयन पर रोक लगाई है, क्योंकि उसके क्रियान्वयन में कुछ त्रुटियां पायी गई है इसलिए उस पर पुनर्विचार किया जा रहा है. स्पेशल इकॉनॉमिक झोन के साथ पुनर्वास योजना को जोड़ने की बात भी चल रही है. इसी वजह से इस विषय का उल्लेख माननीय राज्यपाल जी के भाषण में नहीं किया गया होगा, ऐसा मुझे लगता है.

सभापति महोदय, महाराष्ट्र राज्य ने भारतीय एवं विदेशी निवेशकों के लिए औद्योगिक क्षेत्र में योजना जाहिर की है. महाराष्ट्र सरकार को विदेशी निवेश के प्रस्ताव भी मिले हैं. इस बात का माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में उल्लेख है. लेकिन औद्योगिक विकास में सबसे बड़ी समस्या लैंड एक्वीजिशन के संबंध में आती है. चूंकि लैंड एक्वीजिशन एक्ट बहुत पुराना है इसलिए इस एक्ट में अमेंडमेंट करने आवश्यकता है. ताकि जमीन प्राप्त करने में कोई कठिनाई न आए, प्रभावित लोगों का ठीक प्रकार से पुनर्वास किया जा सके और किसानों को उचित मुआवजा

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मिल सके. चूंकि लैंड एक्वीजिशन एक्ट में ठीक प्रकार से इन चीज़ों का प्रावधान नहीं है इसलिए मेरा यह सुझाव है कि लैंड एक्वीजिशन एक्ट में संशोधन करने के लिए महाराष्ट्र सरकार को पहल करनी चाहिए.

सभापति महोदय, विभिन्न क्षेत्रों के सर्वांगीण विकास के लिए वैधानिक विकास महामंडल स्थापित किए गए हैं. उन्ही में से एक है विदर्भ विकास वैधानिक महामंडल. लेकिन माननीय राज्यपाल जी के अभिभाषण में विदर्भ विकास महामंडल के बारे में कोई जिक्र नहीं है, इसका जिक्र होना चाहिए था, उस पर चर्चा होनी चाहिए. विकास योजनाओं में जो कठिनाई आ रही है, उसके बारे में भी ध्यान दिया जाना चाहिए.

सभापति महोदय, माननीय प्रधानमंत्री जी ने अल्पसंख्याक समुदाय के लिए 15 सूत्रीय कार्यक्रम जाहिर किया है और इसकी जानकारी सभी राज्यों को भेजी गई है. इस कार्यक्रम के अन्तर्गत यह प्रावधान है कि बजट में जितने भी हेड हैं, हर हेड के अन्तर्गत कम से कम 15 प्रतिशत बजट का प्रावधान अल्पसंख्याक समुदाय के लिए होना चाहिए. इसका भी जिक्र माननीय राज्यपाल जी के भाषण में नहीं है. इसलिए इस ओर भी ध्यान दिया जाना चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र के पब्लिक सेक्टर, इन्डस्ट्रियल यूनिट्स और कारपोरेशन्स के बारे में बहुत ज्यादा जानकारी नहीं है. इसमें हमारे प्रदेश के पब्लिक सेक्टर के बारे में जानकारी होना चाहिए, ताकि उनके बारे में सुधार करने की कार्रवाई हो सके. इन सारी कमियों के बावजूद माननीय राज्यपाल महोदय ने अच्छा अभिभाषण किया है, उसका मैं समर्थन करता हूँ और उनको धन्यवाद देता हूँ.

. . . . . .

. . . भाषण पूर्ण, नंतर बोरले.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

तालिका सभापती : सभागृहाची वेळ 8 वाजेपर्यंत आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आज जे सन्माननीय सदस्य बोलावयाचे राहिलेले आहेत त्या सन्माननीय सदस्यांची नावे उद्या अग्रक्रमाने घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, माझी आपल्याला अशी विनंती आहे की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलणा-या सन्माननीय सदस्यांची नावे वाचून दाखवावित.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान, सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे, श्री.राजन तेली, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर, सन्माननीय सदस्या डॉ नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी आणि श्री.शरद पाटील हे सन्माननीय सदस्य माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलणार आहेत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये वेगवेगळया प्रकारचे मुद्दे मांडण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र. 4 मध्ये असे नमूद केलेले आहे की, "आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाचा भाग म्हणून, माझ्या शासनाने पोलीस, होमगार्डस, अग्निशामक दल व स्वयंसेवक यांच्यातील 500 व्यक्तींना पूरग्रस्त परिस्थितीमध्ये करावयाच्या मदतकार्याचे प्रशिक्षण देऊन मास्टर ट्रेनर्स म्हणून तयार केले आहे...." यासंदर्भात माझी अशी सूचना आहे की, आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यक्रमात स्वयंसेवी संस्थांमध्ये कार्य करणा-या लोकांना प्रशिक्षण देऊन मास्टर ट्रनर्स म्हणून तयार करण्यात यावे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र.5 मध्ये राज्यातील विविध प्रकल्पांमुळे बाधित होणा-या व्यक्तींच्या पुनर्वसनासंबंधातील तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासंदर्भात उल्लेख करण्यात आला आहे. सभापती महोदय, राज्यामध्ये अनेक प्रकारच्या नवीन

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर .....

योजना येत आहेत. सिडको, एस.ई.झेड. आणि इतर महाकाय योजनांमुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या व्यक्तींची संख्या रायगड आणि ठाणे जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर आहेत. यासंदर्भात माझी अशी सूचना आहे की, प्रकल्पामुळे बाधित होणा-या व्यक्तींच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी ठाणे आणि रायगड येथे तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात यावे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र.7 मध्ये विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासंबंधी व शेतक-यांच्या पीक कर्जाचे पुनर्गठन करण्यासंबंधी उल्लेख करण्यात आला आहे. यावर माझी अशी सूचना आहे की, विदर्भाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी देखील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. उदाहरणार्थ ठाणे जिल्हयामध्ये मागच्या तीन महिन्यांमध्ये तीन शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही. याचा देखील या धोरणामध्ये अंतर्भाव करण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र.45 मध्ये मुंबई विद्यापीठास दीडशे वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकांसाठी प्रशिक्षण अकादमी स्थापन करण्याकरिता मुंबई विद्यापीठाला 10 कोटी रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय अतिशय चांगला आहे. यासंदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, मुंबई विद्यापीठाला 10 कोटी रुपयांपेक्षा जास्त अनुदान देण्याची आवश्यकता आहे. मुंबई विद्यापीठाने रत्नागिरी येथे बाजार भावाने जमीन खरेदी करुन उप केंद्र सुरु केलेले आहे. तेथील प्रशासकीय इमारतीमध्ये अभ्यासक्रम सुरु करण्याची आवश्यकता आहे. तसेच, इतर ठिकाणी इमारत उभी राहिली नाही तर अभ्यासक्रम सुरु होऊ शकणार नाही.

यानंतर कु.खर्चे .....

अशुद्धीत प्रत/ शीघ्रलिपी नोंदी

श्री.संजय केळकर.....

पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या निमित्ताने या उपकेंद्राला देखील निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. ठाणे जिल्हयामध्ये ठाणे आणि रायगड साठी देखील उपकेंद्राची योजना आहे, त्या योजनेकरिता देखील निधीची आवश्यकता आहे, या धोरणामध्ये देखील याचा देखील अंतर्भाव केला जावा, अशी माझी या निमित्ताने सूचना आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र.45 मध्ये असे म्हटलेले आहे की, आदिवासी क्षेत्रातील अंदाजे 25 लाख मुंलांमध्ये लोहाच्या कमतरतेमुळे त्यांना जंतनाशक गोळया देण्याचा कार्यक्रम राबविला जाणार आहे. परंतु सभापती महोदय, याचप्रमाणे तेथे पोषक आहार देण्याची देखील गरज आहे. सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये आदिवासी मुलींकरिता एक वसतिगृह चालविले जाते. सभापती महोदय आपणच म्हणतो की, " अगं अगं मुली शिक तरी, ताठ मानेने जगशील तरी " या वसतिगृहामध्ये 45 मुली शिक्षणाच्या निमित्ताने राहतात. वसतिगृहामध्ये मी त्यांचे जेवण चालू असतांना गेलो, त्यांच्याबरोबर मीही जेवलो, सभापती महोदय, तेथे विद्यार्थिनींना दिले जाणारे जेवण हे चांगल्या दर्जाचे नसते, त्यांना सकाळी वेळेवर नाश्ता मिळत नाही, शिक्षणाकरिता बाहेर पडण्याकरिता त्यांना जो डबा उपलब्ध झाला पाहिजे तोही त्यांना वेळेवर आणि व्यवस्थित मिळत नाही. संध्याकाळी आल्यानंतर वसतिगृहामध्ये निकृष्ट दर्जाचा आहार त्यांना उपलब्ध करुन दिला जातो. एका बाजूला आपल्या अर्थसंकल्पात अनेक नवीन विकासाच्या योजना येतात आणि दुस-या बाजूला आदिवासी मुलींना साधा पोषक आहार देखील दिला जात नाही. या ठिकाणी संबंधित खात्याचे माननीय मंत्री महोदय देखील उपस्थित आहे, त्यांना माझी अशी विनंती आहे की, आपण या ठिकाणी एका " व्हिजिट " देणे अत्यंत आवश्यक आहे. अशी जर सारी व्यवस्था असेल तर जव्हार,मोखाडा,तलासरी यासारख्या आदिवासी विभागातून ज्या मुली या वसतिगृहाच्या ठिकाणी शिक्षणाकरिता येतात त्या परत आपल्या गावी जातील, सदर धोरण फक्त जंतनाशक गोळयांच्याच संदर्भात न ठेवता त्या ठिकाणी पोषक आहार व्यवस्थित आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीनेही धोरणात बदल करण्यात आला पाहिजे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील क्र.64 मध्ये असे म्हटलेले आहे की, मुंबई हे जागतिक शहर बनविण्याच्या महत्त्वाकांक्षेतून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी

4J -2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

पुनर्निर्माण अभियानांतर्गत मुंबई,पुणे,नागपूर,नाशिक व नांदेड या पाच नागरी समूहांतील गरिबांसाठी 1 लाख 15 हजार घरकुले आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास केंद्रशासनाने मान्यता दिली आहे. या ठिकाणी माझी अशी सूचना आहे की, सदर अभियानांतर्गत घरकुल उपलब्ध करुन देत असतांना ठाणे येथे देखील प्रचंड नागरीकरण झाले आहे. ठाणे जिल्हयात आता सातवी महानगरपालिका होत आहे, सदर अभियानामध्ये ठाणे जिल्हयाचाही समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे, अशा प्रकारची माझी या निमित्ताने सूचना आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र.68 मध्ये असे म्हटलेले आहे की, " विजेच्या टंचाईवर मात करण्यासाठी अतिरिक्त वीजनिर्मितीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे " त्यासंबंधीचे धोरण यामध्ये मेन्शन केलेले आहे. मला याबाबत अशी सूचना करावयाची आहे की, विजेच्या टंचाईवर मात करण्यासाठी स्वामीनाथन् समितीने सुचविल्यानुसार कोकणामध्ये डोंगर द-यांवर बंधारे बांधून त्या ठिकाणी छोटे छोटे जलविद्युत प्रकल्प सुरु करण्यात यावेत. अशा प्रकारचे प्रकल्प विद्युत निर्मितीसाठी कोकणामध्ये सुध्दा सुरु होऊ शकतात.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र. 76 मध्ये पर्यटनाच्या संदर्भात असे म्हटलेले आहे की, "राज्यातील विपुल निसर्ग संपदा,कला,संस्कृती व इतिहास यांच्या सहाय्याने राज्याचा पर्यटन विकास साधता येईल ". माझी यादृष्टीने अशी सूचना आहे की, राज्याचे पर्यटन धोरण जे आहे ते अद्यापही बाल्यावस्थेतच आहे. पर्यटन विकासाच्या धोरणाच्या माध्यमातून ज्या ठिकाणी बेरोजगारी असेल त्या ठिकाणी बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देता येईल. यासाठी राज्याचे पर्यटन विकास धोरण अधिक गतिमान करणे आवश्यक आहे. गोव्याच्या पर्यटन विकासाच्या माहितीच्या आधारे पाहिल्यास राज्याचे कोकणातील पर्यटन धोरण अजूनही बाल्यावस्थेतच आहे, असे आढळून येते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र. 78 मध्ये असे म्हटलेले आहे की, "शासनाने राज्य संरक्षित स्मारकांचे जतन,दुरुस्ती,देखभाल,सुशोभीकरण व विकास या कामांमध्ये सार्वजनिक सहभाग मिळविण्यासाठी महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना सुरु केली आहे. या योजनेद्वारे खाजगी क्षेत्रातील ज्ञान,कौशल्य आणि अनुभव यांचा योग्य उपयोग करुन घेता येईल."

यानंतर श्री.सुंबरे.....

अशोधित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. संजय केळकर ...

या ठिकाणी या संबंधात माझी अशी सूचना नमूद करू इच्छितो की, ...

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहाची वेळ 8.00 वाजेपर्यंत होती. तेव्हा आपल्याला अजून किती बोलावयाचे आहे ? ...

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माझा एकच मुद्दा आहे, मी एक मिनिटामध्ये माझे भाषण संपविणार आहे. कृपया आपण मला तेवढा वेळ द्यावा.

तालिका सभापती : ठीक आहे. पण त्यासाठी मला सभागृहाची वेळ वाढवावी लागणार आहे. तेव्हा सभागृहाची वेळ मी 5 मिनिटासाठी वाढवित आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, राज्य संरक्षित स्मारकांचे जतन, दुरूस्ती, देखभाल, सुशोभीकरण व विकास करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. तर मग त्यामध्ये तमाम महाराष्ट्राचे दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे गड-किल्ले तसेच त्यांच्या वीर साथीदारांची समाधीस्थाने यांचाही त्यात समावेश करावा अशी सूचना मी या निमित्ताने करू इच्छितो.

त्यानंतर शेवटी मला या अभिभाषणातील परिच्छेद क्र. 84 संबंधित सांगावयाचे आहे. यामध्ये 26 जानेवारी 2007 रोजी राज्यातील न्यायालयांसाठी वेबसाईट सुरू करून त्याद्वारे सर्व न्यायालयांतील प्रकरणांबाबतची अद्ययावत माहिती संगणकाद्वारे ताबडतोब मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे आणि ही सुविधा मुंबई येथील नगर दिवाणी व सत्र न्यायालयांना आणि मुंबई येथील इतर दुय्यम न्यायालयांना देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे असे म्हटलेले आहे. तेव्हा या संबंधात माझी सूचना अशी आहे की, राज्यातील नव्याने निर्माण करण्यात आलेल्या तालुक्यांना आणि नागरीकरण झालेल्या भागांमध्ये देखील न्यायालय सुरू करण्याचे धोरण आपण स्वीकारावे. उदा. वसई येथे न्यायालयाची इमारत बांधलेली आहे मात्र तेथे न्यायालय सुरू करण्याच्या दृष्टीने तरतूद झालेली नाही म्हणून न्यायालय सुरू झालेले नाही. तरी त्यासाठी तरतूद करून ते सुरू करावे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, या एकूणच अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करून हे अभिभाषण सर्वस्पर्शी नसल्याने, सर्व विषयांना न्याय देणारे नसल्याने आणि महाराष्ट्रातील सर्व घटकांना न्याय देणारे नसल्यामुळे मी त्याबद्दल खेद व्यक्त करतो. धन्यवाद.

****

..... 4के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या, शनिवार, दिनांक 17 मार्च, 2007 रोजी सकाळी 10.00 वाजता भरेल. सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 ते 10.45 वाजेपर्यंत होईल आणि त्यानंतर सकाळी 11.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 02 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 17 मार्च 2007 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही